म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १८३८

# महाराष्ट्र लोकसाहित्य माला

## पुष्प पांचवें

संपादिका
**डॉ. सरोजिनी बाबर**
एम्. ए., पीएच्. डी.
अध्यक्ष, महाराष्ट्र लोकसाहित्य समिति,
महाराष्ट्र सरकार.

REFBK-0011979
REFBK-0011979

महाराष्ट्र लोकसाहित्य समिति, पुणें.

अनुक्रम 36368 वि: कादंबरी
क्रमांक 9535 नों. दि. 22-12-

# महाराष्ट्र लोकसाहित्य माला

## पुष्प पांचवें

REFBK-0011979

REFBK-0011979

संपादिका

**डॉ. सरोजिनी बाबर**

एम्. ए., पीएच्. डी.

अध्यक्ष, महाराष्ट्र लोकसाहित्य समिति,

महाराष्ट्र सरकार.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
११९८७

महाराष्ट्र लोकसाहित्य समिति, पुणें.

प्रकाशक :
जिल्हा शिक्षणाधिकारी,
चिटणीस महाराष्ट्र लोकसाहित्य समिति, पुणे १.

मुखपृष्ठ:—चित्रकार, श्री. दीनानाथ दलाल
छायाचित्रें:—डॉ. सरोजिनी बाबर

प्रथमावृत्ति १९६१

किंमत चार रुपये

मुद्रक :
श्री. दा. त्र्यं. जोशी, बी. ए. (टिळक),
चित्रशाळा प्रेस, ५६२ सदाशिव पेठ, पुणे २.

महाराष्ट्र सरकारनें नियुक्त केलेली

# महाराष्ट्र लोकसाहित्य समिति

## पदाधिकारी मंडळ

अध्यक्ष

डॉ. सरोजिनी बाबर

चिटणीस

जिल्हा शिक्षणाधिकारी, पुणें

सभासद

श्री. सोपानदेव चौधरी

श्री. पी. सावळाराम

श्री. ना. रा. शेंडे

श्री. प्रा. वामनराव चोरघडे

श्री. न. शं. पोहनेरकर

श्री. बी. जी. हरसूलकर

# आमचीं प्रकाशनें

**पुष्प १ लें :—**

लोकगीतें, लोककथा व संकीर्ण.

**पुष्प २ रें :—**

नगरी, खानदेशी व संकीर्ण लोकसाहित्य.

**पुष्प ३ रें :—**

दंतकथा, दैवतकथा व देवताचार.

**पुष्प ४ थें :—**

महाराष्ट्रांतील आदिवासींचें लोकसाहित्य.

[ हीं सर्व पुस्तके संपादक 'जीवन शिक्षण,' C/o ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन, पुणें २. येथें मिळतील. ]

किंमत प्रत्येकीं तीन रुपये

# संपादकीय

गेल्या जानेवारी महिन्यांत महाराष्ट्र सरकारनें महाराष्ट्र राज्याच्या लोक-वाङ्मय-समितीची स्थापना केली. जुन्या मुंबई राज्यांतील त्यावेळच्या महाराष्ट्रा-पुरत्या मर्यादित असलेल्या ह्या समितीची यावेळीं पुनर्रचना करण्यांत आली. मराठवाडा व विदर्भ या भागांतील व पश्चिम महाराष्ट्रांतील अशा एकूण सात सभासदांची ही समिति बनविण्यांत आली.

जुन्या काळच्या मुंबई राज्यांत देखील अशीच एक मुंबई राज्याची म्हणून लोकवाङ्मय समिति स्थापन करण्यांत आलेली होती. त्यावेळीं कर्नाटक, गुजराथ व महाराष्ट्र अशा वेगवेगळ्या भाषिक विभागांचेसाठीं, याखेरीज वेगवेगळ्या विभागीय समित्या देखील स्थापन झालेल्या होत्या. आणि महाराष्ट्रासाठीं म्हणून त्यावेळीं स्थापन झालेल्या समितीचें मराठी विभागापुरतें भरीव असें काम देखील चालू झालें होतें.

लोकसाहित्याचें संशोधन, संपादन, ध्वनिमुद्रण व लोककलांचें व कलाकारांचें छायाचित्रण अशा निरनिराळ्या प्रकारांनीं हें काम महाराष्ट्रांत चालू होतें. महा-राष्ट्राच्या त्या वेळच्या ह्या समितीच्या अध्यक्षपदीं कै. चिं. ग. कर्वे यांची नेमणूक करण्यांत आली होती व तें काम त्यांनीं हौसेनें पार पाडलें होतें. त्यामुळें नवीन महाराष्ट्राच्या स्थापनेचा विचार सुरू झाल्यापासूनच सर्व मराठी विभागांची एक

मोठी समिति या कामीं सरकारनें नेमावी अशी त्यांची विशेष इच्छा होती. त्यासंबंधीं या समितीच्या वतीनें त्यांनीं सरकारशीं पत्रव्यवहार केला होता. बोलणींहि केलीं होतीं.

परंतु श्री. कर्वे ही गोष्ट पुरी होत असतांनाच दुर्दैवानें अचानक स्वर्गवासी झाले! त्या कारणानें त्यावेळीं इतर सभासदांची भारीच चमत्कारिक अवस्था होऊन बसली. या समितीचें कामकाज कोणीं व कसें चालवावयाचें येथूनच अनेक प्रश्न पुढें आले. तशांतच श्री. कर्व्यांनीं आपल्या हयातींतील या समितीच्या अखेरच्या सभेंत असा निर्णय घेऊन टाकला होता कीं, या वर्षीचा या समितीच्या वतीनें प्रकाशित होणारा ग्रंथ हा मराठवाडा विभागाचा विशेषांक म्हणून प्रकाशित होईल. त्याप्रमाणें त्यांनीं सर्वांचेकडे कांहीं काम देखील वांटून दिलें होतें. मराठवाड्यांतील लोकसाहित्याबाबत कोणाकोणाशीं पत्रव्यवहारहि केला होता.

पण श्री. कर्वे गेले न् हें सारेंच काम अचानक आकसून जावें तसें झालें. मुख्य सूत्रधारच गेल्यानें या संदर्भांत किती व काय काय घडलें याचा कोणालाच पत्ता लागणें शक्य होईना ! कोणीं कोणाला विचारायचें ? साराच प्रश्न ! म्हणून या समितीच्या चिटणिसांनीं या समितीची एक सभा घेऊन असा निर्णय सर्वानुमतें घेतला कीं, ह्या वेळच्या ग्रंथाचें संपादन मीं स्वतः व सौ. अनुताई लिमये यांनीं करावें. आणि मुख्य म्हणजे हाताशीं असलेल्या थोड्या वेळाचा उपयोग अधिकांत अधिक करून मार्च अखेरीस हा ग्रंथ प्रकाशित व्हावा.

त्यामुळें स्वाभाविकच श्री. कर्व्यांनीं मजकडे सोंपविलेल्या 'भक्तगणां'च्या विभागाच्या जुळवाजुळवीसाठीं व संपादनासाठीं माझे प्रयत्न मी सुरू केले. तसेंच सौ. अनुताई लिमये यांनीं पूर्वीं ठरल्याप्रमाणें 'सूची' तयार करायला घेतली. परंतु त्या देखील अचानकच आजारी झाल्यामुळें कामाचा साराच भार माझ्याकडे सोंपविला गेला.

दरम्यानच्या काळांत महाराष्ट्र सरकारनें नव्या महाराष्ट्राची लोकसाहित्य समिति जाहीर केली ! त्यामुळें या कामाला आणखीनच वेगळें वळण मिळालें ! ! कारण माझ्याखेरीज या नव्या समितींत जुन्या समितीपैकीं कोणीच सभासद नव्हते आणि नव्या समितीच्या अध्यक्षपदीं माझी स्वतःचीच निवड झालेली ! शिवाय

सगळेच सभासद नवीन व लांबलांबच्या ठिकाणीं राहणारे. तशातच हाताशीं वेळ फारच थोडा उरलेला. काय करावें हा मोठाच प्रश्न माझ्यापुढें उभा राहिला. तरीपण शिक्षणखात्याच्या वरिष्ठांशीं चर्चा करून या ग्रंथासंबंधीं मी एक वेगळा निर्णय घेऊन टकला व नव्या समितीची सभा तातडीनें घेण्याची चिटणिसांना सूचना देऊन मी कामाला लागलें.

त्या कारणानें स्वाभाविकच सर्व परीच्या कामाला एकदम वेगळें वळण लागलें.श्री. कर्व्यांनीं ठरविला होता तो लोकसाहित्य मालेचा मराठवाडा विशेषांक काढण्याचा विचार मागें ठेवावा लागला. कारण एक तर या वेळेपावेतों फारच थोडें लोकसाहित्य मराठवाडा विभागांतून हातीं आलें होतें व नजीकच्या काळांत तें फारसें मिळण्याची शक्यता नसल्याचें स्पष्ट दिसत होतें. म्हणूनच हा निर्णय बदलावा लागला; व नव्या समितीची अध्यक्ष या नात्यानें मला माझ्या हातीं असलेल्या फारच थोड्याशा कालमर्यादेत माझ्या स्वतःच्या संग्रहीं असलेल्या साहित्यावर आधारित असें या समितीचें पांचवें पुष्प तयार करणें भाग पडलें.

दिनांक ७ फेब्रुवारी १९६१ रोजीं भरलेल्या या समितीच्या पहिल्या बैठकीनंतरच मला ही जुळवाजुळव करावी लागली, त्यामुळें श्री. वामनराव चोरघडे यांना मीं प्रस्तावना लिहावयाची विनंति केली. इतरांचेकडून लेख लिहवून घेतले. परंतु या समितीच्या सर्व सभासदांचेकडून नवीन कांहीं मिळवून आणणें वेळे-अभावीं शक्य झालें नाहीं. तथापि मला जेवढें म्हणून कांहीं नावीन्य या संग्रहांत आणणें शक्य झालें तेवढें तें आणण्याचा मीं कसोशीनें प्रयत्न केला. आवश्यक ते वेगवेगळे विभाग पाडून विभागवार संपादनहि जमेल तेवढें केलें; आणि मुख्य म्हणजे मिळालेलीं लोकगीतें ज्यांचेकडून मिळालीं त्यांच्या विनंतीप्रमाणें तीं मिळालीं तशींच छापलीं जातील हेंहि पाहिलें.

त्यामुळें सामान्य माणसांनीं कथा-कीर्तनांच्या व पुराणांच्या श्रवणामुळें कानावर पडलेली भाषा जशी येथें वापरलेली आढळते, तशीच कथा सांगण्याच्या ओघांत आपली नित्याची बोलीहि वापरलेली आढळून येते. त्याचप्रमाणें येथें पुढारलेल्या वर्गाकडून मिळालेल्या लोकगीतांनीं त्यांचेवर पडलेली संस्कृत भाषेची छाप देखील ध्यानांत येते.

वास्तविक लोकसाहित्याचें या प्रकारचें प्रकाशन करीत असतांना ज्या वेगवेगळ्या गांवांतून हें साहित्य मिळालें त्या गांवांचीं नांवें, हें साहित्य ज्यांनीं दिलें त्यांचीं नांवें व त्यांनीं तें कसें पैदा केलें त्याची माहिती दिली असती तर अधिक चांगलें झालें असतें. त्यामुळें लोकसाहित्यांतून ध्यानांत येणाऱ्या सामाजिक इतिहासाची कल्पना येण्यास मदत झाली असती. भाषाशास्त्राच्या दृष्टीनें काल-मर्यादा ठरविण्यासहि त्याचा उपयोग झाला असता. उच्चारशास्त्राच्या विचारास देखील त्याची मदत झाली असती.

त्याचप्रमाणें जागोजाग प्रादेशिक अशा विशिष्ट शब्दांचे अर्थहि देणें अशा ग्रंथांसाठीं अगत्याचें असतें. त्याकारणानें वाचणारास अर्थ समजावून घेणें सोपें जातें व ह्या साहित्याशीं स्नेह जोडतां येतो.

परंतु ही सर्व जाणीव असूनहि वेळेच्या अभावीं मला ह्या गोष्टी यावेळीं करणें शक्य झालें नाहीं. त्याचप्रमाणें येथें आलेल्या लोकगीतांच्यापैकीं कांहींचें स्वरलेखनहि देतां आलें असतें तर तें मला हवें होतें. पण वेळेच्या मर्यादेमुळें तेंहि शक्य झालें नाहीं. पुढच्या प्रकाशनांत ह्या उणीवा दूर करण्याचा शक्यतों प्रयत्न केला जाईल.

देवादिकांचीं गाणीं, श्रीकृष्णाचीं गाणीं व सांस्कृतिक जीवन यासंबंधींचा सविस्तर भाग येथें देतांना मी श्री. कव्यांनीं जुन्या समितीच्या कारकीर्दींत मजकडे सोंपवलेला भक्तगणांचाहि भाग येथें दिलेला आहे. परंतु सौ. अनुताई लिमये यांनीं त्यांना विनंति करूनहि 'सूची' चें हस्तलिखित आमचेकडे दिलें नसल्या-मुळें त्याचा येथें समावेश करतां आला नाहीं. तरीपण देवादिकांचे संबंधींचा सामान्यांचे मनांतील असामान्य भाव व आमच्या संस्कृतीच्या संवर्धनाची आमची रीत मी येथें शक्य तेवढ्या विविध प्रकारांनीं देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

महाराष्ट्र लोकसाहित्य समितीच्या वतीनें प्रकाशित होणाऱ्या या ग्रंथाचें आणखी एक ठळक वैशिष्ट्य म्हणजे या ग्रंथाच्या दुसऱ्या भागांत दिलेले लेख हें होय.

हे लेख आमच्या विनंतीला मान देऊन निरनिराळ्या लेखकांनीं फारच थोड्या कालावधींत लिहून आमचे हातीं दिले आहेत. या लेखांचे विषय निर-निराळे आहेत. त्याचबरोबर या लेखकांनीं बहुतेक सर्व मराठी प्रदेशांतील लोक-

साहित्याचा आपल्या लेखनासाठीं वापर केलेला आहे. त्यामुळें हा ग्रंथ बराच सर्वांगीण होणें शक्य झालेलें आहे.

या लेखांचे लेखक त्या त्या विषयांतील अधिकारी मंडळी आहेत. त्या सर्वांच्या या सहकार्याबद्दल समितीच्या वतीनें मी त्यांचे आभार मानतें. तसेंच मुंबईचे प्रसिद्ध चित्रकार श्री. दीनानाथ दलाल यांनीं आम्ही विनंति करतांच फारच अल्पावधींत या संग्रहाच्या मुखपृष्ठावरील सुंदर चित्र काढून दिलें त्याबद्दल ही समिति त्यांचीहि ऋणी आहे.

या संग्रहाची छपाई चालू असतांना पुणें जिल्ह्याचे असि. डेप्यु. एज्यु. इन्स्पेक्टर श्री. शं. ल. थोरात यांनीं वेळोवेळीं प्रुफें वाचण्यासाठीं जी मदत दिली त्याबद्दल व हा संग्रह वेळेवर छापून देण्यासाठीं चित्रशाळेच्या चालकांनीं जी मेहनत घेतली त्याबद्दल देखील समितीच्या वतीनें मी त्यांचे आभार मानतें.

सरोजिनी बाबर
अध्यक्ष,
महाराष्ट्र लोकसाहित्य-समिति, पुणें.

३१ मार्च, १९६१.

# प्रस्तावना

प्रस्तुत पुस्तकाला प्रास्ताविक मीं लिहावें इतका लोकसाहित्याचा मर्मस्पर्शी व्यासंग माझा नाहीं. मला लोकसाहित्य आवडतें आणि मिळेल तसें मी तें वाचतों. या साहित्याबद्दल आस्था असणें हाच सध्यांचा माझा अधिकार; प्रस्तावनेच्या निमित्तानें हें पुस्तक मला वाचायला मिळालें हीच माझी कमाई.

या पुस्तकाचें प्रकाशन व्हावें असें ता. ७ फेब्रुवारी १९६१ ला ठरलें. अखेरची तिथि ३१ मार्च १९६१. दीड महिन्यांत सर्व जुळवाजुळव करून अशक्य तें शक्य करून दाखविण्याचा आटोप महाराष्ट्र लोकसाहित्य समितीच्या अध्यक्ष डॉ. सरोजिनीबाई बाबर यांनीं साधला. त्याबद्दल त्यांना श्रेय दिलेंच पाहिजे. इतक्या घाईत प्रस्तावना आपल्याचपैकीं कोणाशिवाय उपलब्ध होणार नाहीं, हें ताडून मजकडे हें काम त्यांनीं सोपविलें. मी त्यांचा फार आभारी आहें.

लोकसाहित्यांत ज्या जीवनाचें प्रतिबिंब उमटलें असतें तें जीवन आणि आजचें जीवन यांत इतका फरक पडला आहे कीं, लोकसाहित्य कशाला म्हणावें? त्याचा संग्रह कशाला करावा आणि तो केल्यानें लोकांचें हित तें काय? हे प्रश्न महत्त्वाचे ठरले आहेत. समाज, धर्म, संस्कृति यांचें अध्ययन करून जीवनमूल्यांचें पुनर्मापन करणाऱ्या अधिकारी व्यक्तीसाठीं लोक साहित्यसंग्रह उपलब्ध करून

द्यावा, कीं सर्वसामान्य माणसाला रस घेतां येईल अशा रीतीनें त्याचें संपादन करावें, हा देखील प्रश्न आहेच.

लोकशाहीच्या जमान्यांत सर्व कांहीं लोकांसाठींच करावयाचें असतें. आपण या देशांतील लोक, आपल्याला परंपरा आहे व तीहि अशी तशी ओढून ताणून आणलेली नाहीं, याची जाणीव आजच्या जनतेला झाली तर संभ्रमित अशा मनःस्थितींतून आत्मविश्वास जागाविण्याला आणि आत्मप्रत्यय बाणावयाला मदत होईल. आज आपल्याला परंपरेचा अभिमान आहे पण तिचें ज्ञान नाहीं, ती समजत नाहीं, म्हणून समजून घेण्याची आस्थाहि राहिली नाहीं. जुन्या भाषेची आपली व्याख्या इतकी कामचलाऊ झाली आहे कीं, पित्याची भाषा त्याच्या मुलाला समजेल कीं नाहीं असा पेंच कदाचित् निर्माण व्हावा. मराठींत लिहिलेल्या ज्ञानेश्वरीचा अभिमान बाळगूनहि ज्ञानेश्वरी न समजणारे आणि न वाचणारे आम्ही पुष्कळच आहोंत. अशा स्थितींत लोकसाहित्याचा नुसता संग्रह, संकलन, उपयोगी पडेल कीं काय कोण जाणे ! संकलनाबरोबरच टीपा, समीक्षण, रसग्रहण आवश्यक आहे. आजच्या गाइडच्या युगांत मुद्दाम बैठक मारून लोकसाहित्याचें रसग्रहण करणें दुष्करच.

लोकांसाटीं असलेलें, लोकांचें आणि लोकांकडून निर्माण झालेलें ( केलेलें नव्हे ! ) तें लोकसाहित्य ! आज तें लोकांना श्रेय वाटत नाहीं याचें कारण त्याचें मर्म त्यांना समजत नाहीं. तें समजावून दिलें गेलें पाहिजे आणि त्याच दृष्टीनें लोकसाहित्याचा संग्रह व्हावा. असें लोकसाहित्य संख्येनें कमी प्रसिद्ध झालें तरी बहुपरिणामी होईल. कारण त्यांतून लोकांची उत्कटता जागेल !

उत्कटतेमधूनच साहित्य स्फुरतें, जीवन आनंदमय होतें. ही उत्कटता आज राहिली नाहीं असें म्हणण्यापेक्षां, ज्या कोणत्या भावनांच्या उत्कटतेंतून आपलें लोकसाहित्य निर्माण झालें त्या भावना, श्रद्धा, निष्ठा आज बदलल्या असून त्यामुळेंच साहित्याची परंपरा आणि प्रस्फुरण बंद झालें आहे. आज ज्या कोणत्या निष्ठांच्या उत्कटतेंतून साहित्य निर्माण होतें, त्या साहित्याला लोकसाहित्य मानलें जात नाहीं. आपली लोकसाहित्याची व्याख्या कर्मठ झाली आहे.

समाजाचें प्रतिबिंब साहित्यांत उमटतें कीं साहित्याचा ठसा समाजावर उठतो ? वाल्मिकीनें रामायण रचल्यानंतर राम निर्माण झाला असें सांगतात. साहित्यामध्यें आदर्श जीवन असलें पाहिजे असें ज्यांचें प्रतिपादन असतें, त्यांचा

या तत्त्वावर विश्वास बसायला हरकत नाहीं. ज्या काळाचें साहित्य असतें त्या काळाचा ठसा त्यांत उमटतो हें एका अर्थानें खरें असतें. पण तो ठसा गौण असतो.

आदर्श जीवनाला जेवढ्या वास्तवाची गरज असेल, तेवढेंच वास्तव आधाराला म्हणून साहित्यांत असावें. उदाहरणच द्यावयाचें तर साहित्यांत वर्णन केलेला राजा वास्तव जीवनाप्रमाणें कधीं सिंहासनावर बसेल, कधीं परांच्या गाद्यांवर लोळेल, तर कधीं स्प्रिंगच्या सोफासेटवर विराजमान होईल, आणि रबराच्या बनविलेल्या गाद्यांवर लोळेल. पूर्वीचे योद्धे रथांतून धनुष्य-बाणाच्या साहाय्यानें लढत; तर आजचे योद्धे विमानांतून बॉम्बगोळ्यांच्या साहाय्यानें लढतात. लेखकाला योद्ध्याच्या मनःस्थितीचें वर्णन करावयाचें झाल्यास कालवैसादृश्य येऊं नये म्हणून तो आधाराला रथ किंवा विमानाचा उल्लेख करील, परंतु मानवी मनाचे व्यापार जे पूर्वी होते तसेंच आजहि असूं शकतील. पूर्वीचा योद्धा मुलांबाळांचा व पत्नीचा जड अंतःकरणानें निरोप घेऊन रथांत पाय ठेवीत असे,तर आजच्याहि योद्ध्याचें जड अंतःकरण पूर्वीच्याच भावनांनीं विकल होईल. फरक एवढाच कीं, असा निरोप घेऊन तो विमानांत पाय ठेवील. मानवी मनाचे चिरंतन भाव इथून-तिथून सारखेच असतात. दुःखाचे, आनंदाचे, द्वेषाचे, मत्सराचे, क्रोधाचे, कामाचे विषय बदलतील, पण सुख, दुःख, द्वेष, मत्सर, क्रोध हे तसेच राहतील.

लोकसाहित्य आणि शिष्टसाहित्य या दोन साहित्यांत असलेली सीमारेखा भिंतीसारखी अपारदर्शक आहे असें समजायला कारण नाहीं. समाजजीवन बदललें, सामाजिक मूल्यांचें पुनर्मापन झालें आणि त्याचा मागमूस लोकसाहित्यांत मिळत नाहीं, म्हणून कदाचित् साहित्यशास्त्रकारांनीं असा भेद कल्पिला असावा. लोकसाहित्य म्हणून आपण ज्याला म्हणतों त्याचें सर्जन आज होत नाहीं, म्हणूनहि हा भेद कल्पिला गेला असावा. कारण आज निर्माण होणाऱ्या लोकसाहित्याचा आधारदेखील जुना जमानाच असतो. खेड्यापाड्यांतून आजदेखील सामाजिक समारंभाच्या वेळीं, धार्मिक सणांच्या वेळीं, जें नवें साहित्य निर्माण होतें त्यांत जुन्या जीवनाचाच आधार दिसतो. लोककवि दंढारीमध्यें जीं पात्रें योजतो त्या पात्रांपैकीं नायक हा उत्तम घोड्यावर बसूनच येतो. त्याचा घोडा थयथय् नाचत असतो. मग त्या कवीला त्याच्या आजवरच्या हयातींत त्याच्या गांवच्या पंचक्रोशींत उत्तम घोडा दिसला नाहीं तरी त्याचें फारसें अडत नाहीं. शिष्टसाहित्यामध्यें आजच्या यंत्रयुगाचा ठसा अवचट उमटत असल्याचा प्रत्यय येतो, तसा

लोकसाहित्यांत येत नाहीं. कोठ्यवधि जनता आजच्या यंत्रयुगानें प्रभावित होऊन सुद्धां तिच्या मुखांतून निघणारा साहित्याचा उद्‌गार यंत्रयुगाच्या महिम्यानें किंवा निषेधानें लिप्त नसतो. लोकवाङ्मयांत मला आगगाडीसंबंधीं एक उखाणा आढळला. यंत्रासंबंधींचा तो उखाणा, “हज्जार आले, हज्जार गेले, हज्जार बसले पारावर,” या पदानें सुरू होतो. हा उखाणा जिंकायचा तर आगगाडी असें म्हणतां येईल. शहाण्यानें घातलेल्या उखाण्याचा मूर्खाला फासा पडत असतो; अशी म्हण आहे. या आगगाडीच्या उखाण्यांत आगगाडीच्या दणदणाटाचें कौतुक आहे. परंतु थोडासा गर्भित असा नैतिकतेसंबंधींचा उल्लेख असा आहे कीं, ज्यायोगें यंत्रयुगासंबंधीं भीतियुक्त कौतुक असलें तरी त्याच्या अनुकरणाची तयारी नाहीं.

लोकगीतांमध्यें काय, लोककथेमध्यें काय किंवा लोकवाङ्मयांतील उखाणे व म्हणी यांमध्यें काय, भारतीय, सामाजिक आदर्शांचाच अजूनहि उल्लेख आढळतो, तो आपल्याला कालविसदृश येवढ्यासाठींच वाटतो कीं, आपण भारतीय जीवनाचें मूल्यमापन इंग्रजी कांट्यानें करीत असतो. पाश्चात्य शिक्षणाचा संस्कार झाल्या-मुळें अशी वृत्ति निर्माण झाली आहे व त्यामुळें आपल्या संस्कृतीची पूर्वपीठिका जणूं काय युरोपचीच आहे असें आपल्याला वाटावयास लागलें आहे. खरी गोष्ट अशी आहे कीं, आपलें सामाजिक जीवन आणि पाश्चात्यांची मनोभूमिका भिन्न आहेत. पाश्चात्यांमध्यें गाईला आत्मा नसतो, तर आमच्या साहित्यांत गाईला प्रमुख असें स्थान आहे. गाय भारतीय जीवनांत आईच्या स्थानीं जाऊन बसली आहे आणि तिच्यावर सुंदर अशी काव्यरचना लोककवींनीं केली आहे.

गाई हंबरती । वासरांच्या माया
सोडी बिरडें देवराया । प्रपंचाचें ॥

किंवा

धेनु हंबरती । वासरं कुठें गेलें
गंगेच्या पाण्या नेलें । सावळ्या कृष्णाजीनं ॥
पहांटच्या प्रहरीं । धेनु झोपी गेल्या
मुरलीनें जाग्या केल्या । सावळ्या कृष्णाजीच्या ॥

स्त्रीप्रमाणें गायहि आपल्यासाठीं तळमळते. गीता सांगणाऱ्या श्रीकृष्णाचा आवडता छंद सकाळीं गाईंना जागे करण्याचा होता. या उल्लेखांतून आपल्यावर

पगडा बसलेल्या पाश्चात्य कल्पना आणि आमच्या समाजांत रूढ झालेल्या भारतीय कल्पना यांतील वैसादृश्य स्पष्ट होतें. आमच्या देशांतील समाजाची, साहित्याची व विशेषतः लोकसाहित्याची धारणा व स्थिति वेगळ्या प्रकारची आहे. आमचें सामाजिक जीवन राजकारणप्रधान नव्हतें आणि नाहीं. सामान्य समाजजीवनांत खास व आम असे भेद नव्हते. लोककथांतील राजेरजवाडे गरिबांची उपेक्षा करीत नसत. आर्यसंस्कृतीमध्यें लोकभेदापेक्षां लोकसंग्रहाला पॉलिसी म्हणून नव्हे तर मूलतत्त्व म्हणून महत्त्व होतें. ‘ सर्वेषां अविरोधेन ब्रह्मकर्माणि साधयेत् ’ ह्या तत्त्वाचा ज्या लोकजीवनांत समावेश झाला आहे त्या लोकजीवनांत गरिबांचें मूल श्रीमंतांच्या मांडीवर आणि श्रीमंतांचें मूल गरिबांच्या झोपडींत वाढविणाऱ्या लोककथा आपल्याला दिसतील. लोकसाहित्यांत मोडणाऱ्या जातककथांपासून तों सिंहासनबत्तिशी, शुकबहात्तरी, बिरबल बादशहाच्या गोष्टी इत्यादिपर्यंत कथांमधून आपल्याला भारतीय समाजजीवनाचें वैशिष्ट्य कायम टिकलेलें दिसेल.

हें वैशिष्ट्य काय होतें ? जुन्या काळचे प्रवासी मन रमविण्यासाठीं ज्या कथा सांगत किंवा ऐकत त्यांतून कोणत्या प्रकारचें ज्ञान आपल्याला मिळत होतें ? मानवी स्वभाव सगळीकडे सारखाच आहे, सुखदुःखाचीं कारणेंहि सारखींच आहेत; सुखानें सगळ्यांचें हृदय फुलतें, दयेनें द्रवतें, दुःखानें पाझरतें; अशाच कल्पनांचा आढळ आपल्याला त्यांत दिसेल. धार्मिक आचार, स्मृतींचे नियम, राजा व धर्मगुरु यांच्या आज्ञा, असल्या एक ना दोन अनेक गोष्टींनीं आपलें मन आणि हृदय जखडलें गेल्यामुळें आपला साहित्याचा उद्गार जसा कृत्रिम असतो, शिष्टाचाराप्रमाणें भासतो, तसें लोकसाहित्यांत होत नाहीं. तें अनिर्बंध किंवा कृत्रिम बंधनापासून अलिप्त असतें. लोककथांतील राजेलोक आपलें वैभव पूर्णपणें उपभोगूनहि स्वतःची माणुसकी आणि प्रजाकल्याणाची वृत्ति कधींहि विसरत नाहींत. या वाङ्मयातील लुटारू, ठग, बिलंदर चोर हे देखील गरिबांचे वाली बनतात आणि जनतेची सहानुभूति मिळवितात. दुष्ट म्हटला कीं तो सर्वदूर दुष्टच, दंडनीयच, अशी लोकसाहित्याची धारणा नसून दुष्टांतहि चांगुलपणा असूं शकतो, हा मानवी हृदयावरचा विश्वास आढळतो. लोकसाहित्यांतील वीर पुरुष व फकीर देखील आपल्याला अनुकरणीय एवढ्यासाठींच वाटतात कीं त्यांचें वीरत्व किंवा फकिरी अलौकिक नसून लौकिक जीवनांतून, सामान्य माणसासारखें वागण्यांतूनच प्रकट झालेलीं असतात. लोकसाहित्याची अभिरुचि सकस आणि साधी असते. त्यांत धर्मशास्त्राइतकी पापांची मोजदाद नसते. मानवी स्वभावाची घडण ध्यानीं

धरून त्याला काय शक्य आहे आणि काय अशक्य आहे हेंच त्यांत विशद केलेलें असतें. लोकसाहित्याचा दंडविधि आजच्या न्याय व अन्याय यांच्या कसोटीला उतरत नाहीं. लोककथांमध्यें जी शिक्षा लुटारूला मिळते, तीच कंजूष माणसाला मिळते. कारण समाजजीवनाच्या दृष्टीनें दोघांचाहि समाजद्रोह सारखाच असतो. जे बलवान् आहेत, जे योजक आहेत, जे चतुर आहेत, तेच या दुनियेंत टिकतात व टिकतील, ही भौतिक शास्त्राची शिकवण लोकसाहित्याला मान्य नाहीं. निष्कपट मुलांची, नाडलेल्या गरीब बिचाऱ्यांची किंवा असमर्थ माणसांची राखणी करावी हा लोकसाहित्यांतील सामाजिक आदर्शाचा विशेष आहे. अशा लोकांना सहानुभूति मिळवून देण्यासाठीं लोकसाहित्य फार झटतें. नैसर्गिक शक्तींचे नियम-देखील याकरतां ते पाळत नाहींत. लोकसाहित्यांत हृदयाचें समाधान हा मुख्य नियम आहे. सार्वजनिक सहानुभूति हा मुख्य आदर्श आहे. स्वभावाचें निरीक्षण हें मुख्य सामर्थ्य आहे. म्हणूनच जाणतेपणीं किंवा नेणतेपणीं लोकसाहित्यांत आदर्श जगच रंगविलें आहे. समाजधुरीण म्हटला म्हणजे त्यानें समाजाला वळविण्याची कला आत्मसात् केलीच पाहिजे हा समज लोकसाहित्यांत रूढ आहे.

यामुळेंच आजचें जीवन आणि आजचें साहित्य यांत जसा फरक आपल्याला दिसतो, तसा लोकजीवन आणि लोकसाहित्य यांत दिसत नाहीं. प्रगट मन आणि सुप्त मन असे भेदभाव कृत्रिम बंधनामुळें निर्माण होतात. लोकसाहित्यांत तें दिसत नाहीं. आजच्या शिष्टसमाजाच्या साहित्यांत व भाषेंत आणि आचार-विचारांत जी शुद्धता आपल्याला दिसून येते ती जर खरी असती, तर आजच्या युगाला सत्ययुग म्हणतां आलें असतें. पण शरिराचीं व्यंगें पोषाखानें झांकण्यागत हा प्रकार आहे. लोकसाहित्यांतील समाजदर्शनांत हें आढळायचें नाहीं. या समाज-दर्शनाचे पूजाविषय आणि निषेधविषय आपल्याला स्पष्ट, अकृत्रिम असे दिसतील. लोकसमाजांत ज्या म्हणी, उखाणे प्रचालित आहेत, त्यांतून सामाजिक दर्शनांचीं शुभ आणि अशुभ लक्षणें आपल्या प्रत्ययाला येतील. पातिव्रत्याचा महिमा लोक-साहित्याला मान्य आहे. म्हणून पातिव्रत्याला विघातक गोष्टीबद्दल लोकवाङ्मयां-तील म्हणी तिरस्कार दाखवितील. पति हें स्त्रीचें भूषण, विधवेनें शृंगार करूं नये असें लोकसाहित्याला वाटतें. म्हणून '**कुणास कशाचा, बोडकीस केसाचा**' किंवा '**रांडोळ्या बायकोस कुंकवाची उठाठेव**' असा निषेध त्यांत दिसेल. वस्त्रें वापरायचीं तीं अंग झांकावें म्हणून, अंग दिसावें म्हणून नव्हे. तसें दिसतांच लोकसाहित्य म्हणेल '**सतरा लुगडीं, भागुबाई उघडी**'. प्रेमविवाह असला

तरी तो सुखाचा असला पाहिजे. नाहीं तर लोकसाहित्य म्हणेल, 'आवडीचा केला वर रात्रीं खोकला दिवसा ज्वर', अव्यवस्थित स्त्रीला 'सतरा सुईणी अन् लेकरूं वळणी वळणी' असा आहेर मिळेल. घरकाम टाळणारी स्त्री 'गोरी गोरी पान तिच्या सैंपाकाची घाण' या दूषणाला पात्र होईल. पतिधर्म सोडणाऱ्या स्त्रीला, 'नवरा करतो पाणी पाणी, अन् बायको बसली देवस्थानीं' असा इशारा मिळेल. जो पुरुष गृहस्थधर्म सोडून वागतो त्याच्यासाठीं 'घरचीं करे देवा देवा, बाहेरचीं म्हणे चोळी शिवा', त्यानें डामडौल केला तर 'घरावर नाहीं कौल आणि रिकामा डौल' अशा म्हणी त्याच्यासाठीं तयार राहतील. म्हातारपणीं कोवळ्या मुलीशीं लग्न केलें, तर त्या पुरुषाला 'बाई येईल रूपा बुवा जाईल कूपा' म्हणून लोकसाहित्य रागें भरेल. नसती उठाठेव करणाऱ्याला 'जात ना पात अन् कोरडी उपाद' असें म्हणून समाजजीवनांत कसें वागावें हें सांगेल. दुसऱ्याचा परोपकार ज्यांना सहन होत नाहीं, त्यांना "ज्याचा माल त्याचे हाल अन् कोल्हे कुत्रे झाले लाल" ही म्हण ऐकावी लागेल.

लोकसाहित्यामध्यें ज्या समाजाचें दर्शन मिळतें तो समाज साध्या साध्या गोष्टींनीं हरखतो आणि छोट्या छोट्या विपरीत गोष्टींनीं हळहळतो. सज्जनता, वीरता, शौर्य, धैर्य, विवेक इत्यादि आर्यसद्गुण लोकसाहित्याला पूजनीय वाटतात आणि याच्या विपरीत प्रत्ययाबद्दल त्यांत निषेध असतो. लोकहृदयाचा सामाजिक आदर्श स्वच्छ, शुद्ध असतो. तो शिष्ट भाषेंत व्यक्त केला गेला नाहीं म्हणून काय झालें? त्यांत कला असते. कलेचें अवडंबर किंवा सोवळेपणा नसतो, म्हणून त्याची उपेक्षा करणें बरें नाहीं.

तसें झालें तर ज्या सामाजिक आदर्शाचें जीवनदर्शन लोकसाहित्य आपल्याला घडवितें तें नष्ट होऊन धड इकडचेंहि नाहीं, धड तिकडचेंहि नाहीं, एक ना धड भाराभर चिंध्या, अशी स्थिति होऊन जीवनाचें तारतम्य हेरतां येणार नाहीं.

प्रस्तुत संग्रहांत देवभाव, भक्तिभाव, सांस्कृतिक भाव, यांचा प्रत्यय यावा येवढी सामग्री एकत्रित केली आहे. संग्रहाबरोबर अर्थाविष्करण झालें असतें तर सर्वसामान्य मराठी माणसाला या पुस्तकाचा अधिक उपयोग झाला असता. पुढच्या संकलनांत हा प्रयत्न व्हावा अशी नम्र सूचना मी अध्यक्षांना करतों.

याबाबत आणखीहि एका गोष्टीचा उल्लेख करतो. लोककथा, लोकगीतें हीं आज सांगीवांगीनें गोळा केलीं जातात. तीं जशीं मिळालीं तशींच छापलीं तर ज्याला केवळ स्मरणशक्तीपलीकडे दुसरी कसलीहि पात्रता नाहीं, असा माणूस अधिकारी समजला जाऊन लोकसाहित्याचा उद्गाता होण्याचें श्रेय त्याला द्याव लागतें. आपल्याला ज्याच्या तोंडून लोकगीत ऐकायला मिळालें, तोच अधिकारा मानला तर त्याचे उच्चार, त्याची बोलण्याची ढब म्हणजेच तत्कालीन, तद्देशीय भाषेची लकब असें मानण्याचा अनवस्था प्रसंग आपल्यावर ओढवतो. शिष्ट-समाजांत जें "पाणी" असतें तें अज्ञ समाजीं "पानी" होतें.

पण ज्याच्याकडून 'पानी' शब्द असलेलें लोकगीत ऐकायला मिळालें तो तोतरा असेल किंवा अन्य वैगुण्यामुळें 'पानी' ऐवजीं "पाई" म्हणत असेल तर तें आपण अधिकृत मानावयाचें काय? कीं आपण त्याची प्रादेशिक वैशिष्टयांच्या आधारें छाननी करून 'पानी' स्वीकारावयाचें? मला असें वाटतें कीं, हें तारतम्य पाळलें नाहीं तर अर्भकाच्या तोंडचें वेदपठन परिशुद्ध समजण्याचा प्रसंग ओढवेल. या संग्रहांतलें एक उदाहरण पृ. ७७, "सुंबरान मांडीलं" चें बघूं! या गीतांत पहिल्या नमनाला "सरस्वती" "चंद्रसूर्य" "हस्तिनापूर" "श्रीकृष्ण" असे शुद्ध शब्द आहेत. त्याच्याच जोडीला "येळ" "भैन" ('बहिन' शब्द असूनहि) असे शब्द आहेत. मला वाटतें ज्याला चंद्रसूर्य, सरस्वती असे उच्चार करतां येतात त्याला किंवा त्याच्या गीतांत "भैन", "इठ्ठल" येऊं नये. हा विवेक कुठें तरी स्पष्ट केला पाहिजे, पाळला गेला पाहिजे. तरच भाषाशास्त्राच्या अभ्यासकाला देवघेव करतां येईल. याचा विद्वानांनीं विचार करावा अशी माझी त्यांना विनंति आहे.

गीत-संग्रहाव्यतिरिक्त लोकसाहित्याच्या विविध अंगांवर प्रकाश टाकणारे मर्मज्ञांचे लेख या संग्रहांत दिले आहेत, त्यामुळें लोकसाहित्याची कक्षा अधिक विस्तृत होऊन त्याच्या विविध दर्शनाला खुमारी आली आहे.

लोकसाहित्यांत भक्ति हाच मूळ गाभा आहे. मग ती देवाची, माणसाची, सग्यासोयऱ्याची, प्राण्याची, वस्तूची कशाचीहि असो, त्या भक्तीचें रूप आणि रंग मराठी साधुसंतांच्या उद्गारांचा मागोवा घेत सजलेला आहे असें दिसतें. लोक-साहित्यांतील भक्ति हा एक स्वतंत्र विषय आहे आणि त्याचा इथें वा अन्यत्र परामर्श घेतला जाणें अवश्य आहे.

असो, मी मोठ्या आवेश अभिनिवेशानें प्रस्तावना लिहिलेली नाहीं. त्यासाठीं जी कुवत लागते ती मजकडे नाहीं. नम्रपणें जें वाटलें तें नमूद केलें. एका सामान्य अभ्यासकाला काय वाटूं शकतें, याची कल्पना जरी यावरून होऊं शकली तरी मला संतोष आहे.

समितीच्या अध्यक्षांच्या परिश्रमांचा उल्लेख केलेलाच आहे. अध्यक्ष आणि सदस्य यांच्या आपुलकीनें या साहित्यवास्तूच्या दारवंठीं उभे राहण्याचा मान मला मिळाला त्याबद्दल ऋण मान्य करतों आणि प्रगतिपथावर जिर्चीं पावलें उमटूं लागलीं आहेत अशा नव महाराष्ट्राच्या: मराठी जनतेला वास्तुदर्शनासाठीं आवाहन करतों.

वर्षप्रतिपदा
१७–३–१९६१

—वामन कृष्ण चोरघडे

• • • •

# महाराष्ट्र लोकसाहित्य माला

## पुष्प पांचवें

## अ नु क्र म णि का

## भाग पहिला

### ( १ ) देवादिकांचीं गाणीं १


| नांव | पृष्ठ |
|---|---|
| संग्राहिकाः—सौ. कुमुदिनी पवार | |
| ( १ ) पूजा | २ |
| ( २ ) रामसीता | ६ |
| ( ३ ) तुळस | ९ |
| संग्राहिकाः—विद्या देसाई | |
| ( १ ) तुळशीचें गाणें | ११ |
| संग्राहिकाः—सौ. कुमुदिनी पवार | |
| ( १ ) महादेव | १३ |
| ( २ ) विठ्ठल | १४ |
| संग्राहिकाः—शरदिनी बाबर | |
| ( १ ) जनाबाई | १७ |
| ( २ ) फेराचें गाणें | १९ |
| ( ३ ) मुंबादेवी | २१ |
| ( ४ ) देवाची द्रिष्ट | २१ |
| ( ५ ) भरली चंद्रभागा | २२ |


### ( २ ) भगवान् श्रीकृष्णाचीं गाणीं २४


| नांव | पृष्ठ |
|---|---|
| संग्राहिकाः—सौ. विजयादेवी सावंत | |
| ( १ ) राधिका | २५ |
| ( २ ) झिम्म्याचें गाणें | २६ |
| ( ३ ) फेराचें गाणें | २७ |
| संग्राहिकाः—सौ. सुलोचना फडके | |
| ( १ ) गाणें सुदामाचे पोहे | २८ |
| संग्राहिकाः—सौ. ताराबाई साठे | |
| चिंधी | २९ |
| द्रौपदीचा धावा | ३० |
| टिपऱ्याचें गाणें | ३१ |
| दुर्वासाचें भोजन | ३२ |
| कृष्णाचा विनोद | ३८ |
| विंचू | ३८ |
| कृष्णाचें गाणें | ३९ |
| संग्राहिकाः—सौ. अन्नपूर्णाबाई जोशी | |
| श्रीकृष्णाचीं गाणीं | ३९ |
| संग्राहिकाः—शरदिनी बाबर | |
| गौळण | ४१ |
| कृष्णाचें गाणें | ४५ |
| फेराचें गाणें | ४६ |
| ओव्या | ४७ |
| चुडा | ४८ |
| संग्राहिकाः—विद्या देसाई | |
| राजसूय—यज्ञ | ५० |
| संग्राहिकाः—सौ. सुलोचना फडके | |
| मीठ | ५४ |
| संग्राहिकाः—सौ. राधाबाई रानडे | |
| सत्यभामा गर्वहरण | ५८ |

## ( ३ ) भक्तगण ६०


| नांव | पृष्ठ |
|---|---|
| संग्राहिकाः—डॉ. सरोजिनी बाबर | |
| **गोंधळ्यांचीं गाणीं** | ६१ |
| गोंधळ | ६२ |
| गण | ६३ |
| वारुळाचें गाणें | ६४ |
| पांच जातीच्या गौळणी | ६५ |
| कोल्ह्याचं लगीन | ६५ |
| संग्राहिकाः—डॉ. सरोजिनी बाबर | |
| **वाघ्या मुरळी** | ६७ |
| नमन | ६८ |
| पद ( नवीन ) | ६९ |
| भक्ताचं गाणं ( पुरातन ) | ६९ |
| पद ( पुरातन ) | ६९ |
| पद ( देह ) | ७० |
| मल्हारी मार्तंड | ७१ |
| श्री. खंडेराव प्रसन्न | ७४ |
| आरती | ७४ |
| श्री आरती मल्हारीची | ७५ |
| संग्राहिकाः—डॉ. सरोजिनी बाबर | |
| **बिरुबादेव** | ७६ |
| सुंब्रान मांडीलं | ७७ |
| **पोतराज** | ९२ |
| संग्राहिकाः—डॉ. सरोजिनी बाबर | |
| पोतराजाचीं गाणीं | ९३ |
| **जोगती** | ९७ |
| संग्राहिकाः—डॉ. सरोजिनी बाबर | |
| देवी यल्लमाचीं गाणीं | ९८ |
| तुळजापूरच्या अंबाबाईचीं गाणीं | १०४ |
| **आराध्याचीं गाणीं** | १०६ |
| संग्राहिकाः—डॉ. सरोजिनी बाबर | |
| आराध्याचें गाणें | १०७ |
| कमळावंती | १०७ |


## ( ४ ) सांस्कृतिक जीवन ११३


| नांव | पृष्ठ |
|---|---|
| संग्राहिकाः—विद्या देसाई | |
| हादगा—भोंडला | ११४ |
| संग्राहिकाः—सौ. नलिनीबाई शिंदे | |
| हादगा—भोंडला | ११९ |
| भुलाबाई | १२० |
| संग्राहिकाः—विमल तपस्वी | |
| भुलाबाईचीं गाणीं | १२१ |
| मौंजीबंधन | १२४ |
| संग्राहकः—श्रीमंत सरदार आबासाहेब मुजुमदार | |
| श्रीकृष्णाचें मौंजीबंधन | १२४ |
| संग्राहिकाः—सौ. सुलोचना फडके | |
| मुंज | १२९ |
| **लग्नाचीं गाणीं** | १३० |
| संग्राहिकाः—विद्या देसाई | |
| गणेशनमन | १३१ |
| गणेशस्थापना | १३२ |
| मेढ किंवा मंडपस्थापना | १३२ |
| पहाटपटी | १३३ |
| हळद | १३४ |
| तेलवण | १३६ |
| संग्राहिकाः—शरदिनी बाबर | |
| मैनाला मागणं | १३९ |
| नवरी | १४० |
| घाणा | १४० |
| आमंत्रण | १४१ |

| नांव | पृष्ठ |
| --- | --- |
| हळद | १४२ |
| कृष्णदेव नवरा झाला | १४२ |
| आहेर | १४३ |
| बंधूचं लगीन | १४३ |
| विहीण | १४४ |
| झालीचें गाणें | १४५ |
| पात ओवाळणी ( उखाणा ) | १४६ |
| उखाणे—आहाणे | १४७ |
| संग्राहिकाः—सौ. पार्वतीबाई किर्लोस्कर | |
| उखाणे | १४८ |
| संग्राहिकाः—सौ. कुमुदिनी पवार | |
| उखाणे | १५१ |
| संग्राहिकाः—सौ. विजयादेवी सावंत | |
| जानपद उखाणा | १५५ |
| मंगळागौर | १५९ |
| संग्राहिका—सौ. ताराबाई साठे | |
| खुर्ची का मिर्ची | १६१ |
| सूपनृत्य | १६२ |
| कांचकिरडा | १६२ |
| पिंगा | १६३ |
| सोऽमी—गोऽमी | १६३ |
| दंडफुगडी | १६३ |
| लाव्यांचा झिम्मा | १६४ |
| सवतीचें भांडण | १६४ |
| आगोटा—पागोटा | १६५ |
| किकीचें पानबाई कीऽकीऽ | १६५ |
| कोंबडा | १६६ |
| गांठोडें | १६६ |
| संग्राहिका—विद्या देसाई | |
| फेराचें गाणें | १६७ |
| संग्राहिका—विमल तपस्वी | |
| डोहाळे | १६८ |
| संग्राहिका सौ.—पार्वतीबाई गुंजाळ | |
| डोहाळे | १७० |
| संग्राहिकाः—दुर्गा परांजपे | |
| डोहाळे | १७१ |
| संग्राहिकाः—सौ. सिंधू वारनूळकर | |
| पाळणे | १७३ |
| संग्राहिकाः—विद्या देसाई | |
| नागपंचमी | १७८ |
| नागोबा | १८० |
| झिम्म्याचीं गाणीं | १८० |
| संग्राहिकाः—जानकीबाई पाटील | |
| फेराचीं गाणीं | १८० |
| संग्राहक—आचार्य प्र. के. अत्रे | |
| गाईचें गाणें | १९१ |
| संग्राहिकाः—शरदिनी बाबर | |
| दंडफुगडी | १९२ |
| फुगडीचे उखाणे | १९२ |
| वीस बाई वीस | १९५ |
| महालक्ष्मी—गौरी | १९५ |
| संग्राहिकाः—विद्या देसाई | |
| गौरीपूजा | १९७ |
| गौराई | २०१ |
| गंगागौरीचें भांडण | २०२ |
| संग्राहिकाः—सौ. सुलोचना देशमुख | |
| गौराईचें गाणें | २०४ |
| गाणें शंकराचें | २०४ |
| दसरा दिवाळी | २०५ |
| संग्राहिकाः—जानकीबाई पाटील | |
| ओव्या | २०६ |
| संग्राहिकाः—सरोजिनी बाबर | |
| अहिराणींतील ओव्या | २१५ |

## मराठी लोकसाहित्य
## भाग दुसरा

मराठीचें माणिक मोती २१९
लेखक–श्री. न. शं. पोहनेकर

लोकगीतांतील साम २२९
लेखक–श्री. सोपानदेव चौधरी

लोकगीतें आणि संगीत २३२
लेखिका–डॉ. सरोजिनी बाबर

विदर्भाचीं अस्मितादर्शक कांहीं लोकगीतें २४०
लेखक–श्री. ना. रा. शेंडे

उखाणा २७६
लेखिका–सौ. कुमुदिनी पवार

सासुरवास २८४
लेखिका–डॉ. विमल ल. चोरघडे

हळदीचें सांस्कृतिक स्थान २९१
लेखक–कै. चि. ग. कर्वे

• • •

# मराठी लोकसाहित्य

## भाग पहिला

१. देवादिकांचीं गाणीं

२. श्रीकृष्णाचीं गाणीं

३. भक्तगण

४. सांस्कृतिक जीवन

अनुक्रम ३८३९४ वि ..............
.................... नों दि

# १. देवादिकांचीं गाणीं

मानवी मनाला अद्‌भुतरम्य गोष्टींची जशी चटक आहे तशीच ती देवादिकांचीहि आहे. या दोन्हींत फरकच पाडावयाचा म्हटलें तर देवादिकांच्याबद्दल वाटणारी गोडी वरच्या नंबरची ठरेल. या गोडींत भाळा भाव आहे. अपार श्रद्धा आहे. नितांत आदर आहे. सौभाग्याची मागणी आहे. माणुसकीचा गहिंवर आहे. कुलदैवतांची पूजा आहे.

त्यामुळें देवादिकांचीं गाणीं स्त्रिया मोठ्या आवडीनें गातात. त्यांच्या भलेपणाचें वारेमाप वर्णन करीत राहतात. त्यांचे ठायीं मानव्याचें दर्शन घेतात. आपल्या सुखदुःखांची त्यांना उटी लावतात. म्हणून हरघडी या गीतांची गोडी वाढती राहते.

ह्या देवादिकांत राम आहे, सीता आहे, विठ्ठल आहे, भगवान् श्रीकृष्णहि आहे. त्याचप्रमाणें सूर्यनारायण आहे, तुळस आहे, आणि मुंबादेवी पण आहे. ज्याच्या त्याच्या आवडीचे देव ज्याच्या त्याच्या मगदुराप्रमाणें आळविले जातात, पूजिले जातात.

हातांत धूपारती घेऊन, गंध, अक्षत व फुलें घेऊन होणाऱ्या नित्य-नैमत्तिक पूजेपेक्षां लोकगीतांनीं बांधिलेली ही देवादिकांची पूजा मोठी सुंदर आहे. तिचें आपल्या दारीं तोरण बांधावें एवढी ती चांगली आहे. अंतःकरणाच्या माध्यमांतून तिची उभारणी झाली आहे. भावफुलांच्या शिंपणानें तिची काया सजली आहे.

संग्राहिका-सौ. कुमुदिनी पवार

# पूजा

सकाळच्यापारीं हात जोडीती अंगणाला
सूर्या डुलुतू गंगनाला
सकाळीं उठोनी झाडलोट मी दारीं करी
आतां सूर्यनारायणाची येईल बघा स्वारी
उगवला सूर्य गेला आयवेच्या आळीं
माया भैनीच्या कुंकुं देखील कपाळीं
उगवला नारायण उगवतांना कोवळा
चांफ्याच्या फुलावर नाग डुलतो पिवळा
उगवला नारायण उगवतांना ऊन पडं
माझ्या कुंकवाला लाली चडं
उगवला नारायण आधीं उगव माझ्या दारीं
मग पिरतीमी धुंड सारी
उगवला नारायण माझ्या पिवळ्या झाल्या भिंती
औक मागाया उभी ऱ्हातीं
आळंदी म्हणूं गांव पुन्याच्या टेकाखालीं
देव ग्यानुबा पोथी वाची इंद्रावनीच्या झोकाखालीं
आळंदी करुनी मला देहूला जायाचं
ईश्वराच्या पिंडीवरी वले नाऱ्याळ वहायाचं
आळंदी करुनी पंढरीं जाऊं नारी
सोन्याचा पिंपळ देवा ग्यानुबाच्या दारीं
जोडीली मायाबहिन कुनाचं घरदार
कुनाचा संवसार चला आळंदी एकबार
आळंदी करुनी चला पुण्याच्या बाजाराला
हातांत तुळशीमाळा हार गजरा ग्यानुबाला
पाऊस झिरिमीरी आळंदीच्या माळावरी
ग्यानोबा तुकाराम संत भिजले वारकरी

आळंदी वसवली माळ मैदान पाहूनी
घानोबा राजे चारी चौघडे लावूनी
घानुबा देव बोलं चल सोपान वाईला
सुपं सासवड जागा उत्तम पाहीला
देवीच्या देवळांत उभी राहिली अंधारांत
मोतीं दिल्यात अंगाऱ्यांत
एकादशी केल्या नाहीं वायारती गेल्या
जन्मा सोडवानी दिल्या
सडा या सारवान सया म्हणीती कोनवार
एकादशीचं व्रत थोर
आळंदी ग रचिइली इंद्रावनीच्या गाळायानं
जिती समाधी घेतीयली बारा वर्षाच्या बाळकानं
वाक्री उप्रीच्या वड्यावरी सव्वा खंडी शिजे डाळ
देव घानुबाचं ऐंशी मुडदुंग नऊशें टाळ
वाक्री उप्रीच्या वड्यावरी सव्वा खंडीचं वरायान
खालीं साखबीरचं आळं वर तुपाचं दुरायान
भाऊच्या हिरीवर गुरुबहिणी दम धर
घानुबा तुकोबाचा घोडा नाचेतो रिंगनावर
वाकरीच्या माळावरी उंच ऱ्हावटी कुणाची
घानुबा तुकोबाची स्वारी आळंदीकराची
हावस मला मोठी पंढरीला जायाची
वाक्री उप्रीच्या वड्यावरी पालखी ज्ञानुबाची
माडीच्या पायऱ्या रुक्मीन चढती झरझरा
इठ्ठलाची एकादस तिच्या वटीला राजगीरा
हातांत टाळ वीना तुका हिंडे दारोदार
मी का निगालों वैकुंटाला कोन येतंया बरोबर
पंढरीचा विठू सिंगनापुरीला येतू जातू
पाळं जरिबीइची देतू

भरली चंद्रभागा पानी लागलं वडायला
रुक्मीन माता बोलं देव कुंडलीक बुडईला
जाईन पंढरीला पंढरीची मऊ माती
घानुबा तुकाराम संत गेले एक्यारातीं
पालखीची दांडी लागली माझ्या दारा
देव ज्ञानेश्वर आले दुबळीच्या घरा
हातीं घेऊनी झाडणी लोटूं लागले पंढरी
वाकून शीरीहरी चुकवली यमपुरी
सकाळच्या प्रहरीं मला येशीकडं जाणं
मारुतीरायाची भेट सकाळींच होणं
रंगामंदीं रंग शेंदूर निवडीला
मारुती दासभक्त रामाला आवडीला
अंजनीबाई बोलं माजा मारुती लई शाना
सांगे लंकच्या रावण खुना
अंजनीबाई बोलं माजं मारुती तानं बाळ
लंका जाळुनी तोंड काळं
मारीला इंद्रजीत शीर पडलं नदीकांठीं
सुलोचना त्याची नार आरसा फोडी कुंकवासाठीं
मारीला इंद्रजीत शीर फिरतं गंगनीं
सुलोचना त्याची नार कागद वाची अंगनीं
मारीला इंद्रजीत शीर पडलं येऊनी
सुलोचना त्याची नार टाकी कागद लिहुनी
चोळी पातळाची घडी रामलक्षुमणा हातीं
लेक सुलोचना सती जाती
साधूमंदीं साधू नामदेव तूं कर
देवा माज्या इठलाच्या घाली पायरीला चीर
जीवाला माझ्या जड नाहीं कुणाला माया येत
सावळा पांडुरंग आला गरुडासहीत
पहिली माझी ओवी आदि गाती मी तीन देवा
विष्णु महादेवा सदाशीवा

दुसरी माझी ओवी पांचीबी पांडवाला
द्रुपतीच्या बंधवाला
ओवी मी गातें चवथीच्या चांदा
मोतीं तिच्या भांगा अंबाबाईच्या
चंद्रावळीच्या रूपासाठीं देव झाल्यात कोलाटी
देवा माज्या नाथाजीनं येळू रविलं उमाटीं
नाथाच्या शिखरावरी वाघ खेळतू लढाई
दोघांच्या राजाची काय सांगू बढाई
चला सयानू पाहूं म्हसवड गांवाचं रिंगावन
भोजलींग नाथबाबा रथीं बसला भगवान
तुका म्हणे तुका हांक मारी तुझा बाप
तुका झाला बगा गप
तुका म्हणे तुका हांक मारिती तुझी आई
तुका वैकुंठीं गेला काई
शिव शेजारीं दत्तगुरु मला जायाचं घडईना
सयानो पाहूं चला वाडी गांवचा टाळवीना
दत्तगुरुच्या आंघोळीचा कृष्णाबाईला जातो पाट
अडयाल दत्तगुरु पल्याड भोनसरीची येती वाट
पंचवटीच्या पायरी सीता चढली जोमायानं
छत्री धरीली रामायानं
सिंग वाजतं सिंगाणापुरीं कर्ना वाजतू कोल्हापुरीं
देवा माज्या त्या जोतीबाचा होतू उत्सव रत्नागिरीं
पंचगंगेचं पानी दुरनं दिसतं ताकावानी
देवा माज्या त्या जोतीबानं जटा धुतलीया गोसाव्यांनीं
चैत्राच्या महिन्यामंदीं देव जोतीबा उभा रातू
माज्या त्या बंदूजीची भोळया भक्ताची वाट पातू
देवा जोतीबाच्या वाटं कोन नखाच्या धोतराचा
हावशा बंधूराया सोगा आवर धोतराचा
उगवला नारायण उगवतां लालीलाल
मामा सांगतो भाच्याला यासी रामराम घाल

• • •

# राम सीता

रामलक्ष्मण दोन्ही कांठाचे पदर
सावळी सीताबाई मधीं ठुशीचा गजर

सीता सत्वाची तीच्या सत्वाला भेली
जातीचा मानभाऊ भिक्षा वाढायाला गेली

राम लक्ष्मण माझ्या बापजींचे भाऊ
सीता जानकी माझ्या मावलीची जाऊ

लंकचा रावण बाण मारितो जातां जातां
रामाची एवढी सीता नेली शुक्कीर उगवतां

ओवी मी गातें देवा मारुती रामायाला
रत्नं दुहेरी जानव्याला

सीताला सोधायाला कोन कोन सांगा गेलं
रामलक्ष्मण देव मारुती तिघेजण

नदीवड्याच्या पायऱ्या सीता चढती जोमायानं
लव अंकूस दोन्ही बाळ कडं घेतलीं रामायानं

मंडोदरी बोलं सीता नार तूं माजे भैनी
रावनाच्या लंकेवरी राज करूं ये दोगी जनी

सीताबाई बोलं काय बोललीस कशी
तुझ्यासारख्या माझ्या रामाच्या हायत्या दासी

आटंग्या वनामंदीं सीता करिती राम राम
देवा मारुतीनं मुद्रिका दिली खून

सोन्याची लंका झळकं हिरे कंगनांनीं
रावनाच्या संसाराची केली रामानीं धुवधानी

गोदावरीच्या पायऱ्या सीता चढती दमानं
धरली आबदागिरी पंचवटीच्या रामानं

रामाची ती सीता लक्ष्मणाची वहिनी
दशरथाची सून पहिली कामिनी

राम बी म्हणूं राम राम आमृताचा पेला
रामचंद्राचं नांव घेतां शीण माझा सारा गेला
पहिली माझी ओवी गाती मी आळसांत
राम सोन्याच्या कळसांत
राम म्हणूं राम राम माझा गुरुभाऊ
सोन्याची सळई देते तांदुळाला घावू
राम म्हणूं राम साखरचा खडा
पहांटच्या प्रहरीं हात मुखामधीं सोडा
सरालं दळायान माझ्या सुपांत जाई जुई
रामाची सीताबाई लक्षुमणाची भावजई
सरीलं दळायान सरती आरती कुनी केली
रामाची सिताबाई दळूं लागूनी मला गेली
रामा तुझं नांव घेतें मीं वेळूवेळां
माझ्या हृदयाचे बंद सोळा
सीतेला सासुरवास सासू केगाइनं केला
देवासारखा जोडा नाहीं सीतेला लाभूं दिला
नाचन्याचा कोंडा नको खाऊंस सीताबाई
लव अंकुस तुझीं बाळं उद्यां होतील शिपाई
सीता पतिवरता लक्षुमणाला कळली
तिच्या सत्वानं गंगा जमुना वळली
सकाळच्या प्रहरीं देव मारुती कुठं गेला
त्यांनीं येतांना गुरु केला
सीता नार वनवासी तिनं तनांची केली शेज
लव अंकुशा बाळ नीज
सीता नार बाळातीन नाहीं मिळाला कातबोळ
सीता चिंचांचा पेली कोळ
सीता सांगे कथा ती आपल्या जलमाच्या
रामासारख्या भ्रताराच्या
सीता सांगे कथा ती सांगं कवा कवा
लव अंकुश नव्हता तवा

सीतला बघायला रथ यीशींत दाटला
सीतला घालवाई राम सभेचा उठला
राम म्हणूं राम राम कुठंच दिसना
चित्त धंद्यावरी बसना
रामलक्ष्मुण दोन्ही गुलाबाचे माझे हार
सावळी सीताबाई मधीं शेवंती सुकुमार
रामलक्षुमण दोन्ही सोनीयाचे गोल
सीताबाई मधीं सावळी देती तोल
रामलक्षुमण दोन्ही दक्षिणीचे दिवे
सावळी सीताबाई उत्तरेला वीज लवे
रामलक्षुमण दोन्ही मालाचे रांजण
सावळी सीताबाई वर डोलती नागीण
राम अवतारीं वचन दिलं चंद्रसेना
कृष्ण अवतारीं करीन सत्यभामा
सीतेला वनवास तिनं दगडांची केली उशी
आटंग्या वनामंधीं तिला झोपबी आली कशी
राम लक्षुमण दोन्ही मोतीयांची जोडी
मायाबहिण सीताबाई मंदी शोबती लालइंडी
सीतला वनवास कैकईनं नेली फणी
तिनं बारा वर्षं वरज केली वेनी
सीतच्या सरपानं लंकेची झाली होळी
आन् त्या वानरांची तोंडं झालीं बघा काळीं काळीं
सीतच्या सरपानं डोंगर जळती
आन् ते वानर राम राम म्हणती
सीताबाईला वनवास तिला आलाया कुनच्या गुणं
गंगनीं चवथीतीचा चांद तिनं पाहिला सान्यांतन
सीताबाईचा वनवास बोरी बाभळी सांगी गोष्टी
लव अंकुबीशाच्या येळं पांच महिन्यांचा गर्भ पोटीं
लव अंकुबीशाच्या येळं आडरानांत तिची न्हानी
दोनी नेतर झाकुईनी देव गोसावी घाली पाणी

रामावरती बाण बाण येत्याती झरा झरा
लवबी अंकुईस रामराजाचा पुत्र खरा
रामाबीवरती बाण न्हाई बाणाला आळईस
सीता सुंदरी बोलइती राम शेजचा कळईस
राम बसले सिंहासनीं सिताबाई ती डावीकंड
मारुती ब्रह्मचारी हात जोडूनी उभा पुढं

## तुळस

सकाळीं उठुयीनी दार उघडी नेटं नेटं
राम तुळशीला घाली खेटं
पहांटच्या प्रहरीं उघडीतें दार कडी
नजर पडली दारीं तुळशीची माडी
रुक्मीनीला साडीचोळी सत्यभामाला दुरवा
तुळशीबाईला थंड पाण्याचा गारवा
उगवला सूर्य जागी झाली सर्वी दुनिया
तुळशीला पाणी घाली राया भीमकाची कन्या
उगवला सूर्य जागी झाली जनलोक
तुळशीला पाणी घाली राजा भीमकाची लेक
सडासारवण वर रांगोळीचा थाट
माझ्या दारावरनं देवा नारायणाची वाट
तुळशीला घाली पाणी तुळस वाड्यावर गेली
माझ्या बाळानं सेवा केली
तुळशीला घाली पाणी काय तुळशीखालीं झरा
बया माझ्या त्या मालनीच्या पतीवरताचा नेम खरा
ओवी मी गातें सये तुळशीबाई तुला
राम तुझ्या सावलीला
ओवी मी गातें गातें तुळशीच्या पाना
हाय गोकुळीं कृष्ण ताना
तुळशीला घाली पाणी हात पुरना वृंदावनीं

ताईता बंधू माझ्या बांध पायरी सरावनीं
तुळशीला घाली पाणी तुळस झालीया झापाईळ
माझा ग बाळराज पाणी घालतो गोपाईळ
रुक्मीन म्हणे तुळस कशानं थोरली
माझ्या मंजुळाची तिच्या नथीला आरली
तुळसीबाई तुला कोणी दिला धक्का
बारा मेहूना तुझा सख्खा
तुळशीबाई वाळून झाल्या काड्या
देवा ग विठ्ठलांनीं वाहून नेल्या गाड्या
तुळशीबाई तुझ्याखालीं काळी माती
तुझ्यासाठीं देव आले रातोरातीं
रुक्मीन बोलं देवा आवड कोनाची
तुळस गुणाची खेप घाली उन्हाची
रुक्मीन बोले देवा कुठं होतां तुम्ही रातीं
पडले डाग तुळशीची काळी माती
तुळशी भुपळी भांडती जणूं जना
तुळशीच्या केल्या माळा भुपळी केला वीना
गोविंद ठकडया जोखीतो सोनंनाणं
वजनीं आलीं तुळशी तुझीं पानं
तुळशीच्या माळा एका गरुडाचं वज्जं
प्रीतीच्या पांडुरंगा श्रीमंती लेनं तुझं
तुळशीच्या माळा पंढरपुरच्या बाजारीं
प्रीतीचा पांडुरंग लेतो कंठी शेजारीं

• • •

मराठी ... स्थळप्रत.
अनुक्रम ३६३९४ ... ११
क्रमांक ........................ नों: दि: ...



संग्राहिका—विद्या देसाई

# तुळशीचें गाणें

जें जें घालूं तुळशी वटा
इष्ट पळे बारा वाटा
तुळस वंदावी मावली
संताची सावली

जें जें घालूं तुळशी आळं
पातकाचं व्हईल काळं
तुळस वंदावी मावली
संताची सावली

जें जें घालूं तुळशी माती
इष्ट पळे हातोहातीं
तुळस वंदावी मावली
संताची सावली

जें जें लावूं तुळशी रोप
इष्ट पळे आपोआप
तुळस वंदावी मावली
संताची सावली

जें जें घालूं तुळशी पानी
इष्ट पळे रानीं वनीं
तुळस वंदावी मावली
संताची सावली

जें जें लावूं तुळशी कुंकू
पूजा करुनी गेली सखू
तुळस वंदावी मावली
संताची सावली

जें जें लावूं तुळशी बुक्का
कैलासाला गेला तुका
तुळस वंदावी मावली
संताची सावली

जें जें लावूं तुळशी गंध
पातक्याचं तुटतील बंध
तुळस वंदावी मावली
संताची सावली

जें जें लावूं तुळशी दिवा
उजेड पडे सकाळिक देवा
तुळस वंदावी मावली
संताची सावली

जें जें दावूं तुळशी बोनं
पंढरीशीं झालं जाणं
तुळस वंदावी मावली
संताची सावली

जें जें घालूं तुळशी फेऱ्या
झाल्या पंढरीच्या वाऱ्या
तुळस वंदावी मावली
संताची सावली

तुळशीला आल्या शेंगा
माळा घालूं पांडुरंगा
तुळस वंदावी मावली
संताची सावली

• • •

संग्राहिका-सौ. कुमुदिनी पवार

# महादेव

सोंगटयाचं डाव आल्यात आट नऊ
म्हादेव बोलती गिरजा तूं नको रडी घेऊं
वर संबूचं शिकार खालीं बळीचं देवाळ
माह्यार गिरजाचं जवळ
शिकरीसिंगनापूरीं मुंगी घाटाला दाटली
संबू देवाची गिरजा नार कुंकूं लेतांना उठली
संबू देवाला रात्र झाली नात्यापुत्याच्या बाजारांत
गिरजा नार वाट बघी कमानी दरवाज्यांत
महादेवाच्या शिखरावरी रांगोळी प्रकाराची
देवा माझ्या त्या सांभाची पूजा होतीया सरकाराची
पाटासंगं जातं पाणी सिंगणापूरच्या तळयायांत
देवा माझ्या त्या शंकरानं दौना आनीला खळ्यायांत
रुसला संभूदेव डोंगरी घाली धूनी
गिरजा नार बोलं देवा तुझ्यावांचूनी नाहीं कुणी
रुसली गिरजा नार संबू देवाच्या मांडीवरी
बहिणभावांचा मेळा बसला वसरी

• • •

# विठ्ठल

पंढरीला जाती इठ्ठल सका माजी रुक्मीन वहिनी
वाटला दिली भेट चंद्रभागा बहिनी
भरली चंद्रभागा देव कुंडलीक नाहीं भ्याला
पूर शिखरावरनं गेला
रुक्मीन रुसइली गेली मंगळयेड्याला
प्रीतीचा पांडुरंग जिन घालितो घोडयाला
विठ्ठल बोलं सोड रुक्मीनी भेट गांठ
साधुसंत आले कशाचा बोभाट
दारीं वाजती वाजंतरी माळी दाराच्या येशीमंदीं
देवा माझ्या इठ्ठलाचं पाय बुक्क्याच्या राशीमंदीं
पहांटच्या पाऱ्यायांत पंढरपुरीं काय वाजतं मंजुईळ
देव माझ्या त्या विठोबाला दह्यादुधाची आंघोईळ
जातीची कळवातीण पांडुरंगाचं तिला ध्यान
देवा विठ्ठलाच्या दारीं कान्होपातरा तुझं झाड
पंढरीला जातें संगं न्हेतें मी आईला
चारा घालती गाईला
पंढरीला जातें संगं नेतें मी मावशीला
सोन्याच्या कळशीनं पाणी घालतें तुळशीला
पंढरीला जाती माझ्या आळीच्या बायका
वाटला दिली भेट तुम्ही इठ्ठल नायका
पंढरीला जाती माझ्या आळीचे गोपाळ
इठ्ठलाला शेला रुक्मीणीला पातळ
पंढरपुरामंदीं कोन सोन्याचा काकनाची
राणी विठ्ठल देखण्याची
पंढरपुरामंदीं जनाबाईचा गेला तवा
विठ्ठल देव बोलं दवडी पिटवा नामदेवा
पंढरी करुनी जाती आळंदी देखायाला

बुंदीचा लाडू घाली मगर माशायाला
पंढरीला जाती हांका मारीती राऊळांत
इठ्ठल पांडुरंग हाई जनीच्या देवळांत

सोळा ग सहस्र नारी ह्या तर घाली धिंगाणा
रुक्मिनी वांचून विडा देवाचा रंगना
भरली चंद्रभागा पलीकडे कशी जाऊं

देवा ग इठ्ठलांनीं फुलांची ग केली नावूं
रुक्मिन गोरी काळ्या इठ्ठलाला दिली
मोत्या पवळ्यांची कुनीं जडाबीजडी केली

दोगांच्या गांठी भेटी वाक्री उप्रीच्या कड्यावरी
सयाला सांगूं किती देव इठ्ठल घोड्यावरी
देवाच्या देवळांत दिवा जळतो लोण्याचा
देवा माझ्या त्या इठ्ठलाचा सारा मंडप सोन्याचा
पंढरपूरामधीं देव विठ्ठल किती काळ
गळा घालितें तुळशीमाळ

पंढरपूरामध्यें विठू देवाची कोणती आळी
दारीं बुक्क्याची रांगोळी
पंढरी येवढी केली आईबापाच्या पुण्याईनं
आंघोळ येवढी केली चंद्रभागेच्या पाण्याईनं

रुसली रुक्मीन जाऊन बसली वाळवंटीं
इठ्ठल देव बोलं ज्यान हतरा दोघांसाठीं
रुसली रुक्मीन गेली पदम तळयायाला
सावळा पांडुरंग हात घाली गळ्यायाला

रुसली रुक्मीन अवघ्या पंढबीरींत नाहीं
इठ्ठल देव बोलं तिच्या रागाला करूं कांहीं
रुकमीणीचं लेणं वीस पुतळ्या कारईलं
रामअवतारी डोरईलं
पंढरीला जातें मला सोबत नाहीं कुणी
पुढें विठ्ठल मागें जनी

पंढरीला जातें वाट लागली कुसळाची
बोटें बारीक गोसाव्याचीं
पंढरीला जातें वाट लागली चिकलाची
मला सोबत इठ्ठलाची
इठू बसला जेवायाला  पोळी ठेवतो मांडी आड
राई रुक्मीन बोलं काय जनीचं तुला येडं
दर्शनाला जातीं हातीं परात पेढ्याची
देवा त्या इठ्ठलाच्या वाट चुकली वाड्याची
रुसली रुक्मीन खाईना दूधपेढे
इठ्ठल देव बोलं तुला जनीची भीति पडे
पंढरीची दिंडी पैठणाच्या शिवरांत
गंगा वळली रांजणांत
पंढरीची दिंडी पैठणाला गेली
गंगा रांजणीं उतू आली
एकनाथाच्या घरीं पाण्याचा झाडा झाला
सावळा पांडुरंग कुठं गेला लगडीवाला
चंद्रभागच्या वाळवंटीं मोतीं पवळं हांतरलं
तिथं वैकुंठ उतरीलं
इठ्ठल देव बोलं जनी माझी वनवासी
चंद्रभागच्या कांठीं धुनं धुतीया उपाशी

• • •

संग्राहिका–शरदिनी बाबर

# जनाबाई

जनी हिंडे आडराना
पाठीशीं उभा कान्हा
जनी म्हणे नको येऊं
तुला जग ठेवील नावू
शेणी वेचूं लागीन तुला
शेणी वेची दुई दुई बोटं
पितांबराची घालुनी कास
वेची शेणी सावकाश
शेणी वेचूनी बांदिली मोट
श्रीरंग देव देई गांठ
शिरीहरी मोट उचली
जनीच्या डोईवर दिली
जनी चाले पुढं पुढं
देव धावं धुडं धुडं
ऐसें बोलतां चालतां
गेले राजाईच्या वाड्याला
राजाई रागावती झाली
जनी जाऊनी साळी कांडी
देव जाऊनी उखळ झाडी
देवा मुसाळ सोड सोड
तुज्या हाता येत्याल फोड
फ़ोड येऊं दे जाऊं दे
साळी कांडानं होऊं दे
पायांत पद्म हातांत कडी,

कोंडा पाखडुनी काडी
कोंडा फेकी दूरच्या दूर
तांदूळ झेली वरच्या वर
साळी कांडान झालं
सडासारवानं केलं
जनी बशी रंदापाशीं
देव गेले आंगूळीशी
आदान ठेवीलं पान्या
आंत वैरील्या कन्या
देवा न्हाई थाळा वाटीं
कैसा जेवशील जगजेठी
देवा न्हाई खाळं पान
कसा राकूं तुजा मान
देव जेवुनी तृप्त झाले
दासी जनीनें विडे केलें
देव तेथुनी गुप्त झाले
जाऊनी पंढरीं पोचले
पंढरपुरीं चोरी झाली
आळ आला जनीवरी
दंडी लावील्या काढन्या
धाव धाव विठ्ठल पावन्या
माज्या येळं कुठं गेला
देव इठ्ठल कसा मेला
चंद्रभागे रवीला सूळ
जनाबाईला आलं मूळ
जनी गेली सुळापाशीं
त्या सुळीचं झालं पानी
हरीनामाची गजनी

• • •

संग्राहिका—शारदिनी बाबर

# फेराचें गाणें

विठ्ठल बाप रुक्मीन आई
चंद्रभागे तीरीं कुंडलीक भाई
आपली भैन गुरुजीची दणी
उभी होतें अंगणीं वाट मी पाही
अग माया मैनी मज चुकवीशी
मोक्षाची वाट मज दाखवीशी
मोक्षाशीं जाईन गगनीं बैसेन
पांडुरंग तुझें कौतुक पुसेल
मावच्या मैनी आल्या भेटायासी
चांदीचे पाट दिले बसायासी
वरतमान काय सांगूं बाई
गुरुच्या सेवेशीं अंतरले बाई
जन्मास येऊन सार्थक नाहीं
पुराणशास्त्र हरीनाम नाहीं
राधाबाई बोले उकला माझी वेणी
वल्या आवळ्याची करा चवकोनी
असे हात मऊ धन्य विठाबाई
राधाबाई बोले निवली पाक डोई
राधाबाई बोले उकला माझा माथा
अशा विसणाला हंडा केला रिता
चांदीची वजरी आहे तीन कोनी
अशा कारित्यात मावच्या मैनी
चांदीचें घंगाळ सोन्याचे तांबे
ऐसा माझा बंधु कुंडलीक नांदे
न्हाऊनी धुवूनी उभी जी होते
कुंकाचा चांदव कपाळीं लेतें

कपाळीं लेवुनी सौभाग्यी होतें
आरसा घेऊनी मुख जी पहातें
ऐसा नमस्कार जावो जन्मभर
अंबट अमसूल चटणी सुंदर
कवळ्या काकडीची भाजी झाली थोडी
मुळ्या वाळक्याच्या केल्या कोशिंबिरी
खाजा करंज्या अनारसे मऊ
बुंदीच्या लाडूचे प्रकार बहू
चांदीचें ताट कोमेला भात
पिठीसाखरेची भरीली मूठ
ऐशा पक्वान्नांनीं भरीलें ताट
कुंडलीक बंधु बघतो वाट
विडा करूनी घाली मुखांत
ऐसा बंधु नाहीं जन लोकांत
उंची चिरीचांफा अंगीं चोळी लाल
बोळवण केली बंधु कुंडलिकानं
उकला साडी चोळी भरा हिची ओटी
वल्या नारळाचा प्रसाद वाटी
बसली रथांत धुवा हिचे पाये
कुंडलिक बंधु परतुनी पाहे
नगरीच्या नारी उभ्या होत्या दारीं
कधीं आला राधाबाई आपल्या घरीं
काय सांगूं बाई माहेराचं सुख
विसरुनी गेलें प्रपंचाचें दुःख

• • •

## मुंबादेवी

आई तूं मुंबादेवी तुला तांदबीळाचं बोनं
हावशा माझा बंधू तुझ्या नगरीं माझं सोनं
आई तूं मुंबादेवी तुजं सोन्याचं कंबाळ
बंधू माझ्याला संभाळ
आई तूं मुंबादेवी येईन तुझ्या त्या नगराला
हावशा माझा बंधू जर तुझ्या त्या पदराला
आईतवारा दिवशीं गिरणीवाल्याला माझ्या सुटी
मुंबा देवी पेढे वाटी
मुंबईची मुंबादेवी तिची सोन्याची कंबर
निरी पडली शंभर पैठणीची

## देवाची द्रिष्ट

पांडुरंग मनीं पांडुरंग ध्यानीं
जागृतीं सपनीं पांडुरंग
उभे विटेवरी सुकुमार चरण
पिवळा पितांबर नेसले कसून
जळू जळू द्रिष्ट तुला कशी झाली
पाप्याचंडाळांनीं काय खोडी केली
लोण उतरीतें सावळ्यावरूनी
द्रिष्ट उतरीते विठ्ठलावरूनी

वैजयंती माळा घाली गळ्यांतुनी
कानांत कुंडल उजेड पडती
जळू जळू द्रिष्ट तुला कशी झाली
पाप्या चंडाळांनीं काय खोडी केली
लोण उतरीतें सावळ्यावरूनी
द्रिष्ट उतरीतें विठ्ठलावरूनी

अनुक्रम ........ वि: ..................
क्रमांक ..................... नों: दि: ........


हिऱ्यायाच्या वाती समया जळती
केशरकस्तुरीचा गंध लल्लाटीं
जळू जळू द्रिष्ट तुला कशी झाली
पाप्या चंडळांनीं काय खोडी केली
लोण उतरीतें सावळ्यावरूनी
द्रिष्ट उतरीतें विठ्ठलावरूनी

जरीचा रुमाल मुगूट सोभती
नाशिवंत देहाला टाकीं ववाळूनी
जळू जळू द्रिष्ट तुला कशी झाली
पाप्या चंडाळांनीं काय खोडी केली
लोण उतरीतें सावळ्यावरूनी
द्रिष्ट उतरीतें विठ्ठलावरूनी

## भरली चंद्रभागा—

भरली चंद्रभागा नाव झाली कळवंतीन
उतरिली बाळंतीण सीताबाई
भरली चंद्रभागा नाव झाली ती नवरी
शेला गोलाचा आंवरी सीताबाई
भरली चंद्रभागा नावेचा घोडा बुडे
पतिव्रते व्हावें पुढें रखमाबाई
भरली चंद्रभागा नावेची करी पूजा
उतरला बाळराजा पांडुरंग
भरली चंद्रभागा कोंडले हरिदास
पितांबराची घाली कास पांडुरंग
भरली चंद्रभागा कोंडली म्हातारी
अंगें झाला उतारी पांडुरंग
भरली चंद्रभागा पाणी शिरलें गांवांत
हातीं सांगड धांवत पांडुरंग

भरली चंद्रभागा बुडालीं झाडं झुडं
पोहणाऱ्याला पाणी थोडं भाईराया
भरली चंद्रभागा कांठ्याकुठ्यावरी
पोहोणार पेट्यावरी भाईराज
भरली चंद्रभागा भरली दोन्ही थड्या
पोहोणार टाकी उड्या भाईराज
भरली चंद्रभागा रस्त्यावर आल्या नावा
रुक्मिणी म्हणे कांहो देवा निजलाती
भरली चंद्रभागा उतार दे ग माये
दूर देशीं जाणें आहे भाईयांना
भरली चंद्रभागा उतार पश्चिमेचा
तारु दक्षिण देशाचा भाईराज
भरली चंद्रभागा पाणी लागलं वेशीला
हांका मारीते दासीला रखुमाई
भरली चंद्रभागा पाणी लागलं भिंतीला
चोळी वाळते खुंटीला रखुमाईची

• • •

# २. भगवान् श्रीकृष्णाचीं गाणीं

द्वारकेचा भगवान् श्रीकृष्ण म्हणजे उभ्या मराठी मनाचें एक अतिशय आवडतें दैवत आहे. ह्या दैवताच्या विविध लीला वर्णन करण्याची आपापल्यापरीनें आजवर अनेक कवींनीं शतकानुशतकें खटपट केलेली आहे. तरीपण हा विषय रोज नव्या रूपानें लोकांच्या हृदयांत वास करतो आहे. त्याकारणानें श्रीकृष्णाचें नांव घेतलें कीं, लगेच लोकांच्या नजरेंत गोकुळचा कृष्ण आणि त्याच्या बाळलीला खेळूं लागतात. ओठांवर घोळूं लागतात, त्यामुळें मग कितीतरी गाणीं नव्यानें पुढें येतात.

मराठी लोकगीतांतील श्रीकृष्ण असाच नव्या नवलाईनें पाहायला मिळतो आहे. "सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज" ही गोष्ट गीतेंत सांगून अमर झालेला श्रीकृष्ण लोकगीतांतहि हीच भावना घेऊन आलेला आहे. त्या कारणानें श्रीकृष्णाचीं गाणीं हवीं तेवढीं-मोठीं चटकदार आणि एकदां ऐकलीं कीं, मन घर करून राहणारीं अशी तजेलदारहि. ह्या गीतांतील वैभव अपूर्वाईचें आहे. बोलणें आगळें आहे. आणखी रचना मोठी छानदार आहे.

असलीं श्रीकृष्णाचीं गाणीं लोकगीतांच्या खजिन्यांत भरपूर आहेत. हा फक्त एक वानवळा आहे. पण तेवढ्यावरूनहि त्यांची कल्पना येईल आणि भोळें भाबडें सामान्य मन त्यांच्या दर्शनानें भूल घेऊनच उठेल.

संग्राहिका–सौ. विजयादेवी सांवत

# राधिका

चिकणी सुपारी कात हो केवडयाचा
हातीं पक्कीं पानें चुना मोतियाचा
रुमालांत घेवोनि राधा निघाली
अशा कृष्णजीच्या महालांत गेली
कृष्णाजी कृष्णाजी शेज करा निराळी
कां तोडली माझी मोत्याची जाळी
अग राधिके आज कां रुसलीस
पलंगा स्थळीं जाऊनी बैसलीस
पलंगा स्थळीं शेज चांफेकळयाची
उद्यां आणीन आण तुझ्या गळयाची
असें वाटतें राधेला कन्या व्हावी
सरी साखळी घालुनी खेळवावी
असें वाटतें राधेला पुत्र व्हावा
कडी करदोटा घालुनी खेळवावा
असें चांदणें पडलें पौर्णिमेचें
राधा लुगडं नेसली भरजरीचें
चोळी घातली हिरव्या तापत्याची
वेणी गुंफली शेवंती मोगऱ्याची
ओटी भरली खारिक खोबऱ्याची
अशी राधिका कृष्णजी नेटक्याची

• • •

# शिमग्याचें गाणें

याहो या रुक्मिणी आमुच्या या आळी
हिरामोराची तुमची काचोळी
हिरा मोरावरनं गांवा गेला हरी
गांवा गेला हरी वसली पंढरी
पंढरपूरचा दामाजी सोनार
त्येनं घडविलं जोडव्यांच ज्वाड
एका जोडव्याला साडेतीनशें मोतीं
म्हाई रुक्मिणीचा पांडुरंग पति
याहो या रुक्मिणी आमुच्या या आळी
हिरामोराची तुमची चोळी
हिरामोरावरी गांवा गेला हरी
गांवा गेला हरी वसली पंढरी
पंढरपूरचा दामाजी सोनार
त्येनं घडविलं पैंजनाचं ज्वाड
एका पैंजनाला साडेतीनशें मोती
म्हाई रुक्मिणीचा पांडुरंग पति
याहो या रुक्मिणी आमच्या या आळी
हिरामोराची तुमची काचोळी
हिरा मोरावरनं गांवा गेला हरी
गांवा गेला हरी वसली पंढरी
पंढरपूराचा दामाजी सोनार
त्येनं घडविलं बांगडीच ज्वाड
एका बांगडिला साडे तीनशें मोतीं
म्हाई रुक्मिणीचा पांडुरंग पति

(हें गीत याप्रमाणें सर्व दागिने संपेपर्यंत लांबतें.)

# फेराचें गाणें

म्हाईबाई जोडवी मोडुनी
दयाबाई चेंडूजी गुंफूनी
आगाशीं मणी माळ ग
कृष्ण घेत्याती लोळूनी ॥ १ ॥
म्हाईबाई पैंजण मोडूनी
दयाबाई चेंडूया गुंफूनी
आगाशीं मणी माळ ग
कृष्ण घेत्याती लोळूनी ॥ २ ॥
म्हाईबाई बिलवर मोडूनी
दयाबाई चेंडूया गुंफूनी
आगाशीं मणी माळ ग
कृष्ण घेत्याती लोळूनी ॥ ३ ॥
म्हाईबाई पाटल्या मोडूनी
दयाबाई चेंडूया गुंफूनी
आगाशीं मणी माळ ग
कृष्ण घेत्याती लोळूनी ॥ ३ ॥
कृष्ण झिम्मा घालीतो
गोण्या गुलाल उधळीतो ॥ ४ ॥
तुझा गुलालाचा भार
माझी जोडवी झाली लाल ॥ ५ ॥
जाऊन येशवदेला सांग
कृष्णा झिम्मा घालीतो ॥ ६ ॥
कृष्णा झिम्मा घालीतो
गोण्या गुलाल उधळीतो ॥ ७ ॥
तुझ्या गुलालाचा भार
माझं बिलवर झालं लाल ॥ ८ ॥
जाऊन येशवदेला सांग
कृष्णा झिम्मा घालीतो ॥ ९ ॥

• • •

संग्राहिका–सौ. सुलोचना फडके

## गाणें सुदामाचे पोहे

सुदामा ब्राह्मण होता तो दुर्बळ । घरीं चित्तीं गोपाळ । दीड घरीं तयाचें । चरित्र ऐका सावधान ।। तेणें जन्ममरण दूर होती । सत्त्वाचा सागर । धैर्याचा मंदार । भक्तिवानी धरि तयापाशीं । ऐसा तो ब्राह्मण दारिद्रें पीडाला । परी स्मरे देवाला । अखंडीत नाहीं धड घर । केवळ जर्जर चंद्र प्रभाकर । उगवती उष्णे पोळे वारा येतसे भरारा । मेघाचीये धारा घरा । माझी एके दिनीं भार्या । भावें हात जोडी भ्रताराच्या पुढी नम्र तेणें । तुमचा सोयरा आहे नारायण । अखंडीत ध्यान । करितां त्याचे बालमित्र । भेटी जावे लवकरी । तो आहे कैवारी । दीनालागी ।। ऐकतां वचन मानीलें तयासी । पुढें कल्पनेसी गव नाहीं । तेथें नामा जावें कैसें हें न कळे । नीवतील डोळे दर्शनानें । परी तया भेटीं न्यावें कांहींबाहीं । परंतु ते नाहीं देशवरीं । सुदामा ब्राह्मण बायकोस म्हणे । रिकाम्या हातानें लाज वाटे ।। पाहे चहुकडे धुंडोनी सुंदरी । देखी मुष्टी चारी तांदुळीका । तेची भक्तिभावें । पतीपुढें ठेवी । पाहुनी गौरवी ब्राह्मण । तूं तया नावें योग्य पदार्थ प्रेमें करी । अति कृष्णदेव पोव्हे बांधावया । वस्त्र ते फाडीलेल्या माजीं बांधीलें कसेंतरी ।। सुदामा ब्राह्मण आनंद पावला । मुहूर्तानें मला प्रयाणाचा द्विज । म्हणे जातां मनीं कैसा भेटे चक्रपाणी । काय होईल नकळे म्हणुनी । हृदईं कळवळे । केवढा त्याचा राज्यभार । मी तो केवळ फकीर । येईल का आठवण बालपणाची । माझें नांव, तैत होता गवळ्याघरीं । आतां त्रैलोक व्यापी कालें तयानें देखीले द्वारकानगरीं । दिसती घोस ते लोंबती मोतीयाचें । सभा ते साजरी रत्नसिंहासनीं । देव चुडामणी शोभतसे देवाचीये दारीं । नाहीं आडकाठी हें तो आहे गोष्टी सिद्धान्ताची । तटस्थ जाहला चालला सत्वरी । तो मुखीं नामें गात गोविंदाचें । देखीला सुदामा आपुल्या नयनीं । मग चक्रपाणी उठे त्वरें । सिंहासनाखालीं टाकूनिया उडी । करद्वय जोडी नयनालागीं । भेटुनीया तेव्हां धरीला मस्तकीं । बैसवी मंचकीं सोनीयाच्या । म्हणे रुक्मिणीसी आण उदकाला । पूजूं ब्राह्मणाला सन्मनानें । पट्टराण्या तेव्हां उटणें लावीती । आऊक्षवान आरती करीताती । करवीलें स्नान दिलें त

पीतांबर । तैसे अलंकार नानापरी ।। काय वहिनीनें दिधलें आम्हांसी हें तो गोष्टी कृष्ण म्हणे । सोडियलें तेव्हां मुठी तांदुळी । रुक्मिणी नायका । पुढें ठेवी । घेऊनीया पोहे मुखामाजीं टाके ते भीमकी हात धरी। भक्षुनिया पोव्हे संतुष्ट जाहला। मग आनंदला नारायण । तेव्हां आज्ञा केली क्षणांत रचली सुदामपुरी । सर्व सुवर्णाची द्वारकेप्रमाणें ब्राह्मणासी दाने गुप्त दिली। सुदामा म्हणे अनंता। आम्हां आज्ञा द्यावी आतां । जाऊं घरासी सत्वर । येऊनी दिवस झाले चार । सर्व ठेवूनी जावें बरें वाटे । मारीती मस्करे ऐसी ऐकुनी वचनें । सर्व काटीलीं भूषणें । आज्ञा घेऊनी चालला देव बोळवीत आला ।। नाहीं अमुचे दैवीं त्यानें कैसें द्यावें । व्यर्थ का रुसावें देवावरी ।। धरीतां न खेद पुढें वाट चाले गवळी । भेटले तयालागीं पुसतसे । त्यांनीं कोणाचें नगर । ते म्हणती घर सुदाम्याचें । सुदामाही तेव्हां मंदीरासी गेला । मग ओवाळीला सुंदरींनें । समाधानी झाला सुदामा ब्राह्मण । करा रे कीर्तन सुदाम्याचें ।।

संग्राहिका—सौ. **ताराबाई साठे**

# चिंधी

द्रौपदी भगिनीवरती प्रीति अधिक का रे कृष्णा अधिक का रे ।।ध्रु०।।
तुझी ही भगिनी सुभद्रा असे, प्रेम अधिक मग तिजवर कैसे । कधीं कारण मज गुह्य जरी असे नंदबाळा । ऐकुनि वच हे निज भगि-नीचे, बोट कापलें म्हणे आमुचें । जाऊनि भगिनी चिंधी मागे नारदा रे ।। २ ।।

जाऊनि सत्वरी सुभद्रा गृहीं बोट कापलें सांगे तिजही ।
देई देई चिंधी थोडी विलंब ना गे, लावी विलंब ना गे ।। ३ ।।

चिंधी पाहण्या वेळ नसे मज, शालू पैठणी आणली आज ।
कैशी फाडून चिंधी, चिंधी देऊं नारदा रे ।। ४ ।।

येउनि सत्वरी द्रौपदी गृहीं, बोट कापलें सांगे तिजही ।
देई देई चिंधी थोडी विलंब ना गे लावी विलंब ना गे ।। ५ ।।

ऐकतां क्षणीं पदर जरीचा, फाडुनि बोले लावूं आतां ।
वेगें येउनि बांधी बोटा ती स्वकरें भगिनी ती स्वकरें ।। ६ ।।
पाहुनी प्रीति द्रौपदीची कृष्णा म्हणियलें धन्य भगिनीची, ।
ऐशी भक्ति, तैशी प्रीति तुझी प्रभु रे आहे तुझी प्रभु रे ।। ७ ।।

## द्रौपदीचा धावा

दुष्ट दुर्योधन कुळकुळींत कसा ग जन्मला । द्यूत खेळूनी आरी आणीले पांडवाला । दुष्ट हा शकुनी दुष्टबुद्धी शिकवी कपटाला । सापळा ग एक गाईला पाजी वासराला ।। सोडिला बाण शब्दाशी चढे गुणाला । पाही अंतरीं कळ काढी माया प्राणाला । लागली ग चिंता शरण जाऊं कोणाचे पायीं । धाव रे धाव कृष्णा श्रीरंग माझी आई ।। संकटीं पडलें मी एकदां भेट मज द्यावी ।। १ ।।

धरोनी मृदुवेणी दुःशासन हासडूनी पाडी । फरफरा ओढीत ग नेत असे सभेंत तातडी ।। डाव्या अंकावरी बैस म्हणी तो जोडी । नको ग धरूं ममता भलत्याची आशा सोडी । धावोनी ये दयाळू वत्सला। संकटीं येई । नको सख्या गुंतू कोठें अयोध्या राहिली थोडी ।। वस्त्रहरणाचा कैफ मांडिली सारी घाई । संकटीं मी पडलें एकदां भेट मज द्यावी ।। २ ।।

क्षीरसागरींचा विलासी मोठा ध्यानीं मनीं । अजून कसा ग येईना सावळा चक्रपाणी ।। रंगमहालीं नेला असेल सत्यभामानी । वाट बघून शिणती नेत्र माझे दोन्ही ।। होईल रे हानी सख्या सोडीव येऊनी । संकटीं मी पडलें एकदां भेट मज द्यावी ।। ३ ।।

न सोडी सत्व तो धर्मराज गंभीर । भीम अर्जुन भाकले गुंतले शूर । नकुल सहदेव रणीं भैरववीर आनीवार । न बोलतां म्हणती रागवला ईश्वर ।। न अर्धी भीष्म द्रोण आला विदुर । सभा लोक पाहे टकमका थोर थोर । एकली मी आहे ह्याला गत करावी काई । संकटीं मी पडलें एकदां भेट मज द्यावी ।। ४ ।।

ऐकोनी इतकें गहिंवरले जगजीवन । कोण्या वेड्यानं गांजिली माझी हरण । ऐकोनी धावा मनीं योग टाकोनी । नाभीं नाभी शिष्याचा ऐकोनी ।।

खवळलें प्रेम । अंगाचें झालें स्फुरण । सावरल्या जाई जुई । संकटीं मी पडलें एकदां भेट मज द्यावी ॥ ५ ॥

दुर्योधनानें हासडितां निरी । फेडिली पहिली सोनेरी चटक अंजेरी । फेडली दुसरी शेलारी वैजापुरी । फेडली तिसरी पुन्नड नाग भरजारी । हिरवा दोरया कंचुकी गोरुपटयावा नेसली । चुमा खंबाईत हिरवी जाई । संकटीं मी पडलें एकदां भेट मज द्यावी ॥ ६ ॥

सोडिला दिंड काढिली बोभाटाची खजोरी । डाळिंबीं काळी-चंद्रकळा झळझळी । गुलाबी हिरवी वाणपुरीची खंजूरी । डाळींबी सेवराला म्हणोनी । आपला पितांबर झाकी भेटला मजला । देव श्रीहरी द्रौपदीला हर्ष झाला । धाव रे धाव श्रीरंगे माझे आई । संकटीं मी पडलें एकदां भेट मज द्यावी ॥ ७ ॥

## टिपऱ्याचें गाणें

नर्तनाची प्रार्थना । नमन करूं गजानना
पार्वती सूतनंदना । देव टिपरी खेळूं कुंजवनीं ॥
प्रथम राजा । येऊनी टिपरी माझी घेऊनी ।
कृष्ण सन्मुख लाजूनी । देव टिपरी ॥ १ ॥
सीता करीती रोदना । काय करूं मी या वना
वेध लागला मना । देव टिपरी ॥ २ ॥
श्रवण कुंडल पैठणी । वाणी गळी ठिकाणीं ।
संभू लगेची कल्पनी । देव टिपरी ॥ ३ ॥
गोकुळांत जावूनी । गौळणींशी बोलावुनी
दही दूध खावुनी । देव टिपरी ॥ ४ ॥
गोकुळांत जावुनी । गोपाळ गोप्या मिळवुनी
गाया चारतात वनीं । मधुर पावा वाजवुनी
देव टिपऱ्या खेळूं कुंजवनीं ॥ ५ ॥

• • •

## दुर्वासाचें भोजन

एके दिवशीं हस्तिनापुरास
आले दुर्वास
आदर त्यासी त्यासी
बहु केले ग दुर्योधना
बसविलें सिंहासनीं नेऊन
अशी सेवा सेवा मनोभावा
भाव काय केला । कावा करी मनामध्यें
योजना केली भक्ती सहा महिने संपूर्ण
स्नान करुनी
झारी भरुनी
खालीं बघुनी
धार धरुनी
केलें केलें चरणप्रक्षालन
झाले ऋषिराज प्रसन्न मग म्हणे
मग बोले दुर्योधन । द्या मजला एक वचन
दिलं ऋषींनीं ततक्षण । काय मागितलं दुष्टानं
येथें आहे एक काडी कवन
तेथें पंडूचे नंदन । धर्म द्रौपदी, भीमसेन,
नकुल सहदेव अर्जुन । रात्र होऊं द्या प्रहर दोन
तुम्ही जाऊन इतकेजण । मागा तयासी भोजन
जरी अन्नमाग केला तयानं । तत्घडी शाप देऊन
भस्म करी
जय जय जगदीश्वरा, पूर्ण भास्करा, दयासागरा
कीं विश्वंभरा, नंदकुमरा, शामसुंदरा, सख्या,
गिरीधरा, कीं धाव मनोहरा, चाला दुड दुड ये
लौकरी मजवरी कृपा करी श्रीहरी ॥ ध्रु० ॥
दुर्वास म्हणे दुर्योधना

अनुक्रम ............ वि: ............
क्रमांक ............ नों: दि. ............

तुझ्या रे मनींची मनकामना
पूर्ण करीन मी ऐक सुयोधना
तयारी केली की काङ्ग्लिक वना
निघाले तेथुनी अति सत्वर
सवे अठ्ठाविस हजार दळभार
निजले होते पंडुकुमार
रात्र होऊं दिली भली दोन प्रहर
मिळूनि सकळीक एकंदर
वेढिली गुंफा हो चौफेर
अवघ्यांनीं केला गजर हार हर
जागा झाला धर्मराज
करीतो खूण बसा महाराज
कोणतें कार्य काय लागली गरज
कां दया केली मजवर गरिबावर
दुर्वास म्हणे धर्मासीं
कांहीं एक जात होतों कार्यासी
मार्ग चालतां झाली निशी
आहोंत उपवासी
आम्हांला भूक लागली फार
वाढा जेवाया सत्वर भाकर
गेला धर्माचा आंवका
द्रौपदी म्हणे भिऊं नका
स्नान करा म्हणा सकळिका
मी लागतें सैंपाका
बोलली पतिव्रता उत्तर
अतां काय करूं विचार
मग जाऊन वृंदावनीं
बसली आसन घालुनी
गेली निद्रा वरी लागुनी

काय आठवी अंतरांतुनी
ये कृष्णा ये साजणी
कुठें गुंतलास मायबहिणी
तूं माझी कुलस्वमिनी
मी पडलें महा अडचणीं
जशी फाशामध्यें हरणी
पडलें अवचित येउनी
जरि न येशिल धांवा ऐकुनी
सत्त्वाची होईल हानी
तो द्वारकेचा धनी
नुकतां पितांबर नेसुनी
बसला होता ग साजणी
आला ग धावत चक्रपाणी
हाका मारी जय जय
मजवरी कृपा करी श्रीहरी
श्रीकृष्ण म्हणे द्रौपदी
करांया कारण माझी स्तुति
काय संकट पडलं तुजप्रति
नाहीं रे धडगति
काय सांगूं रे बाबा तुला
नको गुंतूं रे बोलायला आजला
ऋषी गेले आहेत आंघोळीसी
आतां ते येतील भोजनासी
काय वाढावें मी इतक्यांसी
म्हणुनि हृषीकेशी
सावळ्या तुझा मी धांवा केला
एवढी माझी लज्जा नाहीं तुला
श्रीकृष्ण म्हणे तुझा मी भाऊ
आधीं तूं मला घाल ग जेऊं
ऋषींचें कार्य पुढें मग पाहूं

आधीं तूं संतोष कर ग मला
मग सगळे लाव कामाला
राबला मग फारच चिंताग्रस्त
मोठ्यानं आक्रंदत
फुटलं माझं संचित
नका भिऊ माझी मात
हात घालुनिया थालीनं
काढीलं भाजी पान
वाढाया अपुली किर्ती
होईल यानें पूर्ती
तें टाकलं मुखांत
दिली ढेकर झाला तृप्त
मग अन्नाचे पर्वत
पाडले असंख्यांत
अजुनि का ऋषी येईनात नदीवरूनी
श्रीहरी मजवरी कृपा करी
तिथेंच ब्राह्मण तिथेंच द्रौपदी
तिथेंच सैंपाक तिथेंच यदुपति
न कळे कोणास याच्या गति
पाडिले ग अन्नाचे ढिगारे
नाना परींचे प्रकार सुंदर
दहींभात वडे खिर पोळ्या
घारगे पुऱ्या काय भाज्या चिरल्या
मोकळ्या तुपसाखर दह्याच्या डिखळ्या
अशी नांवें घेऊं मी कुठवर
बैसले ऋषेश्वर हरहर
परब्रह्म अन्न चोखट
इच्छिति श्रेष्ठाचीं ती श्रेष्ठ
खातां खातां दमले चट
तरी त्या अन्नाची आशा न सुटे

भोंक जरी असते रे माथ्यावर
आणि एक पक्का अच्छेर जेवीत रे
चट भोजन उरकलें
हात धुतले, विडे घेतले
जाऊनि पसरले गडगड लोळती वाकूवर
फिट फिटुन गेलीं धोतरं नाहीं खबर
असा श्रीरंग कवटाळी
त्यानें तिकडल्या तिकडेच केली
हांक भीमाला मारली
भीमानें आरोळी दिली
उठा उठा पात्रें टाकलीं
द्रौपदी खोळंबली
ऋषी अवघे चपापले
अजुनि तोंड नाहीं वाळलें
तोंचि बोलावणें आलें
गोष्ट दुर्वासा कळाली
त्यानें अंतर्यामीं शोधली
बुद्धि नष्टाची ऐकली
कांहीं बरी नाहीं झाली
जरि द्रौपदी क्षोभली
इथें नाहीं रे आमुचा वाली
अशा देशामध्यें पडली
त्यानें मागेंच्या मागें केली झुभापुरी
मजवरी कृपाकरी श्रीहरी
परतुनी आले वृकोदर
त्यासि पुसूं लागले जगजीवन
आजुनि ऋषी आले कां नाहीं रे
स्नानें तरी झालीं कीं नाहीं रे
भीम चकित होऊनि उभा राहिला

मी गेलों होतों त्यांसी बोलावयाला
ते म्हणाले आतां घातलें जेवूं
आणिक कां आलास पुनः बोलावूं
कर कर लागले दांतभी खाऊं
आम्हांला मारूनि तरी टाका रे
ते गेले पळून चट सारे माघारे
मीनाच्या मनीं उमजलें
आम्हांला जरा नाहीं कळुं दिलें
तिकडल्याच तिकडे समजावले
  हें अन्न रे वायां गेलें
तुम्ही आम्ही काय जेवुं या रे
सर्व घेऊनि पांच मूर्ति
बहिण द्रौपदी सातवी कुंती
आठवा आपण स्वयें श्रीपती
जेविली ग बहु प्रीत केली
जशी बालकांसि माउली रक्षिली
द्रौपदी पांडव अंगना लागले हरीच्या चरणा
काय करिते विज्ञापना
आली आमुची करुणा
श्रीधरा मधुसूदना अच्युता जनार्दना
पूसनसुता नंदना
भूल पडली अठरा जणा
तुम्ही श्रीहरी कां आठवाना
पापाचा होतो चुना
कर जोडुनि करी प्रार्थना मुरारी
जय जय मजवरी कृपा करी श्रीहरी

• • •

## कृष्णाचा विनोद

तेव्हां तो कोण्या एके दिवशीं । रुक्मिणी बोले हरिसी । कृपा करूनि आधीं मज सांगा । विडा देईन मग शेजीं तुम्ही धीराचे आहां परंतु । तुम्ही कां हो काळे मी गोरी । तुम्ही थोराचे आहां परंतु । नंदराणीनें बाळपणाशीं । काळें लाविलें गालासी । नाहीं पुसिलें तसेंच राहिलें । गुंतलों भक्ता काजांसी ।

कृष्ण म्हणे मी सूत गवळयाचा । मजवर धुरळा त्रिभुवनाचा । शिशुपाल वर योजिला । मी काय गड्या तुझ्या कामाचा । तुम्ही थोराचे । बल्लव म्हणे अगे सुंदरी । तुळशीमाळा जड झाल्या । पूर्वीं हा वर योजिला । भ्रतार येईना तुझ्या मना । तुम्ही थोराचे आहां परंतु ।

इतकें भाषण ऐकून । रुक्मिणी लोळे धरणीला । उठून धरीं हृदयीं सहज बोललों मी तुला । तुम्ही थोराचें आहां परंतु । तुम्ही कांहो ःकाळे मी गोरी।तुम्हीं थोराचे आहां परंतु ।

## विंचू

सहज उभी मी अंगणीं । हर्षवंत मनीं । सर्व शृंगार करूनी । पितांबर नेसुनी । रंगीत कंचोळी शिकोळा । उभी ग चित्रशाळा । खांब कवळीला । तिथंच विंचू होता । त्यांनीं मज डंखीलें । विंचू करितसे मज कष्टी । कळ घ्यावी मनगटीं । बावन चंदन शिरसोनं । जडित्राचं लेणं । माळ चिमण्यांची असावी । याला गत करूं कैसी । भेटी मदनाचा पुतुळा । ऐशी शिवतकळा । विंचू उतरा गे । साजणी आणावे चक्रपाणी । विंचू उतरा गे ।

विंचू नव्हे ग तो । काळ जीव माझा व्याकूळ । सुटली गळगांठ । मोकळे मुरशन मंडयळी । विंचू उतरा गे ।

सूर्य उगवला आकाशीं । तो आणा मजपाशीं । त्यानें होतैसे उबारा । विंजन वारा घाला । विंचू उतरागे तयासी ।

विंचू-विंचू बाना । विंचानें डंखिलें । राजहंस सख्यांनो घरीं शाम आले । झडकरी जागा आणाजी कृष्णाजीला । ऐसीं राधिका हांसत बोले मंद चाले । विडा बनविती सत्यभामा । देवा मेघःशामा । तुमचा तांबूल । राधाला प्रसाद गोविंदाचा । विंचू उतरला । तयाचें चित्त नेलें चोरुनी । विंचू उतरला ।

## कृष्णाचें गाणें

परदरीं तूं उदय चंद्राचा वनीं । व्हीदं उभा गवळणींचा । सुगंध सुटत सुमनांचा । ये पवन मलयागिरीवरचा । हा थाट उभा रासांचा । धरुनी हस्त राधेचा । श्रीरंग कुठें आजी जावा हृदयींचा तो प्राणविसावा । मुरलीधर आजी कुणी दावा हृदयींचा । तो प्राणविसावा कुंज्यांत असेल प्रभु बसला यदुपती । आम्हांवरी रुसला मग विचारती । तुळशीला माला ती । अम्र बकुळीला तुम्हीं कुठें कृष्ण पाहीला । ठकवोनी गोपींना गेला । तो मदनतात हरी यावा । हृदयींचा तो प्राणविसावा । मुरलीधर आज कुणी दावा ।

संग्राहिका-सौ. **अन्नपूर्णाबाई जोशी, पुणें.**

## श्रीकृष्णाचीं गाणीं

### ( गवळण )

—१—

येश्वदेबाई तुझ्या दुर्गुणीं मुलाला करुं काय
घरांत शिरुनी चोरुनि खातो दुधावरील साय ॥ १ ॥
पराई पोरें जमवूनी सारे शंभरदां करी येरझारे
प्रसंग पाहुनी करितो चोरी अवगुण याचें न जाय ॥ २ ॥
धेनुवत्सें सोडुनी देतो गेली म्हणूनी आम्हां पळवितो
शिंक्यावरची दहीदुधाचि मडकीं फोडूनी जाय ॥ ३ ॥
या कृष्णाला बांधुनि टाका किंवा यमुनाजळांत लोटा
राधा म्हणे हा कृष्ण नाटकी पूर्ण ब्रह्म यदुराय ॥ ४ ॥

• • •

—२—

सुप्रभातीं थोडें तरी रे दुध घेईं प्रभुवरा
दुध घेई प्रभुवरा रे नयनशामा सुंदरा रे
दूध घेई प्रभुवरा ॥ ध्रु० ॥
षड्रिपुशीं जाळियेलें भक्तीनें दूध तापविलें
प्रेमभरें आटविलें घातियली शरकरा
दूध घेई प्रभुवरा ॥ १ ॥
सत्पात्रा धरुनिया करी उभी येश्वदा सुंदरी
आतां घेई बा श्रीहरी विनविते किंकरा
दूध घेई प्रभुवरा ॥ २ ॥
शांत व्हावयासी मजला मान देई या विनंतीला ।
आजी भाग्योदयची झाला
दूध घेई प्रभुवरा ॥ ३ ॥

—३—

घ्या गे घ्या गे घ्या गे कुणी घ्या गे
ह्याच्या हाताचा वेणु कुणी घ्या गे ॥ध्रु०॥
गृहीं अपुल्या करीत होतें धंदा नंदाचिये नंदा
तल्लीन झालें मी मुरलीच्या नादा ॥ १ ॥
गृहीं सासुरवास मला भारी । जात्रा नंदा गांजिती परोपरी
ह्या मुरलीनें ठकविले पोरी ॥ २ ॥
वेणु नव्हे हें विष मला वाटे । वेणु ऐकतां भ्रांती मनीं दाटे
महादेवाची मूर्ति कधीं भेटे ॥ ३ ॥
सासूकी सासरा म्हातारा । त्यानें केला जिवाचा कैवारा
तान्हे बाळा टाकूनि आलें गृहाघरीं

—४—

नंद बाल गोपाल हरी, जाऊं दे आम्हांला ॥ ध्रु० ॥
गौळणी आम्ही सासुरवाशी । जातों मथुरें बाजाराशीं
नित्य आमुच्या खोड्या करिसी । सांगू आम्ही नंदाला ॥ १ ॥
बाजाराचा घावा कर । मग आपुला रस्ता सुधार
त्यांत एक गोपी सुंदर । त्यांत एक राधा सुंदर
पाहुनिया कर धरिला ॥ २ ॥
तुझें रूप मोहक फार । कासे शोभे पितांबर
भक्तासी एक वार । दासासी एक वार
दर्शन दे जगपाला ॥ ३ ॥

संग्राहिका-शरदिनी बाबर

## गौळण

—१—

हरी माझा काळा निळा
संगं गोपाळांचा मेळा
त्येच्या हातींचा वेनू
कुनी घ्या ग घ्या ग

हरी माजा किती छान
जसं केवड्याचं पान
हरीमाज्याच्या अंगीं गोडी
चालतांना डोळे मोडी
करी गोकुळांत खोडी
हरी माजा किती धड
धरी मथुरेची वाट

कुनीकुनी आक्रूज आला
माज्या हरीला घेऊन गेला
आक्रूजानं उद्धव पाठविला

येश्वदीचा समाचार कळला
मन न्हाई त्या संसारीं
सर्व चित्त हरीवरी
खेळ बघुनी झुरतो जीवू
कुठें ग हरीला पाहूं

—२—

गौळण सांगे गौळणीला
पुत्र झाला येश्वदीला
येकी म्होरं येक धावे
येक वाटे सुंटावडी
अशी गलबल झाली
दासी जनीं हेल घाली
वान घेऊनिया तार्टी
नंदाघरीं झाली दाटी

—३—

नंदाघरचा त्यो गुरंराख्या
येतां वो जातां मजकडे
पाहतां वाईट तुमची खोड, काना
पदराला धरूं नको सोड
करूनी येनीफनी
काजळ कुंकू लेली
काळ्या हरीला दावी गोरा रंग
पदराला धरूं नको सोड
तूं किष्णा काळा
मी राधा गोरी
तुजी माजी न्हाई शिनजोड,
काना पदराला धरूं नको सोड

—४—

हांडी भींवरी पारी कासीला
आग लाव त्या गाईला
जाती कुनब्याच्या रानाला
जोंधळा खाऊनी बुडविला
तवा तो कुनबी धांवत आला
हातीं भेंड त्यानें घेतला
मग धीर माझा तुटला
पळतांनी कांटा मोडला
कृष्ण बाळ बोले येश्वदीला
गाई फुकट दे कोनाला ॥ १ ॥

ढवळी पवळी पांढरी पाय सोरटी
ती खाईना करड
काठीवाडी मालंदीची जुटी
काळी म्हताप गाय धाकटी
धरी हरणीच्या शेपटी
मग वळल्या यमुना तटीं
घाली धुनर बाळवंटीं
कृष्ण बाळ बोले येश्वदीला
गाई फुकट दे कोनाला ॥ २ ॥

यमुना जमुना गाई सरसपती
तान्हीं वासरं पाजती
गंधारी गाई धुरपतीला हुमरती
कावीरी तिला चाटती
जग हवान चैताळती
गुल पंतग उधळती
लक्षी जावीला जुजती
कृष्ण बाळ बोले येश्वदीला
गाई फुकट दे कोनाला ॥ ३ ॥

क्रमांक ....... नों. दि. .......

आबी भवानी बंदर भंडारीला
नाहीं सुमार लाथ मारली गुढग्यावर
राजी गीरजी टेकावर
गाई पिळाव्या कुठंवर
कृष्ण बाळ बोले येश्वदीला
गाई फुकट दे कोनाला ॥ ४ ॥
पानी पिईना साळीबाळी गाय चरना
इसी भाच्याला आयकना
गजी वासरू घेईना
कमळी नाचती छनाछना
तिला घालावा लोढना
छंद चोरीचा लागला
कृष्ण बाळ बोले येश्वदीला
गाई फुकट दे कोनाला ॥ ५ ॥

—६—

फुलांची शेज सुंदरी
कधीं येतील राजमंदिरीं
भुललें ग बाई घननीळासी घेऊन यायी
करूं गत काई कृष्णाला कडेवर घेई ॥ १ ॥
दारीं उभी होतें मी वनिता
कमरी घालुन सोन्याचा पट्टा
हातामधीं सोन्याची अंगठी
शोभती निराळ्या बोटीं
भुललें ग बाई घननीळासी घेऊन यायी
काय करूं गत काई कृष्णाला कडेवर घेई ॥ २ ॥
ब्रदी भरून खिरीची वाटी
सोलना मजेची आमटी
पापड लाविला ताटीं
भुललें ग बाई घननीळासी घेऊन यायी
काय करूं गत काई कृष्णाला कडेवर घेई ॥ ३ ॥

# कृष्णाचें गाणें

कृष्णा लोळण जी घेती
आमा अंगीं जी शिवावी
काढ गजनी दिंड
काढल्या सोन्यायाच्या सुया
काढले रेशमाचे दोरे
गेले शिंप्यायाच्या आळी
आर तूं शिंपी नामदेवा
अंगी शिव नाना परी
श्री नाम दे शिवन्यावारी
मुंगळे काढा भुजवरी
चांद सूर्या छातीवरी
गरुड पक्षी पाटीवरी

अंगी घालूनी सावळा
दिसे मदन पुतळा
आला आपुल्या वाड्याला
गाई गोंदन सोडीली
गेला जमुना नदीला
डाव चेंडूचा मांडीला
डाव आला कृष्णावरी
फर फर अंगीं जी काढिली
नेऊन खडकाव ठेविली
अकस्मात वायदळ आली
अंगीं वाऱ्यानं गेली
कृष्णा रडत फुंदत
आला आपुल्या वाड्याला
येश्वदा माता बोलती झाली
कृष्णा अंगीं काय केली
आल्या काशीच्या कावड्या

अंगीं दानाला दिली
लेक न्हव नूं वर्यारीं
मुंगळे काढिले भुजवरी
चांदसूर्या छातीवरी
गरुड पक्षी पाठीवरी

## फेराचें गाणें

माझं सगुण गुणाचं तानं
बाळ दिसतं गोजिरवाणं
तुमी लटकेंच करतां गाऱ्हाणं
ग गोकुळच्या नारी ॥ १ ॥

तुमी लपवुनी याचा भवरा
आळ घेतां सारंगधरा
तुमी बारा घरच्या बारा
ग गोकुळच्या नारी ॥ २ ॥

तुमी लपवुनी याची गोटी
लागतां त्याच्या पाठी
एवढीच रीत तुमची खोटी
ग गोकुळच्या नारी ॥ ३ ॥

तुमी लपवुनी याचा दांडू
कुचकी घालीतां चेंडू
तुमी बळेंच येतां भांडू
ग गोकुळच्या नारी ॥ ४ ॥

श्रीरंग माझा ग वेडा
याशीं नाहीं दुजा जोडा
याचा तुमी छंद सोडा
ग गोकुळच्या नारी ॥ ५ ॥

●●●

# ओव्या

उपजला कृष्ण अडवा घेतला बापानीं
कवाड कृष्ण उघडी लाथांनीं
आगाशी पांखरूं बोलीचा फेर जाना
उपजला कृष्ण उघडीला बंदीखाना
आगाशी पांखरूं बोलीची गत मत
उपजला कृष्ण झाला आनंद गोकुळांत
आगाशी पांखरूं बोली बोलांत दुहीरी
उपजला कृष्ण झाला मामाला वयीरी
उपजला कृष्ण कुलुप गळाली ठाईचीं
पुरवीली इच्छा मातां देवकीबाईची
उपजला कृष्ण आनंद झाला फार
हात्तीवर जासूद मामा वाटीतो साखर
उपजला कृष्ण उपजतां रांगतो
कंवस त्याचा मामा माराया सांगतो
साठ पुतरांनीं गंध्यारी नाई धाली
एकल्या कृष्णातानी देवकी संतुषली
कृष्णा तुझी बोली गुळाची गुळपोळी
आतां भुलावीली राधा गवळ्याची लेकुरवाळी
मथुरी बाजारीं गेल्या गवळनी झाडुनी
कळंबाच्या झाडावरी कृष्णा बसला दडुनी
नदी जमुनाला कृष्ण खेळतो सारंगपाट
आला गवळनीचा थाट कृष्णा द्यावीस देवा वाट

• • •

# चुडा

गोकुळामध्यें कृष्ण नांदतो बहु आनंदानं
मातेच्या उसण्यासाठीं देवानं घेतलं लहानपण
वैराळाचं रूप घेऊनी निघाले भगवान
कंस मामाच्या गांवीं मुक्काम केला देवानं
घ्या ग घ्या ग चुडा बायांनो जडीत्राचं लेणं
सर्व नगरीच्या बाया चुडयाचं करतात खंडानं
खोल खोल पेटारा चुडा तुझं नांव सोनारी
एक एक चुडयाची किंमत तूं बा सांग खरोखरी
सव्वा लाख सोनटक सोनं ऐक सुंदरी
झाक झाक पेटारा चुडा तुझा मोलाचा भारी
एवढ्या मोलाचा चुडा लेणारी भाग्याची कोण
भाग्याची नार कमळजा कंसाची जाण
खबरीमागं खबरी कळल्या कमळजबाईला
कुण्या देशींचा वैराळ आपुल्या गांवांत आला
जाग जाग सयांनो आणा तुम्ही त्या वैराळाला
आणा वैराळाला चुडा मी भरतें मनगटाला
पुढं साऱ्या न् मागं वैराळ आल्यात वाडयाला
ऊठकर बसकर चंदनपाट दिला बसायाला
कोण गांव कोण ठिकाणा कुठला रहिवाशी
तुझ्यासारखा कृष्ण भाचा नांदे गोकुळाशी
गांव नाहीं शिव नाहीं मूळचा परदेशी
चुडा विकण्यापायीं आम्ही हिंडतों दाही दिशीं
असें म्हणतांना विश्वास आला कमळजबाईला
कमळजबाई नारी चुडा तिनं भरला मनगटाला
अरे अरे वैराळा एवढा चुडा ढिला कर
मनगटीं लागली कळ न् माझा पति जागा होईल
जाग जाग सयांनो आणा तुम्ही विळा खिळा सुरी

चुडा खिसायचं खड्ग माझं विसरलें मी घरीं
उभी होती अंगणीं झटकन् गेली पतिच्या म्हालाशीं
उशाखालचं खड्ग आणूनी दिलं वैराळाशीं
खड्ग आलं हाताला कृष्णदेव खुशालींत झाला
खुशालींत झाला न् देतो वळक मामीला
जाग जाग मामीबाई निरोप कळवा मामाला
गोकुळचा रहिवाशी कृष्णदेव मी आलोंय दाराला
भाच्याचं नांव ऐकतां मामा दचकून जागा झाला
दस्तरूमालानं हात बांधुनी शरणच गेला
अरे भाच्या नको कापूं रे तूं माझी मान
सांगतों खरोखरी घरचा तुझा मी होतों बंदिवान
बंदिवान होतों मी न् गोकुळीं गाई राखीन
सात बंधु मारिल तुम्ही मामा नव्हतं असं बोलणं
एका शिरासाठीं तुम्ही मामा लई कष्टी झाला
मावळ भाच्याची लढाई चालली त्याच येळेला
पहिला हातीं मारिलान् मामाची झरे बांधिला
दुसरा हात मारिला दंड पाडीला धरणीला
तिसरा हातीं मारिलान् शीर घेऊनी गेला गोकुळाला
बाळ गेलं शिकारीला न् देवकी आली ओवाळायला
अरे अरे चांडाळा कसा तूं वैर साधीला
वाणीतिणीचा बंधु माझा कां तूं मारीला
सात बंधु मारिले पाणी नाहीं डोळ्याला
एकाच शिरापाइं माथा लई कष्टी झाला
त्या दिवशीं आनंद झाला उभ्या गोकुळाला
असा पापी मारिलान् त्याचा दोष नाहीं मजला

• • •

संप्राहिका-विद्या देसाई

## राजसूय-यज्ञ

पंडुचा निरोप नारदांनीं सांगितला
राजसूय-यज्ञाचा धर्मराजानें बेत केला
धर्म म्हणे अर्जुनाला तुम्ही जावें द्वारकेला
राजसूय-यज्ञासाठीं आणावें माधवाला
सोन्याच्या नांगरानें पृथ्वी नांगरीली
राजसूय-यज्ञासाठीं धर्मराजानें जागा केली
द्रौपदीचा निरोप लागे अर्जुनाच्या कानीं
सोळा हजार अष्ट नायीका कृष्णासहित रुक्मिणी
अर्जुन गेले द्वारकेला थोर आनंद झाला मनीं
आंत रामकृष्ण पाहिले सिंहासनीं
अर्जुन गेले सभेला समोर जगजेठी
नरनारायणाच्या गांठी फार दिवसांनीं झाल्या भेटी
अर्जुन बोलावितो छप्पन्न कोटी यादवाला
प्रद्युम्न आतिरथ्य तुम्ही सारेजण चला
देव म्हणे बळीरामदादा बरोबरी चला
राजसूय-यज्ञाचा धर्मराजांनीं बेत केला
रुक्मिणीकडे पाहुनी हांसले चक्रपाणी
राजसूय-यज्ञासाठीं चला तुम्ही साऱ्याजणी
कुटुंबासहीत रामकृष्ण कोठें जातो
धर्मराजाच्या घरीं राजसूय-यज्ञ होतो
सोन्याच्या रथांत रामकृष्ण बैसती
हस्तीनापुरीं जातां रथ पालख्या होत्या कीती
मोतीयाचा तुरा पडला वाटेवरी
राजसूय-यज्ञासाठीं तांतडीनें आले श्रीहरी
अंबारीचा हत्ती उभा केला महाद्वारीं
राजसूय-यज्ञासाठीं तांतडीनें आले श्रीहरी

धर्म येवूनी समोरीं रामकृष्णाचा मान केला
धरून देवाचा हात यज्ञमंडपांत चला
द्रौपदी सुभद्रा येवूनी रुक्मिणी सामोरीं
देऊनी हळदी कुंकू साऱ्यांचा मान करी
देव आले मंडपांत द्रौपदी पाय धरी
पद्माचा उजेड पडला चुड्यावरी
द्रौपदी सुभद्रा करी देवाला नमस्कार
दिला चुडयाला आशीर्वाद मनीं हासले यदुवीर
राजसूय-यज्ञामध्यें सारे ऋषी बोलवीले
वसिष्ठ वामदेव कपीळ महामुनी आले
राजसूय-यज्ञासाठीं कामें दीलींत नेमुनी
देव नारायण उभे कंबर बांधुनी
राजसूय-यज्ञामध्यें दुर्योधन कोठींवरी
नाथमच्छींद्र त्याच्या उजव्या हातावरी
आकाशीं मंडप सुरूचे दिले खांब
राजसूय-यज्ञाचा केला धर्मराजानें आरंभ
अग्रपूजेला आले हरी उद्धव अक्रूर हात धरी
राजसूय-यज्ञाची सभा ऊठुनी उभी सारी
नकुल म्हणे द्रौपदीबाईला
राजसूय-यज्ञासाठीं धर्मराज खोळंबला
धर्मराज धुतो पाय द्रौपदी घाली पाणी
अर्जुन म्हणे नकुलास अग्रपूजेचें ताट आणी
हिऱ्यामोत्यांचे अलंकार वर तुळशीचे हार
द्रौपदी दृष्ट काढी देवाची वारंवार
सुगंध चंदन भीमसेनाचे हातीं
पांची पांडवांत द्रौपदी उभी होती
द्रौपदीबाई माझी धर्मराजाचे शेजारीं
गंध अक्षदा लावोनी पूजा केली ती साजरी
राजसूय-यज्ञ धर्मराजाचे घरीं झाला
अग्रपूजेचा मान देवा गोविंदाला

राजसूय-यज्ञ धर्मराजाचे घरीं
देव नारायण अग्रपूजेला अधिकारी
रुक्मिणी येवूनी द्रौपदीला न्हाऊं घाली
हिऱ्यामोत्यांची कांचोळी पैठणी हातीं दिली
हिऱ्यामोत्यांची कांचोळी द्रौपदीबाई ल्याली
राजसूय-यज्ञामध्यें करी आहेर वनमाळी
सुभद्रा नेसती पिवळा पितांबर
राजसूय-यज्ञामध्यें केलें कृष्णांनीं आहेर
राजसूय-यज्ञामध्यें सभेला झाली दाटी
धर्मराजाला आहेर करितो जगजेठी
राजसूय-यज्ञामध्यें सभेला रीघ नाहीं
धर्मराजाला आहेर करितो शेषशायी
राजसूय-यज्ञामध्यें सभा दिसती तांबडी
द्रौपदीबाई माझी पांघरली शालजोडी
होमशाळेला मोतीं-पोवळ्यांचे घोस
द्रौपदीबाई माझी अग त्रिवेणी खालीं बैस
राजसूय-यज्ञामध्यें वाजंत्र्याचा गजर
धर्मराज द्रौपदीला राजे करीती आहेर
शंकर म्हणे पार्वतीला यज्ञाला दोघे जाऊं
धर्मराज द्रौपदीला आहेर होतो तो पाहूं
राजसूय-यज्ञामध्यें धर्मराज हार्षीक
प्रसादाला आले मिथुलापुरीचे जनक
राजसूय-यज्ञामध्यें द्रौपदीबाई वाढी
करुनी ब्राह्मणाची पूजा धर्मराज हात जोडी
ऋषीच्या पंगतीला जेवीती कोण कोण
वशिष्ठाची आरुंधती लोपामुद्राला बोलावणं
ऋषींच्या पंगतीला वाढीती दोघी सया
द्रौपदी रखमाबाई नणंद भावजया
ऋषीच्या पंगतीला द्रौपदी वाढीती
देव विमानीं पाहती जशी वीज चमकती

राजसूय-यज्ञामध्यें स्वर्गीं घंटानाद झाला
राघूच्या रूपानें शुक प्रसादाला आला
स्वर्गींची घंटा वाजते खणा खणा
धर्मराजाचे घरीं शुक बैसले भोजना

राजसूय-यज्ञामध्यें स्वर्गीं घंटानाद होतो
कृष्ण म्हणे धर्मराजा शुक प्रसाद वेचीतो
राजसूय-यज्ञामध्यें उच्छिष्टाची लगबग
देव नारायण मोहनमाळ टाकी मार्ग

राजसूय-यज्ञामध्यें नित्य ब्राह्मणाच्या ओळी
देवनारायण अंगें काढीतो पत्रावळी
राजसूय-यज्ञामध्यें धर्मराज पुण्यशील
पांडवांचें भाग्य थोर काढी उच्छिष्ट घननीळ

रुक्मीणी येऊनी म्हणे द्रौपदीबाईला
पांची पांडवांचीं नांवं घ्यावींत सभेला
पांची पांडवांत धर्मराज पुण्यवान
द्वारकेचे घरीं पाठीशीं नारायण

साती समुद्राचा पृथ्वीला पडला वेढा
अर्जुन भीमासारखा नाहीं जोडा
वहिनी तुम्हांला सांगतें
पांची पांडवांत नकुल रूपवान
जसें पौर्णिमेचं चांदणं

सात्त्वीक सहदेव कीर्ती त्याची दूरवरी
राजसूय-यज्ञामध्यें दक्षणा दिली सारी
सुभद्रा नांव घेती नका करूं गलबला
कृष्णांनीं मला दिली संन्याशाला

अर्जुन म्हणतो मला संन्याशी कोणीं केलं
सुभद्रेनं नांव घेतलं देवा तुम्हीं ऐकीलं
द्रौपदीबाई म्हणे सुभद्रा आहे पोर
आतां नांवासाठीं काय सुचवावं त्यावर

द्रौपदीबाई म्हणे वहिनी तुम्हीं नांव घ्यावं
भीमकांनीं मला दीली आनंत त्याचीं नांवं
द्रौपदीबाई म्हणे वहिनी तुम्हीं नांव घ्यावं
त्रैलोक्यामध्यें प्रसिद्ध केशव त्याचें नांव
हिऱ्यामोत्यांची सभा मायासुरानं केली
देव बैसले सभेला कशी शोभा आली
राजसूय यज्ञामध्यें सुवासनींची झाली दाटी
द्रौपदीबाई माझी हळदी कुंकूं वाटी
राजसूय-यज्ञ झाला राजे निरोप मागती
देवूनी आहेर-विडा धर्म सन्मान करीती
निरोप दिला छप्पन कोटी यादवाला
रुक्मीणीसहीत माधव निघाले द्वारकेला
देव बैसले रथांत द्रौपदीला पुसे श्रीहरी
येईन लवकर माघारीं पांडव बसवीन राज्यावरी

संग्राहिका—सौ. **सुलोचना फडके**

## मीठ

प्रथम नमुं गणपती । आणिक माते सरस्वती । पूर्ण हावी मज मति । गुरुराया ॥ उत्तम गोविंदाचे गुण । नीज भावें मी वर्णीन । चित्ता होईल समाधान । संतोषाचें ॥ ऐका श्रोते देऊन चित्त । पूर्व पातक होतील भस्म । ऐसें तारक हरीनाम । कलीयुगीं ॥ व्रतदान तपदान । यथा सांगेन मी पूर्ण । गलित अन्नमय प्राण । म्हणती ॥ म्हणूनी एक नाम सारं । उच्चारावं वारंवार । उतरुनी जावं भवसागर । हरीच्या कृपें ॥

एके दिवशीं साऱ्या जणी । मिळुनी कृष्ण कामिनी । आल्या रुखुमिणीचे सदनीं । क्रीडावया ॥ अष्टनायकाही देखणी । रखुमाही पट्टरानी । मधें शोभे सारंगपानी । चंद्र जैसा ॥ रत्नजडीत सिंहासन । त्यावरी बैसे नारायण । अर्धांगी रखुमाई जाण आदि शक्ति ॥

अनुक्रमांक ३७३८५ . वि. ... क्रमांक ........ नोंद दि: ... ५५

प्रथम विनवी सत्यभामा । मी आवडती कैसे तुम्हां । सत्य सांगा पुरुषोत्तमा ॥ हंसूं आलें गोविंदाशीं । प्रती उत्तरले भामेशीं । चित्तापासूनी आवडसी । प्रियराणी ॥ जगीं उत्तम गूळ गोड । तैसी आवड सर्व काळ । मग ती संतोषली वेल्हाळ । नमन केलें ॥ नमन करूनी गोविंदाशीं । जाऊनी बसला असनाशीं । आनंद ना मावे चित्ताशीं । साठवेना ॥

मग ती विनवी जांबुवंती । सत्य सांगा प्राणपती । माझी आवड कोण्या रीतीं । सांगा स्वामी ॥ हंसूनी बोलले गोपाळ । तुझ्या प्रीतीचे कन्होळे । क्षण एक असावी वेळ । जगीं उत्तम साखर गोड । तैसी आवड सर्वकाळ । मग ती संतोषली वेल्हाळ । नमन केलें ॥

मग ती विनवी मित्रावंदा । सत्य बोलाजी गोविंदा । माझी आवड आनंदकंदा । कोणे गुणीं ॥ जगीं उत्तम दूध गोड । तैसी आवड सर्वकाळ । मग ती संतोषली वेल्हाळ । नमन केलें ॥

मग ती विनवी लक्ष्मणी । सत्य बोला नारायण । माझी आवड तुमच्या मनें । कुण्या गुणें ॥ जगीं जैसें तूप । तैसें आवडतें रूप । आनंद झाला मग आमूप । नमन केलें ॥

मग ती विनवी मित्रावंती । सत्य सांगा प्राणपती । माझी आवड कोणे रीतीं । सांगा स्वामी ॥ जगीं उत्तम जैसें लोणी । तैसी आवड तुझी मनीं । मग संतोषली कामिनी । नमन केलें ॥

मग ती विनवी यज्ञजननी । सत्य सांगा प्राणपती । माझी आवड कोणे रीतीं । सांगा स्वामी ॥ जगीं उत्तम जैसा मध । तैसी आवड तुझी शुद्ध । झाला नारीशीं आनंद । नमन केलें ॥

मग ती विनवी कालिंदी । सत्य सांगा प्राणपती । माझी आवड कोणे रीतीं । सांगा स्वामी ॥ जगीं उत्तम साखरखडी । तैसी तुझी प्रिये गोडी । आनंद झाला मग तांतडी । नमन केलें ॥

सहस्र विनवीती । सत्य सांगा प्राणपती । आमची आवड कोणे रीतीं । सांगा स्वामी ॥ जगीं उत्तम जैसा पेढा । तैसा तुमचा माझा जोडा । आनंद झाला मग केवढा । नमन केलें ॥

जगीं उत्तम जैसी बर्फी । तुम्हावर प्रीती । आनंद झाला मग तो किती । नमन केलें ॥

जगीं उत्तम जैसा खवा । तैशा आवडती जीवा । आनंद झाला मग वेधवा । नमन केलें ॥

मग ती विनवी रुखुमीणी । सत्य सांगा चक्रपाणी । माझी आवड कोणे रीती । सांगा । स्वामी ॥

जगीं उत्तम जैसें लवण । तैसें तुम्हावरी मन । भीमक् बाळी झाली खिन्न । आपुले चित्तीं ॥

मनीं दचकली सुंदरी । उतरला मुखचंद्र । कंठीं दाटला गहींवर रुखमिणीच्या ॥ सोळा सहस्र हांसती । ठायीं ठायीं कुजबुजती । किती डोळ्यांनीं खुणाविती एकीमेकीं ॥ भामा म्हणे रुखमिणीशीं । आम्हांहुनी श्रेष्ठ होशी । भ्रताराशीं कां नावडशी । कोणे गुणीं ॥ उदास रुखमिणीचें मन । सर्वक्ष अंगीं झाली खिन्न । आपुल्या प्रालब्धाचा गुण सखेबाई ॥ मूर्च्छा दाटली शरीरीं । सर्वही आंगा आली घेरी । उलंडली धरणीवरी । निधळवाणी ॥ देव म्हणे रुखमिणीशी । काय राग धरलास मनीं । सत्य सांग मज लागोनी ग सुंदरी ॥ देव म्हणे ग रुखुमिणी । दाही अवताराची राणी । आज काय पडली धरणी । निधळवानी ॥ रुखुमिणी बोल्ली देवाशीं । मला निजवूनी शेजेसी । आपण जावें हो सभेशीं । वेळ झाली ॥ परतूनी यावें मंदीराशीं । मग मी बोलेन तुम्हाशीं । सोळा सहस्र मंदीराशीं पाठवाव्या ॥ सभेशीं बसले नारायण । आनंदानें सभाजन । बैसविलें सन्मानानें । गोविंदाशीं ॥ सभेशीं बसले भगवंत । मनीं होऊन चिंताक्रांत । कैसे यानें होईल शान्त । भीमकबाळी ॥ सभा सारोनी वेगेशी । देव विचारे मानसीं । सत्वर गेले मंदीराशीं । देवकीच्या ॥ देवकी म्हणे तान्ह्या बाळा । मुखचंद्र झाला काळा । काय चिंता बा गोपाळा । उद्‌भवली ॥ वाणीचें तूं माझें तान्हें । सत्य सांग मज लागोनी । प्रिय पुत्रा ॥ वानीचा मी तुझा साच । साळा सहस्रांचा जाच । कोठवर सोसूं जननीये ॥ आज तुम्हां अवघ्या सूना । एका जागी मिळाल्या जाणा । पुसती आवडीची खूणा आम्हालागीं ॥ मीं सांगितलें समस्तांशीं । सांगितलें रुखुमिणीशीं । मिठासारखी आवडशी । म्हणूनीया ॥ कोपून मजवरी भीमकबाळी । कासावीस भारी झाली । उलंडली धरणीवरी।निधळवाणी ॥ देवकी म्हणे तान्ह्या बाळा । आधीं करवा भोजनाशीं । मग मी जाऊन समजाविन । रुखुमिणीशीं ॥ उदक उपसोनी घंगाळीं । स्नान घाली करकमळीं । भोजनासी वनमाळी बैसविले ॥ भोजन

घालोनी देवाशीं । शेजे निजवूनी गोविंदाशीं । आपण गेली मंदीराशीं । रुखुमिणीच्या ॥ सुनमुख देखोनी देवकी । उदरे गौरवी भीमकी । करीं धरोनी । मंदीराशीं नेली ॥ रखुमाई वंदी चरण । माता बोले आशीरवचन पांच पुत्र होतील जाण । सुने तुज ॥ वाणीचें हें माझें तान्हें । तुम्हांस दिसतें इलबिल-वाणे । कृष्णाचें हें बालपण देखीलें नाहीं ॥ कंवसाच्या बंदी शाळेंत । बहुत शिणलें इलबिल बाळे । नाहींतरी माझी आठही बाळें । असती मज ॥ सुन तूं माझी देखणी । आवडशी चित्तापासूनी । सोळा सहस्र सुंदरी । तुझ्या दासी ॥ सोळा सहस्रा वरिष्ठ । वडील सून तूं माझी श्रेष्ठ । आतां तोडीन तुझे मीठ ग रुखुमिणी ॥ सख्या म्हणती रुखमिणीशीं । घरीं आले हृषीकेशी उठजी बाई ॥ घेऊनी पंचारती । भीमकी ओवाळी श्रीपती । करीं धरुनी कौतुकीं । मंदिरीं न्हेलें ॥ सेजे बसले नारायण । वदन पाहती न्याहळून रुखमिणीचें ॥ उदास रुखमिणीचें मन । सर्वही अंगीं झाली खिन्न । पाहूनिया घननीळा कृपा झाली ॥ सहज बोललों वचन । तुज काय वाटलें कठीण । माता देवकीची आण । आवडशी मीठ तर सर्वांचें जीवन । तुझें माझें एक मन । पित्या वसुदेवाची आण आवडशीं ॥ समजावूनी रुखुमिणीशी । देव पहुडले शेजेशीं । चार प्रहर निद्रा नाहीं देवकीशी ॥ उठूनीया प्रहर प्रातःकाळीं । देवकी बसे सुखासनीं । सत्वर गेली मंदिराशी रुखुमिणीच्या ॥ सुनमुख देखोनी देवकी । उदरें गौरवी भीमकी । करीं धरुनी कौतुकी मंदिरीं न्हेली ॥ रुखुमाई वंदी चरण । माता बोले आशीर्वचन । पांच पुत्र होतील जाण । सुने तुज देव । म्हणे ग जननी । सोळा सहस्र कामिनी । आठौ सहित मेजवानी । द्यावी आम्हां ॥ पाक सारोनी सत्वरी । सोळा सहस्र सुंदरी । आठासहीत आले भोजनासी हृषीकेशी । काढु-नीया रंगमाळा । रत्नसहीत सोहोळा । करी देवकी सोहाळा कृष्णाजींचा । मांडुनी सोनीयाचे पाट । रत्नजडीताचीं ताटं । आणिक माणिकाच्या वाट्या । झळकती ॥ उदक भरोनिया झाऱ्या । रत्नजडीत अडण्या । वाढी-तसे अंगीं माता । समस्तांसी ॥ आंबा, लिंब, करंदेसाल फळ मुपसाचे कर-वंदे । भाज्या फळभाज्या सांभारी फुलभाज्या, पापड, सांडगे, कुरडया वाढी-यल्या ॥ तिळवड्या चिकवड्या । मिरे बोंडसवडे । भजी अरुवाळ वाढियली पुऱ्या पुरण पोळीया । त्यावर वाढील्या घुराळ्या । त्यावरी वाढिलया करंज्या सुकुमार ॥ सुंदर मांडे याची घडी । त्यावरी वाढली खाजी । त्यावरी

वाढीयली फणी अरुवार । लाडुबुंदीचे सढळ । दळया बेसण मोतीचुर चिरोटे जिलब्री घिवर वाढीयल्या ॥ भात वाढूनी राजवळ । वरण वाढिलें निर्मळ । साजूक ताकाची कढी । त्यावरी आळवाची वडी । दहींभातावर मिरपुड वाढियली । तूप वाढूनी सुगंध । देवकी बोलली आनंदांत । आतां बसावें गोविंदा भोजनासी ॥ समस्त बसले भोजनाशी । लवण नाहीं त्या पाकाशी। रुची नाहीं त्या मुखाशी । न गिळे अन्न ॥ देवकी बोलली प्रगट । मीठ तर सर्वच खारट । तैसा आहे आम्हा वीट रुखमिणीचा ॥ सोळा सहस्र झालाया खिन्न । खाली घालुनीया मान । संगें घेईन रुखुमिणीशीं । मी तर जाईन तीर्थाशीं । तुम्ही घेऊनी गोविंदाशीं राज्य करा ॥ देव म्हणे जननीशी । संगें घेऊनी रुखमिणीशी । मला ठेवूनी कुठें जाशी । जननी ये ॥ झालीं सर्वांची भोजनं । सर्वत्र देऊन भुषणें तिघे बसलीं आनंदानें । विडा देत असे करोनी । रुखमिणी ॥ एके दिवशीं नारायण । घरींच मांडीलें गहन । मीठ पळविलें नगरांतून । एकाएकीं । मीठासाठीं लहान थोर । अबला नारी वृद्ध । आले धुंडत रावळ । रुखमीणीचें ॥ मिठासाठीं लहान थोरी । सोळा सहस्र सुंदरी । लवण द्यावे हो पाकाशीं । रुखमिणीबाई ॥ रुखमिणी बोले देवाशीं । लवण द्यावें समस्तांशीं ॥ ऐकूनी हृषीकेषी हांसू आलें ॥ देव बोलले प्रगट । मीठ तर सर्वांत खारट । तैसा आहे आम्हां वीट रुखमिणीचा ॥ एके दिवशी नारायणें । चरित्र मांडिलें गहन । मिठाच्या पडल्या राशी । ऐसा गृहस्थ द्वारकावासी । नांदतसे ॥

संग्राहिका—सौ. राधाबाई रानडे

## सत्यभामा गर्वहरण

मुनी म्हणे ग नारद हिजला गर्व फार झाला । परब्रह्म श्रीकृष्ण सांवळा न कळे मुरकेला । तिशीं ठकवावें ऐसा विचार नारदानीं केला । पुनर्जन्म येईल म्हणोनी संशय मनिं धरिला । जें जें द्यावें तें तें प्राप्ती हृदयीं नेम ठरला । दे कृष्णाला दान आतां गे उपाय हाचि उरला ॥ चाल ॥ भामा म्हणे नारदा देतें हरिला । पूजा करूनिया दिला हरिला । उदक सोडितांचि हरि उठे झडकरी ॥ चाल ॥ चंबूगवाळे वीणा देऊनि श्रीकृष्णाचे पाशीं ।

शिष्या करूनि मुनी निघाले त्यजुनी द्वारकेसी ॥ रूपाभिमानी सत्यभामा बोले नारदासी । जन्मोजन्मीं कृष्ण भ्रतार व्हावा सांग मजसी ॥ १ ॥

घरोघरीं यदुपति होता तो आला होवोनी । मुनीच्या मागें त्वरित चालला ब्रह्म-वीणा घेऊनी । अग पापिणी काय करणी तूं कां पट्टराणी । नरनारींचा आकांत झाला न दिसे चक्रपाणी ॥ चाल ॥ वसुदेव । देवकी बळीराम आणि यादव । रोहिणी-सुभद्रा म्हणती थोर तुझें ग वैभव । पति दान देऊनि घालविला ग माधव । या पापाचीं फळें तुज ग गौरव ॥ चाल ॥ रुक्मिणीवराहि सर्व बोलती सत्यभामेसी । नारद चरण वदुंनी आणि गे आमुचा ह्रशीकेशी रूपाभिमानी ॥ २ ॥

भामा वंदी नारदचरण स्वामी चुकी झाली । हरिच्या बदला मागा देतें मी आन्यायी ठरली । मुनी म्हणे ग परत दानाची नाहीं कोठें चाली । ऐक शिष्या पुन्हां मिळेना ही लटकी बोली । परंतु देतों आणा सुवर्ण हरि घरांत घाली । हरि सुपुत्त सुवर्ण आणाया भामा घरीं गेली ॥ चाल ॥ हरि पारड्यांत सोनें एकीकडे । सर्वांनीं घातले अलंकार आणि चुडे सर्वांनीं घातिले चुडे परि न हाले पारडें । हें आश्चर्य देखून भामेचें मुख वांकडें ॥ चाल ॥ मुनी म्हणे ग नारद हिजला आणा भीमकेशी । तिजवांचूनी हें कार्य साधेना कळली खूण मजशी ॥ रूपाभिमानी ॥ ३ ॥

पट्टराणी श्रीरुक्मिणीदेवीस सांगती जाऊन । आली हातीं कृष्ण-तुळशीचें एक पत्र घेऊन । सुवर्ण तबकीं ठेवून दिधलें तेंच तुळशी पान । तत्क्षणीं जड पान पाहुनी हरि झाले लहान । ज्याचे त्याला हे अलंकार दिधले काढून । कृष्ण रुक्मिणी महालीं जाती बहुत आनंदांत ॥ चाल ॥ भीमकेनी यदुपति नेला निज मंदिरीं । रत्नमंचकीं बसवुनी आरती करी । आले नारद भामा लज्जित अंतरीं ॥ चाल ॥ कृष्ण रुक्मिणी भामा वंदिती नारद चरणांसी । परब्रह्म श्रीकृष्ण असे हा वश हो भक्तिशी ॥ रूपाभिमानी॥४॥

○ ● ●

# ३. भक्तगण

एखादा सामान्य माणूस रोज आपल्या आवडत्या देवाची पूजा बांधीत असतो. त्यायोगें मनाला शांति मिळवीत असतो. त्या आधारावर दिवसभराचें काम करीत राहतो. पुढच्या दिवसाच्या स्वागताची तयारी करीत असतो. कर्तबगारीचें आवाहन स्वीकारीत असतो.

परंतु कांहीं माणसें अशींच जन्माला आलेलीं असतात कीं, त्यांनीं जन्मभर एखाद्या कुलदेवतेचीच तेवढी अखंड पूजा बांधावयाची असते. देवाच्या रंगभोगासाठीं व अंगभोगासाठींच जणूं त्यांचा जन्म झालेला असतो. अशा लोकांनीं जन्मभर नृत्यगायनादि कलांच्या साहाय्यानें देवाला प्रसन्न करण्याचें व्रत घेतलेलें असतें. अशा लोकांना देवाचे भक्त मानलें जातें. पुजारी म्हणून त्यांना लोक ओळखतात. कलाकार व भक्तगण म्हणून त्यांचा घरोघरीं सन्मान केला जातो.

ह्या भक्तगणांच्याजवळ देवाला प्रसन्न करण्यासाठीं म्हणून एखाद्या वाडवडिलार्जित इस्टेटीसारखीं अनेक गाणीं असतात. परंपरेनें तीं चालत आलेलीं असतात. त्यांची भाषा ठरलेली असते. रचना पक्की झालेली असते. आणखी सुरावट तर नेहमींच वाढत्या वयाचें लेणें लेवून खुलती राहते. अशा कांहीं भक्तगणांच्या कांहीं गीतांचा इथें मुद्दाम विचार केलेला आहे.

संग्राहिका-डॉ. सरोजिनी बाबर

# गोंधळ्यांचीं गाणीं

एखाद्या घरांत लग्नकार्य झालें म्हणजे त्या घरच्या कुलदैवताला प्रसन्न करण्यासाठीं रात्रींच्या वेळीं 'गोंधळ' घालण्यांत येतो. त्या देवतेची पूजा नृत्यगीतांनीं केली जाते. त्यासाठीं घरीं गोंधळ्यांना बोलावतात. हे गोंधळी मग ह्या पूजेचा आरंभ करतांना आपल्या वाणीला त्या घरच्या कुलदैवताचें व इतर प्रमुख देवतांचीं गोड नांवें घेण्याची आज्ञा करतात. ह्या पूजेसाठीं त्यांनीं येतांनाच आपल्या-बरोबर संबळ व तुणतुणें आणलेलें असतें.

सुरवातीला अंगणांत अगर माजघरांत जोंधळ्याच्या ताटांचें तिकाटणें उभारण्यांत येतें. तसेंच ताम्हणांत टांक मांडण्यांत येऊन नारळ व पानसुपारी ठेवलेले तांब्याचे दोन तांबे घेतले जातात. दिवटी पेटवली जाते. कवड्यांची माळ व टोप घातलेला माणूस पेटती दिवटी घेऊन नाचूं लागतो. कुठें कुठें चालरीतीप्रमाणें वाघ्या-मुरळ्यांचाहि मग नाच त्या नाचांत घुमूं लागतो. नाचाबरोबर अनेक गीतेंहि भराभर बाहेर येत राहतात. गोड चालींनीं सजतात. ऐक-णारांना मंत्रमुग्ध करून सोडतात. त्या गाण्यांतून कधीं विनोद बाहेर पडतो तर कधीं अद्भुत-रम्य गोष्टहि पुढें येते. त्याचप्रमाणें सद्-भावांचीहि पेरणी केली जाते. त्या कारणानें हा 'गोंधळ' व हीं गाणीं मोठ्या बहारीनें रात्र रात्रभर रंगत जातात.

• • •

## गोंधळ

मायेचा नीजरूप आईचा गोंधळ मांडीला
उदे उदे ग अंबाबाई गोंधळा ये
मोरेश्वर गणा गोंधळा ये
तेहतीस कोटी देवा गोंधळा ये
पुण्याची पर्वती गोंधळा ये
वाईचा गणपति गोंधळा ये
कृष्णा कोयना गोंधळा ये
सातारची मंगळाई गोंधळा ये
रत्नांगिरी जोतिबा गोंधळा ये
कोल्हापूरची लक्ष्मी गोंधळा ये
तुळजापूरची भवानी गोंधळा ये
कारंडी येळुबाई गोंधळा ये
म्हसवड शिदा गोंधळा ये
शिंगणापूर महादेवा गोंधळा ये
फलटणचे रामा गोंधळा ये
नाशिकचे रामा गोंधळा ये
कवठ्याची यमाई गोंधळा ये
वाडेघोडयाची बोलाई गोंधळा ये
जुन्नरची शिवाबाई गोंधळा ये
साती समींद्रा गोंधळा ये
नवलाख तारांगण गोंधळा ये
धरतरी माता गोंधळा ये
आगाशीं पिता गोंधळा ये
भक्ताच्या गणा गोंधळा ये
राहिले साहिले गोंधळा ये
आपल्या भक्ता प्रसन्न झाले

● ●

# गण

मोऱ्या गणपती रे गणराजा
किती विनवूं तुला म्हाराजा

तेतीस कोटी देवदैवता
सर्वा आधीं गणनायका
दैत्य मारुनी केलीस दशा
लावली पळवून धाही दिशा
चेडा झुटींग वेताळ म्हैशा
दुष्टाला देशी तूं सजा
किती विनवूं तुला म्हाराजा

तुजा धाक तिन्ही ताळाला
दिला सराप तूं चंद्राला
चतुर्भुज तूं मंगल मूर्ति
संगें घेऊनी सारजा सती
हातीं त्रिशूळ डमरु बाजा
किती विनवूं तुला म्हाराजा

अष्ट भैरव सिद्ध सोळा
चौसष्ट जोगणी ( दैवत ) मेळा
गण शंभर कोटी जमले
माझ्या अंगणीं येऊनी गमले
पीर पैगंबर हे रमले
गाऊं नाम लावूं ध्वजा
किती विनवूं तुला म्हाराजा

• • •

## वारुळाचें गाणें

जाऊं मिळून वारूळाला
चला सण पंचमीचा आला

आली चांभारीण इठी
तिच्या बोलण्याची धाटी
सदा रुसे पेरूसाठीं
सखा समजावी तिला बाजूला

आली सुतारीण बबी
तिच्या बोलण्याची खुबी
हातीं तपकिरीची डबी
हांका मारी खेळगडणीला

आली बुरडाची लीला कला
म्हाई खेळून आली गमतीला
आली घिसाडीन हिरी
न्हाई पदर डोकीवरी
तिची तारांबळ सारी
न्हाई कुंकूं तिच्या कपाळाला

आली धनगराची नार
नाकीं शेंबूड हिरवागार
रडतें काकला प्वार
नको घेऊं तिला संगतीला

आली चिपडी न्हाव्याची रमा
भांड कुबडी जंगमाची भीमा
आली मऱ्हाटीन साळी
तिची रीत साधी भोळी
न्हाई वडारनीला चोळी
कशी बोली कळायची तिला

• • •

## पांच जातीच्या गौळणी

पांच जातीच्या आम्ही गौळणी
जातों विकाया दहींदूध लोणी
सोड सोड कृष्णा माझी वाट
विकायला जातें भरून दह्यादुधाचे माट
आम्हा गौळणींची कां धरलीस वाट
सोड रस्ता कृष्ण घनश्यामा
तूं अखंड ब्रह्मांड नामा
रागं भरून शिक्षा करी माझा सासरा
नंदा जावा रागीट शिव्या देईल दीर दुसरा
नको त्रास देऊं यादवा, तुजा आम्हां आसरा
तूं शाना असूनी श्रीरंगा
करशी कां दंगा सारंगपाणी
जातों विकाया दही दूध लोणी
पांच जातीच्या आम्ही गौळणी

## कोल्ह्याचं लगीन

रान बोक्यानं लगीन ठरविलं
रात्रीं समयाला
मांडव दिला गांवकुसवाला
मूळ वऱ्हाडी नवरा केला
सांगी सर्वांला
चला गरीबाच्या लग्नाला
शेळ्या मेंढरं वराड सारं
येऊं द्या लग्नाला
वाघ म्हणतो जानवस देती
माझ्या वस्तीला

अनुक्रम ३७३५...... दि.
क्रमांक १...... नों: दि: १



घूस वरमाई घरूघर जाती
चला अक्षदाला
मांजार भटजी तिथं सांगतो उंदीरमामाला
कोंबड्या कुरवल्या आणा हळदीला
वेळ फार झाला
मुराळी मुंगास पाठवला
तरस भेकर युवायी झाले
भेटूं सर्वांला
अस्वलबाई झिपरी वरमाई
रुसली मानाला
कोला नवरा थाट करुनी
बसे मांडवाला
डुक्कर सायळे सेशा भरुनी
बसल्या बाजूला
झाली जेवनाची वेळ म्हणूनी
वाघ आरडला
सिंह पाठीं तरस लांडगा
बसले जेवायला
हरण भेकर, ससा
स्वयंपाक वाढी पंगतीला
चट् जेवले वराडी सारे,
सैंपाक न्हाई शिल्लक उरला
तरस बाजूला रुसून बसला
सारे वराडी म्हणे
घोटाळा लांडग्यानं केला
कुत्रं समजावी तरसाला
कोंबडा वाजंत्री पहांटपारीं
बाजा सुरू केला
झालं कोल्याचं लगीन
वराडी लागले डोंगराला

• • •

संग्राहिका—डॉ. सरोजिनी बाबर

# वाघ्या - मुरळी

वाघ्या मुरळी म्हणजे खंडोबा देवाचे भक्त. हा वाघ्या म्हणजे खंडोबाला वाहिलेला मुलांचा वर्ग. आणि मुरळी म्हणजे याच देवाला वाहिलेल्या मुलींचा वर्ग खंडोबाला हीं मुलें वाहण्याचा विधि पाहण्यासारखा असतो. पहिल्यांदां चैत्रमासांत गुरवाला ही बातमी दिली जाते. नंतर ठरलेल्या दिवशीं या मुलांना मिरवणुकीनें खंडोबाच्या मंदिरांत आणलें जातें. तेथें गुरव त्यांना हळद लावतात. वाघ्या मुलास वाघाच्या कातड्याच्या पिशवींत हळद भरून दिली जाते व ती पिशवी गुरव त्याच्या गळ्यांत बांधतो. नंतर देवावर हळद टाकून त्या मुलाचा स्वीकार करण्याची विनंती गुरव करतो.

हल्लीं पूर्वीप्रमाणें मुली मात्र देवाला वाहायाची चाल कायद्यानें बंद करण्यांत आलेली आहे.

ही वाघ्या व मुरळी देवाचें रंगभोगाचें काम करतात. नृत्य-गायनांनीं देवाची पूजा बांधतात.

मुरळीला मद्रासकडे बसवी म्हटलें जातें. देवाची आजन्म पूजा करणाऱ्या अशा स्त्रियांची त्यांच्या वेगवेगळ्या देवतांसह निरनिराळीं नांवें अशीं आहेत:—

| भक्तिणीचें नांव | देव | देवस्थान |
|---|---|---|
| मुरळी | खंडोबा | जेजुरी |
| जोगवीण | अंबाबाई | तुळजापूर |
| भावीण | रवळनाथ | खानापूर ( बेळगांव ) |
| नायकीण | भूतनाथ | मालेगांव ( कोंकण ) |
| कलावंतीण | महाबळेश्वर | गोकर्ण ( कारवार ) |
| वेसवी | दारेश्वर | कुमठें ( कारवार ) |
| देवदासी | गुरम्मा | शिरसी ( कर्नाटक ) |
| देवळी | यल्लमा | सौंदत्ती ( बेळगांव ) |
| जोगतीण | दुर्गव्वा | कणकेरी ( बेळगांव ) |
| मातंगी | आमव्वा | गदग |

या स्त्रियांच्या प्रमाणेंच पुरुष देवभक्तांचींहि या प्रकारचीं वेगवेगळीं नांवें आहेत.

ह्या वाघ्या-मुरळींना आजन्म अविवाहित राहावें लागतें व एकमेकांत बहीणभावांचें नातें ठेवावें लागतें. मुरळीला देवाची चौरी धरणें, देवासमोर नाच करणें, देवाला कुंभारती ओवाळणें अशीं कामें करावीं लागतात.

वाघ्यामुरळींचें भंडारा फेकीत व "हब् हब्" म्हणत होणारें नृत्य फारच प्रेक्षणीय असतें. त्यांचीं गाणींहि मोठीं छानदार असतात.

**नमन**

शिव शिव नामामृत रससार
सेवन करावें वारंवार
भक्तीमुक्तीचे दरबार
रंग रंगले रंगा
आदी शक्ति म्हाळसा
बानु शोभती गंगा
हृदयांतरीं धरुनी विश्वास
करुनिया षड्कर्माचा नाश
जावें भवबंधन तोडुनि पाश
जगदीशा पुरविती आस
मिटवितील दंगा
आदीशक्ति म्हाळसा
बानु शोभती गंगा
कितीक सद्सेवक भिकारी
गळयामध्यें घालुनिया भंडारी
उभे सद्गुरु नाथाचे द्वारीं
होती प्रसंगा
आदीशक्ति म्हाळसा
बानु शोभती गंगा

## पद ( नवीन )

चला जाऊं एकदां तरी जेजुरगडा
चला जाऊं एकदां तरी जेजुरगडा
बानू म्हाळासा मधीं मल्हारी
दैत्य सामोरीं हात जोड
कासवावरती यात्रेची दाटी
नगारे नौबत झड
अडीच पायरी किल्ल्याबाहेरी
यशवंतराव[१] भुंगे सोड

## भक्ताचं गाणं ( पुरातन )

मल्हार वारी मोतीयांनीं द्यावी भरून
नाहींतर देवा मी जातों दुरून
नाहींतर देवा मी येतों फिरून
गड जेजुरीचे आम्ही रहिवासी
देवाचा झेंडा वळखला दुरून
बानू म्हाळसा रमाबाई शिंपीन
देवाचा चालली हात धरून
सुरदासाचा निश्चय त्यांचा
देवाच्या चरणावर जावें मरून

[ ५ ]

## पद ( पुरातन )

पहाडपर ज्योत खडा मलुखान
लगे दख्खनका मैदान ॥ ध्रु० ॥
राव होळकरनें किला बनाया
मेहेल जडित हिरखान

१—देवाचा हवलदार—खंडोबा देव

नऊ लाख पायरी बनाया
कळस झळके दिनमान १
किले अंदरसे भुंगा निकले
मोगल कहे मलुखान
कोई कुत्तीको हडने बोले
रखो चरणपर ध्यान २
बापू वाघ्या सनमुख गावे
सिद्ध करी अनुमान

( हिंदुमुसलमानांची होणारी ही एकत्र पूजा )

## पद

### ( देह )

इस किलेकू दस दरवाजे
बीच पवनकी बस्ती
एकवीस हजार सहाशें घंटा
दीनरात धुनी बजती ॥
अठ्ठावीस पायरी सब सातारा फिरती जी
गुरुपुत्राला पुसलें मूळ मार्गाची झडती जी
वर आकाशीं चंद्र सूर्याची गस्त फिरती जी
सात दीप नवखंड दक्षिणी गड जेजुरीका नाका
तीन लोक का राज्य मल्हारी बजे नामका डंका
कहा नर तंगड बाका बीचे रहिवास मालुका

[ ६ ]

छप्पनकोट किल्लेकी रुंदी एकशें चार उंची
उस किल्लेमें तोता बैठे बोले लटपटपंची
सुन मेरे गुरुभाई क्या जबाब चतुराई
उस तोतेको खाविंद मलुखान बादशाई
बोली छप्पन देशकी उन्हे बात बतलाई

चौदा तबक पे मेहेल बनाया
नहीं कालोका धोका
तीन लोकका राज्य मल्हारी
बजे नामका डंका

[ ७ ]

साही शास्त्रें, अठरा पुराणें, चारी वेद सोनेरी
कहे तुकाराम वंदे पांचवा मिलगई दसवे द्वारीं
चैतन्य प्रकर्ण हें सर्वांवर स्वार
पहा पिंडीं ब्रह्मांडीं मूळमायेचा आधार
हाजर, हुजर, गजर, चौघडा मलुनाम का डंका
मुकुंदराज प्रसन्न गाई प्रेम नामका झटका

[ ८ ]

## मल्हारी मार्तंड

रुसला का माझ्यावरी मल्हारी
बानू नार आणली घरीं
लखलख दिवट्या जळती
पाजळली दीपमाळ
रुसला का .... .... ॥ १ ॥

कडेकपारीं त्रिशूळ द्वारीं
वर उधळे भंडार
रुसला का .... .... ॥ २ ॥

नाथ निरंजन सद्‌गुरु स्वामी
घेतलासे अवतार
लोटलासे भंडार
रुसला का .... .... ॥ ३ ॥

मल्हार धनी मी म्हाळसा राणी
कर जोडुनी लागतों चरणीं
प्रीत नको तुजवरी
रुसला का .... .... ॥ ४ ॥

[ ९ ]

जेजुरीचा बाई वाणी आला माझ्या सपनीं
सपन पडलें प्रात:काळीं
स्नान केलें गंगाजळीं
घोडा नाचतो माझ्या अंगणीं
घालुनी पितांबराची कास
पडला प्रिथिमीवरी प्रकाश
शेला झळकतो जसा ग अंगणीं
देव आला ग माझ्या सपनीं

[ १० ]

खंडेराव खंडेराव बानू प्यारी
हांसून बात बोला गाहिरी
खेत्रगांव वडा पिता आहे माझा
तो आहे जंगलपुरचा राजा
सातशें गवळ्यांच्या फौजा
तुम्ही कराल चाकरी
हसून बात बोला गाहिरी
चला गवळनींचं भार
राजमंदिरीं सातशें गवळ्याच्या फौजा
तुमी कराल चाकरी
हांसून बात बोला गाहिरी

[ ११ ]

म्हाळसा बोले देवाला कां हो मसीं अबोला
देवा जातां कुठें मनीं कपट मोठें
नका जाऊं चंदनपुराला
केला बानूचा लाड झाला सवतीचा पाड
नका जाऊं चंदनपुराला
बाळू भैरव नेमानं येतो करतो भंजान्
नका जाऊं चंदन....बानूच्या गांवाला
खंडेराया भोळ्या देवा पथराविन तुमची जी
मला आवड तुमच्या बोलाची जी
खंडेराया.... ॥ १ ॥
केली ग निद्रा दोन ग फेराची जी
सई मला झाली बानू नारीची जी
का वो आडी धरली ग मनाची जी
सोडा मिठी तुमी ग खांबाची जी
वेळ आली होती ग आनंदाची जी
सेवेला दासी मी उभी तुमची जी
मला आवड तुमच्या गुणाची जी

[ १२ ]

हाकल देवा मेंढी बानूची
काई हो गोडी
घेऊन हातामधीं काठी
लागे शेळ्या मेंढ्या पाठी
खांद्यावर घोंगडी
या ग बनूच्या पायीं
गेले चंदनपुरीं ठायीं
हाकल देवा मेंढी
बानूची काई लई गोडी

## श्रीखंडेराव प्रसन्न

मल्हार देवराव कुलस्वामी माझा
अवतार धरीला आपल्या भक्तिच्या काजा
वरदी घाल मनीं भाव
हा देव जेजुरीचा राजा
हा देव पींबरीचा राजा
आणखी रूप तुझें
दैत्या मारील्या पैजा
नांव घे मल्हारी माझे अनुभव आक्षरीं
देव तूं देवराव साक्षा वर्णीला चातुरी
म्हाळसा ही ईश्वर माता
अर्ध्या अंगीं परवेशा
घेतीस लोटांगण तो हा मल्हारी राजा
रंकाळ चरणीराव तुझं देणं उधारा
रक्षीव तुजवांचुन कळी काळ भेदरा
येळकोट उभ्या उभ्या बोलती रे
आरती जय खंडेराया
तुज पींबरी ठाया
नळ उदगीरी गंगा म्हाळसा राया
आरती ओवाळी कुळस्वामी राया

## आरती

देवाचा वाघ्या झाला
हातीं घोळ कोटंबा दिला
भुकत गर्जत वाघ्या भक्तादारीं आला
आदरमान सन्मान देवाचा बहु आदर केला
उत्तर पूर्व पश्चिम दक्षिण चारी कोन कोटंब्याला
सोडून सर्व गळ्यामध्यें लंगर घातला

देवाचा सत्वर थोर लंगर आपोआप उत्तरला
विडा पाकड वाघ्या हस्तकीं धरिला
जरी भक्तावर दया ऐसा वाघुन्ना बोलला

## आरती श्री मल्हारीची

मस्तकीं मुगुट अंगीं सोन्याचा किल्ला
हातीं खड्ग घेऊनी मारीत मणिमल्ला
कैलासाची प्रतिमा जेजुरीचा किल्ला
बसवुन रक्षींत असशी दक्षिणचा किल्ला
जय देव जय देव खंडेराया
अखंड भंडारानें डवडवली काया
चंपाषष्ठीचे दिवशीं जे करीती कुलधर्म
त्यांची सफलपूर्ण होताती कर्म
त्यांची तोडतोसी तात्काळ वर्म
जय देव जय देव खंडेराया
अखंड भंडारानें डवडवली काया
तुमची भक्ति जे जन करिती ते सर्व
जिकडे तुमचा धर्म तिकडे गौरव
मध्वनाथ जपतो येळकोट भैरव
निंदा करती त्यांना होती रव रव
जयदेव जयदेव जय खंडेराया
अखंड भंडारानें डवडवली काया
जय देव जय देव जय खंडेराया

• • •

संग्राहिका--डॉ. सरोजिनी बाबर

# बिरुबादेव-

कोणत्याहि मराठी मुलखाच्या कानाकोपऱ्यांतून धनगरांचा ढोल-नाच ऐकूं आला नाहीं असें होत नाहीं. ही धनगरमंडळी मेंढ-पाळ म्हणून ओळखली जातात. मेंढ्या पाळून त्यांपासून लोकर तयार करावयाची व लोकरीचीं वस्त्रें निर्माण करण्यासाठीं साधनें उपलब्ध करून द्यावयाचीं हें त्यांचें काम. तसेंच मेंढ्यांचा भला मोठा कळप शेतांत बसवून शेतीला आवश्यक असणाऱ्या खता-साठींहि शेतकऱ्यांच्या उपयोगी पडावयाचें हा त्यांचा व्यवसाय.

जगाला त्यांची आणखी एका प्रकारें ओळख होते. ही ओळख प्रामु-ख्यानें त्यांच्या ढोलनाचामुळें होते. आपल्या आवडत्या दैवताचें, बिरुबा देवाचें, नामस्मरण करीत आणि त्या देवाच्या जीवनचरित्राची मोठी सुंदर अशी अद्‌भुत कथा गात, ही धनगर-मंडळी रात्र रात्र नाचत असतात. 'सुंबरान मांडून' देवाची पूजा बांधतात. सुंबरान म्हणजे स्मरण. देवाची आठवण. देवाचें नामस्मरण करावयाचें व जागरण घालावयाचें ही त्यांची पिढ्यान् पिढ्याची आवड असते.

ही मंडळी ढोलाच्या तालावर आणि झांजांच्या नादावर जेव्हां गातात तेव्हां नाचतातहि. त्यांच्या या नाचाला 'गजा' नाच म्हणतात. विशेषत: सातारा व सांगली भागांतील हा नाच फारच प्रेक्षणीय होतो. रात्र रात्र घुमणाऱ्या व रंगणाऱ्या ह्या नाचासाठीं लागणारें गाणें मोठें सुंदर असतें व त्याची सुरुवातहि शानदार असते.



गजा–नृत्य



गजा–नृत्य

अनुक्र. ३०३ ... नों: दि:

# सुंबरान मांडीलं—

सुंबरान मांडीलं मांडल्या या येळला
आदि नमो गणपते मग सरस्वतीला धरती मातेला
करत्या माझ्या नंदीला करत्या माझा बैलाला
कैलासाच्या संबाला संभावतार लिंगाला
गुरु केदार लिंगाला गुरु काशी लिंगाला
पराणाच्या लिंगाला श्रीरामलिंगाला
तेतीस कोटी देवाला चंद्रसूर्य त्या भावाला
म्हसूबा देवाला पारशेर ऋषीला
देवा माझ्या इट्टला नमन तुमच्या गादीला
यावं आमच्या शब्दाला नमन तुमच्या ओवरीला
गुरुमारग दावायाला
दुपार या योगाला दिल्ली हस्तिनापुराला
पांच महेंद्र पांडव सोन्यायाच्या द्वारकेला
श्रीकृष्ण देवकी वो बळिराम दादाला
येक बहिन पाठीला सुभीदरा भैनीला
दिंडीच्या वाड्याला अर्जुनाच्या बाळाला
सुभीद्राला दिली होती बारा वर्षे झाली होती
दोघेजण भाऊ गा सोन्याच्या द्वारकेला
एकमेकां बोलत एकमेकां सांगत
दिवाळीचा सण आला चला भाऊबीजेला
चवदा घोड्याचा वो रथ तयार केला
शेजेच्या पागेतला वारू शेलका घेतला
दोपारचा दिवस मावळायला गेला
श्रीकृष्ण देवाचा हस्तिना शहराला
पांडवांच्या वाडयाला दरबाराच्या तोंडाला रथ गेला
सुभीदरा भैनीनं भावाला त्या वळकीला
समुरल्या सोप्याला बसाय पाट टाकला

मैन बोलते भावाला मैन पुसते भावाला
बारा वर्षानं अशी कशी वाट तुमी चुकला
श्रीकृष्ण महाराज लागलं बोलायला
लागलं सांगायला
दिवाळीच्या सणाला भाऊबीज करायला
विसावा बा दियाला तुला आलों निय्याला
सुभद्राबाईचं मन झालं उल्हास
बोलायला लागलं सांगायला लागलं
तांब्या हातीं दिलेला भरून चुळा त्या भरल्या
पांच महिने पांडव श्रीकृष्ण महाराज
भोजनाला बसलं मोठ्या आनंदानं हो
भोजन त्यानं येचलं
निंद्रा समयी झाल्यात
रामायाच रातरं वो निघून कीं गेलं
पहांट्याच्या पाऱ्यांत सुभद्रा बहिन
शिदोरीची तयारी सांगायाला लागली
उठा आमच्या दादा हो
तांब्या दिले भरून
जातों आतां म्हायारला येवढंच बोलतांना
शेजारची म्हातारी तिनं काय केलं
बाळ घेतला जवळ गोड गोड बोलं
कवतिक लागली बोलाया
तान्या माज्या बाळा रे
बारा वर्सानं आजोळाला जातोस
काय तूं रे आनवार
बाळानं त्या ऐकलं तान्यानं तें ऐकलं
सोन्यायाच्या द्वारकेला निघून बा चाल्लं
मार्ग त्यानं धरला सकाळ दिवस दोपार गेला
दुपारचा दिवस मावळायला गेला

दादायाच्या वाड्याला दरवाजाच्या तोंडाला
रथ तवा गेलाया
शिदूरी बा वाढीली दोघां मग भावांनं
आनंदानं जेवले पान विडे खाऊन
निंद्रासमय जाल्यात रातपाऱ्याच्या रातला
सकाळच्या पाऱ्यांत सुभिदराबाई बोलायला
विचाराया लागली दिवाळीच्या सणाला
पांच येवढं परकार परकार मी बनवीन
धान्य मला सांगावं
सोन्यायाच्या उतरंडी गव्हानं त्या भरल्या
पांच आहेत धान्य वो तांदळानं भरल्या
येवढंच बोलतांना सुभिदरा बहिनीनं
सवर्णाचं सूप हातीं घेतलं मंदीरांतनं
पहिलं सूप तांदळांचं सुभीद्रानं भरलं
बाहीर आली घेऊन समूरल्या सोप्याला
परमेश्वराची करणी अभिमन्यू वत्सला
तांदळाच्या सुपांत बाळ जाऊन बसला
खेळ लागले खेळायला येकामेकां माथ्यावर
तांदूळ टाकूं लागले भगवानाची करणीवर
सुभीदराबाईनं चौकाच्या आडानं
खेळ पाहिला नेतरानं
कोण झाला आनंद कोणाला ह्यो सांगावा
सुभीदरा बाईचा जीव कसा भुलला
देव माजा विट्ठल वो गुरु हाये बळकट
नित हाये संगट चिंचेच्या बेटाला
लई सोबा देवाला सोन्यायाच्या द्वारकेला
सुभीदराबाई गा धावत गेली पळत
कचेरीला गेली गा आली कशी धावत
दोघां मग भावांना लागली बोलायला
त्यांत खेळ दाखवला श्रीकृष्ण देवाला

वचन दादा देवावं आक्का याच्या मुलग्याला
आमची मुलगी देवूं या शब्द मनांमधिं आला
बळीराम दादानं सुभीदरा भैनीला
वचन बा दिलंया वो हातांत हात घातला
तुमच्या मुलग्याला आमची मुलगी दिलीया
श्रीष्कृण देव लागलं बोलायाला
इलाजानं घेऊं या पांच मग पांडाव वो
ऐकायचे न्हाईत पांडवाची लक्ष्मी वो
शंबराव्या भावानं काय तोंड काढली
पांच पांडवांना बोलावून ठेवून घेऊं या
मग घेतों जिंतून एकशें एक कौरव
धृतराष्ट्र राजाचं पांच मग पांडाव
सैन्य पांडुराजाचं कौरव ये पांडव
चुलत मग भाऊ नेतरानं पहावं
पांच माझ पांडाव शंकराचा अवतार
बल्लवानं घेतलं भोळ्या मनीं चित्तार
पांच मग पांडाव एकशें एक कौरव
कपटी मग होते करीत गौरव
कौरव तो पांडाव आनंदानं जेवला
एकांमेक बोलत शकुनीच्या मामाला
वैरायाची रातरं रातरं कशी जाणार
कवडया या खेळूं या करूं या जागर
धर्मराज बोलायला लागला
नको आम्हां कवडया त्या खेळायाला
शकुन्या त्यो मामा कीं वो ऐकनासा झाला
शक्तिवान भीम गा श्रीकृष्ण देवाला
दोघेजण गेले होते गा माराया त्याला
सात मग यीळ गा सात मग रात्र गा
लढाई मग चालली होती जरासंध मरणा गा

जरासंधाच्या हाडाच्या कवडया खेळाया घेतल्या
राजधर्म आमचा कवडया भिकार नादिल्या
ही आरोळी हाडांनीं ऐकली वो वक्ताला
कवडयाव लावलं राज जिंकून घेयाला
शकून त्या मामानं पांच लावले पांडव
शकून त्या मामानं जिंकले पांच पांडव
लेक मग अस्तुरी द्रोपदी ती कस्तुरी
पार्वतीचा अवतार धर्मराजानं कवडयावर लावली
कौरवानं जिंकली द्रौपदी राणीला
आमच्या आज्ञेंत वागलें पाहिजे बोलाय लागला
दुश्शासन म्हाराज पांडवाच्या वाड्याला निघून गेला
पांडवाचे दागिने काढा म्हटला
आमच्या आतां घालावे अंगाला दुश्शासन बोलला
दुरपताबाई गा बोलाय लागली न्हाई तोडणार दागीन्याला
दुश्शासन कौरव त्यांचं काय केलंया हो मत
दुरपतीच्या वेनीला ओढूं लागले कवाच
धरुन वोढीत आणीली सभेला दुरपताबाईला
एकशें एक कौरव काय करूं लागला
पांडवाच्या देखत दुरपताबाईला
वस्त्र ओढूं लागले कौरव सभेला
श्रीकृष्ण भावाचा धांवा दुरपतीनें हो केला
काळ्या निळ्या देवानं वळखलं वक्ताला
श्रीकृष्ण देव गा आला म्हाईत नाहीं कुणाला
आले देव दुरपतीजवळी देव बोलूं लागला
एकशें एक कौरव वस्त्र वढूं लागला
पैलं वस्त्र वोढीलं दुसरं वस्त्र तयार झालं
वस्त्राच्या पदरावर नवं वस्त्र तयार आलं
तिसऱ्या बा पदरावर रामसीता मूरती दिसल्या
मूरती लागल्या झळकायला माणकापरी दिपल्या

तेंबी वस्त्र फेडिलं पांचवं वस्त्र तयार झालं
पांचव्या पदरावर पांडवाच्या मूरती दिसल्या
सभेंत झळकायला लागल्या
तेंबी वस्त्र फेडीलं नवं वस्त्र पुढं आलं
सातव्या त्या पदरावर एकशें एक कौरव दिसलं
मद्यायाची कळा गा तेंबी वस्त्र फेडीलं
आठव्या पदरावर श्रीकृष्ण महाराज कौरवास्नी दिसलं
मग कोनी तो बेत सोडिला

पांडव वनवासाला गेला

सोन्यायाच्या द्वारकेला द्वारकेला गेल्यात
भटजीचं रूप धरून कळीचा त्यो नारद
बळीराम दादा वो गादिवर बसत
श्रीकृष्ण त्याच्या म्होरं गेल्यात
कळीयीचा नारद बोलाया लागला
व्होणार तें सांगणार म्हटला एक मुलगी पोटाला
तिचं लगीन ठरलं वो हस्तिना शहराला पांडवाच्या वाड्याला
अर्जुनाच्या मुलग्याला दिली तुमी मुलीला
अर्जुनाच्या घरांत घात केला मुलगीचा
पांच पांडव मग अन्न अन्न करीत गेलं वना ठायाला.
बोलायाला लागला सांगायाला लागला
बळीराम दिलगीर झाला
हस्तिना या शहरांत एकशें एक कौरव
दुर्योधन कौरव सर्वांत थोरला
त्याचा मग मुलगा लक्ष्मण युवराज झाला
त्येला मुलगी देवावी म्हटला
मुलगीयीच्या बापानं कबुल तवा केलं या
भटजीच्या रूपानं नारद दुर्योधनाकडं आलाया
होणार आहे तें सांगणार
एक मुलगा पोटाला येतेल्या या तिथीला
लग्न ह्याचं करावं येळेला

लगीन केल्याव वात व्हयीला तुमचा
        दुर्योधन दिलगीर झाला
कौरवाचं वराड वो चाललं द्वारकेला
देव माझा विठ्ठल गुरु हाये बळकट
        नित आमच्या संगट
नवनीत कळवा वो भंडाऱ्यानं पिवळा
कौरवाचं वराड चाललं द्वारकेला
जातांना त्या वाटेला लांबच्या त्या पल्ल्याला
        कळालं त्या कुनाला
पांच मग पांडवाचा गुरु कोण होता गा
        द्रोणाचार्य म्हाराजाला
द्रोणाचार्य बोलायाला लागला
सुभद्रा पक्वान्न घेऊन गेली द्रोणाचार्यांकड आली
पांडव नाहींत तो रागावून म्हणाला
पांडव असते तर कौरवांचा बुक्का असतां केला
जळलं तुझं जेवान पेटलं तुझं जेवान सुभीदरा घाबरली
तुझ्या मग भावानं वचन केलं बदल
        कौरवाच्या मुलग्याला मुलगी देऊन दिल्लीला
कौरवाचं वराड चाललं द्वारकेला
कौरवाचा आवाज सुभीद्रेच्या कानाव
झेला काय करावं वो कुनीकडं जावावं
पांडवाचा गुरुं गा सुभीदरा बाईला
सांगायला लागला बोलायाला लागला
तुझ्या बंधु भावानं वचन केलं बदल येला काय करावं
सुभीदरा बाईनं धरणीच्या आंगायाचा वरुटा केला
कसं केलं भगवाना कसं केलं नारायणा
जग नांव ठेवीलं काय सांगूं जगाला
तेथून बा चालली गेली राजवाड्याला
थाट वाकाळ घेतली सांधीला त्या पडली

काय तोंड दावूं म्हटली
माता माझी माऊली सुखायाची साऊली
काय झालं सांगावं सुभीदरा
तान्ह्या माझ्या बाळा घेवून माहेरा गेलें तुला
तुझ्या मावळ्यानें मुलगी मला दिली
वचन त्यानं बदललं कौरवाच्या मुलग्याला मुलगी दिली
कसं केलं भगवाना काय केलं नारायणा
पांच आमचे पांडाव वनवासाला गेले
एवढ्याच शब्दाला अभिमान्यु बाळ गा आला
कासोटा वो घातला रथ तेव्हां जुंपला
रथामध्यें बसावं बोलला रथ लावला वाटेला
रथ लावला मार्गाला सोन्यायाच्या द्वारकेला
जातां बाहेर जातां होतां होतां काय झालं
कौरवाचं वराड विसाव्याला थांबलेलं
चिकुल मग झालेला सुभद्रेचा रथ हाल्ं लागला
जातां मग जातांना रथ रुतून पडला
सुभद्राबाई गा तवा रडायाला लागली
कसं केलं भगवाना कसं केलं नारायणा
इथं केलं असं देवा पुढं कसं होईल देवा
रथ लावला वाटेला डोंगराच्या पायथ्याला
वाट नाहीं जायाला सुभद्रा राणीला
कसं केलं भगवाना कसं केलं नारायणा
वाट नाहीं हो जायाला येनं काय करावं त्येला
कातऱ्या बाण सोडला जंगल सारं तोडीलं
रस्ता वो तयार केला निघून बा चालला
जातां बर जातांना म्होरं काय नवाल होतं
दैत्याचं शीर राजाचं शीर आडवं होतं
दैत्याच्या बागेला वो अभिमन्यू बाण सोडूं लागला
कातऱ्या बाण सोडला पांच हजार दैत्याला

नाक कान कापलं ओंजळीमधी टाकलं
भक्षण त्यांनीं केलं रथ लावला वाटेला
नेत्र त्यांनीं उघडले कानायाचं रगात वो
नाकायाचं रगात वो दैत्यांनीं त्या पाहिलं
भिऊन मागं पळालं पळत पळत सुटलं
गारऱ्याला झालं जाणं पाणी घेतलं तोंडानं
वर आत्मा वड्यांत पडला चुळा टाकतांना बाळानं पाहिलं
तेनं काय केलंया डिब्या बाण सोडला
एक मोकळी सोडली घटोत्कच राजाला
सांगायाला लागली
आमच्या नवऱ्यानं नाक कान कापलं
आम्ही सुंडाला गेलों काढण्या त्यानं लावल्या
घटोत्कचाची माता हेडंबा
घटोत्कच राक्षस मातेला सांगायाला लागला
माता माझी माऊली सुखायाची सावली
आका धावलीस दरवाजाच्या तोंडाला
ताडायानं माडायाचं दोन हात झाड गा
उंच गेलं गगनाला माझ्या वर्णाची खूण त्याला
तीन मग वाऱ्यानं वो झाडं पडतील धरणीला
मी ग नाय पडणार झाडं नाय पडणार
जन्म दिल्या मातेचं दर्शन घेतलं
गेला लांब पाण्याला लढाईच्या ठायाला
सकत्या बाण लावला बाण दिला सोडून
सकत्या मग बाणावर घटोत्कच दैत्यानं
सव्वा मण गदा गदा दिली खांद्यावर
बाणायाचं कुंडकं तुंडकं झाल्यात
बाणायाचा शेंडा परत मागं गेला
अभिमन्यु बाळाच्या उरस्थळीं लागला
बाळ पडला वरतून डोळ खालीं गेल्यात

जन्म दिल्या मातेनं बाळ घेतलं मांडीवर
कसं केलं भगवाना कसं केलं नारायणा
जग नांव ठेवील‌ं
इथं झालं अस्सं ग म्होर जावं कशाला ?
रडायाचा आवाज अंतर्यामीं कळालं श्रीकृष्णाला
श्रीकृष्ण देवानं मनीं विचार केला
अंबाबाईच्या रूपानं धाऊन गेला सुभद्रेच्या म्होरं
जाऊन उभा राहिल्यावर सुभद्रा बोलली
माता माझे माऊली बाळ माझा उठवावा
घायाळ तें झालंया अंबाबाई मातेला
श्रीकृष्ण देवानं अंबाबाईच्या रूपानं
दोन कुप्या दिल्या
सांगायला लागला सुभद्राबाईला
एक घाल बाळाला एक जवळ ठेव ग
उपयोगाला येईल देव गप्प झाल्यात
शक्त्या बाण सोडला अभिमन्यु बाळानं
मोठ्या राना खुबीनं बाण मग सोडला
बाण गेला धावता घटोत्कच बाळाच्या उरस्थळीं लागला
घटोत्कच राकूस उलथून पडला
जन्म दिल्या मातेला खूण तिकडं पडली
मग वाऱ्यानं ताड माड पडले उलथून
हेडंबी मग राक्षीनं तिनं तेव्हां जाणलं
माझ्या मग बाळाचा घात आतां झालाया
धावत गेला पडत बाळ घेतला मांडीवर
रडायाला लागला धाव माझ्या बंधवा तूं
पांडवाचा धावा वो करूं लागला
अभिमान्यु बाळ मातेला विचारूं लागला
यांचे पांडव नात्यानं कोण ग ?
विचारून ये जा ग

सुभीदरा बोलली हेडंबा आईला
याच वनाला राजवाड्या म्होरं
झोपाळा बांधला ठेवला व त्यावेळेला
बारा कोस झोका द्यावा घेऊन मला जावावं
पांच मग पांडाव याच या वो वनाला
तेबी मग आलेवते वनायाच्या ठायाला
साधा माझ्या सुरत्यानं घ्यान चांगला देवावा
विठू माझा गुरुहो नीट आहे संगतीला
पांच मग पांडवांतला शक्तिवान भीम वो
डाव्या पाया बोटानं बारा कोस झुगारले
तितनं मागं आलों ग पाय धरले भीमाचे
पत्नी मला वरावें काय केलं भीमानं
शीरीं हात ठेवीला आशीर्वाद वो दिला
एका मग घटकेनं बाळ तुला होईल
एवढंच सांगून गेला
एक मग बाळ मला झाला
बाळाचं नांव घटोत्कच ठेवीलं
वध केला बाळाचा वध केला ग तान्याचा
सुभीद्रेनं खबर दिली भावानं शब्द मोडीला
सोन्यायाच्या द्वारकेला बसलेल्या थोराला
रामराम सर्वांला येऊं नका रागाला
चुकलेल्या शब्दाला माफी द्यावी आम्हांला
माणसाचा जल्लम वो पाणीयाचा बुडबुडा
बुडबुडा वो फुटंल रंग जाईल बाहुलीचा
मातींत माती मिसळेल व्यर्थ आहे जल्लम
रंग आहे तव्वर हो तुम्ही आम्ही मिळून
राम घोका मुखांत सदा राव्हा सुखांत
रावण आहे मुखांत त्याचा जन्म दुखांत
भजन करा रामाचं

स्थळप्रत.
अनुक्रम 36364 वि: ...............
क्रमांक .................. नों दि: 72-7166


गुरु माझा विठ्ठल नित्य आहे संगट
सुभिद्राबाई ग सैन्य सारं घेऊन
सोन्याच्या द्वारकेला मार्ग त्यानं धरला
द्वारकेच्या शिवेला शेजारीं गेल्यावर
जांगीला त्यो राक्षस सांगायला लागला
देव आमचा सोन्याचा वारना तिरथ पान्याचा
लई सोबा मठाला लई सोब्रा देवाला
सुंबरान मांडीलं मांडलेल्या येळला
द्वारकेच्या शेजारीं जांबील तो राकूस
सांगायला लागला बोलायला लागला
द्वारकेच्या पल्याड
मावयाचा बाजार कोन व्हावं दागिना गा
कोन व्हावं वस्त्र इकायाला बसावं गा
बाजाराचा दर गा काई मग ठेवावा गा
काई मग सांगावा गा
जुनं जावा ठेवून नवं जावा घेऊन
कोन झालं दागिन कोन झालं वस्त्र ग
कोन बसलं विकाया कोन भांडीं झालाया
बाजार झाला तयार बाजारचा उजेड द्वारकेला पडला।
कौरवाचं वऱ्हाड बाजारांत शिरलं
दर लागला विचाराया दैत्य सांगो लागला
जुनं ठेवा काढून नवं जावा घाढून
मोटं मोटं जव्वार काढून बा टाकलं
नवं चालले घाढून
तंवर काय झालंया घटोत्कचानं काय केलं
घडां घडां लोळत रूप केलं धारण
दैत्यरूप सोडलं बायकी रूप धरलं
बारा वर्षं वयाचा धरला वो अवतार
हिरवं पातळ अंगाला

लाजत वा लपत पदर लावला तोंडाला
मांडवांत गेल्यात बळीराम दादाला बोलायाला लागला
सोन्यायाच्या वाड्याला दागिनं बघायाला
पावन्या आम्ही बायका तोंडाकडं बघायाला
सांगीत जातों राजाला देतों तुला फासाला
शिपाई म्होरं चालला न्हाई मागं बगणार
ह्येनं काय केलंया
बोळानं गेलंतं किस्नाच्या त्या बागला
मुलगी नेऊन ठेवली
जांबिल मामा करवली घटोत्कच नवरी
हळदीयाची तयारी नवरीयाच्या पायाला
हळद लावली नवऱ्यानं घटोत्कचा नवरीला
नवऱ्याच्या पायाला हळद बा लावतांना
गुडघ्यापासून खालीं बा चमडं काढलं सोलून
लक्ष्मण युवराज वरडाया लागला
चमडं माझं निघालं सोसना मला
एकशें एक चुलता बोलायाला लागला
मावयाचा बाजार बाजार बा मोडला
जुनीं वस्त्रं वो जुने वो दागिने
गठुलं बांदीलं किस्नाच्या बागला
नेऊन टाकीलं दैत्या खालीं खालीं गेला
दैत्य आडवे टाकले दैत्यायाचं भावलं केलं
तया मांडवाची आरास
खऱ्या मग लग्नाला भट नवता बागेला
दैत मांडवा बसला
भटायाची लांबड द्वारकेकडं जातांना
धमकी देऊन भट आणला
नंदाया कामिनीनं नवऱ्याच्या पायावर

अंगठा जरा ठेवला पाय त्याचा मोडला
नवरा लागला वरडायला पाय माजा मोडला
एकशें एक कौरव आला
म्हौतुर आल्याव अक्षता टाकल्या
किस्नायाच्या बागेंत अक्षता पडल्या
अभिमन्यु नवऱ्यावर वत्सला त्या नवरीवर
फुलं टाकलीं देवानं
तिळा मग तांदळाच्या गांठी मग जन्माच्या
गाडी नाहीं चुकणार तंवर काय झालं
घटोत्कच नवरी लक्ष्मण नवरा
बावल्यावर बसली नवऱ्यायाच्या मांडीवर
मांडी दिली नवऱ्यानं पाय त्याचा निघाला
नवरा लागला वरडाया वो वढून मला काढावा
घटोत्कचास भूक लागली मामा म्हणतो भूक लागली
स्वैपांकघरीं वो तिला घेऊन गेला
अन्नायाच्या राशी गा भातायाचा ढीग गा
पोळयाचा ढीग गा गुळवण्याच्या काईली
शेवायाच्या काईली पुसून त्या टाकील्या
घटोत्कचा दैताला कोडं पडलं जिवाला
सैंपाकाच्या शाळेला हुडकाया पुरता लागला
खंडीयाच्या ढीग गा पुरनायाचा पडलावता
बढून सारा घेतला किंवड्या मग आवाजानं
नेतरानं पाहिलं भेवडून गेला या
परकाळा त्यो टाकला कौरवाच्या अंगावर
मावयाचीं धडुतं मावयाचे दागिने
हळूच सारे जागले दैत्यामागं लागले
कौरवांचं वऱ्हाड शीवेच्या बाहेर
नेऊन बा घालवलं

किस्नाच्या बागेंतलि नवरानवरी
दैत्यांनीं वाजत आणली
वाजत बा गाजत
धावत वो चालत
बळीराज चालला रामराम दिला
घटोत्कच्या भावानं हेडंबा त्या चुलतीनं
रातच्या रातीं वो जेवलं खावलं
सकाळच्या पाऱ्यांत मार्ग त्यांनीं धरला
गेली आपल्या शहराला
अभिमान चरित्र लग्नाचं झालंया
चुकल्याल्या शब्दाला माफी द्यावी आमाला
रामराम सर्वांला जातों आमच्या गांवाला

• • •

# पोतराज

पोतराज हा देवी महालक्ष्मीचा भक्त. तो स्त्रियांच्या प्रमाणें माथ्यावर केस वाढवितो व कपाळावर कुंकू लावतो. त्याचा अंगावर कमरेभोंवतीं चोळीच्या खणांची व हिरव्या बांगड्यांची माळ असते. पायांत चाळ असतात.

हे पोतराज लोक सनईसूर व डफ हीं वाद्यें घेऊन निरनिराळीं गाणीं गातात. घरोघरीं देवीचें हळदकुंकू द्यायला व भिक्षा घ्यायला जातात. ह्यांचे गाण्यांचे प्रकार अनेक असातत. देवादिकांच्या ओव्या देखील ही मंडळी गातात व प्रामुख्यानें देवी मरीआईची पूजा करतात.

कांहीं पोतराज हातांत एक मोठा चाबूक—कडूक—वागवितात. बरोबर देवी मरीआईचा पेटारा डोईवर घेतलेली एक बाई असते. ह्या बाईच्या डोईवरचा हा पेटारा खालीं ठेवून कडूक्वाला पुरुष त्या देवीपुढें देवीचें नांव घेऊन मोठमोठ्या आरोळ्या देत हिंडत असतो व मधून मधून तो कडूक वाजवीत असतो. कडूक वाजवितांना कडाड असा फार मोठा आवाज होतो. ह्या असल्या आवाजावरूनच पोतराजाच्या हातांतल्या ह्या चाबकाला कडूक म्हणतात व त्याच्या बरोबरच्या देवीला कडकलक्ष्मी म्हणतात. त्या पोतराजालाहि कोणी कोणी कडकलक्ष्मीच म्हणतात. देवीच्यापुढें चाबूक वाजवून खेळ करीत असतांना हे पोतराज केव्हां केव्हां गाणें म्हणतात व केव्हां केव्हां तो चाबूक आपल्या अंगाभोंवतीं मारून—गुंडाळून—घेतात ! त्याला हा चाबूक फार मोठ्यांदां लागलेला आहे व त्याच्या अंगांतून रक्त निघालेलें आहे, असेंहि पाहाणाराला दिसतें.

ह्या पोतराजाला—कडकलक्ष्मीला—पाहाणाऱ्या बायका हळद कुंकूं वाहतात व सुपांतून नेऊन जोंधळे वाढतात.

संग्राहिका–डॉ. सरोजिनी बाबर

# पोतराजाचीं गाणीं

– १ –

संबु झाले गोसावी न् गेलें चांगुणाच्या घरीं
अलक्ष गाजवून उभी राहिल्यात द्वारीं
सत्वाची चांगुणा उठली लटपटीं घरांत
मोत्या-पवळ्यांचे सुप आणिलें बुवाला वाढायास
सात दिसांचा उपवासी सांगतों मी माई
आपल्या चिलीया बाळायाचं भोजन द्यावं मसी
बाळ जातं शाळेशीं न् भोजन द्यावें मसीं
बाळं जातंया शाळशी न् हांक मारली मातांनीं
हांक मारीतां बाळ गेलं धावुनी
सत्त्वाची चांगुना न् बाळ पाडीलं धरणीला
उरावरती गुडघा दिला न् हातीं घेतलं खड्ग
सत्त्वाची चांगुना न् हांक मारती बुवाला
तुमी बसावं भोजनाला
बुवा बोलतो चांगुनाला
नरकाचा पेला नको भोजना आमाला
सत्त्वाची चांगुना न् साळीडाळी कांडील्या
पांच वऱ्या आनंदानं शंकराला गाईल्या

– २ –

आली आली वो मरीमाता
उबी राहिली दारांतच दारांत
हळदीकुंकाचा हें मान हें मान
देवी पतिव्रताला
आली येडीच्या रुपांत
अशी सत्तेची मावली
हळदकुंकाची चिळ्या न्

साई ठेवीली दारांत
पतिवर्तांचं लेणं
आई चालली हांसत
असा [1]हांदडा हुंदाडा
युद्धासाठीं दोघं गेल्यात लढूनी
अशा आयानू बायानू
पतिवर्तांचं पाताळ
धन्य महायुगाची माताची
आई तुजं कर्तवीं
आई दंडतं तुजी तुळा
जा शीताळ निघूनी जा
असे लिंबनारळाची माई अंगाभवतीं गर्दी
पहात्याती जनता लोकना
असा हात जोडूनिया
माई विनंति तुजला
हळदी कुंकवाचा मान
दिला पतिवर्तांला

— ३ —

अहो ऽऽऽ
एक गाडी मागें गाडी एक गाडी उतरली
जनाबाई,
पूजा घ्याया उतरली मरी आई
आली मुक्ताबाई आलं पोतराज,
फुलायांची घाली माळ
मुक्ताबाई पालवीत फुल्यायाची माळ
ऐक जनाबाई
कोल्हापूरचा राजा निंदीतो सातव्याला
परडी माळ दिली त्याला
ऐक जनाबाई

१. दोघे भाऊ

कवड्याच्या माळा एकच आहे
आई अंबाबाई पतिव्रता लेणं तुझं
आई अंबाबाई घाट शिडी उभी राही
वाट तेल्यायाची पाही, भुत्याची पाही
मोठे मोठे गहूं ठेवले वांसरींत
आई अंबाबाई तुझं येणं भक्ता दसऱ्यांत
आई अंबाबाई तुझी सेवा कुणीं केली
शिवाजी राज्यानं फार सेवा केली
आई अंबाबाई तुला कोणीं सांगितलं
गांव पंढरपूर
आहे दिंडुऱ्या वनांत
आई अंबाबाई तूं पंढरीला गेली
घार होऊनी सारी यात्रा ग मोजियिली
आई अंबाबाई तुझ्या शिखरावर कोन
एक्या मिनिटामधीं वांती पंढरीला झाली
मुडघा मुडदा वाट भेटना जायला, देव नाहीं
देवळांत पूजा बा यानं बुडाली
मनीं नाहीं भाव, दुनिया पापानं बुडाली

[ ४ ]

पांडवाची दुरपता नेसी रंगाचं लुगडं
बोलतो दुर्योधन नेत्रं अंधारीं दिपलीं
पांडवाची दुरपता जळो जळो माझं जिणं
असूनी पांच पांडव लज्जा घेती दुर्योधन
दुरपतीचं वस्त्र फेडीतां देव भागला
तिच्या वस्त्राचा ढीग गगनीं लागला
दुरपतीशीं पावलासी देवा मला तसा पाव

दुर्योधनामधीं नको उणं दावूं
रुखमीन मोरावरी देव घोड्यावरी
चालूनच स्वारी गेली देहू गांवीं शहरावरी
रात्र मला झाली देहू गांवाच्या पांदणीं
जळती उदबत्ती तुकारामाच्या समाधीं
राम गेला म्हणीं देहू गांवाच्या विजेला
नवलाख मोतीं तुकारामाच्या तुऱ्याला
ऐक जनाबाई

[ ५ ]

आली आली मरीबया । कोण्या राजाला पावली ।
ध्वज मोत्याची लावली ।।
आली आली मरीबया । शिवेवरी डेरा दिला ।
कोण राजा उतरला ।।
आली आली मरीबया । आली गाड्या घोड्यावरी ।
चंद्रासारीक्या रेड्यावरी ।।
आली आली मरीबया । हिचं शिवेवरी ठाणं ।
आडविला बागवान ।।
आली आली मरीबया । तुला वाहिलं कंबाळ ।
गाडीवानाला संबाळ ।।

• • •

# जोगती

जोग म्हणजे संन्यास. देवाला सोडलेले किंवा देवाला वाहून घेतलेले लोक म्हणजे जोगती.

जोगती हे देवी यल्लमाचे भक्त होत. हे जोगती म्हणजे स्त्री वेषाधारी पुरुष असतात. कांहीं स्त्रियाहि जोगतिणी म्हणून असतात. त्यांचे हातीं चौंडकें व सुती हीं वाद्यें असतात. त्यांचे पैकीं एकाचे डोक्यावर हिरव्या पातळाच्या चुणीदार घोळानें माखलेली मोठी टोपली असते व त्या टोपलींत यल्लमा देवीची मूर्ति असते.

या देवीची जत्रा हुबळी, धारवाड व सौंदत्ती या गांवीं होते. ही यात्रा रांडव पुनवेला (मार्गशीर्ष शुद्ध पौर्णिमेला), पुषी, चैत्री व माही पुनवेला भरते. परंतु हे जोगती पश्चिम महाराष्ट्रांत अनेक ठिकाणीं भिक्षा घेत फिरतांना दिसून येतात. त्यांचे जवळ अनेक गाण्यांचा सांठा असतो व नृत्यकलेंतहि ते निपुण असतात.

ज्या घरीं भिक्षेला जावयाचे त्या घरीं भंडारा लावतांना हे जोगती पुढीलप्रमाणें आशीर्वाद देतांना आढळून येतातः—

"आई जगदंबा तुळजापूरची आई। रामकड्याची आई। चतुर्शिंगीची आई। इडा, पिडा, खरूज, नायटा, फोडी फुनशी, रायरोग दूर कर। खडया घोडयावानी धुतल्या मोत्यावानी कर। जगदंबा आमांला दे तांब्याचे। भक्ताला चांदीसोन्याचे। भक्ताची इच्छा पूर्ण कर। घर गोकुळागत चालूं दे"।

संग्राहिका-डॉ. सरोजिनी बाबर

# देवी यल्लमाचीं गाणीं

— १ —

अवो यल्लमाकारी कंकाळ भारी
गोऱ्या लोकांला गेली वर्दी
घोड्यावरती स्वार झाले
धांवत आले लौकरी
सौंदतीवरती तळ टाकिला
घोडा बांदिला पळभरी
एका बाजूनीं घोडा चालिला
निघून गेला कुंडावरी
यल्लमाचा राऊळ पाहून
तन्मन झाला अंतरीं—
परसगडाला निघुन चालीला
विलाज चालना ह्याचातरी
उगर गुळाचे आले पुजारी
मंगळवार दिवस तरी—
पांच घागरी धयादुधाच्या
अभिषेक होतो नानापरी
पूजा ज्याच्या अंगावरतीं
सायेब गेले धावुन तरी
आपल्या हातानं करूं द्या अंगूळ
यलमा पाहुं द्या सत्वधारी
चारी दरवाजाला कुलपं लावुनी
पुजारी बसले बाहेरीं
यल्लमा बसली गादीवरी
यल्लमा बसली आसनावरी
पिवळा पिंतांबर देवी नेसली
तापत्याची चोळी घाली

अनुक्रम 36338........ दि: ..................

 क्रमांक ...................... नों: दि: .................. 

डागिन्याची काडुनी पेटी
यल्लमा करती शिनगारी
दाही ग बाटं शिनगार केला
पायीं पैंजण तोडे घाला—
कंबरशीं दाब्र घालुनी
कुलपं बसविली दोन चारीं
पुतळ्याची माळ जोंधळ पोत
टिक्क शोबती शेजारी
गळ्यामंदीं लिंग घालुनी
मोतीं शोभतो दुयेरी
चितांग चिंचपेटा घागर पेटा
आणखी सोन्यायाची सरी
कवडयाची माळ लेली
जगदंबेला शोभा आली
हातागमंदीं गोट पाटल्या
कंगण शोबे दंडीं तरीं
नाकामंदीं नथ सर्ज्याची
शिरावरती मुगुट भारी
भंडागऱ्याचं लेली भूषण
इभत्याचे पट्टे खालीं
कुंकवाचा टिळा रेखला
मुखामंदीं विडा धरी
खिडकीवाटं सायेब पाहतो
काय स्वरूप हिचं तरी
सुरत पाहुनी तनमन झाला
नित असावी शेजेवरी
मडुमनीला हांक मारीतो
येग पाह्याला लौकरी
सूर्यास्वरूप हिचं

काय दिसते सुंदरी
मह्ळमनीला राग आला
हात मारती तोंडावरी
अशा देवाची करुं नये निंदा
पतिव्रता हाये भारी
यल्लमानी ऐकुन घेतली
कानावरती गोष्ट सारी
सायेबाचे गेले ग डोळे
फुलं पडली अंधारी
हात जोडुनी उभा राहिला
माफी द्यावी मातोसरी
शिकराला लावीन सोनं
सडका आनीन तुज्या डोंगरावरी
गोऱ्या लोकाला दिला दाकला
नांव काडीना कोनतरी
अंब्याची वो झाडं लावीलीं
भक्त ऱ्हात्याती आरामीं
करवीरामंदीं मारुती जोग्या
रेणुकाचे मानकरी
जगदंबाची मोठी वो छाया
हात ठेविला शिरावरी

[ २ ]

सौंदतीची जागा पाहिली ऊंच डोंगूर
उंच डोंगूर जागा मला दिसती हवेशीर
करणारानीं केली करणी कुरुंदाचं चिर
बाऱ्या बांदल्या चौफेर जी
अग दोहीं येळला अभिषेक होतो
धयीदुध साखर

धर्यादुध साखर पूजेला बसले बामण
अवो यल्लमापुढं नारळ फुटतो
अंत ना पार
अंत ना पार, देवी तुजी महिमा लई थोर
वाऱ्न्यामंदीं उभी रेणुका
नेसुन पितांबर
भक्ताच्या हात शिरावर जी
अवो येल्लूच्या वो उजव्या बाजूला
हाय बारवहीर
येनी कुंडामंदीं येऊन पडती
पाण्याची धार जी
हजार बाराशाची गडबड होती
बराच येणार जी
बराच येणार भांडती हालवई आतार
अवो सौंदतीची जागा पाहिला
उंच डोंगर जी
जागा मला दिसते हवेशीर जी

[ ३ ]

आमी जातों जतरला
रींग न्हाई गाड्याघोड्याला
वलं सरपन चुलीला
सत्वपन दावी सर्व्याला जी
गेलं मनोळीच्या नदीला
पूजा [1]वान लागले करायला जी
जन जोगती उभे चाकरीला
भक्त लागले हारकी घियाला
पूजा सोडली जागच्या जागेला
जत्रा चालली निघून डोंगराला
चला येन्नीकुंडाच्या आंगूळीला

११८७९

[1] नैवेद्य

पैसा टाकुन तीर्थ घियाला
पालखी गेली माहेरघराला
गेली मानकऱ्याच्या वाड्याला
पैला मान मांगनीला दिला
हळदकुंकू भंडार लावीला जी
पालखी गेली भंडारघराला
जन जोगती बसले वानाला
वान पुजारी वाटूं लागला
संपूर्ण वटींत घातला जी
रेणुका निघाली आगीन खायाला
लागली म्होरं मागं सरायला
परशुराम मागं लागला
होमांत ढकली मातेला जी
परशु चौंडव्यानं छंद केला
वसगड्याचा ग म्हानेवाला
गुरु वस्ताद आमुचा चांगला
गाण्याचा मार्ग दावीला

— ४ —

पंढरपुरीं भीमातीरीं
भक्ति विठ्ठलाची जी
राम नाम घ्या तुमी मुखामंदीं
सुटका जल्माची जी
चंद्रभागेच्या तीरीं .... न्
आंगुळ करावी गंगेची जी
जाईल पाप निघुनी पुढं
एक पायरी धर्माची जी
अवो राउळामध्यें जाउनी
भेट घ्यावी विठ्ठलाची जी
माघारीं येतांना गळ्यामंदीं

माळ तुळशीची जी
अवो उदबत्त्याचीं झाडं देवापुढं
गर्दी अबीराची जी
ऐक एवढी गोष्ट सेवा कर
मायबापाची जी
धरणीवरती लोळे मनुष्य
पिशवी मातेची जी
आरडून वरडून काय होतं
युक्त्या बरम्याची जी
अग चला सयानू जाऊं वाडीशीं
वाट पाहतो सका
ब्रह्मघाटला जाऊं लौकरी पाहूं
आजोबा सका जी
गोपाळ काळा खेळ मांडला
जनमन गवळ्या घरीं
त्रिलोकीं लोकामंदीं कपट नाटिका
धन्य कारागिरी जी
अवो दत्त म्हाराजा सद्गुरुराजा
सर्वत्राचे धनी
स्नान संध्या नित अक्षदा
शोभे चुडामणी जी
अवो घाट पायरी कळस सोनेरी
झळके शिकरावरी
आंत देवळां शिवशंकरा
उत्सव कृष्णातीरीं
नारळ केळी ठेवा देवापुढं
वहावा तुळशी बुक्का
ब्रह्मघाटला जाऊं लौकरीं

# तुळजापूरच्या अंबाबाईचीं गाणीं

[ १ ]

अवो दखनामंदीं तुळजापूर
हाये बालेघाट
तिथं माज्या अंबाची बैठक जी जी
अवो धया-दुधाच्या नद्यांचे वाहिले पाट जी जी
बघा माज्या अंबाचा थाट जी जी
गांवो गांवच्या आल्या ग काठ्या
चांदीचे काठ
हातामंदीं सोन्याचे गोट जी जी
दंडामंदीं बाजूबंद गोंडे लटपट
मोरनीला मोतीं तीनशें साठ जी जी
किंकापाची चोळी अंगामंदीं
हायतं जरी कांठ
बघा माज्या देवीचा थाट जी जी
लाखू खंड्या तेल जळातं
पोताची दाट
द्यावी माज्या अंबाला वाट जी जी
कल्लोळ तीर्थावरी बसीयलं
सरकारानीं ग्याट
दिली माज्या अंबानी भेट जी जी
अंबाबाईच्या उजव्या बाजूला
भारतीचा मठ
खेळती सोंगट्याचा पट जी जी

[ २ ]

जातं अंबिकेला तुळजापूराला
माळपरडी आलीया माज्या नशिबाला ॥

तुळजापुरीं यात्रा भरती
पणग्या [१] पौर्णिमेला ॥
माही पौर्णिमेला
पायीं पैसा नाहीं तिथं
कवड्या चुना वेचण्याला ॥
पिवळा पितांबर अंबा नेसण्याला
पिवळा पिंतांबर देवी नेसण्याला
कवड्याचा शिनगार
अंबानं केला वो देवानं केला
[२] भोप्याकडे जाऊं
समाचार घेऊं
माळ परडी आलीया माझ्या नशिबाला

[ ३ ]

कोंडणपूरची न्हाणार अंबाबाई जी
शिवाजीला झाली परसन जी
आणली किल्ल्यावर जी
पर्वती पुण्याच्यावर जी
मला पाव नवसाला पायऱ्या
बांधिन मी हजार जी
नार गेली जेजुरीला ग
जेजुरीच्या मल्हारीला जी
नऊ बकऱ्यांची दावण देईन
गळ टोचिन कमरेला जी
नार गेली म्हस्कोबाला
या दूरच्या म्हस्कोबाला
पांच पल्ले शेंदूर द्यावा
मागनं करीन तुला जी

१. कोजागिरी २ पुजारी

चिंचवडीं जाईन आतां मी
चिंचवडीं जाईन जी
तिथं देव मोरया
सव्वा खंडीचा मोदक वाहीन जी
नार गेली जोतिर्लिंगाला जी
भस्म भरतार वांचूं दे गुलाल वाहीन
भक्त वांचूं दे गुलाल उधळीन
तिरशूळ वाहीन तुला जी

## आराध्याचीं गाणीं

आराधी म्हणजे आराधना करणारा. भक्त, पुजारी. आराधी हे तुळजापूरच्या देवीचे अंबाबाईचे उपासक असतात. त्यांना कोणी कोणी भुत्याहि म्हणतात. हे लोक गळयांत कवड्यांच्या माळा घालून, डोईवर कवड्या बसवलेला टोप घालून, अंगावर तेलकट वस्त्रें परिधान करून आणि हातांत पोंत (जळता काकडा) घेऊन भिक्षा मागत फिरत असतात. हातांच्या बोटांच्या खुणांवर बसवलेली मिताक्षर भाषा बोलून हे लोक एखाद्या माणसाचें नांव-गांव किंवा इतर कांहीं म्हणणें आपल्या जोडीदारांना दूर उभा करून ओळखायला लावतात. लोकांना त्यामुळें नवल वाटतें व ते पैसे देऊन मुद्दाम आपलें नांव-गांव ओळखायला सांगतात. हे लोक गाणींहि म्हणतात.

• • •

संग्राहिका-डॉ. सरोजिनी बाबर

# आराध्याचें गाणें

वारा ग मंदीं वार—वार मंगळवार केला
आंबे, उंबर ओटा सारवीला
वारा ग मंदीं वार—वार बुधवार केला
आंबे किष्ण राजा जन्मला
वारा ग मंदीं वार—बेस्तरवार केला
आंबे अगरबत्ती दत्तात्रीला
वारा ग मंदीं वार—वार सुक्किरवार केला
आंबे शेंदूर लक्ष्मीला
वारा ग मंदीं वार—वार शनिवार केला
आंबे कापूर मारुतीला
वारा ग मंदीं वार—वार आईतवार केला
आंबे भंडार मल्हारीला
वारा ग मंदीं वार—वार सोमवार केला
आंबे दवना संभूजीला

# कमळावंती

आला दिवाळीचा सण बाप बोलतो मुलग्याला
आणा जावा कमळावंती बहिणीला
दिवाळीच्या सणाला भेटण्याला
असा लेकानं बापाचा शब्द ऐकून
गाडी बैल सजवून गेला बहिणीच्या गांवाला
बहिणीच्या गांवाशेजारीं जाऊन एक स्थळ पाहून
गाडी बैल दिली तळ्यावर सोडून
आनंदानं जाऊन झोपला मारुतीच्या देवळांत
सकाळीं कमळावंती बाहिण पाण्याला आली
भावाचे बैल गाडी ओळखून जाऊन उठविती
आपल्या भावाला

उठवितांना आले भावाच्या मनीं कपट
कोणाची आली ही नार म्हणून मागं सरून
मारली थोबाडीत
बहिणीच्या तोंडांतून चालल्या रक्ताच्या धारा
भावानं मारलं म्हणून कपट नाहीं आलं बहिणीच्या
मनांत
रागानं मारलं असेल दादानं म्हणून भावाचे हात
धरून नेले आपल्या वाडयांत
घरला गेल्यावरती कमळावंतीचा सासरा
बोलतो आपल्या सूनला
एकूलती एक लाडकी तूं सून मला
कोणी मारिलं तुझ्या तोंडाला
सूनबाई सांगावं मला
सून बोलती आपल्या मामाजीला
कोणी न्हाई मारलं मामाजी मला
पाण्याची घागर घेऊन येत होती रस्त्याला
ठेंच लागली माझ्या अंगठ्याला
पडलें धरणीस न् ओठ गेले माझे फुटून
बारा वर्षानं भाऊ आला माझ्या घराला
पांच प्रकारीं भोजन करून आनंदांत जेवला
घालती आपल्या दादाला चार दिवस राहिला
भाऊ बहिणीच्या घरीं जेवला
सून बोले जाऊन मामाजीला
बारा वर्षानं भाऊ आला मला घेऊन जायला
मी जातें माझ्या माहेराला
सासऱ्यानं सुनेच्या अंगावर घालून
दिलं पाठवून तिच्या माहेरा
बहिण भाऊ बसून गाडींत गेले बारा कोस वनाला
त्या वनामधीं जाऊन बहीणीचे दागिने बघून
कपट मनीं आला


हे दाग दागिने .... शोभला नाहीं
आक्का तुझ्या अंगावरचे दागिने शोभातील माझ्या बायकोला
ह्या दागिन्यासाठीं बहिणीला मारीली वनांत
बहिण जोडते आपल्या भावाला हात
मारूं नको दादा या वनांत बारा वर्षानं आलें भेटीला
आई बापाच्या देखतं हे सारे दागिने देतें तुम्हांला
मारूं नको वनांत मला
नाहीं दया आली चांडाळाला
बहिणीचे हातपाय बांधून
अंगावरचे दागिने घेतलं काढून
बहिणीला दिले गाडींतून ढकलून
दागिने घेवून गेला निघून
तिथें जाऊन मनांत विचार घेतो करून
चाटाचा चाटसरू बहिणेचं हात सोडून
सांगल तिच्या सासूसासऱ्याला तो जाऊन
सासू सासऱ्यास सांगून फाशी होईल मला
म्हणून असंच परत जाऊन मारून टाकावं बहिणीला
मग गाडी बैल घेऊन आला
गाडींतून खालीं उतरून
जंगी धोंडा उचलून लागला बहिणीला मारायला
जंगी धोंडा उचलतांना नाग सर्प चावला भावाला
बहिण हात जोडून सांगते आपल्या भावाला
कसं पाणी पाजूं दादा तुमच्या जिवाला
हात पाय बांधून तुम्ही टाकली रस्त्याला
हात पाय सोडा पाणी पाजतें तुमच्या जिवाला
पाणी म्हणून प्राण निघून गेला
कमळावंती सत्य पतिव्रताला
शंकर पार्वतीचं नांव घेतांना हातपाय गेले सुटून
आपल्या भावाला पतिव्रता रडते मांडीवर घेऊन

स्थळप्रत.
अनुक्रम ३८३९... दि. ...
क्रमांक ... नों दि: ...


धायी धायी त्या वनास
महापतिव्रतेचे संकट पडलें शंकर पार्वतीस
शंकर पार्वती धावून आले
शंकर पार्वती कमळावंतीस बोले
कोणतें संकट पडलें सांग आम्हांस
काय सांगूं देवा तुम्हांस
भाऊ जाईत होता पाणी पिण्यास
तळ्यावर पाणी पितांना नाग-सर्प चावला
भावाच्या डोक्याला
शंकर पार्वतीनं तिचे शब्द ओळखून
अमृताची कुपी देऊन साजीवतं करून
घेतला आपल्या भावास
शंकर पार्वती गेले निघून आपल्या वनास
बहिण हात जोडून सांगे आपल्या दादास
आणि तोंच धोंडा उचलून
बहिणीच्या अंगावरती टाकला भावानं
बहिणीचा चक्काचूर झाला
दिली तळ्यांत टाकून तिला
आपल्या घराशीं गाडीबैल सजवून गेला
माय बाप वाट बघतात उभ्या वेशीला
लेकं येईल म्हणून माय बाप वाट बघतात
लेकाची गाडी दिसतांच लेक गाडीमधीं दिसना
आई घेती करळ्या केस ओढून
माय बाप बोलते झाले लेकाला
बारा वर्षांनीं गेला होता बहिणीच्या गांवाला
काय करून आलास माझ्या कमळावंती लेकीला
लेक बोलतां झाला आपल्या माय बापाला
बारा वर्षांनीं गेलों होतों माझ्या बहिणीच्या गांवाला
तिचे सासू सासरे पाठवून देईनात तिला

माय बाप बोलता झाला
कसं नाहीं पाठवून दिलं माझ्या लेकीला
तीच बैलगाडी घेऊन मायबाप गेले लेकीच्या भेटीला
बारा वाजतां जाऊन पोहोंचले तळ्याला
तहान लागली फार मातोश्रीला
आनंदानं पाणी पीतीया तळ्याला
पाणी पितांना कमळाचं फूल आलं आईच्या हाताला
कमळाचं फूल शोभेल माझ्या कमळावंती लेकीला
मायबाप आनंदानं जाऊन झोपले आंब्याच्या सावलीला
तें फूल ठेवलं त्यांनीं ठेवलं आपल्या उशाला
महापतिव्रताचं संकट पडलें शंकरपार्वतीला
शंकरपार्वती आले धाऊन त्या समयाला
अमृताची कुपी घालून साजीवंत केली कमळावंतीला
कमळावंती उठवीते आपल्या मायबापाला
ऊठ ऊठ ग आई आलों तुझ्या भेटीला
मायबाप उठून बोलते झाले आपल्या लेकीला
कुणीं आणून टाकली होती तुला या वनाला
काय सांगू आई बाबा तुमाला
बारा वर्षांनीं आलों होतों तुमच्या भेटीला
त्या वनांमधीं चोर आल्यावर दादा पुढं गेला
चोरानं मारुन टाकली होती तळ्यांत मला
देवानं सांजीवंत केली आलें तुमच्या भेटीला
कमळावंतीनं त्या गाडींत बसवून मायबापास
नेले सासूसासऱ्याच्या घरास
सासरा बोले आपल्या सूनेला
एकुलती एक सून तूं लाडकी मला
लई वर्षांनीं गेली होतीस माहेराला
अंगावरले दागिने काय केलेस सांग मला
बहिण-भाऊ गेलों होतों गाडीमधीं बसून
त्या वनामधीं चोर आला धावून

त्यानं अंगावरचे दागिने घेतले काढून
चोरांनीं मारून तळ्यांमधीं टाकली
देवानं साजीवंत केली
मग आलं तुमच्या भेटीला
पांची प्रकार करून भोजनाला
आनंदानें जेवाय घातलें आपल्या मायबापाला
दुसऱ्या दिवशीं पांच पाऊलं पोंहचून
दिलं आपल्या मायबापास घालवून
येवढीच भेट तुमची आमची म्हणाली
कधीं नाहीं येणार तुमच्या गांवा बोलली



श्री गणेशाय नमः ।

( वाईचा ढोल्या गणपती )



दसरा - पूजा

# ४. सांस्कृतिक जीवन

एखाद्या माणसाची पारख ही त्याच्या जन्मघराण्यावरून व त्याच्या स्वभावावरून केली जाते. तो वागतो कसा व बोलतो कसा यावर ह्या मोजमापाची उभारणी होते. तेवढ्यावरून त्याची चालरीत समजते. घराण्याचें वळण लक्षांत येतें. आणखी मग त्यावरून तो कोणत्या लायकीचा आहे ह्याचा विचार ठरतो. चारचौघांत त्याची वाखाणणी होते. म्हणून लहानपणापासूनच आपलें मूल चांगलें व्हावें यासाठीं त्या घराण्यांतील मंडळी काळजी घेतात. त्या मुलाला चांगलें वळण लावावें म्हणून अहोरात्र खपतात. त्यामुळें तें मूल त्या घराण्याचें विशिष्ट वळण घेऊन समाजांत येतें. त्याच्या मूळच्या मनोवृत्तीला धरून जगूं पाहतें. त्या कारणानें ह्या विशिष्ट वळणाला त्या घराण्याची चालरीत वा संस्कार म्हटलें जातें.

ह्या चालरीतींवर किंवा संस्कारावरच मानवी मन पोसलें जातें. म्हणून मूल जन्मल्यापासूनच त्या घरांतील स्त्रिया सणासुदीच्या निमित्तानें किंवा लग्नमुंजीसारख्या प्रसंगांच्या निमित्तानें गाणीं गाऊन व विशिष्ट चालरीत करून मुलाला वाढविण्याचा प्रयत्न करतात. धार्मिक जीवनाची त्यास कल्पना आणून देतात.

म्हणून ह्या विशिष्ट सांस्कृतिक जीवनामुळेंच मानवी मनाचा विकास होत राहतो. त्या देशाची संस्कृति उभारली जाते. आरोग्य सुधारतें. जगभर वैभवशाली बोलबाला होतो.

सामान्य लोकांचें यापरीचें सांस्कृतिक जीवन उभारण्यासाठीं लोकगीतांनीं आपली दुनिया अनेक प्रकारांनीं उभारलेली आहे. त्यासाठीं त्यांनीं बारसें, मुंज, भोंडला, लग्न, डोहाळे, मंगळागौर, नागपंचमी, महालक्ष्मी, दसरादिवाळी, संक्रांत, व्रतवैकल्यें इत्यादींतून आपला संचार केलेला आहे. ह्या सर्व प्रकारच्या वेगवेगळ्या लोकगीतांनीं जुन्या काळच्या चालरीतींबरोबरच शानदार अशा अद्भुतरम्य गोष्टींचीहि पेरणी केलेली आहे. त्याचप्रमाणें यापैकीं हरएक गीतानें आपली सुरावटहि वाखाणण्याजोगी ठेवलेली आहे.

त्या कारणानें हीं गीतें गाणारीं व ऐकणारी मंडळी जीवनांतील उच्च प्रकारचा आनंद उपभोगूं शकतात असा सर्वत्र अनुभव आहे. म्हणून एका पिढीनें दुसऱ्या पिढीला दिलेला हा सांस्कृतिक जीवनाचा वारसा मोठा विलोभनीय आहे यांत शंका नाहीं.

## हादगा—भोंडला

पश्चिम महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतून आश्विन मासांत घरोघरीं होणारी हस्तनक्षत्राची पूजा हादगा किंवा भोंडला या नांवानें ओळखिली जाते. ह्या पूजेसाठीं घराच्या भिंतीवर तोंडांत माळ धरलेल्या व समोरासमोर तोंड केलेल्या हत्तीचें रंगीत चित्र टांगलेलें असतें व पाटावर रांगोळीनें ह्याच चित्राची उभारणी केलेली असते. भिंतीवरील हत्तीच्या गळ्यांत रोज वाढत्या क्रमानें त्या विशिष्ट काळांत निर्माण होणाऱ्या फळांच्या व फुलांच्या माळा घातलेल्या असतात. पाटावरील रांगोळीभोंवतीं घरोघरींच्या पोरीबाळी मोठ्या समुदायानें एकत्र येऊन गाणीं गात फेर धरतात. रोज एक नवीन गीत म्हणावयाचें या परीनें वाढत्या क्रमानें हीं गीतें गाण्याचा प्रघात आहे. खेरीज गाणीं संपल्यानंतर त्याच गीतांच्या संख्येप्रमाणें निरनिराळ्या खिरापती वांटण्याचीहि चाल सर्वत्र रूढ आहे. ह्या खिरापती घरच्या मुलीनें आपल्या परकराच्या सोग्यांत लपवून ठेवून इतरांना ओळखायला लावायच्या असतात. हा खिरापती ओळखण्याचा प्रसंग मोठा बहारदार असतो.

हस्ताचा पाऊस म्हणजे वर्षभराचें पिण्याचें पाणी उभें करणारा पाऊस. त्याच्या मुसळधारीनें सर्वत्र होणारें पाणीच पाणी मानवाच्या आयुष्यांत नवजीवन उभारतें. चैतन्य आणतें. म्हणून ह्या नवजीवनाच्या स्वागताचीच ही पूजा होय.

त्यामुळें ही पूजा ओळीनें सोळा दिवस मोठ्या उमेदीनें व हौसेनें सर्वत्र केली जाते व त्यासाठीं वडीलधाऱ्यांचें कौतुकहि उफाळून वर येतें.

संग्राहिका—**विद्या देसाई**

[ १ ]

वाजे चौघडा रुणझुण
आला ग हादगा पावणा
दारीं तुळस दवणा
जाईजुई शेवंती दुपारीं
फुले ग नानापरी
हादगा देव मी पूजीतें
सखयांना बोलावीतें
हादगा देव मी पूजीतें
लवंगा सुपाऱ्या वेलदोडे
करून ठेवले विडे
आणखीन् दुधांतले दुधपेढे
वहातें मी हदग्यापुढें
हादगा देव मी पूजीतें
सखयांना बोलावीतें
हादगा देव मी पूजीतें

[ २ ]

हस्त हा दिनीयाचा राजा
तयासी नमस्कार माझा
नमस्कारासरशीं वारा
आधीं पडल्या मेघधारा
मागून पडल्या मुसळधारा

( चाल वेगळी )

धारा या दुधाऱ्या दिसती
त्यानें ग पिकें हीं पोसतीं

( चाल वेगळी )

हस्ताची मग पाळी आली
म्हणूनी त्यानें गंमत केली
त्याच्या योगें झाला चिखल
त्या बाई चिखलांत लावली केळ
एकेक केळ मोठालं
हादग्या देवा वाहिलं
खिरापतीला वाटीलं

( चाल वेगळी )

हादगा गांधारी मी पूजीतें
सखयांना बोलावीतें
हादगा देव मी पूजीतें

-- ३ --

एक लिंबूं झेलू बाइ
दोन लिंबू झेलूं
बारा लिंबाची सेवा करूं
हनुमंताला माळ घालूं
हनुमंताची निळी घोडी
येतां जातां कमळं तोडी
कमळांत गुंतली एकच राणी
अग अग राणी
इथं कुठं पाणी
वरच्या डोंगरीचं आणा पाणी
आमच्या गांवचा नवलक्ष माळी
त्यांनीं लावली करवंदजाळी
करवंदजाळीचं पाटूळं
पाटूळ सोगा जी लोळूं द्या
आडवा गोपा जी खेळूं द्या
आमचा भोंडला घुमूं द्या

— ४ —

हरीच्या नैवेद्याला केली
जिलबी बिघडली

त्यांतली एवढीशी उरली मळी
त्याची केली बुंदीकळी
तुपांत तळली साखरेंत घोळली
जिलबी बिघडली

त्यांतला एवढासा उरला पाक
त्याचा केला साखरभात
तुपांत तळली साखरेंत घोळली
जिलबी बिघडली

त्यांतलं एवढंसं उरलं पीठ
त्याचं केलं थालीपीठ
तुपांत तळली साखरेंत घोळली
जिलबी बिघडली

— ५ —

आला चेंडू गेला चेंडू, राया चेंडू झुगारिला
आपण चाले हत्ती घोडे, राम चाले पायीं
राम ग वेचीतो कळ्या
सीता ग गुंफिते माळा
आल्या ग लगीनवेळा
आकाशीं घातीला मंडप
जरतारी घातीलं बोहलं
जरम् जरती बसले पाति
पतीन् पती तिरूबाई राळा
तिरूबाई राळा मुंजाबाळा
मुंजा बाळाची मुंजक दोरी
तीच दोरी सावध मारी

सावधा सावधा सर्वतकाळ
सर्वतकाळाचा दोर
आणा दोर बांधा चोर
बांधा चोर बाई झाडाशीं
झाड झपकं, फूल टपकं
तें बाई फूल मीं तोडीलं
बहिणा माथां खोवीलं
बहिणा तुझी वेणी ग
सोनीयाची फणी ग
बहिणा तुझा खोपा ग
उंदीर घेतो झोपा ग
कोथिंबिरी बाई ग
आतां कधीं येशील ग
आतां येईन चैत्रमासीं
चैत्रा चैत्रा लौकर ये
हस्त घालिन हस्तारा
देव बसविन देव्हारां
देव्हाराच्या चौकटी
उठतां बसतां लाथाबुक्की
घे काठी लाग पाठीं
घेत नाहीं काठी
लागत नाहीं पाठी
घरादाराची लक्ष्मी मोठी

• • •

संग्राहिका–सौ. नलिनीबाई शिंदे

— ६ —

सासऱ्याच्या वाटं कुच कुच काटं
कोण पावणा आला ग सई....हूं....हूं
सासरा पावणा आला ग सई....हूं....हूं
काय घेऊन आला ग सई....हूं....हूं
गाडी घेऊन आला ग सई....हूं....हूं
गाडीची बैल खरताडी
वर बसला कैकाडी
त्याच्या गाडींत मी बसायची न्हाई बाई
त्याच्या मागें मी जायाची न्हाई ....हूं....हूं....

दिराच्या वाटं कुच कुच काटं
कोण पावणा आला ग सई....हूं....हूं
काय घेऊन आला ग सई....हूं....हूं
तोडे घेऊन आला ग सई...हूं....हूं
त्याचे तोडे मोडके
त्याच्या गळ्यांत मडकें
त्याचे तोडे मी लियाची न्हाई बाई
त्याचे मागें मी जायाची न्हाई ....हूं....हूं

सासूच्या वाटं कुच कुच काटं
कोण पावणी आली ग सई....हूं....हूं
सासू पावणी आली ग सई....हूं....हूं
काय घेऊन आली ग सई....हूं....हूं
पाटल्या घेऊन आली ग सई....हूं....हूं
तिच्या पाटल्या सडक्या
जशा काय भिंगाच्या त्या खिडक्या
तिच्या पाटल्या मी लियाची न्हाई बाई
तिच्या मागें मी जायाची न्हाई....हूं....हूं

नवऱ्याच्या वाटं कुच कुच काटं
कोण पावणा आला ग सई....हूं....हूं
नवरा पावणा आला ग सई....हूं....हूं
काय घेऊन आला ग सई....हूं....हूं
घोडं घेऊन आला ग सई....हूं....हूं
त्याच्या घोड्यावर मी बसणार
माझ्या पुढून तें चालणार
त्यांच्या मागें मी जाईन सई
त्यांना गुजु गुजु बोलीन सई
नवऱ्याच्या वाटं, कुच कुच काटं,
कोण पावणा आला ग सई....हूं....हूं
नवरा पावणा आला ग सई....हूं....हूं

## भुलाबाई

पश्चिम महाराष्ट्रात होणाऱ्या हस्त नक्षत्राच्या पूजेच्या वेळींच खानदेशांत व विदर्भांत शिवशक्तींची पूजा बांधली जाते. आमच्या कडील भोंडल्याप्रमाणेंच यावेळीं भुलाबाईचीं गाणीं फेर धरून तिकडच्या मुलीबाळी म्हणतात.

सुंदर रीतीनें सजावट केलेल्या एखाद्या मखराच्या कोनाड्यांत भुलाबाईची स्थापना होते. ही भुलाबाई म्हणजे पार्वती व भुलोबा म्हणजे शंकर होय. म्हणूनच यांच्या पूजेस शिवशक्तीची पूजा म्हटलें जातें

भुलाबाईचा हा सोपस्कार देखील भोंडल्याप्रमाणेंच सोळा दिवस चालतो व आश्विन मासांतच होतो. यावेळींहि वाढत्या दिवसा प्रमाणें गाण्यांचा व खिरापतींचा वाढता क्रम असतो. हादग्याप्रमाणेंच अखेरच्या दिवशीं भुलाबाईची बोळवण केली जाते. मात्र त्या दिवशींची रात्र सर्वजण गाणीं गाऊन व खेळून जागवतात हें विशेष होय.

क्र. 5636 दि. ..................
भुलाबाईचीं गाणीं ........................ नों दि. ...१२१

संग्राहिका–विमल तपस्वी

# भुलाबाईचीं गाणीं

–१–

पहिली ग भुलाबाई देवा देवा साजे
घातिला मंडपा खेळ खेळ खंडोबा
खंडोबाच्या नारी बाई वणी वणी अवसनं
अवसनेचं पाणी तसं गंगेचं पाणी
गंगेच्या पाण्यानें वैरिला भात
जेविला कंथ ठोकिला रांध
हनुमंत बाळाचे लांब लांब झोके
भुलाबाई झोके अवस्तर फुगे
भाऊ भाऊ केकती
माया फुलें झळकती
झळकतीचं एकच पान
दुरून सुलाबाई नमस्कार

–२–

येवढीशी गंगा झुळू झुळू वाहे
तांब्या पितळी नायकू
हिरवी टोपी बायकू
हिरवी टोपी हारपली
सर्पाआड लपली
सर्पादादा एकला
जाई अंबा पिकला
जाई नाहीं जुई नाहीं
चिंचेखालीं लपली
चिंचा तोडीत जाय ग
पांच पान खाय ग
खातां खातां रंगली मळ्यांत

घागर बुडली तळ्यांत
तळ्या तळ्या ठाकुरा
भुलाबाई जातें माहेरा
जाते तशी जावूं द्या
पोटभर मेण लावूं द्या
तांबड पाण्यानें न्हावूं द्या
बोटभर कुंकूं लावूं द्या
हिरव्या बांगड्या भरूं द्या
निळ्या घोड्यावर बसूं द्या
निळ्या घोड्याचे लटके पाय
आऊल पाऊल येवलें गांव
येवले गांवाचे ठसे ठसे
भुलाबाई म्हणती सासर कसें

— ३ —

आरडी एवढी परडी ग
आज मूळ कोण ग
आज मूळ सासरा ग
सासऱ्यानं काय आणलं ग
सासऱ्यानं आणला पाटल्या जोड
घ्या घ्या भुलाबाई पाटलीचा जोड
पाटलीचा जोड घेत नाहीं
तुमचे बरोबर येत नाहीं
आरडी येवढी परडी ग
आज मूळ कोण ग
आज मूळ सासू ग
सासूनं काय आणलं ग
सासूनं आणला बिंदीचा जोड
घ्या घ्या भुलाबाई बिंदीचा जोड
बिंदीचा जोड घेत नाहीं

तुमच्या बरोबर येत नाहीं
आरडी एवढी परडी ग
आज मूळ कोण ग
आज मूळ पती ग
पतीनं काय आणलं ग
पतीनं आणला कुंकाचा पुडा
घ्या घ्या भुलाबाई कुंकाचा पुडा
कुंकाचा मी पुडा घेतें
तुमच्या बरोबर येतें

— ४ —

कोणे ऐके दिवशीं
राळा पेरला बाई राळा पेरला
मधल्या बोटाला विंचू डसला
आणा माझ्या माहेराचा वैद्य
आणा माझ्या सासरचा वैद्य
अंगांत अंगरखं फाटकं तुटकं
डोक्याला पागोटं काळी चुंबळ
हातांत कांठी जळकं लांकूड
पायाला बंद तोंडांत विडा
आणा माझ्या सासराचा वैद्य
आणा माझ्या माहेराचा वैद्य
अंगांत अंगरखा भरजरी
डोक्याला पागोटं जरतारी
हातांत काठी पंचरंगी
कपाळाला गंध केसरी
तोंडांत विडा हिरवं पान
आणा माझ्या सासरचा वैद्य
आणा माझ्या माहेराचा वैद्य

## मौंजीबंधन

पूर्वींच्या काळीं योग्य वय प्राप्त झाल्यावर जवळपास राहणाऱ्या विद्वान्, सदाचारी व ज्ञाननिष्ठ गुरूजवळ स्वतःला त्यांच्या शिष्यांच्या शाखेंत सामील करून घेण्याबद्दल व विद्यादान देण्याबद्दल विद्यार्थ्यानें विनंती करण्याची पद्धति असे. या वेळीं लहानसा विधि केला जात असे. हा विधि उरकल्यानंतर ब्रह्मज्ञान प्राप्त करण्यासाठीं उपवीत चढविलें जात असे. या विधीस मौंजीबंधन वा मुंज म्हटलें जाई.

याच वेळीं वेदाध्ययनाचा आरंभ म्हणून गायत्री मंत्राचा उपदेश केला जात असे. त्याचप्रमाणें हा विधि आटोपल्यावर त्या विद्यार्थ्यास द्विजत्व प्राप्त होई. इथें द्विज म्हणजे दोनदां जन्मलेला असा अर्थ घ्यावयाचा. आणखी मातापित्यांपासून मिळालेला एक जन्म व गायत्री मंत्र आणि आचार्य यांच्यापासून मिळणारा दुसरा जन्म असे हे दोन जन्म मानावयाचे.

आपल्या पुढील अध्ययनासाठीं गुरूकडे जाणें यालाच ‘ उपनयन ’ असें म्हणतात. हा उपनयनाचा अगर मौंजीबंधनाचा विधि मुलग्याप्रमाणेंच जुन्या काळीं मुलींच्या बाबतींतहि होत असे !

संग्राहक—**श्रीमंत सरदार आबासाहेब मुजूमदार**

### श्रीकृष्णाचें मौंजीबंधन

श्रीगणेशाय नमः
हरिहरि ऐसें जन हो म्हणा
सत्य पाप जाईल जाणा
कृष्ण द्वारकेचा राणा
त्याशीं मौंजीबंधन ॥ ध्रु० ॥

नंद यशोदा दोघेजण
पाहती कृष्णाचें लक्षण
पिता देखुनी म्हणे जाण
मौंजीबंधन करी ॥ १ ॥

सात वर्षांचा मुरारी
त्यासीं करा ब्रह्मचारी
शीघ्र बोलवा आचारी
जोशी मुहूर्त सांगती ॥ २ ॥

तंव ते पाचारिले जोशी
नंद पुसतो तयापासीं
मुहूर्त सांगावा आम्हासीं
चंद्रबळ गोमटें ॥ ३ ॥

पाटीं घालूनि वर्तविलें
उत्तम लग्न जें पाहिलें
लग्न उत्तम जें रिघालें
चंद्रबळ गोमटें ॥ ४ ॥

नंद मनीं संतोषले
थोर सोहळा पैं आलें
दारीं मंडप घातीयेले
थोर कोड कौतुकें ॥ ५ ॥

आमंत्रण नगरांत
आले विद्यावंत भट्ट
विडे वाटिती चोफट
गंध अक्षता करिती ॥ ६ ॥

आले शेट सावकार
घेऊन उत्तम आहेर
गवळी मिळूनी थोर थोर
आहेर उत्तम करिती ॥ ७ ॥

नंदनवनसारिची प्रीती
सरशा नारी गीत गाती
तंव तो मुंजीया श्रीपती
खेळविती गवळणी
नंदें बोलाविला साळा ॥ ८ ॥

त्यासी बैसु घातला शेला
तवं त्या चतुरवृद्धबाळा
खेळविती गोपाळा तें ॥ ९ ॥

गोकुळग्रामीं मांडीला सोहळा
वाजती मृदंग पै कोळा
आणिक वाजंत्रांचा मेळा
झगड मृदंगे ताळ ॥१०॥

अष्टवर्गे जेवीती
षड्‌रस पक्वान्नें वाढिती
तंव तो मुंजीया श्रीपती
मातेपुढें जेवितो ॥११॥

दहीभात कालविती
कृष्णामुखीं कवळ देती
त्यांच्या पुण्या नाहीं नीती
जे कृष्णासंगें जेविती पाहो ॥१२॥

आड धरिला कपडा
कृष्णराम उभा पुढा
हरी पाहे चहूंकडा
मी तर अवघे देखतो ॥१३॥

मीच उंचीं शयनो देखा
मजपुढें कायसाय मनीका
कृष्णरूप हे अनीका
सर्वाभूतीं मीच वसे ॥१४॥

ब्राह्मण समिधा पाठविले
वेळ वगत्रे घेऊनि आले
घरांत स्थंडील घातलें
होम मांडीला नीका ॥१५॥

चरुघृताच्या आहुती
बरव्या समीधा अर्पिती
ही तव झाली पूर्णाहुती
शांती करितां अभिषेक ॥१६॥

कृष्णें पसरिला हात
आहुती तो खाया मागत
स्वच्छ वदन प्रकाशीत
मुखीं अग्नी दिसताहे ॥१७॥

मी चराचरी देखा मनीं
अग्नीप्रवेश मजपासूनीं
पाहा दिव्य लोचनीं
हरिरूप गोमटें ॥१८॥

कान्हुगाईचा गोवळा
साप घालीतो वोंगळा
हा तो उंडीचा भूकेला
उभ्या अन्न भक्षीतो ॥१९॥

आमुचें कुळीं धर्म थोर
संध्येनिष्ठेचा आचार
आव घाली तो अपार
अन्न खाया मागतो ॥२०॥

घेई करगोटा कासोटीसी
ब्रह्मचारी तूं बा होसी
तीर्थाटण करिसी
संध्याकारणालागीं ॥२१॥

भट्ट तुम्ही हो आळशी
मौंज वळली पाहो कैसी
कृष्णा न पुरे कासेसी
भट्टां दक्षणा थोडी म्हणूनी ॥२२॥

भट्ट सर्व हो हांसत
हरिकडे कसे पाहत
तंव ती कानो जी बोलत
आम्हा नीगुती हो सांगा ॥२३॥

आंगीकारोनी श्रीहरी
संध्यामंत्र तो उच्चारी
पाटी बैसले आचारी
तयांपुढें तो बोलती ॥२४॥

बोलावा हो ती यशोदा
कांहीं सांगेल मुकुंदा
रुष कां धरीशी गोविंदा
अघटित पवाडे होती तुझे ॥२५॥

शाहण्या राहे बाऊगला
तूं तर ब्रह्मचारी भला
लाडू साखरें घोळिला
खाये बाप भुकेला हो ॥२६॥

हातीं घेऊनीयां थाळा
मातेपुढें उभा बाळा
ब्रह्मचारीयांचा खेळा
भिक्षा मागतो कैसा ॥२७॥

भिक्षा मागतो कानया
लाडू सूदले तान्ह्या
सुवर्ण पुष्प अंगोळीया
बरवी भीक्षा मागतो ॥ २८ ॥

म्हणारे गोविंद गोविंद
मना लागो हाची छंद
माझे हृदयीं प्रेमानंद
तीन्हा योग्यान सोढी ॥ २९ ॥

कृष्णादेवा हो मौंजीबंधन
आनंदलें त्रिभुवन
जन करिती चिंतन
पापा होय भजन हो ॥ ३० ॥

संग्राहिका—सौ. सुलोचना फडके

## मुंज

प्रभुकृपें सुदीन हा आला
व्रतबंधन हें आजी बाळा

चौघडा वाजतो दारीं
तुज स्नान घालिती नारी
काजळ कुंकू तव या गाला
व्रतबंधन हें आजी बाळा

भोजन सिद्धता केली
घातिली पाटरांगोळी
जमविले आप्त इष्टांला
व्रतबंधन हें आजी बाळा

बैस तूं भोजना आतां
मुखीं घास घालिते माता
आनंद होत या काला
व्रतबंधन हें आजी बाळा

केशरीभात जिलबीला
मोतीचूर झुलवित आला
करी सेवन पक्वान्नांला
व्रतबंधन हें आजी बाळा

ॐ भवती भिक्षां देही
गायत्री मंत्र हा गाई

गुरुमुखें करी श्रवणाला
व्रतबंधन हें आजी बाळा

तुजवरी कृपेची छाया
राहो ही सदा प्रभुराया
विनविते माता जगताला
व्रतबंधन हें आजी बाळा

# लग्नाचीं गाणीं

विवाह किंवा लग्न म्हणजे मानवी जीवनांतील एक श्रेष्ठ व महत्त्वाचा असा संस्कार आहे. स्त्री व पुरुष योग्य वय प्राप्त झाल्यानंतर संसार करण्यास पात्र व्हावेत म्हणून त्यांची जोडी पसंत करावयाची व लग्नगांठीमुळें त्यांना एकत्र नांदण्यास परवानगी द्यावयाची हा विवाहाच्या मागचा हेतु आहे.

त्यामुळें जुन्या काळच्या चालीरीतींच्याप्रमाणें विवाहाचा हा सोहळा आप्तेष्ट व इष्ट मित्र यांच्या साक्षीनें पार पाडण्याची चाल आहे. एवढेंच नाहींतर हा विवाहाचा संस्कार नवदांपत्यावर चांगल्या रीतीनें व्हावा म्हणून बारीकसारीक विधि वा चालीरीतीहि पाळण्याचा सर्वत्र प्रघात आहे.

अशावेळीं हें नवजीवन नवदांपत्यांना मंगलदायी व्हावें म्हणून परंपरेनें चालत आलेलीं गाणीं म्हणावयाची पद्धति आहे. हीं गाणीं त्या त्या विशिष्ट प्रसंगांनुसार स्त्रिया म्हणत असतात. ह्या गाण्यांची सुरावट चांगली असून त्यांचें अंतःकरण कौतुकानें माखलेलें असतें. त्याचप्रमाणें ह्या गीतांनीं जुनी परंपरागत अशी चालरीत सांगितली असून त्या काळचें वैभव दर्शविण्याचाहि मोठा सुंदर प्रयत्न केलेला आहे.

लग्नाचीं हीं गाणीं कांहीं पुढारलेल्या वर्गांतील असून कांहीं सामान्यांच्या व विशेषतः खेडुतांच्या जीवनांतील अशीं आहेत तीं दोन प्रकारांनीं येथें दिलेलीं आहेत.

संग्राहिका–विद्या देसाई

# गणेशनमन

घाणा भरियेला विडा ठेवियेला
आदि नमियेला गणराज

घाणा भरियेला साचा खंडेश्वरी मातेचा
मोठा भार तो गोताचा गणराज

आम्हां घरीं कारणी गणराज पुराणीं
मांडव दणाणी चारी दिवस

आम्हां घरीं तुम्ही देवें गणराजें यावें
मांडवी राहावें पांच दिवस

गणराज गणपती त्याशीं शेंदुरें लिंपिती
जें मनीं कल्पिती तेंची होय

आदि मूळ धाडी घुंगुरांची गाडी
शालजोडीचा वऱ्हाडी गणराज

आदि मूळ धाडा अंबेचे हो गांवा
मग तेल लावा कृष्णनाथा

पानाचा कीं पुडा फुलाचा हो तुरा
आदि मोरेश्वरा नमियेला

आदि मूळ धाडा दूरीचीये हो दूरी
आम्हां कुळाचारी अंबेश्वरीमाय

• • •

अनुक्र: ३६३८९ ... दि ...
... लो० दि० ...


## गणेश–स्थापना

जयजयाजी देवा गणेशा । मुहूर्तें स्थापी खांबाचा प्रकाश
दवळा गाइन सुरेशा । रघुनाथ नोवरा
देव भक्तांचा कैवारी । गणेश विघ्नें निवारी
नवरदेव नोवरी । दया करी तयावरी हो
बरवे दोंद देवाचें । कंठीं पदक नवरत्नाचें
हिरे जडिले तयावरचे । उजेड पडे भुजांवरी
शेंदुर चर्चिला मस्तकावरी । जास्वन सुमनाची पूजा शिरीं
मोदक झेली तो हातावरी । विघ्नहरण गणराज
बरवी सोंड या देवाची । कंठीं माळ मोतीयाची
हिरे शोभती तयाची । प्रकाश पडे उदरीं
सभे बैसला गणराजा । चरणीं नमीते सारजा
ब्रीद तोडा संकट निवारणा जा । भक्ताचा विघ्ना हरण गणराज

## मेढ किंवा मंडपस्थापना

इंद्र, चंद्र, ब्रह्मा नारद चौघे जाणा
आणाया पानपुडा नारोळा गेले वना
जोडा मेढ घाव घाली
मुहूर्त मंडपा पाहिली
ये मेढी गोत्र उच्चारा व्याही
मंडप सीवीता पांघरोब शाल व्याही
मंडप सीवीतां पांघरावी शेला काकाजी व्याही
मंडपा आंगणीं ये मेढी गोत्र उच्चारा व्याही
मंडप सीवीतां नेसावा धोत्रजोडा आजोबा व्याही
मंडपा चौथ्या मेढी गोत्र उच्चारा व्याही
मंडप सीवीतां पागोटें घाला बंधुजी व्याही

# पहाटपटी

पहाटेस सोईचें चांदणें अती ।
मोर जे टाहो फोडीती ।
कोकिळा शब्द डाळींती ।
बावी पोखरणी खणील्या ॥ १ ॥

उठले माळी जुंपीती बैला ।
पाणी लावीती हो रोपाला ।
उठा तुमी व्याही पाहिला ।
लावा तुम्ही मांडवीं दिवे ॥ २ ॥

उठा तुम्ही काकाजी ।
तुम्ही वाजंत्री हाकारा ।
उठा हो आजोबा करा ।
करा तुम्ही उपाध्या आमंत्रण ॥ ३ ॥

उठा हो बंधूराया ।
शृंगार तुम्ही कराया ।
उठा आरती कराया ।
तुम्ही मामी बाई ॥ ४ ॥

करा तुम्ही बाशिंगाची आईती ।
लग्नालागीं कोंडयला श्रीपती ।
उठा विहीणबाई निगूती ।
घाला तुम्ही मांडवी कणे ॥ ५ ॥

उठा हो काकीबाई वेगें ।
भरा कुंकवाचे करंडे गे ।
उठा हो आजीबाई वेगें ।
भरा तुम्ही पक्वान्नाची आइती ॥ ६ ॥

उठा हो करवलीबाई
लावा नवरदेवा हळदी कांहीं ।

उठा हो आत्येबाई ।
भरा तुम्ही पुजेचीं तबकें ॥ ७ ॥

उठा हो मामीबाई ।
भरा तुम्ही कलश लवलाहीं ।
उठा हो मावसीबाई ।
करा तुम्ही नवरदेवा शृंगारराया ॥ ८ ॥

लग्नालागी कोंडयला ।
नवरदेव तो पाहा वहीला
आनंदें सकळांशीं ॥ ९ ॥

## हळद

पाहिलें नमन करूं देवा एकदंता पाई हो ।
हळद नीलकंठा विजयी हो ॥ १ ॥

दुसरें नमन करूं सारजेपायीं ।
त्रिभुवनाची आई गाईन ती आई ॥ २ ॥

मुहूर्त तो पुसूनीया ।
हातीं घेऊनी कुदळीया ॥ ३ ॥

बुरडीव वो पाटीया ।
खणली हळद कुदळीया ॥ ४ ॥

रंगायासाठीं गंगे नेउनीया ।
उदकें ती हळद प्रक्षालीया ॥ ५ ॥

आदित्यकिरणीं बाळ विलीया ।
स्कंदर केली ती लावावया ॥ ६ ॥

वाणी बोलाविले ।
बैस पानालीले ॥ ७ ॥

चांदण्या चालले ।
डवळ ओबैल पिवळे ॥ ८ ॥

गजघंटा वाजती ।
तेणे वेगें चालती ॥ ९ ॥

आले ते सत्वर गती ।
हळद आली नगराती ॥१०॥

रोकडे दाम देउनी खचीत ।
दुरड्या भरुनी ती चोखटा ॥ ११ ॥

आणिली हळद मुहूर्ताला ।
भीमकाच्या त्या मंडपाला ॥१२॥

सुरंग हळद ।
आणिली हळद ॥ १३ ॥

पाहती चोखट ।
भाणसा साजत ॥ १४ ॥

कनक पाटावरी ।
ठेवीयेली तीवरी ॥ १५ ॥

पाहती नरनारी ।
आनंदें तीतें करी ॥ १६ ॥

सुवासिणी करवल्या
आरती वो पाचारील्या ॥ १७ ॥

त्याही आरत्या करील्या
त्या हळदीशी सिवल्या ॥ १८ ॥

सोन्याचा वो पाटा ।
गोमेदी वरवंटा ॥ १९ ॥

वाटिल्या वरवंट्या ।
देव कन्या एकट्या ॥ २० ॥

वाटिली हळद चांगली ।
चापेल तेल मोहिली ॥ २१ ॥

ती वेगें करवली ।
घेऊनी हो आली ॥ २२ ॥

करवलीला सनमान ।
कशीबी पातळ नेसुन ॥ २३ ॥

हळद गाती सर्व सुवासीण ।
आनंदें सकळ मान घेऊन ॥ २४ ॥

हळद गावी वऱ्हाडणी ।
श्रीकृष्ण देवाची रुक्मिणी ॥ २५ ॥

आईकता श्रवणी ।
पुण्य जोडे श्रवणीं ॥ २६ ॥

आली हो रखुमाई ।
वज्रचुडे गौरील्याही ॥ २७ ॥

उटी हो ओवरा करी बाई ।
नवरदेवाचे आंगीपाई ॥ २९ ॥

हळद लाविली हो बाई ।
त्वरा करा लग्नाची घाई ॥ ३० ॥

## तेलवण

नागवेलीचें पान चौघींनी तें करीं धरीलें
लहान थोर मिळोनी केशरतीळ तेलें भरीलें
आदि तें तेल कुळस्वामिणीशीं लाविलें
नवरदेवानंतर उच्छिष्ट माखीलें ॥ १ ॥

नोवरदेवना हें तेलवण लाविल्या
जाईजुईच्या कळ्या कोवळ्या
शेवंती फुलाच्या भरु पडल्या
मस्तकीं घराचा करवल्या ॥ २ ॥

आंगणीं गुढ्या तोरणें लाविलीं मंडपाशीं
पडतील फुलें मंडप द्वाराशीं
नोवरदेवा मंगळ तुरे तुर तुर वाजती
तुज लागी सोहिऱ्या पोखण्या येती ॥ ३ ॥

आदि पोखीती माय बहिणी
मग मावशीया सोहिऱ्या साजणीं
चुलत्या माम्या सुवासीणी
नवरदेवा पोखूं येती च्यारीजणी ॥ ४ ॥

मंगळमूर्ती देवद्वारीं
करिती जै जै कारी
पहिल्या नमस्कारी
गणपती देवराया करी ॥ ५ ॥

मदनाचा पुतळा
सावळा श्रीपती चांगला
नमस्कार कृष्ण देवाला
पर्णावया तो आला ॥ ६ ॥

रखुमाबाई नोवरी
राहे कौंडण्यपुरीं
शिशुपाळ मज वरी
असें रखुमाईनें ऐकिलें ॥ ७ ॥

ती हो शंकली मनीं
विप्र तो बोलावुनी
पाठविला द्वारका भुवनीं
वेगें आणा हरी विप्रां बोलुनी ॥ ८ ॥

त्या हो कौंडण्यपुरीं
मंडपा घाल्रं पाचारी
भीमकराजाचे द्वारीं
मंडपीं दिसे सुंदरी ॥ ९ ॥

न्हाणीयाच्या दारीं
चंदनपाटावरी
पासोडी विचित्र वरी
बैसूं घातलीसे सारी ॥ १० ॥

येते यशोदा सती
अनुसया सावित्री
कृष्णा तेलवण लेववीती
नानोपचारें करिती ॥ ११ ॥

सावित्री सीता
दमयंती दुहिता
पद्मावती माता
या चौघी मिळूनी येता ॥ १२ ॥

रखुमाबाई शींबीका
सवें अष्टनायका
पुजूं जाती अंबीका
सैन्य घेउनीया गेल्या येका ॥ १३ ॥

रथावरी बैसले
श्रीकृष्णनाथ आले
त्यानें नेलें भीमकबाळे
ऐसें झालें सकाळे ॥ १४ ॥

कासे कशीला सोनशेला
वरी रत्न मेखळा
कस्तुरीचा साजे टिळा
भाळीं लावी गोपाळा ॥ १५ ॥

आंगीं चंदनाची उटी
शोभे कस्तुरी ल्हाटीं
चाफेकळा मुगुटीं
ऐसा दिसतो जगजेठी ॥ १६ ॥

सोळावीं सोव्वावीं
बासिंगें घडावीं
नवरत्नें जडावीं
तयावरी बरवीं ॥ १७ ॥

पहिलें बासिंग घ्यावा बाई
घेतलें तें रखुमाई
ते कृष्णद लवलाही
बांधीलें नवऱ्यासी ओ बाई ॥ १८ ॥

दुसरें बासिंग सही
घेतलें वोऊबाई
तें नवरी रखुमाबाई
आनंदें बांधिलें बाई ॥ १९ ॥

संग्राहिका—शरदिनी बाबर

## भैनाला मागणं—

भैनाला मागणं दुही दारांनीं झाली दाटी
कंबरेला शेला मामा तिचा ग पानं वाटी
भैनाला मागणं आमी कोणाची देणार
मामा किल्याचा येणार
भैनाला मागणं आमी कोनाची कोन द्यावी
तिच्या चुलत्याची पूस घ्यावी
भैनाला मागणं आलं दडत लपत
भैना खेळती चांदणी सोप्यांत
भैनाला मागणं तिचा बाप न्हाई घरीं
मामानं केली बोली वीस पुतळ्यावरी सरी

• • •

## नवरी

सारविल्या भिंती । वर काढील्या गवळणी
तुझ्या हौसेच्या मावळणी
पांच दुरड्या सरबत । सहावी दुरडी पानांची
चुलती रुसली मानाची
लगनाच्या वेळीं । शिंगी कांपती थरथरा
आला नवरा धीर धरा
मांडवाच्या दारीं । चिकल कां ग झाला
नवऱ्या मुलाचा बाप न्हाला
पांच पेडी वेणी । तिच्या मामांनीं उकलली
कन्या दानाला उभी केली
नवरी पाहूं आले । सोपा चढुनी माडी गेले
नवरी पाहूनी दंग झाले
नवरा पाहूं आले । काय पाहातां वाडा घोडा
नवरा आहे तो जाडा जुडा
लाडकी जरा लेक । लाड सांगती बापाला
मोतीं मागती कापाला

## घाणा

घाणा भरीला सव्वाखंडी भाताचा
उदंड गोताचा गणराजा
घाणा जो भरीला खंडीभर भाताचा
मंडप गोताचा दणका थोर
घाणा जो भरीला खंडीभर जीऱ्याचा
मंडप हिऱ्याचा लखलखाट
घाणा जो भरीला खंडीभर गव्हाचा
मंडप देवाचा दणका थोर

घाणा जो भरीला पांच कुडवातीं
पांच कुडवांचा आधीं मान
घाणा जो भरीला सुपाच्या तेजांनीं
सूर्याच्या तेजांनीं उल्हासला

## आमंत्रण

आवातनं गेलं पाटलाच्या देवा
पाटलाच्या देवानं येवावं
नवऱ्याला हळद लावावी
आवातनं गेलं चांदसूर्व्या देवा
चांदसूर्व्या देवानं येवावं
नवरीला हळद लावावी
आवातनं गेलं नवलाख देवा
नवलाख देवानं येवावं
नवऱ्याला हळद लावावी
आवातनं गेलं भवानी आईला
भवानी आईनं येवावं
नवरीला हळद लावावी
आवातनं गेलं गणगोतायाला
गणगोतायांनीं येवावं
नवऱ्याला हळद लावावी

• • •

## हळद

देवळाचे दारीं कोगबीवर कोगबा
दाटली वो दाटली वो
ती कोगबा तोडुनी भरील्या परड्या
सयांच्या साडया रंगविल्या वा रंगविल्या वो
ती साडी नेसली चंद्राची भारजा न्
तुळशी पुंजायला गेली वो गेली वो
तुळशी पुंजतांना चांद सूर्व्या पुसतो
साडीचं मोल काय बोला वो बोला वो
दोन लाख साडी न् लाखाची चोळी
चुड्याला गणीत न्हाई वो न्हाई वो

## कृष्णदेव नवरा झाला

कृष्ण देवजी देवजी नवरा झाला
शिरीं बाशिंग बाशिंग तुराया लेला
मोडीव मंदील मंदील भगवान लेला
कृष्ण देवजी देवजी नवरा झाला
कृष्ण ग देवाच्या देवाच्या नवरीसाठीं
पैजान घडवीलं घडवीलं नानायापरी
एवढ्या मध्यान मध्यान मध्यान रातरी
तोडं घडवीलं घडवीलं नानायापरी
कृष्ण देवजी देवजी नवरा झाला
नवरा वारूव वारूव स्वारजी झाला
शेलकं वराड वराड मागंजी चालं
भंवतीं चालल्या चालल्या नक्षत्रमाळा
कृष्ण देवजी देवजी नवरा झाला

• • •

अनुक्रम ३८३८ दि:
क्रमांक ........ ग्रं. लि: ........

# आहेर

मांडव्याच्या दारीं सगळ्या आयराच्यायेळीं
बंधूच्या ग आयराची पिवळं पातळ हिरवी चोळी
बंधूच्या आयराची आली परात जरीकाडी
लोकाच्या आयराची तेची उगाच उरफोडी
माज्या बंधूच्या आयेराची जाव मालनी घडी घाल
लोकांच्या आयरानं झाला मांडव लालीलाल
लोकाच्या आयराची घडी ठेवली खुंटीवर
माज्या बंधूच्या आयाराचा जरी पदर पाठीवर
बंधु मी करतें याही दीर दाजीबा चला संगं
मांडव नारळीचा पायघड्याची बोली मग
बंधु मी करतें याही जावा नंदाच्या मेळ्यांत
सोन्याची मोहनमाळ सून राधाच्या गळ्यांत

# बंधूचं लगीन

जात्या ईसवरा तीळा तांदळाचा घास
ताईता बंधुराया माजा मोतीयाचा घोस
पानवंताच्या बायानू तुमा पदरानं पालवीतें
बंधूच्या लगनाची हळद दळाया बोलावीतें
मोठ्याचा नवयिरा त्येच्या बाशिंगी जाईजुई
त्येची ग करवली भैनीसकट भावजयी
मांडवाच्या दारीं हळदीकुंकवाचं भवयिलं
ताईता बंधुजीचीं वरती हिऱ्यांचीं पावयिलं
वराड उतरीलं पानमळ्याच्या टिपरीखालीं
सावळा बंधुराया सोन्याच्या छत्रीखालीं

• • •

## विहीण

मिरवती वरमाई पायघड्यावरूनि जाई
गोरे नाजुक पिवळे पायी
मिरवत मिरवत दारीं आली
नाहीं मनीची हौस पुरली
सखे ग नाहीं मनीची हौस पुरली

घोडे सांडणीस्वार
नौबंद वाजे घनोघोर
पालख्या आबदागिऱ्या
बाज्या लावला मनोहारी
नाहीं मनीची हौस पुरली
सखे ग नाहीं मनीची हौस पुरली

नक्षत्रमाळा ताज्या
हावई नळा फुलबाज्या
ताशा वाजंत्र्याचा बाजा
चौघडा लावला उडाली मजा
सखे ग नाहीं मनीची हौस पुरली

विहिणीचा केवढा थाट
रांगोळी पुढं फिरकी पाट
हंड्या लावल्या तीनशें साठ
गल्लास भरले कांठोकांठ
उदबत्त्यांचा लखलखाट
नाहीं मनीची हौस पुरली
सखे ग नाहीं मनीची हौस पुरली

विहिण बसली न्हायाला
व्याही दादा गेला पाणी आणायला
वासाचें तेल लावी

कुटल्याली शिकेकाई
वजरीनें पाय धुयी
तरी मनींची हौस नाहीं पुरली
सखे ग नाहीं मनाची हौस पुरली

आड भिंती करी नखरा
ठराव केले रुपये आकरा
मागती बेटी बकरा
सुनेला बांगडी कबूल केली
तरी नाहीं मनींची हौस पुरली

वऱ्हाडणी गुलहौशा
करवल्या सुसरमाशा
रंग भरुनी टाकी कळशा
गुलालांनीं विहीण घाबरली
नाहीं मनींची हौस पुरली
सखे ग नाहीं मनीची हौस पुरली

## झालीचें गाणें

झुण झुण वाजंत्री वाजती
पुढं कळवतीनी नाचती
नवरा आला शिवेपाशीं
शिव नारळ देईन
नवरी जिंकून नेईन ॥ झुण झुण वाजंत्री वाजती ॥

नवरा आला बोहल्यापाशीं
बहुले नारळ देईन, नवरी जिंकुनि नेईन
॥ झुण झुण वाजंत्री वाजती ॥

झालींत होतें पांच पापड
वऱ्हाडयांनीं केली तातड
झालींत होते पांच वडे
वऱ्हाडयांनीं जुंपले गाडे
झालींत होते पांच आंबे
वऱ्हाडयांच्या हातीं तांबे
झालींत होते आरशे
वऱ्हाडयांचें तोंड पारूशें ॥झुण झुण वाजंत्री वाजंत्री ॥६

परसांत होती बोर बोरश्री
त्यावर बसले चोर जावई
त्यांनीं नेली आपली बाई
धावून काढा तिच्या पाई
धावुवून काढून होत कांहीं न्हाई
ज्याची होती त्यांनी नेली
आपली माया गेली ॥ झुण झुण वाजंत्री वाजती ॥७

## पात ओवाळणी ( उखाणा )

ऐका मंडळी ऐका. नवरीच्या बापानें घेतला पैका. घेतला असेल तर जगाला दिसेल.

डोंगराशेजारी डोंगर, डोंगराचा तुटला कडा, बारा बैलाचा जुंपला गाडा, गाडयाला लागली उटी, साहेबांनीं केली दाटी, साहेबाला दिला फेटा, कोळ्याचा मान मोठा, कोळ्यांची पुंजली कावड, पुढं आलं मारुतीचं देऊळ, वर्धाचा गेला सेवया खायला, काळं लागलं गालाला, दृष्ट होईल लालाला, वेशीजवळ कसला गलबलाट, वाजंत्री वाजवितात, वाजंत्र्याचा थाट, पुढं आलं महारणीचं ताट, महारणीला दिली साडी, पुढं आली वर ओवाळणी, वर ओवाळणीला दिली घडी, ब्राह्मण म्हणतो लग्नघडी राहिली थोडी, लग्न लागलं, नवरा हंसला, नवरीचा मामा कन्यादानासाठीं बसला, कन्यादानाची तूप लोटी, येऊंद्या कानपिळ्याची आंगठी, तिकडून येईल

खाकळाची ( कुरड्याची ) पाटी. झाली झाल, झालीची आली हुंडा परात, मिरवण्याची राहिली वरात, वरात मिरवली, असा कोणता दिगंबर सोयरा, त्यानं घेतला पांचशें शेला, सुवर्णाचा दिवा, माणकाची पोत, ओवाळलं ........रावांचं गोत.

## उखाणे - आहाणे

कांहीं कांहीं वेळेला स्त्रीजीवनांत असा प्रसंग निर्माण होतो कीं, स्त्रियांना नेहमींप्रमाणें सरळ सरळ बोलून भागत नाहीं. अशा-वेळीं त्या वेगळी भाषा वापरतात. कांहींतरी सूचित करणारें असें बोलतात. विशेषतः असा प्रसंग पतीचें नांव घेण्याचे वेळीं येतो. आणि असे प्रसंग लग्न समारंभाचेवेळीं, डोहाळ जेवणाचे वेळीं आणि बारशाचे वेळीं प्रामुख्यानें येतात. याखेरीज सणासुदीला व हळद कुंकवाचे वेळींहि पतीचें नांव घेण्याचा प्रसंग उद्भवतो. अशा वेळीं ज्या पद्धतीचें बोलणें स्त्रिया करतात त्या पद्धतीस उखाणा असें म्हणतात. कांहीं मराठी विभागांतून हा उखाणा आहाणा या नावानेंहि ओळखला जातो.

फुगडी खेळतांना देखील उखाणे घालण्याची चाल महाराष्ट्रांत आहे. फुगडीच्या उखाण्यांतून बऱ्याच वेळां विनोदाची निर्मिति केली जाते. आणि पतीचें नांव घेण्यासाठीं वापरल्या जाणाऱ्या उखाण्यांतून घरचें वैभव प्रगट केलें जातें.

खेड्यांतील स्त्रियांचा उखाणा-जानपद उखाणा-भला मोठा लांबलचक असा असतो व सांसारिक जीवनांतील सर्व प्रकारचा भाव त्यांत मोठ्या खुबीनें गोवून टाकलेला असतो.

संग्राहिका—सौ. पार्वतीबाई किर्लोस्कर

## उखाणे

विष्णूची केली पूजा बाळकृष्णाची केली शांती
××× राव सुखी असावेत हीच माझी विनंती

महादेवाच्या पिंडीवर बेल घालतें वाकून
××× रावांचें नांव घेतें वडील माणसांचा मान राखून

हळदीला दिला रुपया कुंकवाला दिली मोहोर
××× रावांच्या जिवावर मी आहें थोर

महादेवाच्या पिंडीला बेल वाहतें ताजा
××× रावांच्या शिवाय देव नाहीं माझा

काळी चंद्रकळा लुगडं त्याला जरीचे कांठ
××× रावांच्या जिवावर हळदिकुंकवाचा थाट

जडिताचं मंगळसूत्र सोनारानं घडवलं
××× रावांच्या नांवासाठीं सर्वजणांनीं अडवलं

मला नाहीं येत विशेष कांहीं मी आहे साधी
××× रावांचें नांव घेतें सर्वांच्या आधीं

जाई जुईच्या कळया पसरल्या दाट
××× रावांच्या जिवावर पाहिन मोक्षाची वाट

बसायला देतें खुर्ची पायाखालीं दिलं स्टूल
××× राव बसले पूजेला देतें हातांत गुलाबाचें फूल

×××हातभर कांकणं अंगभर पदर
××× रावांच्या सेवेला मी आहे हजर

ठुशी टिक्का खालीं तन्मणी कीर्ती
××× राव सुखी असावेत ही माझी विनंती

रंगीत पाटावर शालजोडीची घडी
××× रावांचें बोलणें जणू बर्फीची वडी

काळी चंद्रकळा लुगडं बारीक केलं ××× रावांचं नांव घ्यायला मला कां आडवलं

सुखदु:खाच्या लाटांनीं भरलें मानससरोवर
आयुष्याचा प्रवास करतें ××× रावांच्या बरोबर

स्वातंत्र्याचा हार हिंदमातेच्या गळ्यांत
××× रावांचें नांव घेतें सुवासिनींच्या मेळ्यांत

गुलाबाचं फूल माळ्याच्या मळ्यांत
××× नवरत्नांचा हार सासूबाईच्या गळ्यांत

पोटीं जन्माला ××× रावांसारखा हिरा
मांमजीच्या मंदीलाला शोभतो जणुं मोत्याचा तुरा

जाईजुईच्या वेलावर उमलली कलिका
××× रावांचं नांव घेतें ××× बालिका

जाईजुईच्या वेलावर रुमाल टाकतें विणून
××× रावांचं नांव घेतें तुम्ही सांगितलें म्हणून

फुलांत फूल सुवासिक फूल जाई
××× रावांसारखे पति मिळाले ही माझी पूर्व पुण्याई

वंदे मातरमची पाटी हिंदमातेच्या हातांत
××× रावांचं नांव घेतें तुमच्या घरांत

स्वराज्यसीमेवर उभी हिंदमाता
××× रावांचं नांव घेतें मी कांता

हिंदमातेच्या हातांत स्वराज्याचा झेंडा
××× रावांच्या चरणीं देह अर्पण केला

राम बसले राज्यावर सीता बसली अंकावर
××× रावांचें तेज माझ्या कुंकवावर

रामराज्यांत मारले रावण, कृष्णराज्यांत खाल्लें दही
निवडणुकीच्या पत्रकावर ××× रावांची सही

तारामती राणी, रोहिदास पुत्र, हरिश्चंद्र राजा
××× रावांचं नांव घेण्यांत पहिला नंबर माझा

संसाररूपी सागरांत पतिपत्नींची नौका
××× नांव सर्वजणी ऐका

स्त्रियांनीं संसार करावा शक्तीपेक्षां युक्तीनें
××× नांव घेतें प्रेमपूर्वक भक्तीनें

यमुनेच्या कांठीं कृष्ण खेळे खेळ
××× नांव घेतें संध्याकाळची वेळ

गौरीच्या पुढें हळदी कुंकवाच्या राशी
××× नांव घेतें चैत्रमासीं

राम गेले वनवासा राज्य आलें भरता
××× रावांचें नांव घेतें तुमच्या आग्रहाकारितां

तुळशीला पाणी घालतें बर्फापेक्षां गार
××× रावांचें नांव घेतें आग्रह झाला फार

लवंगानें होतें उष्ण, वेलदोड्यानें होते सर्दी
××× रावांच्या नांवाची आतां पुरे करा गर्दी

गुलाबाचें फूल गणपतीला वाहिलें
××× रावांचें नांव घेतें द्या आशीर्वाद आपले

अत्तरदाणी गुलाबदाणी चौफुला देतें पुसून
××× रावांचें नांव घेतें खुर्चीवर बसून

अत्तरदाणी गुलाबदाणी चौफुला करितें नवा
××× रावांचं नांव घेतें आशीर्वाद मला द्यावा

संग्राहिका–सौ. कुमुदिनी पवार

सोन्याची डबी बुक्यानं घातली
× × × रावांचं नांव घेतां सर्व मंडळी हांसली

चांदीची डबी टाकून देती आहो झेलून घ्या
× × × राव रागीट बोलणं सोडून द्या

काळी गरसुळी गळाभर मोती ××× राव शंकर मी पार्वती
अत्तर दानी गुलाब दानी चपलाहार करतें नवा
× × × रावांच्या जिवावर पाहतें खटावची हवा

गुलाबाचें फूल सासूबाई जवळ ठेवायला देतें
× × × रावांचं नांव आवडीनें घेतें

महादेवाच्या पिंडीला भोंवताली चिरा
× × × राव बसले पुजेला मी वहातें हिरा

चांदीच्या ताटांत नागवेलीचं पान
× × × रावांचं नांव घेतें वडील माणसांचा राखतें मान

सरी ठुशीचे गोंडे कलाबुतीनें आवळले
× × × रावांचं नांव घेतां चंद्र सूर्य मावळले

तुळशीची करतें पूजा महादेवाची करतें सेवा
× × × राव सुखी असावेत हाच आशिर्वाद द्यावा

मागं पुढं गोठ पाटल्या मधें घालतें छंद
× × × रावांचं नांव घेतें गलका करा बंद

आत्रावली, पत्रावळी, पत्रावलीवर भात, भातावर तूप,
तुपासारखं रूप, रुपासारखा जोडा चंद्रभागेला पडला येडा
चंद्रभागेंत वाजती झांज × × × रावांचं नांव घेतां झाली
तिन्ही सांज

पाटावर पाट शंभर साठ, वरल्या पाटाव घोडा
× × × राव सगळं काम सोडा न् मला माहेराला धाडा

कलमी आंबा चाकूनी कापला × × × रावांचं नांव घेतें आशिर्वाद आपला

मुंबईच्या कपडयाला रुपये पडतात सत्तर × × × रावांचं नांव जसं गुलाबाचं अत्तर

काळी चोळी कणखर पुण्याची इनकर, चांदीचा वाडा, रुप्याचं कुलूप, सोन्याचा हात, उघडून बघती जिर-साळीचा भात, भातावर तूप, तुपासारखं रूप, रुपासारखा जोडा, चंद्रभागला पडला येडा, चंद्रभागेंत पांच नावा × × × राव मला आळंदी दावा.

काळी चंद्रकळा तिळा कलाबुतीचे कांठ
××× रावांच्या जिवावर करतें हाळदीकुंकवाचा थाट

गोट पाटल्याच्या मधीं तांबडी बांगडी दिसती खुलून
××× रावांच्या रुपाला मी जातें भुलून

कमळाच्या फुलावर बसले पक्षी
××× रावांचं नांव घेतें चंद्र सूर्य आहेत साक्षी

सोनं नको, नको मोतीं, घेतें माणिक
×××रावांच्या नांवाचा आग्रह झाला आणिक

कामाधंद्याचा आळस, संसारपरपंच्याचं कोडं
××× रावांच्या जिवावर विलास करितें थोडं

सोन्याचं डोरलं सोनारानं घडवलं
××× रावांच्या नांवासाठीं तुम्ही कां आडवलं ?

गोट केलं, पाटल्या केल्या, ठुशी आतां करायची
××× रावांच्या नांवाला मागं नाहीं सरायची

आंत जातें बाहेर येतें, घड्याळ्यांत वाजला एक
××× रावांचं नांव घेतें रानभऱ्यांची लेक

शंकराला प्रिय नंदी, दत्ताला प्रिय गाय
त्याहून मला प्रिय xxx रावांचे पाय

टिळक गेले स्वर्गीं, गांधींनीं केली कमाल
xxx रावांच्या हातांत स्वदेशी रुमाल

संध्येच्या पळीला नागाची खूण
xxx रावांचं नांव घेतें धाडग्यांची सून

लांब लांब केसाला मद्रासी मसाला
xxx रावांच्या नांवाला आग्रह कशाला

कोवळें गवत हरणाचें भक्ष
xxx रावांचं नांव घेतें नीट द्या लक्ष

उगवला चंद्र रजनीला लागली चाहूल
xxx रावांच्या घरांत सुमुहूर्तावर टाकतें पाऊल

मखमली कापड रुपायाला मिळतं गज
xxx राव बसले खुर्चीवर मी पाहिलं सहज

चांदीच्या ताटांत जिलेबीची चवड
xxx रावांच्या नांवाची तुम्हांला कां आवड ?

विठोबाच्या देवळाला सोन्याचा कळस
xxx रावांचं नांव घ्यायला मला नाहीं आळस

सोन्याचे सागरगोटे पडले पातळाच्या घोळांत
xxx नांव घेतें मैत्रीणींच्या मेळ्यांत

सरीखालीं ठुशी, ठुशीखालीं कोल्हापुरी साज
xxx रावांचं नांव घेतें हळदीकुंकू आज

समोर होता पाट, त्यावर होती रत्नांची पेटी
xxx रावांचं नांव घेतें तुम्हां सर्वांसाठीं

हत्तीवर अंबारी उंटावर फौजा
xxx रावांच्या जिवावर मी मारतें मौजा

अनुक्रम ......... दि: ..........
क्रमांक ......................... नों. दि. ..........


काळी चंद्रकळा तिच्यावर काढल्या चांदण्या
xxx रावांचं नांव घेतें पवारांची कन्या

महालक्ष्मीच्या पुढें शहाकर्णाची घोडी
xxx जिवावर लेतें मंगळसूत्राची जोडी

जाईजुईच्या वेलाखालीं विणीत होतें शेला
xxx रावांचं नांव घेतें, सूर्य आकाशांत गेला

महादेवाच्या पिंडीवर द्राक्षाचा वेल
xxx राव बसले पूजेला मी वाहतें बेल

लक्ष्मीच्या पुढें समयी लावतें आठशें एक xxx रावांच्या
जिवावर सुखांत आहे xxx लेक

गौतम ऋषींच्या शापानं, अहिल्या झाली पाषाण
xxx नांवाचें मी लावतें निशाण

यमुनेच्या तिरीं कृष्ण वाजवितो पावा
xxx रावांचें नांव घेतें आशीर्वाद द्यावा

प्रेमाचा दिला हुंडा, भक्तिची केली करणी
आबांनीं मला अर्पण केली x x x रावांचे चरणीं

पैठणी नको शालू नको, नको भरजरी शेला
xxx रावांचे चरणीं देह अर्पण केला

नीलवर्ण आकाशांत वीज लवे चपला
xxx रावांचें नांव घेतें आशिर्वाद आपला

काळी चंद्रकळा नेसण्यांत खुबी
xxx रावांचे सेवेला मी आहे उभी

शंकर बोले कैलासीं पार्वती बसली मांडीवर
xxx रावांच्या नांवाचें तेज माझ्या कुंकवावर

मोत्यानें गुंफला पाळणा, रेशमानें विणली बाज
××× रावांचे नांव घेतें बाळाचं बारसं आहे आज

खळं भरलं दाण्यानं, आभाळ भरलं पाण्यानं, मधीं तिवडा गणराज
× × × रावांच्या जिवावर मी लेतें कोलापुरी साज

संग्राहिका-सौ. **विजयादेवी सावंत**

# जानपद उखाणा

आड भिंत पड भिंत, पडभिंतीला दिवळीं, दिवळींत बक्षी गहूं, पांच भाऊ, एक तिरासिंग राऊ, घोड्याच्या खरारा, चल जाऊं नगरा, नगराची भिंगरी, भिंगरीचं पत्र, सोलापुरी धोतरं, पन्नासाची घेतली गाडी, त्याचा झाला चुरा, लेला मोहरांचा तुरा, आस्तुपुरी पटका, पटक्यांची लेंडी, तळेगांव बंडी, बंडीचा साचा कमरच्या काचा, आवस पुनव आली दाट, घेतलं एका भाकरीचं पीठ, पिठाला नाहीं दूध, झाली आईची सूद आईच्या सुदीला घेतला घोडा, गार दवंडी घेतला जोडा, गेला रोजगारा, राहूचं पाणी कशानी आडलं, नाहीं तीन दिवस कुठलं, रोजगार केला, ग हीनसहीन घरची बायको मावस बहिण, किंमत केली समईची, हवी लागली ग मईची, अशी आई बरी, न्हयारीला घातली कडी, जेवणार म्हणतो जेवायला एक घडी, पोळ्या केल्या महंमदवाडी, पाडाचा अंबा हा देवाला वाहीला, सातारा केला पण ××× राव बडोदा राहिला.

किंवा

आड भिंत पड भिंत, पड भिंतीला दिवळी, दिवळींत हुते बनसी गहूं, चांगली चव, तिरसिंग राव, तिरसिंग राव म्हणाला चला नगराला जाऊं, नगराचीं पागरं, पागराचीं कातरं, सोलापुरांत घेतलीं धोतरं, पन्नासाची घेतली गाडी, त्याचा केला चक्काचूर, तेथून पाहीलं मोचीपूर, मोचीपुरांत घेतला पटका, पटक्याचा चटका, चटक्याची लेंडी, अष्टीपुरांत घेतली बंडी, बंडीची काय अच्चा, रत्नागिरींत घेतला काच्या, काच्याची काय वाट, दस्तूरी लागली दाट, दस्तुरीला दिला वेडा, काळ चौंडीत

घेतला जोडा, बांदा भाकरी चला जाऊं रोजगाराला, रोजगार केला जैन-सैन, घरची आस्तुरी मावसबहिन, एका भाकरीचं बांदलं पीठ, तिची भाकरी ईना नीट, त्याला लागतं दूध, मग झाली मावलीची सूद, अशी मावली खरी, भाकरी केली बरी, जेवनार म्हणतूं, जेवूंया घरीं पोळ्या, जेवाय जाऊं सासरवाडी, पाडाचं आंबं, ईश्वराला वाहिलं × × राव सार गांव, पाहीलं पण फलटान राहीलं.

— २ —

व्याह्याच्या घरीं विहीण चालली दुडदुडा, वाट पुराना मुरुम फोडा, वाट फोडून लावली घरीं, तोंड धुवायला हंडा, हंडा पुराना रांजण मांडा, दांत घासायला दिला वासा, वासापुराना तुळई तासा, तोन्ड धुवुनी बसली जेवाया, बारा मणाच्या खाल्ल्या शेवाया, पोट भरलं नाहीं जावया, बारा मणाचा, खाल्ला भात, तरी आखडीना हात, बारा मणाच्या केल्या तेलच्या, विहिण म्हणती कालच्या, बारा मणाच्या खाल्ल्या रोट्या, विहिण म्हणती लहान मोठ्या, बारा मणाच्या खाल्या पुऱ्या, विहीण म्हणती झरझऱ्या, बारा मणाच्या खाल्ल्या पोळया, विहीण म्हणती शिळ्या, बारा मणाच्या खाल्ल्या वडया, विहीण म्हणती थोडया, बारा शेर खाल्लं तूप, आलं मरणाचं रूप, बारा शेर प्याली तेल, नरडयाला झाला बेल, बारा शेर खाल्ला गूळ, आलं मरणमूळ, बारा खणाची शिवली चोळी, बारा तोळ्याची केली ठुशी, विहीण केली खुशी न् लावली आपल्या घराशीं.

—३—

चांदीचं घंगाळ आंघोळीला, चंदनाचा पाट बसायला, जरीकांठीं धोतर नेसायला, चंद्रभागेचं पाणी, फुलपात्र सोन्याचं, सान येवल्याची, खोड बडोद्याचं, केसरी गंध, त्याला तऱ्हेतऱ्हेच्या कोंशिंबरी भोजनाला, भोजनाचा थाट, डबे पडले ३६०, गज्नीचा आडकित्ता, धारवाडचा चुना, गोकणची जायपत्री, विजापूरची लवंग, बंदरचीं पानं, मालगांवची सुपारी, कोंकणचा पलंग, कादलीची उसूशी, मोराचा भरजरी लोड, बोलणं अमृतासारखं गोड, मी हंसलें गालांत, विचारतात रंगमहालांत, उभी होती सवाशिणींच्या मेळ्यांत, गुलाबाचं फूल माळ्याच्या मळ्यांत, तिनशें खेडयांचा बनवला हत्ती, जनलोक बोलती किती हौसेला पडला पैका × × × नांव घेतें सर्वत्र ऐका.

—४—

खन खन कुदळी मन मन माती, चितारलं खाबं, उभारल्या भिंती, राम राम म्हणलं, नाम नाहीं घेतलं, आण्याचा आणलं करडं, शिवजी म्हाला, भिवजी म्हाला, वजंताचं बाळंतपण झालं, उरलं सुरलं शिंक्यावर ठेवलं, शिंकं तुटलं, मडकं फुटलं, लोंडा गेला महापुरीं, जन लोक गेल बगायला, मी गेलें वाडयांत, वाडयांत हुती खिडकी, खिडकींत हुता हंडा, हंडयांत हुता चंबू, चंबूंत हुता पैका, × × × नांव घेतें सर्व मंडळी ऐका.

—५—

आद घरांत मद घरांत, मद घरांत पलंग, पलंगावर गादी, गादीवर उसुशी, उसुशीवरती मोर, मोरावर माशी × × × × रावांची असेल खुशी, तर घालतील पांचशेंची ठुशी.

—६—

आद घरांत मद घरांत पलंग, पलंगावर झुंबर, झुंबरावर आरशी × × × राव जेवायला बसले, मी वाढतें अनारशी.

—७—

दीर सदरेला उभा, जाव मोठी शहाणी, आठवड्याला घाली पाणी, नणंद मोठी प्यारी, चुकून देईना न्हारी, दीर मोठा अष्ट पाडाचा हातीं मिळाला ताडमाड, दार भिंगाचं, गादी कीनखापाची, उसुशी मोराची ××× नांव घेतें लाडकी लेक थोराची.

—८—

काय गोड पाडाचा आंबा, त्याच्या करतें फोडी, काय नांवाची गोडी, काय नांवाची आगत, तुळशीच्या बागेंत रामाचं देऊळ, सिता होती जवळ, सितेच्या हातीं सोन्याची कळशी, त्यांत पंचनदीचं पाणी××× रावांचं नांव घेतें पंचअमृतावाणी.

— ९ —

कालं बेलं कासेगांव, वंड मंडू नांदगांव, साळ शिरंब वाटेगांव, हातांत कांदा गुंडवाडकरणी, पाटीवर गोंडा मोराळकरणी, बारवचं पाणी निमसूडकरणी, चिपट्यांत नांद ग म्हातूर्णकरणी, टेकाव राहा ग गडकरणी, भाजी खा ग पळसकरणी, तव्याचं काळं खरसिंगकरणी, तळ्यांत पव ग औंधकरणी, देवाला जा ग नांदूसकरणी, कलागतकर ग कळंब्रीकरणी, अंबरस कर ग आठाणकरणी, सैंपाक कर ग पुसावळकरणी, टेंभ्यांत बस ग कुलेंकरणी, खिडींत राहा ग शामगांवकरणी, ऊंस लाव ग किवळकरणी, ऊंस खा ग चिखलकरणी, आडसाराला राहा ग नाजगीर-करणी, पान तोड ग अर्वीकरणी, कुऱ्हाड कर ग वाठारकरणी, हातांत कुऱ्हाड तारगांवकरणी, काला खा ग कालगांवकरणी, काटया पाड ग कोपार्डकरणी, वताव राहा ग कवठकरणी, टेकाव राहा ग खेराडकरणी, देवाला जा ग पालीकरणी, शेरडं पाळ ग इंदूलकरणी, बाजार भर ग चरेगांव करणी, अड्ड्यावर राहा ग उंब्रजकरणी, बनांत राहा ग कोनेगांव-करणी, भज्याचं हाटेल मसूरकरणी, पायांत चेपल्या शिरावडकरणी, जागा सोड ग सासवडकरणी, अफू पाळ ग बेलावंडकरणी, ढोल बांध ग नडशीकरणी, दुपारती टाक ग कोपार्डकरणी, कयताळ वाजीव वागाव-करणी, माळावर राहा ग मुंडेकरणी, टेकाडावर राहा ग गोटकरणी, टुंगांत राहां ग कराडकरणी, संगमावर राहा ग सैदापूरकरणी, वाघ मार ग वागीर-करणी, रेशीम भर ग रिसवडकरणी, हांका मार ग आतवडकरणी, गाया पाळ ग सुर्लीकरणी, धारा काड ग कामटीकरणी, औषध उडीव ग कडेपूर-करणी, सवतीवर नांद ग सवलकरणी, दारु काढ ग रूडूलकरणी, बकरं काप ग शाळगांवकरणी, सांगावा ने ग रायगांवकरणी, बकरं जेव ग उपाळकरणी, कैप आण ग हिंगणगांवकरणी, फिर्याद कर ग कोळस, करणी, साक्षा दे ग खेरडकरणी, खटला चालीव ग येतगांवकरणी, सुपारी फोड ग चिखलहोळकरणी, दंड काढ ग नागवाडीकरणी, पान खा ग धानवडकरणी, तंबाकू खा ग गाडीकरणी, नाक्यावर राहा ग बिटे-करणी, नदार राक ग निवरीकरणी, तांदूळ चूर ग ढवळसरकरणी, भात रांद ग भाळवणीकरणी, जेवाय वाढ ग कविकरणी, चटणीला जवास

आळसुंदकरणी, पारवं पाळ ग पारेकरणी, माप घाल ग सांगलीकरणी, माप घे ग मिरजकरणी, नारळ तोड ग तासगांवकरणी, नथीचा आकडा वेजेगांवकरणी, माती उकर ग सांगोलकरणी, चाळशी घाल ग साळशिंग-करणी, उप्राटं पाणी कलढोणकरणी, खिंडीत राहा ग तरसवाडीकरणी, पहा वड ग इबतवाडीकरणी, नाक्यावर राहा ग डिगीजीकरणी, बस्तीला राहा ग मदुदकरणी, दर्शन कर ग पंढरपूरकरणी, गाया पाळ ग लोखंडी-करणी, बाजार भरीव ग आडपाडकरणी, भिंत बांध ग लिंबूडकरणी, सनई वाजीव ग वरकूटकरणी, दरोडा घाल ग कुकूडवाडकरणी, कट्यावर राहा ग कटरवाडीकरणी, बेलट घे ग ठोकळवाडीकरणी, पाणी भर ग औताडवाडीकरणी, घागर लाव ग कान कातरकरणी, कुत्री पाळ ग पिंपरीकरणी, मोटार उभी खटावकरणी, हरडा भरड ग दाळमोडीकरणी, वड्यावर राहा ग हिंगणकरणी, कंबरला खुरपं तडावळकरणी, खांद्यावर खोरं मांडवकरणी, ढाळ दे ग पेडगांवकरणी, धयाचं गाडगं दहिवडी-करणी, गोंदून काढ ग गोंदावलकरणी, खेळण्याचा अड्डा नरावणकरणी, बक्षीस दे ग खातवळकरणी, शिंग फोड ग शिंगाडवाडीकरणी, बोरं खा ग बोंबाळकरणी, शिंग फोड ग बोंबाळकरणी, येरळा वळीव ग येरळवाडी-करणी, देवाच्या ऐकण्यांत राहा ग अंबवडकरणी, गोशावा राहा ग गोरी-गांवकरणी, मरडून जा ग मुरुडवाककरणी, कुंकवाचा टिळा मायणीकरणी, आकूड बांधा शेंडगवाडीकरणी, निर्मळ धुणं चितळकरणी ××× रावांचं नांव घेतें मी किती शाणी.

## मंगळागौर

विवाहानंतरच्या प्रथम वर्षापासून ओळीनें पांच वर्षे मंगळा-गौरीची पूजा करण्याची चाल महाराष्ट्रांतील ब्राह्मणवर्गांत आहे. विदर्भाकडे ही पूजा मराठे मंडळीहि करतात असें समजतें. ही पूजा दरवर्षी श्रावणांत होते. आपलें सौभाग्य अखंड वाढतें राहावें व जीवन सर्वपरीनें समृद्ध व्हावें या हेतूनें ही पूजा केली जाते.

मंगळागौरीची पूजा हा एक ‘ वसा ’ आहे. म्हणून ही पूजा करणाऱ्या मुलींना ‘ वसळ्या ’ म्हणतात. लग्नानंतरच्या पहिल्या

वर्षाची पहिल्या मंगळवारची ही पूजा विशेष थाटामाटानें केली जाते व ती मानाची मानली जाते.

या पूजेसाठीं सोळा प्रकारची पत्री व नानाप्रकारचीं फुलें लागतात. ह्या फुलांचेच देवीला हात केले जातात, वेणी बनविली जाते, काजळ तयार केलें जातें,चोळीचा खण बनवला जातो वगैरे.

विवाहाचे वेळीं गौरीहर पूजतांना घेतलेली देवीच या पूजे-साठीं घेतली जाते. या देवीचीं स्थापना चौरंगावर होते व षोडशो-पचारांनीं तिची पूजा केली जाते. देवीचे सर्व अलंकार कणकीचे बनवितात व ते देवीला वाहतांना " देवी,तुला घे पिठाचे, आम्हांला दे सुवर्णाचे " अशी मागणी केली जाते.

ह्या पूजेसाठीं बरोबरीच्या अनेक मुली एकत्र येतात. अभ्यंग-स्नान करून व महावस्त्र नेसून सालंकृत अशा त्या येतात. देवीसाठीं केलेला पुरणपोळीचा नैवेद्य दाखविल्यानंतर ह्या मुलींचीं जेवणें होतात. त्यावेळीं घरचें वातावरण प्रसन्न असतें.

संध्याकाळीं मंगळागौर असते त्या घरीं हळदकुंकू होतें. त्यासाठीं ओळखीतल्या व आप्तांतल्या अशा अनेकजणी येतात.

रात्रींच्या वेळीं ' वसळ्या' मुली देवीची पुन्हां पूजा करतात. गुलबक्षीची रंगीबेरंगी पुष्पमाला व पारिजातकाचे हार त्या देवीला वाहतात. यानंतर आरती होते. आणि मग जेवण झाल्यानंतर वेग-वेगळे खेळ खेळले जातात. हे खेळ वैयक्तिक व सामुदायिकहि असतात.

या खेळांची माहिती येथें मुद्दामच देण्यांत येते आहे.मंगळा-गौरीचीं झिम्म्यांचीं व फेराचीं गाणीं तशी ठराविक असतात.त्यामुळें तीं येथें दिलेलीं नाहींत. तरीपण फेराचें एक गाणें नमुन्यादाखल दिलेलें आहे. बाकीच्या खेळांची गाणीं त्या त्या खेळाच्या वर्णनांत आलीं आहेतच.

खेळ संपल्यानंतर पहाटेला आरती होते व नंतर सर्वजणी आपापल्या घरीं निघून जातात.



फुगडी



कोंबडा-झिम्मा



कळशीनृत्य



दंडांतल्या येळी—



सवती-सवतींचें भांडण



सूप-नृत्य



लाटण्यांचा खेळ



विहिणीविहिणींचें भांडण

मंगळागौरीचें पांचवें वर्षहि पहिल्या वर्षाइतकेंच महत्त्वाचें असतें. या पांचव्या वर्षी मुलीच्या आईस वाण द्यावयाचें असतें व व्रताची सांगता केली जाते. या वेळीं तांब्याचे तपेलींत लाडू घालून वरती सोन्याचा नाग नव्या चोळीनें बांधण्यांत येतो व हें सर्व आईला 'वाण' म्हणून दिलें जातें. मुलीच्या वडिलांनाहि सर्व पोषाख छत्री, जोड्यासह दिला जातो. मुलीच्या आईनें या वेळीं लेकीला सोन्याचा हार द्यावयाचा असतो.

हा वसा या वेळीं पुण्याहवाचनानें व होमहवनानें पूर्ण केला जातो.

वाराणसी येथें मंगळागौरीचें खास देऊळ आहे असें म्हणतात.

संग्राहिका-सौ. ताराबाई साठे

## खुर्ची का मिर्ची

दहा वीस जणींनीं या खेळासाठीं चटकन् एकत्र यावयाचें. एकमेकींला चिकटून चिकटून उभें रहात गोल करावयाचा. त्याच-वेळीं एखाद्या नववधूला गोलामधें पकडावयाची असते; म्हणजे मग लगेच खेळाला सुरुवात होते.

घेरांतील सर्व भगिनींनीं टाळी वाजवून पुढें वाकावयाचें आणि तोंडानें प्रश्न करायचा—

सर्वजणी—जाशील कैशी ?

घेरांतील भगिनी—सासू मारीते

सर्वजणी—बरं करीते

आंतील भगिनी वांकत, नाचत व टाळी वाजवत म्हणते—

"खुर्ची का मिर्ची"

बाहेरच्या घेरांतील भगिनी टाळी वाजवीत विचारतात—

"जाशील कैशी ?"

आंतील मुलीनें तक्रार करायची व घरच्या सर्वांचीं नांवें घेत घेत घेर फोडून बाहेर जायला वाट पहायची योग्य संधि मिळल्यावर ती पटकन बाहेर येते व खेळ संपतो.

## सूपनृत्य

खुर्ची का मिर्ची या खेळांतल्या सारखाच बाहेर अनेक भगिनींनीं घेर धरून नाचायचें--

आंतल्या भगिनीजवळ सूप असतें--एकीकडे नाचत बोलत ती सूप या हातांतून त्या हातांत उभें धरून हातांनीं फटफट् आवाज करीत उडवीत असते.

बाहेरच्या घेरांतील भगिनी म्हणतात--'नाच ग घुमा' आंतली भगिनी विचारते--"कशी ऽ ग मी नाचूं ?" "गोठ नाहींत मला, तोडे नाहींत मला, कशी ग मी नाचूं" ? बाहेरच्या भगिनी पुन्हां म्हणतात------'नाच ग घुंमा'. नंतर " आंतील भगिनी विचारते-"कशी ग मी नाचूं ?" आल्या गांवचा, पाल्या गांवचा सोनार नाहीं आला, साज नाहीं मला, कशी ग मी नाचूं ?"

निरानिराळ्या दागिन्यांचीं नांवें घेऊन ते मला नाहींत अशी तक्रार करावयाची व पुन्हां पुन्हां उंच स्वरांत विचारावयाचें "कशी ग मी नाचूं ?" असा हा मजेदार खेळ आहे.

## कांचकिरडा

एका पायाचा अंगठा व त्याचें शेजारचें बोट यांत दुसऱ्या पायाचा अंगठा पकडावयाचा व कमरेवर हात ठेवायचे.

उडी मारायची आणि दोनहि पाय एकदम डावे बाजूस ९० अंशांचे कोनांत व नंतर उजवे बाजूस ९० अंशाचे कोनांत फिरवायचे--पाय हालवायचे त्या वेळीं कमरेवरचा भाग मुळींच हलवायचा नाहीं.

उडी मारून पाय फिरवीत असतांना तोंडानें म्हणावयाचें कीं कांच-किरडा, पाय मुरडा, पायावरून पाय गेले, पाय लंगडा. हा खेळ खेळायला फारच अवघड आहे.

## पिंगा

हा खेळ व्यक्तिशः एकेकीनेंच खेळावयाचा असतो. वाटल्यास अनेकजणींनीं त्यांत सामील व्हावें.

दोन हात कमरेवर ठेवायचे; पाय एकमेकांपासून लांब ठेवायचे; कांचकिरड्यांत कमरेच्या वरचा भाग हलवावयाचा नसतो, तर पिंगा खेळतांना कमरेच्या खालचा भाग हलवावयाचा नसतो.

प्रथम कमरेपासून डोक्यापर्यंतचा भाग पुढें करावा. तो जमिनीशीं समांतर ठेवावा. नंतर उजवे बाजूस, ह्यानंतर मागें व नंतर डावे बाजूस असें वर्तुळाकार फिरावयाचें. असें वर्तुळाकार फिरत असतांना तोंडानें म्हणावयाचें—

माझा पिंगाऽ । जातो काऽशी । आणतो म्हशी ।
माझा पिंगाऽ । जातो वाई । आणतो गाई
माझा पिंगाऽ । जातो साताऱ्या । आणतो म्हाताऱ्या

## सोऽमी—गोऽमी

दोघींनीं आपापले पदर दोन हातांत दोन टोकें धरून डोक्यावरून पुढें घ्यायचे व एकमेकांचे हात धरावयाचे. दोघींच्याहि तोंडावर यावेळीं पदराची जणूं छत्रीच येते व त्यामुळें खेळणाऱ्या भगिनींचीं तोंडें दिसत नाहींत. खेळ खेळतांना कमरेखालचा भाग फारसा हालत नाहीं. दर वेळीं दोन पायांनीं उडी मारायची, पण त्याच जागेवर पाय यावयाचे. अशा उड्या मारीत असतांच कमरेंतून दोघींनींहि एकेकदां एका बाजूस व नंतर दुसऱ्या बाजूस वांकावयाचें असतें. हें सर्व करीत असतां सोऽ मी— गोऽ मी—असें तोंडानें म्हणावयाचें.

## दंडफुगडी

दोघींनीं दोन हातांनीं एकमेकींच्या दंडास धरावयाचें. एकमेकीनें उजव्या पायाला उजवा पाय व नंतर एकमेकींच्या डाव्या पायाला डावा पाय लावावयाचा. तो प्रथम हळूहळू लावावा व नंतर वेग वाढवावा.

कोणी असे पाय न लावतां सरळच फुगडी घालतात. हें करीत असतांना तोंडानें म्हणावयाचें—

दंडफुगडी दंडाची। बाइल माझी पिंडाची।
पिंडावरून जाइन ग। पांच पानं खाइन ग।
दिवाळीला बोली केली तर दसऱ्याला येइन ग॥

## लाटण्यांचा झिम्मा

दोघींनीं दोन लाटणीं घ्यावयाचीं. लाटण्यांचीं टोकें दोन हातांच्या मुठींत धरावयाचीं. कमरेंत किंचित् वांकावयाचें. एकाच वेळीं दोनहि पाय एकदम उडी मारून पुढें घ्यावयाचे; आणि आपल्या हातांतील लाटणें दुसरीच्या हातांतील लाटण्याच्या मध्यावर फुली करून मारावयाचें. अशा पद्धतीनें लाटणीं फिरवायचीं. म्हणजे हातांना पण निरनिराळ्या कोनांत फिरवावें लागतें. यावेळीं पायांचें नाचणें, उडी मारून पुढें व मागें दोनहि पाय एकदम घेणें, लाटण्यांचा हात बदलणें, लाटण्यांचा मोठ्यानें आवाज करणें, हें मोठें मनोरंजक वाटतें. या सर्वांचा वेग हळूहळू वाढवीत न्यावयाचा असतो. कांहींजणी हा खेळ खेळतांना तोंडानें पकवाहि घालतात. या खेळांत जरा चूक झाली तर दुसरीस लाटण्याचा फटका बसण्याचा फार संभव असतो.

## सवतीचें भांडण

दोन भगिनींनीं समोरासमोर उभें राहावयाचें. नंतर कमरेंत वाकून, एकमेकींकडे रागानें पहात, पोकळ हातानें मोठमोठ्यानें टाळ्या वाजवीत हा खेळ सुरू करतात. दोघीहि एकमेकींस विचारतात.

"अग, कां ग, कां ग, अग माझ्या सवती कां ग?
बिलवर बांगडी भरलीस कां ग?—कां ग? कां ग?"

एकमेकींसमोर मधलें अंतर तेंच कायम ठेवून, एकदां एका बाजूस व नंतर दुसऱ्या बाजूस पण सरळ रेषेंत यावेळीं नाचावयाचें असतें.

तूं हा अमुक दागिना कां ग एकटीनें घातलास अशा विचारण्याच्या आविर्भावांत एकमेकीनें एकमेकीस कां ग कां ग? करीत म्हणावयाचें—व

अनु. ३८५८........ दि: ..................
क्रमांक ............................ नों. दि: १६५

वेग वाढवावयाचा तसतसा आवाज पण चढवावयाचा असतो. शेवटीं ओर-डून ओरडून व नाचून नाचून हसूं येऊं लागतें व मग हा खेळ संपतो.

## आगोटा—पागोटा

एक दोघींनाहि हा खेळ खेळतां येतो. परंतु अनेकजणी यांत सामील झाल्या तरीहि चालतें. ह्या खेळासाठीं लुगड्याचा कांचा मारून घ्यावा लागतो. खेळणारांनीं प्रथम ताठ उभें राहावयाचें, नंतर खेळतांना डाव्या पायाची टांच उजव्या गुडघ्यापर्यंत येते—व उजव्या पायाची टांच डाव्या गुडघ्यापर्यंत आली पाहिजे. पाय हलवीत असतांनाच दोन हात खांद्याच्या रेषेंत ताठ करून डोक्यावरून पुढे घ्यावयाचे. नंतर दोन हातांचीं चार चार बोटांच्या मागच्या बाजू एकमेकांस चिकटवावयाच्या यावेळीं तोंडानें दोघींनीं म्हणावयाचें—

आगोटा— पागोटा—घालि शिंगोटा—
मथुरेच्या बागेंत जाइन म्हणतें. जाइन म्हणतें—
लाल साडी नेशिन म्हणते—नेशिन म्हणते—

हा खेळ खेळतांना पायांचा व हातांचा आवाज होतां कामा नये.

## किक्कीचं पान बाई कीऽकीऽ

हा खेळ समोरासमोर दोघीजणी अगर अनेक जणी खेळूं शकतात. एक गुडघा जमिनीवर ठेवून त्या बाजूचा हात गुडघ्यावर ठेवावयाचा. त्याच वेळीं दुसऱ्या पायाचा गुडघा वर असेल व त्या बाजूचा हात कपाळावर आंगठा टेकून आडवा धरावयाचा. [ ऊन लागत असलं म्हणजे आपण जसा धरतों तसा]—मग खेळ लगेच सुरू होतो.चटकन् वेळीं टाळी वाजवावयाची व खालीं असलेला गुडघा वर करावयाचा व वरतीं असलेला खालीं टेंकवायचा अर्थात् हातहि यावेळीं बदलावयाचे. ही बैटक चटकन् बदलावी लागते व त्यावेळीं उडी मारावी लागते, त्यामुळें सर्व आंगाची हालचाल होते. अशा वेळीं तोंडानें म्हणावयाचें—

पहिली बाजू— किकीचं पान बाई की ऽ की—
दुसरी बाजू— सागर मासा सूं ऽ ऽ सूं ऽ
पहिली बाजू— आल्या ग बाई गुजरणी
दुसरी बाजू— कापूस घ्या हो पिंजरणी
पहिली बाजू— कापूस माझा सरकीचा
दुसरी बाजू— पाउस पडला मोत्याचा

टाळी वाजवून हें गाणें म्हणत असतां एक प्रकारचा सुंदर ताल निर्माण होतो—

## कोंबडा

एक, दोन वा अनेक व्यक्ति हा खेळ खेळूं शकतात. प्रथम एक गुडघा जमिनीवर टेकवून पाय मागें घ्यावयाचा, पण पाऊल सबंध न टेकवतां चवड्यावर टेकवावयाचे. दुसरा पाय पहिल्या गुडघ्याच्या पलीकडे ठेवावयाचा—गुडघ्यांवर दोन हात एकावर एक ठेवावयाचे आणि उड्या मारीत सगळीकडे पट्पट् फिरायचें. त्याच वेळीं तोंडानें म्हणावयाचें.

सईबाईचा कोंबडा । आला माझ्या दारीं ।
घालीन चारा । पाजीन पाणी ।

## गांठोडें

खालीं बसून पावलाला पाऊल जुळवावयाचें, आणि उजव्या हातानें उजव्या पायाचा आंगठा, व डाव्या हातानें डाव्या पायाचा अंगठा धरावयाचा. त्यानंतर पाठ त्याच स्थितींत जमिनीवर टेकवावयाची. मग कमरेचा मध्य धरून डोकें उचलून धरून सर्व शरीर गोलांत टेकवावयाचें व लगेच उचलावयाचें. याप्रमाणें स्वतःभोंवतीं फिरतां फिरतां पृथ्वीच्या गतीप्रमाणें मोठें गोल रिंगण फिरावयाचें. एकाच वेळीं अनेकजणी फिरूं लागल्या तर मोठी गंमत दिसते.

संग्राहिका-विद्या देसाई

# फेराचें गाणें

आज मथुरेचा बाजार
झाला उशीर ॥

गौळणीचं न्हाणं धुणं
उद्यां बाजाराला जाणं
अडविलं त्या गोविंदानं
सोडा हरि पदर ॥

कां रे धरलिस माझी वेणी
घरीं आहे घरचा धनी
करील माझी धूळदाणी
सोडा हरि पदर ॥

कां बा धरलिस माझी वेळ
घरीं आहे तान्हं बाळ
रडुन रडुन करील गोंधळ
सोडा हरि पदर ॥

कां बा धरलिस माझी वाट
घरीं आहे सासू खाष्ट
करील कामाचा बोभाट
सोडा हरि पदर ॥

• • •

# डोहाळे

लग्न झाल्यानंतर योग्य काळीं घरच्या सुनेला अगर लेकीला दिवस गेले म्हणजे मग तिचें कोडकौतुक पुरविलें जातें. इच्छाआकांक्षा मोठ्या आवडीनें पुरविल्या जातात. हौसमौज ऐपतीप्रमाणें केली जाते.

अशावेळीं नवीं हिरवीं वस्त्रें ह्या गर्भारशीला नेसवतात. तिच्या आवडीचें भोजन तयार करतात. घरच्या बायकांच्या, पै-पाहुण्यांच्या स्त्रियांच्या व गर्भारशीच्या मैत्रिणींच्या घोळक्यांत तिला बसवतात. तिची ओटी भरतात. ह्या ओटीसाठीं नारळ, केळीं, खण, पानाचा विडा, लेकुरवाळें हळकुंड, आख्खी सुपारी, गहूं किंवा तांदूळ हें सामान घेतात. शिवाय ज्याच्या त्याच्या ऐपतीप्रमाणें फळफळावळ किंवा अलंकारहि करतात. पांचीं पक्वान्नांचीं ताटें पुढें ठेवतात व नंतर सर्वांचें एकत्र भोजन होतें.

या सर्व विधीस डोहाळजेवण असें म्हणतात. कोण कोण गर्भारशीला नखशिखान्त फुलांच्या दागिन्यांनीं शृंगारतात व तिचा फोटोहि काढतात. या फोटोसाठीं तिची आवड जरूर लक्षांत घेतली जाते. यावेळीं घरचीं वडीलधारी मंडळी तिचें भरपूर कौतुक करतात. कारण त्या घरचा युवराज अगर युवराज्ञी नव्यानें येणार असते व म्हणून त्यासाठीं हा स्वागत-सोहळाहि केला जातो.

• • •

संग्राहिका-विमल तपस्वी

शुभ सुदिन उगवला तुला
ईश पावला सखे ईश पावला
प्रथम मासीं अरुची असे
द्वितीय मासीं मळमळ भासे
तृतीय मासीं म्हणती कसें
गर्भ राहिला तुला ॥ १ ॥

चोर चोळी चौथे मासीं
पांचवे मासीं उपवनासी
नेती तुला भोजनासी
कळवी हें तुला ॥ २ ॥

सहावे मासीं तेज वदनीं
सातव्या मासीं स्वजन मिळुनी
सोहळा बहूत करुनी
हेतु पुरवीला ॥ ३ ॥

क्षीण दिसे आठवे मासीं
सगुण पुत्र होवो तिजसी
कर जोडोनी प्रभुपाशीं
करितें विनंतीला ॥ ४ ॥

मास नऊ पूर्ण होती
पुत्ररत्न प्रसवली ती
दीर्घायु करील जगतीं
ईश त्याजला ॥ ५ ॥

[ २ ]

मंगलमय सुदिन हा
आर्जा सखे उदेला
भाग्य उदय झाला
म्हणूनी प्रथम स्मरुनी त्यासी

भावें नमुं या तयाला
मातृपदवी श्रेष्ठ जगतीं
सुजन सर्व वानीती तीं निकडी येई
सार्थ करुनी दावी कृतीनें तियेला ॥ १ ॥

हर्षमग्न होऊनियां
विसरूं नको कर्तव्या
श्रेष्ठ संस्कृतीस रुजवी
बालहृदयीं योग्य काला ॥ २ ॥

देवी सुभद्रे उदरीं
अभिमन्यू वास करी
चक्रव्यूह भेद ज्ञान प्राप्त होय
त्याच कालीं त्याला ॥ ३ ॥

म्हणूनी सतत चिंतन करी
आकांक्षा हृदयीं धरी
श्रीशिवाजी लोकमान्यासम
करीन माझ्या सुताला ॥ ४ ॥

जरी कन्या होईल तरी
लवही नच खेद करी
सुगृहिणी सुशील पत्नी
बनवी प्रेममूर्ती तीयेला ॥ ५ ॥

संपादिका–पार्वतीबाई गुंजाळ

[ ३ ]

बाई पहील्या माशीं उभी मी अंगणांत
मशीं पावला रघूनाथ
बाई दुसऱ्या माशीं उभी मी वृंदावनीं
डावा कुशीला चक्रपाणी
बाई तिसऱ्या माशीं मुखावर दिसती लाली

मैना कोणत्या महिन्यांत न्हाली
बाई चवथ्या माशीं वर्णाचा येतोया वास
माझ्या मैनेला गेले दिवस
बाई पांचव्या माशीं निरी बाई उंच दिसती
तिचा भ्रतार पुसे एकांतीं
बाई सहाव्या माशीं खाऊशीं वाटलें बहूं
चल अंजनी बागेंत जाऊं
बाई सातव्या माशीं इच्छा बाई डाळींबाची
मला चोळी शिवा रेशमाची
बाई आठव्या माशीं मुलीनें घेतला छंद
मायबापाशीं झाला आनंद
बाई नवव्या माशीं नऊ महिने झाले परीपूर्ण
पोटीं जन्मले श्री भगवान
बाई दहाव्या माशीं आणा दाईला बोलावून
साडी चोळी करा बोळवण

संग्राहिका–दुर्गा परांजपे

—४—

जान्हवी पुसती प्रेमें या ऋषी बाला
डोहाळे सांग सखये आणि या काला

या रम्य उपवनीं साऱ्या मिळूनी मोदें
भवदु:ख क्षणभरी विसरूं या आनंदें
या वृक्षावरती पहा लतांचा झोका
त्यावरी बसूनी जाऊं ऊंच नभीं का
हे वृक्ष कसे फळभारा वांकले
नाजूक लतांनीं ज्यांना वेढिलें

हा फुलुनी हिरवा चांफा परीमळें
हे हिरवे राघू बोलती मंजूळ बोला

डोहाळे सांग सखये आणि या काला
हीं हिरवीं वस्त्रें स्पर्शुनी तव कायेला
पावित्र पावलीं ये सौंदर्य तयाला
हीं हिरवीं हिरवीं करीं कंकणें खुललीं
तव करकमलांनीं हळूच ही भूषविलीं
कर्दळी पण ही येथें मांडली
अंजीर जांब हे ताजे आणले
घड द्राक्षांचे घड तुजसाठीं सोडले
या प्रेमें सर्वा वनींच्या आज आहारा
डोहाळे सांगे सखये आणि या काला

साक्षात लाभली आदीमाया ज्या माता
तो पिता ब्रह्म कीं त्रैलोकिचा त्राता
हा पुण्यवान हो कार्य काय तप केलें
कीं भाग्य तयाचें भाग्य फळाला आलें
तें उपवन होईल तेव्हां पावन
तो महाभाग जगीं जन्मा येवून
दिपवील प्रतापें सारें भूजन
बहु अधीर झालों पहावया तव बाळा
डोहाळे सांग सखये आणि या काला

• • •

# पाळणे

आपल्या घरांत मूल जन्माला आलें म्हणजे आपल्या घराचा कुलदीपच आपणाला सामोरा आला या भावनेनें सर्वांचीं मनें आनंदानें भरून जातात. घरचें सारें वातावरण सुखासमाधानांत नांदूं लागतें.

त्यामुळें नव्या बाळाच्या स्वागताची धमाल उडून जाते. दारीं सुवासिनींच्या हातून घागरी ओतल्या जातात. सनई चौघडा झडतो. हत्तीवरून किंवा ऐपतीप्रमाणें साखर वा पेढे वांटले जातात. आणि मुख्य म्हणजे जन्मल्यापासूनच्या बाराव्या किंवा तेराव्या दिवशीं त्या बाळाचें नांव ठेविलें जातें. बारशाचा सोहळा पार पाडला जातो.

अशा वेळीं घरच्या, नात्यांतल्या आणि ओळखीच्या आयाबाया गोळा होतात. मुलींबाळी जमतात. बाळाचे कान टोचले जातात. पाळणा शृंगारला जातो. नक्षत्रांचा खेळणा टांगला जातो. बाळंत-विडे येतात. आहेर येतात. अलंकार येतात. बाळाचा साजशृंगार होतो आणि गोड मुखानें त्याचें नांव ठेविलें जातें.बाळाच्या आईची ओटी भरली जाते.

त्या वेळीं बाळानें शहाणा व्हावें, सुसंस्कृत व्हावें म्हणून निरनिराळे पाळणे म्हटले जातात. मोठमोठ्यांचा आदर्श त्याच्या कानावर घातला जातो. देवादिकांच्या गोष्टी, राजेरजवाड्यांचे सोपस्कार त्याच्यापुढें गाइले जातात.

ह्या पाळण्यांची रचना मोठी सुंदर व रेखीव असते. तशीच त्यांची चालहि बहारदार असते.

संग्राहिका–सौ. सिंधू वारनूळकर

–१–

पहिल्या दिवशीं आनंद झाला । मोत्या पवळ्याचा धर्म वो केला ।
हत्तीवरी अंबारी घाला । जू बाळा जू जू रे जू ॥
दुसऱ्या दिवशीं सांदली न्हाणी । पाणी घालती बारा वो जणी ।
पुत्र वो राज्याला झाला या धनी ॥ जू बाळा जू जू रे जू ॥
तिसऱ्या दिवशीं तिसरडं करिती । हातीं सोन्याच्या आरती घेती ।
घडोघडीला शरण जाती । हरिनामाचें पूजन करिती ।
॥ जू बाळा जू जू रे जू ॥
चवथ्या दिवशीं घडविती डाग । डाग घडविती नाना यापरी ।
वाक्या बिंदल्या बाळाला सरी । बोलवा सोनार आपल्या घरीं ।
॥ जू बाळा जू जू रे ॥
पांचव्या दिवशीं वाजवी घंटा । बळीराम बसले चांदीच्या पाटा ।
झाला आनंद पंचांग वाचा । जू बाळा जू जू रे जू ॥
सहाव्या दिवशीं करीती सहावं । येण्याजाण्याला बहिणभाऊ ।
मायबापाचें राखावें नांव । याचं बाळाला लावावा जीव ।
॥ जू बाळा जू जू रे जू ॥
सातव्या दिवशीं सटवीचा फेरा । ओकी अक्षरें पडेना चुका ।
हांका मारिती तेतीस कोटा । मायाजंजाळ संसारा नका ।
॥ जू बाळा जू जू रे जू ॥
आठव्या दिवशीं आठवी चौकी । गोपा बाळा ती नऊ दिवसांत ऐकी ।
तान्ह्या बाळाची नवती खुलती । सख्या मिळूनी जागृत करिती ।
॥ जू बाळा जू जू रे जू ॥
नवव्या दिवशीं तुझं ग बाळ । बाळ वंशाला चांगलं यावं ।
मायबापाला पंढरी दावं ॥ जू बाळा जू जू रे जू ॥
अकाराव्या दिवशीं अकरावा थाट । उदबत्ती लाविल्या तीनशें साठ ।
शेंडा कुसमिरी केला व दाट । बाळ खेळतो आनंद वाटं ।
॥ जू बाळा जू जू रे जू ॥

बाराव्या दिवशीं बारसं करिती । गोरगरीबा आवातनं देती ।
मोठमोठी आहेर करिती । नांव हौसेनें श्रीकृष्ण ठेविती ।
॥ जू बाळा जू जू रे जू ॥
तेराव्या दिवशीं पाळणा बांधला । मोत्यापवळ्यांची झालरी त्याला ।
मायबापांनीं झोका व दिला । नऊ महिन्याचा शीण व गेला ।
॥ जू बाळा जू जू रे जू ॥

—२—

पहिल्या दिवशीं राजदरबारीं । आला जमूनी खेळ नाना यापरी ।
बाळ शिवाजी पहिल्या अवतारीं । जु जु बाळा जू ॥
दुसऱ्या दिवशीं जावूं राजमंदिरीं । केली आरास नाना यापरी ।
नांव घालसी दासी सुंदरी । ॥ जु जु बाळा जू ॥
तिसऱ्या दिवशीं वाजली घंटा । साऱ्या नगरीसी आनंद मोठा ।
खारीक खोबरं साखर वाटा । ॥ जु जु बाळा जू ॥
चवथ्या दिवशीं केला श्रृंगार । आले तानाजी मामा शेलार ।
असे शिवाजीला शोभे सरदार । ॥ जु जु बाळा जू ॥
पांचव्या दिवशीं पांचवी केली । धन्य शिवाबाई धावूनी आली ।
असे राजाला प्रसन्न झाली । ॥ जु जु बाळा जू ॥
सहाव्या दिवशीं लावून ळळा । कानीं कुंडल गळीं मोत्यांच्या माळा ।
गंध कस्तुरी कपाळीं टिळा । ॥ जु जु बाळा जू ॥
सातव्या दिवशीं सातवी करा । जिजाबाईच्या पोटीं जन्मला हिरा ।
त्याच्या टोपीला मोत्यांचा तुरा । ॥ जु जु बाळा जू ॥
आठव्या दिवशीं आनंद मोठा । आले सेनापती तानाजी ऊठा ।
हातीं तलवार फिरविती पट्टा । ॥ जु जु बाळा जू ॥
नवव्या दिवशीं नवरत्न हार । तशी मोत्यांनीं गुंफली तार ।
त्याचा स्वरूपाचा प्रकाश सारा । ॥ जु जु बाळा जू ॥
दहाव्या दिवशीं गेला या शीण । निळ्या घोड्याला रेशमी झीण ।
फोटो काढावा वर्ती बसून । ॥ जु जु बाळा जू ॥

अकराव्या दिवशीं अकरावा रंग । बाळाला पाहून झाली सेनाही दंग ।
पांच हत्यार राज्याच्या संग । । जु जु बाळा जू ॥

बाराव्या दिवशीं बोलवा माळी । केली आरास लावून केळी ।
नांव शिवाजी ऐका मंडळी । ॥ जु जु बाळा जू ॥

तेराव्या दिवशीं बांधुनी पाळण्याची दोरी । त्याला लावली रेशमाची दोरी ।
गाणें गावून हालवी सुंदरी । ॥ जु जु बाळा जू ॥

चौदाव्या दिवशीं लेवंघ वाजे । बाळ अंबारींत बसून साजे ।
संगें घेवून सेनापती लष्कर फौजे । ॥ जु जु बाळा जू ॥

पंधराव्या दिवशीं मारून धज्या । शाजी राजानं जमविल्या फौजा ।
बाळ शिवाजी दख्खनचा राजा ॥ जु जु बाळा जू ॥

सोळाव्या दिवशीं सोळावी करा । गुरु महाराजांची विद्या मनीं वो धरा ।
धन्य पाळणा गाईला बरा । ॥ जु जु बाळा जू ॥

—३—

सन आठराशें सत्याऐंशीं सालांत । आनंद झाला करविर शहरांत ।
पहिल्या शुक्रवारीं श्रावण महिन्यांत । पुत्र जाहला शाहु राज्याच्या विश्वांत ।
चंद्र उगवला लक्ष्मी महालांत । जो बाळा जो ॥ १ ॥

शाहुच्या गादीला चढले भुषानं । पुत्र पाहुनी झाला सन्मान ।
करणी सत्कार बाळावरून । वाटीती पेढे मानाप्रमाणं । जो बाळा जो॥२॥

शाहु राजांची पुण्याई थोर । गुढ्या उभारुनी तोफेचा मार ।
झाला आनंद होतो गजर । पानसुपारी वाटी साकार । जो बाळा जो ॥३॥

बिजलीबत्तीचा प्रकार भारी । लाह्या टाकील्या राजमंदिरीं ।
पाहून तृप्त झाल्या नगरीच्या नारी । आणून ओतीती पाण्याच्या घागरी ।
खणानारळांनीं ओट्या सावरी । जो बाळा जो ॥ ४ ॥

दोन्ही हिरकण्यावरती जन्मला हिरा । मोठे मोठे शहरीं पाठविल्या तारा । बंदी कैद्यामध्यें फोडल्या मोहरा । जागोजागीं निशाण तोफे फरारा ।
पहिल्या दिवसाचा मजकूर सारा । जो बाळा जो ॥ ५ ॥

दुसऱ्या दिवशीं दुसरा प्रकार । हत्तीवरोनी वाटी साखर । घोडे कोतवाल जिलबेची पूड । घन घन वाज्या वाजे सुंदर ।
जो बाळा जो ॥ ६ ॥

तिसऱ्या दिवशीं त्रिभुवनीं स्मृती । दत्ताची छाया बालकावरती । आपल्या नांवाची गर्जना करती । करुनी शिणगार ओवाळती आरती ।
जो बाळा जो ॥ ७ ॥

चवथ्या दिवशीं चंद्र पूजेचा । गजानन महाराज साहक बाळाचा । खेळ खेळत होता कृष्णा गोकुळचा । प्रकाश पडला महालीं सूर्याचा ।
जो बाळा जो ॥ ८ ॥

पांचव्या दिवशीं सटवीची मान । तीला आज्ञा दिली परमेश्वरानं । लिहीती आक्षरं आपल्या हातानं । सुवर्णीं पूजा आली सन्मानं । हळदीकुंकू घेऊन नगरांत जाणं । जो बाळा जो ॥ ९ ॥

सहाव्या दिवशीं सहावा उल्हास । सडे सारवणं केलं वाडयास । तेल सुवासिक लावी आंगास । पाणी घालीती तान्ह्या बाळास ।
जो बाळा जो ॥ १० ॥

सातव्या दिवशीं साती आसरा । गुप्तरीतींच्या घालीती फेरा । लिंबू नारळ टाका उतारा । पाणी घालीती सखया सुंदरा । द्रिष्ट काढोनी लावा आंगारा । जो बाळा जो ॥ ११ ॥

आठव्या दिवशीं आठवा आनंद । पोटीं जन्मला कृष्ण गोविंद । हार पुष्पांचा सुटला सुगंध । तेलाचा वास करी नगरीला दंग ।
जो बाळा जो ॥ १२ ॥

नवव्या दिवशीं नवस केला । खेळणा पाळणा वाहीन तुला । कृष्ण बालक लाभुंदे मला । कृष्ण कृष्ण म्हणून वाजवी ताला ।
जो बाळा जो ॥ १३ ॥

दहाव्या दिवशीं दहावा उल्हास । सडे सारवण केलें वाडयास । अकरावे दिवशीं आकरावा लिंग । दास रामाचा उभा पांचरंग । पाचीं हत्यारं प्रभूच्या संगं । म्हणुनी चाले सर्वांच्या संगं । जो बाळा जो ॥ १४ ॥

बारावे दिवशीं केलें बारशाला । सोन्याचा पाळणा मोत्यानं गुंफीला । आंगडें टोपडें कीनखापी त्येला । हीरे जोडीती केवळ पिंपळ पानाला । शाहूच्या गादीला प्रभु निजला । राजाराम नांव जाहीर सर्वांला ।



जो बाळा जो जो ॥ १५ ॥

# नागपंचमी

नागपंचमी म्हणजे श्रावणमासांतील एक महत्त्वाचा सण. स्त्री-पुरुषांच्या आनंदाचा क्षण. गोडधड घरांत शिजवायचा दिवस. मुलांबाळांच्या खेळांचा दिवस. वाडवडिलांच्या पूजेचा दिवस.

नागपंचमीला नागाच्या रूपानें वाडवडील घरांत येतात व घराचें रक्षण करतात अशी जुनी आख्यायिका आहे. त्यामुळें ह्या दिवशीं कांहीं कुटायचें नाहीं, कांहीं लाटायचें नाहीं किंवा तळावयाचेंहि नाहीं. चुलीवर तवाच मुळीं ठेवायचा नाहीं अशी चाल आहे. तसा करण्यानें नागाचा फणा दुखावला जाईल ही भीति मानली जाते.

खेडेगांवांतून घरांतील भिंतीवर हळदीनें नाग काढून त्यास चुन्याच्या व काजळाच्या टिकल्यांनीं सजविण्याची पद्धति आहे. शहरांत हा प्रकार फारसा आढळत नाहीं. मात्र चिखलाचा नागोबा शहरांत सर्वत्र आढळून येतो.

दारीं पुंगी वाजवीत एखादा वैदू नागोबा घेऊन आला म्हणजे सुवासिनी स्त्रिया हळदकुंकवानें त्या नागाची पूजा करतात. त्यास दूध व लाह्या देतात. ऐपतीप्रमाणें दक्षिणा देखील देतात.

ह्या नागपंचमीच्या सणाला खेडोंपाडीं **नागारपंचीम** असेंहि म्हटलें जातें. नागारपंचमीसाठीं सासरीं गेलेल्या मुलीबाळींना आवर्जून माहेरीं आणलें जातें. त्यांना चोळीलुगड्याचें माहेर होतें.

या सणाच्या वेळीं मुलीबाळी व मोठ्या बायका भरपूर खेळ खेळतात. तिन्हीसांजेला अगर तिसऱ्या प्रहरीं दारींच्या अंगणांत सुरू होणारा त्यांचा खेळ रात्रभर देखील कुठें कुठें चालू राहतो.

फुगडी, झिम्मा, कोंबडा, फेर वगैरे अनेक खेळ स्त्रिया यावेळीं खेळतात. त्याचप्रमाणें या खेळांच्या निमित्तानें वेगवेगळीं मोठीं सुरेल अशीं गाणींहि म्हणतात. त्यामुळें ही नागपंचमी चांगलीच गाजते. ह्या गीतांतून प्रकट होणाऱ्या देवादिकांच्या अद्भुतरम्य कथांनीं तिला मोठा उठाव येतो. आणि सारें गांव कसें या गीत-नृत्यांनीं रात्रभर घुमूं लागतें.

# नागपंचमी



भुरूला-पिंगा



चौघींची फुगडी



झिम्मा

या सणाचे वेळीं पुरुषमंडळी मनमुराद झोके घेतात. हे झोके उंच झाडांना टांगलेले असतात. त्यामुळें हा झोक्याचा खेळहि चांगलाच गाजतो.

फुगडी व फुगड्यांचे इतर प्रकार खेळतांना यावेळीं घातले जाणारे उखाणेहि या गाण्यांच्या प्रमाणेंच मोठे चटकदार असतात. पोरीबाळींना व मोठ्या बायकांनाहि त्यामुळें मोठा हुरूप येतो.

संप्राहिका—विद्या देसाई

## पंचमीचें गाणें

श्रावण हंकारी हंकारी
कांडून कुटून करा पंचमी
गणपतीची सोंड वाकडी
अग या गणपतीचे लाडू
या बाई लक्ष्मीपुढें वाढू
अग या लक्ष्मीच्या गाऱ्या
अग पित्रांनीं केल्या दाट्या
अग या पित्राचें ग ताट
दसरा आला गजथाट
अग या दसऱ्याच्या माळा
दिवाळी आली काळूकाळा
अग या दिवाळीचा दिवा
सटीनें घेतला बाई धावा
अग या सटीचा रोडगा
संक्रातीनं घातला फुगा
अग या संक्रातीचं सुगडं
शिमग्याला बाई ब्रिगी धाड
शिमग्याचा तो गुलाल ग
पाडवा आला दलाल ग
अग या पाडव्याची गुढी
अखीतीनें मारली उडी

अखीतीचा आंबरस
सर्व सणा निंचिंत बस

## नागोबा

आरड करड
बैल भरड
झेंडू माळया
म्हशी काळया
गाय गौळया
गाईच्या पोटीं
उपाजला पाडा
तोच पाडा
कुंदा काडा
कुंदा न्हवं हराळी
वन वन पाडा
माशी झळाकली
आमच्या नागोबाला
सोन्यारूप्यानं ववाळी

— १ —

## झिम्म्याचीं गाणीं

साखळ्या ठेवल्या तबकांत
राधा रुसली सुंदरी
कृष्णात लावी हात
राधे घाल ग पायांत
पुतळ्या ठेवल्या तबकांत
राधा रुसली सुंदरी
कृष्णात लावी हात
राधे घाल ग गळ्यांत

टिक्का ठेवील्या तबकांत
राधा रुसली सुंदरी
कृष्णास लावी हात
राधे घाल ग गळ्यांत
अग तूं फुलारी माळणी
राजा बोलावी साजणी
बांगडया नव्यानं घडवीतो
दागिन्याचं तबक आतां
राधे घे ग तूं हातांत

— २ —

कारल्याचं आळं लाव ग जू
मंग जा तूं तुपल्या माहेरा

कारल्याचं आळं लावलं वो फुईजी
बंधु आले न्यायजी
मी जातें मपल्या माहेरा

कारल्याला पानं येऊं दे ग जू
मंग जा तूं तुपल्या माहेरा

कारल्याला पानं आलीं वो फुईजी
बंधु आले न्यायजी
मी जातें मपल्या माहेरा

कारल्याला कारलीं येऊं दे ग जू
मंग जा तूं तुपल्या माहेरा

कारल्याला कारलीं आलीं वो फुईजी
बंधु आले न्यायजी
मी जातें मपल्या माहेरा

कारल्याची भाजी कर ग जू
मंग जा तूं तुपल्या माहेरा

कारल्याचीं कारलीं काढली वो फुईजी
बंधु आले न्यायजी
मी जातें मपल्या माहेरा

कारल्याची भाजी कर ग जू
मंग जा तूं तुपल्या माहेरा

कारल्याची भाजी केली वो फुईजी
बंधु आले न्यायजी
मी जातें मपल्या माहेरा

कारल्याची भाजी खा ग जू
मंग जा तूं तुपल्या माहेरा

कारल्याची भाजी खाल्ली वो फुईजी
बंधु आले न्यायजी
मीं जातें मपल्या माहेरा

संग्राहिका—जानकीबाई पाटील

## फेराचीं गाणीं

– १ –

तळ्यायाच्या कांठीं मोर पाणी पितो
पिऊनी पिऊनी रानोमाळ जातो
पंचमीच्या दिशीं वारुळाला जातो
वारुळाचा नाग धरी माझा पदर
सोड सोड नागा तूं माझा पदर
सांग सांग तुझ्या जोडव्याचं मोल
काय सांगूं दादा चुटक्याचं लेनं
त्याचं मोल केलं देवा विठ्ठलानं
तळ्यायाच्या कांठीं मोर पाणी पितो

पिऊनी पिऊनी रानोमाळ जातो
पंचमीच्या दिवशीं वारुळाला जातो
वारुळाचा नाग धरी माझा पदर
सोड सोड नागा तूं माझा पदर
सांग सांग तुझ्या मासूळ्याचं मोल
काय सांगू दादा चुटक्याचं लेनं
त्याचं मोल केलं देवा विठ्ठलानं
तळीयाच्या कांठीं मोर पाणी पितो
पिऊनी पिऊनी रानोमाळ जातो
पंचमीच्या दिवशीं वारुळाला जातो
वारुळाचा नाग धरी माझा पदर
सोड सोड नागा तूं माझा पदर
सांग सांग तुझ्या करंगळ्याचं मोलं
काय सांगू दादा चुटक्याचं लेनं
त्याचं मोल केलं देवा विठ्ठलानं

( या प्रकारें सर्व दागिने सांगून होईपर्यंत हें गाणें चालतें ).

—२—

वनाच्या वाऱ्याला गाईचं खिलारूं
गाई राख्या दादा खिलारूं कोणाचं
चांगुणा बाईचं शिराळ राजाचं
चांगुणाच्या घरीं दान कोण करी
निळ्या घोडयावरी धाव झाले स्वारी
राजा तळं जी खांदितू
बारान् बारा वर्षं झालीं
पाणी लागेना तळयाला
देवा तुझा थोरला लेकू
घरचा कारभार करील कोणू
देवा तुझा मधला लेकू
शेताचा कारभार करील कोणू

देवा माजी रंभा तानी
दिली माझी रंभा तानी
तिथनं रंभा झटकली
गेली शिंप्याच्या आळी
अर तूं शिंपी दादा
माझा मैतर होशील का ?
मला लुगडं देशील का ?
मला चोळीबी देशील का ?
अर तूं कासारदादा
माझा मैतर होशील का ?
मला कांकणं देशील का ?
अर तूं अत्तारदादा
माझा मैतर होशील का ?
मला कुंकूंबी देशिल का ?
अर तूं सोनारदादा
माझा मैतर होशील का ?
मला नथबी देशील का ?
तिथनं रंभा झटकली
गेली सुताराच्या घरीं
आर तूं सुतारदादा
माझा मैतर होशील का ?
मला रथबी देशील का ?
तिथनं रंभा झटकली
गेली आपल्या घराला
सगळा शिनगार केला
रंभाची ओटी भरली
रंभा रथांत बसली
रथ चाले घडाघडा

माता रडे धडाधडा
एक वन वोलांडिलं
दोन वनं वोलांडिलं
चौथ्या पांचव्या वनाला
गेल्या आपल्या बागेला
तिथबी सगळा शिनगार केला
घोट्याला लागलं पाणी
तळ्यांत भरलं पाणी
दंड सोड वैऱ्या
रंभा माझी तानी
बागत बसली राणी

— ३ —

तळून मळून केला पोळा, तळून मळून केला पोळा
पंचमीनं उघडला डोळा, साजनीबाई
पंचमीचं काढतें चित्र, पंचमीचं काढतें चित्र
आलीं वडलांचीं पित्रं, साजनीबाई
पितराची निसतें डाळ, पितराची निसतें डाळ
आली घटाची माळ, साजनीबाई
घटाच्या माळीला बांधतें गाठी, घटाच्या माळीला बांधतें गाठी
सिलंगनानं केली दाटी, साजनीबाई
सिलंगनाचं घेतें सोनं, सिलंगनाचं घेतें सोनं
दिवाळीनं केलं येनं, साजनीबाई
दिवाळीची पाजळतें पंती, दिवाळीची पाजळतें पंती
संक्रांत आली नेनंती, साजनीबाई
संक्रातीचं पुजतें सुगडं, संक्रातीचं पुजतें सुगडं
माही पुनव आली दुगड, साजनीबाई
माही पुनवेची तिंबतें कनीक, माही पुनवेची तिंबतें कनीक
शिवरात्र आली आणिक, साजनीबाई
शिवरात्रीचं सोडतें पारणं, शिवरात्रीचं सोडतें पारणं
शिमग्यानं घेतलं धरणं, साजनीबाई

शिमग्याची करतें खीर, शिमग्याची करतें खीर
पंचमीनं टाकला धीर, साजनीबाई
पंचमीचा शिंपतें रंग, पंचमीचा शिंपतें रंग
पाडवा आला जबर दंग, साजनीबाई
पाडव्याची उभारतें गुढी, पाडव्याची उभारतें गुढी
आखिती आली लाडी, साजनीबाई
आखितीचा पूजतें कऱ्हा, आखितीचा पूजतें कऱ्हा
आशाडीपातूर दम धरा, साजनीबाई

— ४ —

कनकन कनानीलं
वारुळ दनानीलं
चांगुनेच्या घरीं
ऋषी देव आलं
आलं तर येऊं द्या
परसदारानं येऊं द्या
आलं परसदारानं
पाट बसाया टाकीला
झारी भरून पाणी दिलं
घेतलं चौरंगी सूप
गेली पांची उतरंडा
काढली साळी नि बा डाळी
पेटविल्या कातीव उभ्या चुली
लावल्या चंदनाच्या फाळी
पाणी घंगाळ सारीलं
ऊठा बाबाजी भोजना
आमा भोजन काय बा केलं
येळल्या साळी नि बा डाळी
साळी डाळीयांचं काई
आमाला नाहीं चालईत

स्थळप्रत.
अनु. ३६३८ ... दि: ...
क्रमांक ... लो: दि: ...



सत्त्वाची चांगुणा ग
गेली देवायाच्या खोली
घेतला बंदानी रुपाई
सत्त्वाची चांगुना निघाली
वर उडयींतं मोत्याचं इंजानं
गेली खाटक्याच्या आळीं
खाटकी मैतर होशील.
मगरमासा तूं देशील
होय म्हणोनी बोलीला
घेतला मगरमासा
आली वाडयाला निघून
गेली देवायाच्या खोली
सोन्याच्या सुरीनं शीरकमळ उतरलं
कांडूनी कुटूनी भरीलं
कांदा कोतंबीर हिंगाची फोडणी
आदी कड आला रगात पाण्याला
मग कड आला मगरमाशाला
पाणी घंगाळ सारीलं
उठा बाबाजी भोजना
भोजन काय बा केलं
केला मगर बा मासा
मगरमाशायाची आमाला नाहीं चाड
गेली देवायाच्या खोली
घेतले पांचनी रुपये
सत्त्वाची चांगुणा निघाली अंगणा
वर उडयींतं मोत्याचं इंजान
गेली खाटक्याच्या आळीं
खाटकी मैंतर तूं होशील
शिंगरं बकरं तूं देशील

होय म्हणोनी बोलीला
आली वाडयाला निघोनी
गेली देवायाच्या खोली
सोन्याच्या सुरीनं शिरकमळ उतरीलं
कांडूनी कांडूनी भरीलं
कांदा कोतंबीर हिंगाची फोंडणी
कड आला रगात पाण्याला
कड आला शिंगारं बकऱ्याला
पाणी घंगाळ सारीलं
उठा बावाजी भोजनाला
आमा भोजन काय बा केलं
केलं शिंगारं बकरं
शिंगार बकऱ्याची आमाला नाहीं चाड
तुमा भोजना काय बा करूं
मारा पोटीयाचं बाळ
गेली देवायाच्या खोली
घेतली गुळायाची वाटी
गेली बाळाच्या चौकशीला
कडी तोडीयाच्या येरे माझ्या बाळा
कंबरी करदोडयाच्या येरे माझ्या बाळा
पेटी डुलायाच्या येरे माझ्या बाळा
दंडीं वाक्यायाच्या येरे माझ्या बाळा
कळी फुलायाच्या येरे माझ्या बाळा
आंगरी पोचायाच्या येरे माझ्या बाळा
गळा बदामाच्या येरे माझ्या बाळा
सदरा टोपीयाच्या येरे माझ्या बाळा
चप्पल बुटायाच्या येरे माझ्या बाळा
हातीं छतरीच्या येरे माझ्या बाळा
बाळ घुम घुम पळीलं

हातीं दिली गुळाईची वाटी
घेतलं उचलून कडेवरी
आली वाड्याला निघोनी
गेली देवायाच्या खोली
सोन्याच्या त्या सुरीनं
शिर बाळाचं उतरीलं
शिर ठेविलं शिंक्यावरी
धड कांडुनी भरीलं
कांदा कोतंबीर हिंगाची फोडणी
आदी कड आला रगताला
मग कड आला चिलया बाळाला
पाणी घंगाळ सारीलं
ऊठा बाबाजी भोजना
आमा भोजन कायबा केलं
मारीला पोटीचा तो बाळ
शिराचं केलं का धडाचं
केलं धडायाचं शिर ठेवीलं कमान्याला
नको आमाला नर कुंडाचं
करा शिराचं शिर खुर्माचं
केलं शिराचं शिर खुर्माचं
दोन पाट टाकिलं बसाया
दोन ताटं करीयलीं
दोन तांब्या भरीयले
आग तूं सत्त्वाची चांगुणा
दोन पाट या कुणाला
दोन ताटं या कुणाला
दोन तांब्या या कुणाला
एक पाट बाबाला
एक तांब्या बाबाला

एक शिराळ राजाला
आग तूं सत्त्वाची चांगुणा
पाट आणि एक टाकावा
ताट आणि एक करावं
तांब्या आणि एक भरावा
पाट आणि एक कुणाला
ताट आणि एक कुणाला
तांब्या आणि एक कुणाला
एक चिलाल बाळाला
बाळ आतांजी कुठलं
आग तूं सत्त्वाची चांगुणा
जा ग देवायाच्या खोली
घे जा गुळायाची वाटी
हांक बाळाला देवावी
बाबानं डावी करंगुळी कापीली
बाळ साजीवंत केलं
बाळाला हांक या देतीया
कडीं तोडीयाच्या येरे माझ्या बाळा
कंबरीकरदोड्याच्या येरे माझ्या बाळा
सरींबिंदल्याच्या येरे माझ्या बाळा
डूलपेटीयाच्या येरे माझ्या बाळा
दंडीं वाक्यायाच्या येरे माझ्या बाळा
गळी बदामाच्या येरे माझ्या बाळा
आंगटीपांचायाच्या येरे माझ्या बाळा
हातीं छतरीच्या येरे माझ्या बाळा
बाळ धुम धुम आलं
दिली गुळायाची वाटी
घेतला कडेवर उचलुनी
आली वाड्याला निघोनी

बाळ भोजना बसवीलं
बाबानं भोजन बा केलं
राजानं भोजन बा केलं
बाळानं भोजन बा केलं
सत्त्वाची चांगुणा ग बाई
नाहीं हरली सत्त्वाला

संग्राहक—आचार्य **प्र. के. अत्रे**

(मी आठ दहा वर्षांचा असतांना आमच्या खेडेगांवांत दुपारच्या वेळीं एक भिकारी आमच्या घरासमोर येऊन गाईवरचें एक गोड गाणें म्हणत असे. मी आणि माझी आई तें गाणें पुन्हां पुन्हां त्याच्याकडून म्हणवून तन्मयतेनें ऐकत असूं. इतकीं वर्षें झालीं त्या गोष्टीला पण अजूनहि तें गाणें माझ्या अंतर्मनामध्यें घुमत आहे. )

गाई भरून गाईचीं शिंगें ।
जशी महादेवाचीं लिंगें ॥ १ ॥
गाई भरून गाईचे कान ।
जसें नागवेलीचें पान ॥ २ ॥
गाई भरून गाईचे डोळे ।
चकचकीत हिऱ्याचे गोळे ॥ ३ ॥
गाई भरून गाईचे दांत ।
जसा आंबेमोहराचा भात ॥ ४ ॥
गाई भरून गाईची पाठ ।
जशी पंढरपूरची वाट ॥ ५ ॥
गाई भरून गाईचें पोट ।
जशी कापसाची मोट ॥ ६ ॥
गाई भरून गाईची पोळी ।
जशी रेशमाची मोळी ॥ ७ ॥
गाई भरून गाईचे पाय ।
जशी दुधावरची साय ॥ ८ ॥

गाई भरून गाईचा सडा ।
जसा अमरुताचा वडा ॥ ९ ॥
गाई भरून गाईचें नांव ।
भवसमिंदराची नाव ॥ १० ॥

## दंडफुगडी

संग्राहिका—शरदिनी बाबर

काय बाई पुण्याची तारीफ
लवंगा निघाल्या बारीक
लवंगा मेल्याला कुठं कोंडूं ग
आगीनगाडी आरशाची
मुंबई निघाली वर्णाची
राजाराणी दारांत
कुंकूं लावा बारीक

## फुगडीचे उखाणे

कोथंबिरीची काडी लवती कशी
दादाला वायको शोभती कशी
ताई वयनी मला लाजती कशी

आरंड्यावर करंडा करंड्यावर मोर
माझ्यासंगं फुगडी खेळती चंद्राची कोर

आपण दोघी मैत्रिणी खोक्यांत ग खोक्यांत ग
गुलाबाचें फुल माझ्या डोक्यांत ग डोक्यांत ग

आपण दोघी मैत्रिणी आदराव ग आदराव ग
चित्र काढूं पदराव ग पदराव ग

आपण दोघी मैत्रिणी आठीच्या आठीच्या
साडया नेसूं पट्टीच्या पट्टीच्या

आपण दोघी मैत्रिणी एकपान खाऊं एकपान खाऊं
सकाळ उठूनी देवाला जाऊं

कांचेची बशी शिऊं नको पोरी
आज मला एकादशी आहे खरी

अग सखु ले ग कुंकूं कां ग लाजतेस
डबल खुडची चहा न् बिसकिट मागतेस

बामणाचे मुली इथं कांग उभी, पदर कांग ओला,
भरली होती नदी, शिरली होती मदी,
सारंग सुईच्या बागेमधीं

वागज गांव नगरी भोवतनं उगरी
काटयाचंच कुलूप मोत्याचं झुलूप
आपण लेकी थोरांच्या कान्या बुगडी मोराच्या

आकण माती चिकण माती सलाम ग
बामणाच्या मुली गुलाम[1] ग

ये ग सखू ले ग कुंकूं कांग लाजते
मारुतीच्या देवळामध्यें घंटी वाजते

फुगडी फुल्लदार माझा भाऊ शिलेदार
आकाशाची घार माझी सासू दगडेदार
लिंबाला आला भार माझा सासरा हावलदार

माळाच्या मळयांत जाईचं झाड
तोडिती नार गुंफिती हार
अशी सुरत अनिवार मारिती ल्हार

रंभा पातर, झाली रात्तर
श्रीकृष्णाच्या डोलाखालीं पोहत्यातीं पांखरं

आपुटपु आले पाटांतुनी गेले
कांचेचे बेल माझे फुटूनी गेले

---

१ हुशार.

खुर्ची बाई खुर्ची, वेताची खुर्ची,
माझ्याशीं फुगडी खेळते लवंगी मिरची

केळं वाई केळं, राजेरी केळं
एवढी मोठी झालीस तरी लग्न नाहीं केलं

कोरा कागद काळी शाई,
माझ्या लग्नाची तुला ग काय घाई ?

समुद्राची वाळू चाळणीनं चाळूं
आपण दोघी मैत्रीणी गंजीफा खेळूं

बटाटयाची भाजी आंबली कशी ?
माझी मैत्रीण दमली कशी ?

बटाटयाची भाजी आंबली का ?
खेळून खेळून तूं दमलीस का ?

आंबाडयाच्या भाजीला पळी पळी तेल
पहा पहा सासूबाई सुनेचा खेळ

काळा कासोटा भुई लोळतो,
जेजूरीचा खंडोबा फुगडी खेळतो

लाही बाई लाही मक्याची लाही,
मुक्यानं फुगडी शोभत नाहीं

फुगडी खेळतां खेळतां जमीन झाली काळी,
हत्तीच्या सोंडेवर मोत्यांची जाळी.

आपण दोघी मैत्रीणी जोडीच्या जोडीच्या
हातांत पाटल्या तोडीच्या

आपण दोघी मैत्रीणी एकमत करूं,
स्वदेशी कपडे नेहमींच धारूं

• • •

## वीस बाई वीस ।

धडावर काय ? डोकें. डोक्यावर काय ? केस.
केसावर काय ? पदर. पदरावर काय ? चुंबळ.
चुंबळीवर काय ? पाटी. पाटींत काय ? बाळ.
बाळाचें हातीं काय ? डबी. डबींत काय ? पैसा.
पैशाच्या लवंगा किती ? वीस.

वीस बाई वीस । दोडका कीस ।
दोडक्याचें पाणी । घाल माझी वेणी ।
वेणीला गोंडा । सईचा झेंडा ।
सईची सरी । हरवली घरीं ।
मामा मामा जेजूरी करी । फू फू फू

## महालक्ष्मी—गौरी

भादवा निघाला म्हणजे गौरी गणपति घरीं येतात. त्यावेळीं घरांतील कोनाड्याला मखर बांधून गणपतीची स्थापना होते. आणखी गणपतीच्या तिसऱ्या चौथ्या दिवशीं गौरी आल्यानंतर तिला चांगल्या आसनावर बसवितात.

ही गौरी म्हणजे गणपतीची आई—महालक्ष्मी. घरच्या लेकीच्या रूपानें ती घरीं—माहेरीं येते.

नदीवर जाऊन पांच खडे आणून कोणी कोणी ही गौरी बसवितात, तर कोणी वाटीवर काजळी आणून किंवा मातीच्या वाडग्यावर हळदीकुंकवानें नाक डोळे काढून ही गौरी बसवतात. तिला लुगडं चोळी नेसवतात. सर्व अलंकार घालतात. तिच्यापुढें आरास करतात. पांच पक्वानांचीं ताटें भरून ठेवतात. तीन दिवस ही माहेरीं रहाते.

देशावर न्हवणें भरून, फुलांपानांनीं सजविलेला तांब्या घेऊन, व लाह्यांचे भरलेले झोळणे घेऊन मुलीबाळी नदीवरून किंवा विहिरीवरून गौरीला आणतात. घरीं त्यांना ओवाळण्यांत येतें. त्यांच्या पायांवर गरम पाणी ओतून त्यांना हळदकुंकूं लावलें जातें. दारापासून गौरींच्या आसनापर्यंत हळदकुंकवाचीं पावलें काढतात.

कोकणांत गौरीला मोतीं ( नथ ) लागतोच लागतो. घाटल्याचें जेवणहि लागतें व तिसऱ्या दिवशीं थाटामाटांत तिला निरोपहि दिला जातो.

देशावर पुरणपोळीचें जेवण महालक्ष्मीला करतात व हळदकुंकूंहि थाटानें होतें.

रात्रींच्या वेळीं ही गौरी जागविण्याची देशावर खेडोंपाडीं चाल आहे. त्यासाठीं नागपंचमीप्रमाणें आळींतील मुलीबाळी व बायका एकत्र येऊन खूप खेळ खेळतात व गाणींहि म्हणतात. हीं सर्व गाणीं अर्थातच गौरीचीं असतात.

घरांतील परात किंवा काथवट घेऊन ती पालथी घालावयाची व नंतर त्यावर बळगाळ राख पसरून हातीं लाटणें व रवी घ्यावयाची. नंतर हीं दोन्ही धारण केलेले हात आगें मागें असे त्यावरून ओढावयाचे. म्हणजे फारच सुंदर पार्श्वसंगीत तयार होतें. त्या नादावर व सुरावटीवर रात्रभर ही गौर जागते व पहाटेस—

‘ हम रस्ता, पाय पुस्ता
देवाला निघालें पांच वाजतां ’

या बोलण्यानें आपले खेळ बायका संपवितात. हे खेळ खेळतांना कोणाला वयाचें भान राहात नाहीं व काळाचेंहि बंधन उरत नाहीं. म्हणून खेड्यांपड्यांतून हा सण व ही पूजा फार मोलाची व मानाची मानली जाते.

• • •

संग्राहिका–विद्या देसाई

# गौरीपूजा

– १ –

अंगणीं तापतं दूध
दूधा पिवळी शाई
ये ग गवरी बाई
एवढं जिवूनी जाई

आतां काय करूं बाई मातां ग
दारीं शंकर उभा ग
शंकर साळा
राजा भोळा
नगरीं मोडुन जाय ग

नगराला लागलं निशाण ग
कापूराची वात ग
दिवा जळी दिवटीं
कापूर जळी आरतीं
गौरायसारखी पावणी
खेळूं साऱ्या रातीं

– २ –

गवरी ग बाई जागरान तुजं
जागतां जागतां पडल्या झापाडी
एवढ्या निजची पिरत केवढी
सोन्याच्या चौकटी गवरी बाळातनी
नारळीच्या गोण्या झोकील्या अंगनीं
सुपारीच्या गोण्या झोकील्या अंगनीं
तांदळाच्या गोण्या झोकील्या अंगनीं
सोन्याच्या चौकटी गौरी बाळातनी

ग्रं. ३७३६४ वि

हळदीच्या गोण्या झोकील्या अंगनीं
खारकीच्या गोण्या झोकील्या अंगनीं
सोन्याच्या चौकटी गौरी बाळातनी

— ३ —

भाद्रपद सुद्देवो चातुरतीला
गण आनीला गो पुंजनाला
गनोबा आले गो आनंदले
भाद्रपद सद्देवो चातुरतीला

— ४ —

आठशें खिडक्या नऊशें दार
कोण्या दरिवाजानं गेली गो नार
मंगळसुत घालुन झाली तयार गो
कोण्या दरिवाजानं गेली गो नार
येला घालुन झाली तयार गो
कोण्या दारिवाजानं गेली गो नार

( सर्व दागिने या परीनें गोवून होईपर्यंत हें गाणें चालतें. )

— ५ —

ताड गौरी ताडाला लागली
शंकूरबाची वाट गिरजा पाहूं बा लागली
सोड सोड शंकर आमुचा पालव
आमाला जाऊं द्या माहेरीं
गौरी जाऊं द्या माहेरीं
जातील तशा बा जाऊं द्या
काय काय लेनं लेवूनी येतील्या
येतील तशा बा येऊं द्या
आणीन साखळ्याचं जोड
माझं माहेर दुबळं
आणीन पुतळ्याची माळ
माझं माहेर दुबळं

— ६ —

ये ग गवरी बाई, ये ग गवरीबाई
आली आली गवराय येतच होती
आंब्याच्या वनीं गुंतली होती
आंब्याच्या वनीं वरुटा पाटा
आली बाई गवराय हदळकुंकूं वाटा

—७—

वेळु बाई वेळु पन्हाळी वेळु
पन्हाळी वेळूच्या टिपऱ्या किती खेळूं
पन्हाळी वेळु नव्हें काचे पान
काचे पान बरवें रान
बरवें रान कशाचें
बरवें रान तुळशीचें
तुळस गुंफा जाळी लंका
आला आला रावण जाळी लंका
जाळी जळो काजळ पडो
तें बाई काजळ आम्ही दोघी लावूं
गौराईच्या माहेरीं तांब्याच्या चुली
मंडप घातला इस्लामपुरीं
भोजन केलं सोलापुरीं
उष्टया पत्रावळी चिंचेखालीं
पानसुपारी उद्यां दुपारीं

— ८ —

एक लिंबू झेलूं बाई दोन लिंबू झेलूं
तीन लिंबू झेलूं बाई चार लिंबूं झेलूं
चार लिंबू झेलूं बाई पांच लिंबूं झेलूं
पांचा लिंबाचा पानोळा
माळ घाली हनुमंता

हनुमंताची निळी घोडी
येतां जातां कमळं तोडी
कमळाच्या पाठीमागं लपली राणी
अग अग राणी इथं कुठं पाणी
पाणी नव्हे यमुना जमुना
यमुनाजमुनाची बारीक वाळू
तिथं खेळे चिलार बाळू
चिलार बाळाला भूक लागली
सोन्याच्या शिंपीनं दूध पाजलं
पाटावरच्या घडीवर निजवलं
नीजरे नीजरे चिलार बाळा
मी तर जातें सोनारवाड्या
सोनारदादा सोनारदादा
गौरीचे मोतीं झाले कां नाहीं
गौरीच्या घरीं तांब्याच्या चुली
भोजन झालं आवळीखालीं
उष्टया पत्रावळी चिंचेखालीं
शेणगोळा आंब्याखालीं
पानसुपारी उद्यां दुपारीं

या गाण्याचा उत्तरार्ध याशिवाय कुणीकुणी असाहि म्हणतात:—

गौराईच्या माहेरीं तांब्याच्या चुली
मांडव घातला मखमखपुरीं
लगीन लागलं सूर्यातळीं
उष्टया पत्रावळी चिंचेखाली
टाळ्या पोळ्या पुरणाच्या पोळ्या
गौराई जाते सासरीं
जाईल तशी जाऊं द्या
खीर पोळी खाऊं द्या
आमची गौराई येऊं द्या



महालक्ष्मी ( शहरांतील )



महालक्ष्मी ( खेड्यांतील )

# गौराई

( अहिराणींतील गीत )

सोन्यानी सुतई न् पानी काढे कोन्ता
शंकर हरी व माय
केसर दंदनी
पानी काढे शंकर हरी न्
तठे मनी गौराई न्हायनी व माय
केसर दंदनी
तठे मनीं गौराई न्हायनी न्
पिवया पितांबर नेसनी व माय
केसर दंदनी
पिवया पितांबर नेसनी न्
अंगीं काचोई घातली व माय
केसर दंदनी
अंगीं काचोई घातली न्
कपाळीं कुंकवाची चिरी व माय
केसर दंदनी
कपाळी कुंकवाची चिरीन्
भांग गुलालाचा भरी व माय
केसर दंदनी
भांग गुलालाचा भरी न्
डोळीं काजळ झीरीमिरी व माय
केसर दंदनी
डोळीं काजळ झीरीमिरी न्
हातीं चंदनाची छडी व माय
केसर दंदनी
हातीं चंदनाची छडी न्
गौराईचं माहेर फुलझडी व माय
केसर दंदनी

गौराईचं माहेर फुलझडी न्
तठला सुतार नांदे भारी व माय
केसर दंदनी
तठला सुतार नांदे भारी न्
त्यांना घर रंगीत पायना व माय
केसर दंदनी
त्याले रेशीमन्या दोऱ्या न्
त्यांना मां मसूरनी गादी व माय
केसर दंदनी
त्यानां मां मसुरनी गादी न्
त्यानां मां निजना शंकर हरी व माय
केसर दंदनी
त्याना मां निजना शंकर हरी न्
झोके दियी गौराई नारी व माय
केसर दंदनी

## गंगागौरीचें भांडण

पार्वती म्हणे गंगे तूं पाटकरणी ॥
तूं अखंड होतिस विष्णूच्या चरणीं ॥
भुलविलें शिवाला कशि केलीस करणी ॥
राहिलीस मस्तकीं मजला चोरोनी ॥
तूं अमंगळ ग सवती ॥
तुज नाहीं मूळ कुळ जाती ॥
नरनारि तुझ्यामधें न्हाती ॥
मी आद्य शक्ति आदिमाया अर्धांगा ॥
घर निघे जारिणी किती करिसी दंगा ॥
दोघी सवति भांडती पति भांगटभुंगा ॥
आपसांत वर्म बोलती गौरी आणि गंगा ॥ १ ॥

गंगा म्हणे पार्वती तूं दूर हो परती ।
ऐकिल्या मुळापासून तुझ्या कीर्ति ॥
कां असि अगोचर तूं रुसलीस शिवावरती ॥
भिल्लिणीचा वेष तूं धरिला अपकीर्ती ॥
टाकिली उडी होमांत ॥
केला दक्षपित्याचा घात ॥
काय झालीस उत्तम जात ॥
मी असें मस्तकिं तूं असशी अर्धांगा ॥
घर निघे० ॥
दोघि सवती० ॥२ ॥

पार्वती म्हणे गंगे तूं ऐक आतां ।
शंतनूसारिखा भ्रतार तुझा होता ॥
तो सोडून आलीस शिवा पाहतां ॥
मारिलें सप्तपुत्रांस पोटिं होतां
मानिलें न दुःख तुज होतां ॥
दगा दिलास भगिरथा ॥
तुझा जगांत उघडा माथा ॥
मी आद्य शक्ति आ० ॥
घर निघे जा० ॥ ३ ॥

दोघींचा बोल समतोल ऐकुनी कानीं ॥
ऐकतां स्मशानीं शिव बसले ध्यानीं ॥
थोरांची गति ही काय असे करणी ॥
यालागीं न करिती दोन स्त्रिया ज्ञानी ॥
अडल्यावर करणें लागे ॥
असें चालत आलें मागें ॥
त्या प्रवृत्तीनें जन वागे ॥
आणि बोले हर हर शिवगंगा ॥
आपसांत वर्म० ॥
दोघी सवति० ॥ ४ ॥

संग्राहिका-सौ. सुलोचना देशमुख

## गौराईचें गाणें

न्हाली धुली गौराय न्हाली धुली गौराय ।
जाऊन चौरंगीं बेसली ग जु जु ।
गौराईचं चांगुल पन ग जु जु ।
बाळ्या बुगड्यांनीं लवलं कान ग जु जु ।
कापाला सोडवान ग जु जु ।
कापं घेतील इकात ग जु जु ।
नाकीं सरज्याची नथ ग जु जु ।
त्याहीं नथीला आरली ग जु जु ।
चितंगाखालीं सरी ग जु जु ।
सरीला पडला पिळा ग जु जु ।
दंडीं कुसरीच्या येळा ग जु जु ।
हातांत सईच्या ग्वाट ग जु जु ।
आंगठ्यानं भरलीं बोटं ग जु जु ।
पायीं तोड साजती ग जु जु ।
वर पैंजन वाजती ग जु जु ।

## गाणें शंकराचें

— १ —

शंकरा आवड तुला बेलाची बेलाची ।
आर्ध्या अंगीं पार्वती जटेंतून गंगा वहाती ।
मांडीवर शोभे गणपती । आवड तुला बेलाची ।
हातामध्यें तिरसूळ डमरु । वाजविती नाना छंद ।
आला काशीचा रहिवासी । आवड तुला बेलाची ।
ढवळ्यानंदीवरी स्वार । पुढें चाले गजभार ।
उटी लावून भस्माची । आवड तुला बेलाची ।
बेलाची बेलाची । माझ्या तूं भोळ्या शंकरा ।
आवड तुला बेलाची बेलाची ।

– २ –

हातीं गडवा लवंडून दिला ।
तिथं दवना उगवला ।
दवना नव्हं बाई दवन्याची काडी ।
भोळा शंकर बांधतो माडी ।
उठा उठा गौराय बघाया जावूं ।
तोंड नाहीं कशाला जावूं ।

## दसरा–दिवाळी

दसरादिवाळीचा सण म्हणजे नव्यानें लग्न झालेल्या माहेर वाशिणींच्या भाग्याचे दिवस. सासरहून माहेरीं यायचे दिवस. हौस-मौज करायचे दिवस. पांची प्रकारच्या ताटांनीं घरच्यांना सुखी करायचे दिवस.

म्हणून सर्वजण या दिवसांचें आनंदानें स्वागत करतात. ते कधीं उगवतील म्हणून आवडीनें त्यांची वाट पाहतात.

या सणांचे वेळीं आनंदाला जसें उधाण येतें. गोडधडांना ऊत येतो. हवईनळा, फुलबाजा, फटाकडे यांची धमाल उडते. पांची पक्वान्नांच्या फराळाचीं निमंत्रणें जातात. दारीं सडारांगोळी होते. घरच्या देवाची पूजा होते. लक्ष्मीची पूजा होते. शस्त्रास्त्रांची पूजा होते. वाडवडिलांनीं पूर्वीच्या काळीं लावलेल्या शोधांची पूजा बांधली जाते. प्रेमाची देवाणघेवाण होते. म्हणून सगळीकडे आनंदाचें साम्राज्य पसरतें.

घटस्थापनेला मातीच्या भांड्यांत माती ठेवून त्यांत बी रुजत घालून नवरात्रांत त्याची जोपा होते. देव्हाऱ्यांत दिवा तेवतो. दसऱ्या दिवशीं शिलंगण निघतें. घरीं देव्हाऱ्यांत उगवलेल्या पिकाचा तुरा मंदिलांत बांधला जातो. सुवासिनी घरच्यांना ओवाळतात. ताटांत सोनें नाणें येतें.

दिवाळीला भाऊबीज होते. पाडवा होतो. बहिणभावांची भेट घडते. माहेर होतें. म्हणून ह्या सणांची वाट सासुरवाशिणी नागपंचमीपासूनच पाहतात. आईवडिलांच्या प्रेमानें माखलेली भेट भावाच्या हातानें घ्यायला उत्सुक होतात. त्यामुळें बहीणभावांचें

प्रेम मोहरतें. बाळपणापासूनच्या अनंत आठवणींनीं शृंगारतें. आई-वडिलांच्या सहवासांत मिळालेल्या संस्कृतीनें तें विकास पावतें.

बहिणीच्या घरीं होणारी भाऊबीज त्यामुळें प्रेमाचा सागर उभा करते. त्या प्रीतिसागरांत सारें माहेर समाधानानें डुंबत रहातें; आणि सासर पुनीत होऊन जातें.

म्हणून येथें बहीणभावांच्या ओव्या सांगितलेल्या आहेत. त्या वाचून सर्वांचें मन फुलून जाईल. समाधान घेऊन उठेल. स्फूर्तीनें न्हाऊन निघेल.

संग्राहिका—**जानकीबाई पाटील**

## ओव्या

दिवस उगवला येऊंदे वाड्या आंत
बंधु माझ्याला किती सांगू जोडावं दोन्ही हात

दिवस उगवला उगवतांना पाहीला
ताईता बंदूजींनीं बेल वटीचा वाहीला.

बारव विहिरीवरी तिथं पारवं घुमत्याती
माझ्या ताईता बंधुजीचं नंदी मोटेला झुलत्याती

मावळ भाच्यायाची जोडी निघाली आंघोळीला
दोघांच्या सुरतीचा पडे उजेड बारवला

सोनं झालं जुनं तुटंना वजनाला
तसे गुण माझ्या बंधू ग सजनाला

भाऊ कसा म्हणं बहिणीला घाला भात
भावजय बोले साळी टाकील्या बळदांत

पाहुन्याला पाहुनचार बुंदी पाडीती घाईघाई
आप्पा माझ्या त्या बंधुजीला सुबेदाराला रजा न्हाई

गांवाला गेला म्हणूं एक महिना तीन वार
सुरत बंधुची गुलशार कुठं चुकला चंद्रहार

दसरा दिवाळी माझ्या जीवाला आसरा
मावली माझी बाई मूळ धाडीती उशीरा

तुझ्या वाटेकडे माझ्या नेत्राची बाहुली
सावळ्या भाऊराया माया कशाला लावली

बंधूजी घेतो साडी तिचा पदर सोलापुरी
ताईता बंधुजींनीं केली खरेदी सोलापुरीं

बेंदरापासून पंचीम उरली वीस रोज
बंधु माझ्या ताईताची वाट पातीया नित रोज

सनामंदीं सन पंचीम खेळायाचा
बंधु माझ्या ताईताची वाट पातीया मुराळ्याचा

माझं दळण सरईलं माझ्या सुपांत केवईडा
माझ्या बंधुच्या पुस्तकांत रामसीताचा पोवाईडा

आला बंधुर्जा पाहुणा मी का देखीला दरवजांत
जिरेसाळीच्या येळी भात तूप कांचेच्या पेल्यांत

वाडीगांवाच्या पारावर तिथं कंदील लोंबत्याती
बंधु हौशाला मानीत्याती पंच गांवाला शोभत्याती

भरली कृष्णाबाई पाणी चढलं गुमानींत
पाणी दत्ताच्या कमानींत बंधु आला ग उभारीत

दिवस उगवला ऊन पडलं भिंतीवरी
हौशा बंधुजींची बटणं चांदीचीं छातीवरी

शेताला गेली कुरी बाई आडवा आला मांग
बंधुला किती सांगू त्येच्या कुरीला दे मान

गहूं हरबऱ्याच्या गाड्या येशींत थटल्या
सावळ्या बंधूजींनीं दंडभुजांनीं रेटील्या

माझा एक भाऊ तो ग मला बहू
ईश्वरावरी गहूं वाहीयले

भावा ग बहिणींच्या प्रेमाला नाहीं सरी
गंगेच्या पाण्यापरी पवित्रता

आंघोळीला पाणी हंडा ठेवीतें वजनाचा
माझ्या ताईता बंधुजीचा शिण काढीतें सजनाचा

पायांत कडींतोडं कमरीं कडदोरा कधीं केला
माझ्या त्या बाळायाचा मामा कुबेर राजा आला

पायाबी पडुं आली बाई म्यां धरली वरच्यावर
बंधुची माझ्या बाळं भाचा कडेला दुन्यादार

पायाबी पडुं आली चोळी अंगांत खुतनीची
सया नारिला किती सांगू बीज माझ्या बंधुजीची

सख्या बंधु परास चुलत बंधूला माया थोडी
सये नारी मी किती सांगू दिली इनाम चोळीसाठीं

चुलत भावंडं नगा म्हणूस येळं येळं
सयी नारीला किती सांगू एका राशीचं जुंधयीळ

बंधूला मागयिती माझ्या डोरबिल्याला घस
बंधुजी बोलात्याती भैनी पिकूं दे माजा ऊंस

भावाभावांचं भांडण शेताच्या बांधासाठीं
जावा जेवीती एका ताटीं

भरल्या बाजारांत चंद्रकाळाच्या उतरंडी
ताईता बंधु माजा ऊंच पालाच्या बस तोंडी

शेजारीनबाई तूं का उसनं द्यावं लाडू
माझ्या बंधुच्या भोजनाला आतां कवाशा कळ्या पाडूं

नणंद आक्काबाई पाया पडून माजं घ्यावं
हळदीकुंकवाचं एक वचन मला द्यावं

दिवाळीची चोळी भाऊ बिजेच्या कोयऱ्या
हावशा बंधुराजा वाक्या राहिल्या सोयऱ्या

अ... ३८३०४
क्रमांक ........ नों ता. २२-११-६०



तांबडया मंदीलाचा समला सोप्याच्या खुंटीला
माझा तो बंधूराया आला उमराव भेटीला

ताईता बंधुजीनं पाठविल्या गूळ पोळया
आंत उघडूनी पहाती खुतनीच्या चोळया

भावज गुजरीचं तिचं बोलणं ठसक्याचं
हावशा बंधुराया फूल कोमेलं सबजाचं

भावज गुजरी तुझ्या वाड्याला चौथी फेरी
बया माझी ती गवळण अंतःकरणाची नव्हती घरीं

मोठऽ मोठऽ डोळऽ वरल्या देवाची करणी
माझ्या बंधूला देखूनी नार लागली झुरनी

भाचीच्या लगनांत माझा हक्काचा मावळचीर
बांधुनी करनी केली दोनी पदराला जर

माझी तूं माया बहिनी गिरणीवरून दोघी जाऊं
माझा तो बंधुराया गिरणीवरला हिरा पाहूं

भाऊ घेतो चोळी भावजय मागं गेली
सवाया मधीं चार आणिक कमी केली

बसाया बसकर मी का टाकीतें मामाराया
बस बयाच्या बंधूराया

पाव्हणा आला म्हणूं नव्हं भाजीबी भाकरीचा
त्येच्याबी भोजनाला वान्याच्या दुकानीं दर विचारी साखरचा

बहिनी भांवडांचा मेळा जमला पांखराचा
माझी ती बयाबाई पुडा सोडीती साखरचा

माझ्या नटव्या बंधुजीला भाऊबीजेला बोलाविला
सोनसळी गहूं सोजी काढती नकुल्याला

ताईता बंधुजीची भाऊबीज ती धाकलीला
खुतनीची चोळी भाऊबीजेच्या लुगड्याला

ज्येला न्हाई बाहिण तेच्या पदरीं चाराचुरा
ताईता बंधुजीला ताजं जेवण तालीवारा

तांबुळ्याची मैना पानं मोजीती शेकड्यानं
ताईता बंधुजीच्या हातीं पैसा ये शेकडयानं

दिवाळीची चोळी भाऊबीजेची चंद्रकळा
झाला बंधूचा उपराळा

कुस्तीच्या फडावरी तिथं कशाची टाळी झाली
माझ्या ताईता बंधुजीनं गुंड छातीला भिडवीली

तांबडया मंदीलाची त्येची बांधनी बेतायाची
माझ्या ताईता बंधुजीचीं बोटं नाजूक हातायाचीं

दुरुन वळकिती माझा बंधुजी व्हय का न्हवं
माझ्या नेणत्या बंधुजीला पाठीं संबबील्याची सव

बंधुजी पावईना बाइ म्यां चालींत वळकीला
नेणता माझा बंधु खांब रत्नाचा झळकिला

माझ्या दारावरुनी रंगीत गाडया गेल्या
भावांनीं बहिणी दिवाळीला आज नेल्या

बंधुजी म्हणत्याती चोळी पाताळ घे बहिनी
चाव्याच्या दुकानांत चोळी हिरवी हिरकनी

मारक्या बैलानं साऱ्या शिवारीं केला दंगा
हावशा माझा बंधु गांवाला गेला सांगा

चवघी आम्ही बहिणी चार गांवाच्या चार शिवा
हावशा माझा बंधु मधीं नांदतो सदाशिवा

बसाई बसकर सोप्यां टाकीली लाल गादी
ताईता बंधु माझा खास यीवाया बस मधीं

पावण्या रावळ्यानं माझी भरली वसईरी
बंधूजी पावईना टाका बनात दुसईरी

बंधूजी पावईना आकडी दुधाची उचापती
बंधूला विचारती संगं मराठी लोकं किती

बंधूला झाला ल्योक आमा भैनींना आला घोडा
ताईता बंधू माझ्या तुझ्या चिपळ्या माझा तोडा

बंधूजी पावईना शेजी सांगत आली रंभा
बंधूच्या भोजनाला सोजी साखर पिवळा आंबा

शेजारणी बाई घ्यावें वासाचे वेलदोडे
ताईता बंधूजीची आली गाडी वाड्यापुढें

लई नी झाल्या लेकी सारी पाहुणीण्याची धन
ताईता बंधुराया चंद्र वाड्याला राखण

तांबुळ्याची मैना पानं देतां झोपीं गेली
बंधवांनीं माझ्या जादु टाकून जागी केली

पंढरीच्या रखमाकडं नवसाचा भरतें चुडा
सुखी ठेव देवा भावा बहिनींचा जोडा

डावा डोळा लवं उजवी बाही शकुनाची
बंधवाची भेट माझी राघुबा रतनाची

रंगीत पाळणा वरती हिंगाळ सारिलं
तुझ्या मामानं धाडीलं

पहांटच्या दळणाला मला तांबडं फुटलं
सावळा बंधुराया गवळी धारला उठल

मैना सासऱ्याला जाती तिच्या ओटीला कवळीं पानं
संगं मुरळी पैलवान

बंधूजी पावना पडं उजेड वाड्यावरी
हातीं कंदील घोड्यावरी

माहेर मला केलं एका बिग्याचा वसूल
सया बोलत्यात्या बंधू समरत असल

भरल्या बाजारांत काय किराण्या तुजी दाटी
बंधू हिंडतो बहिनीसाठीं

लुगडं ग घेतीयीलं त्याचा पदर दीडश्याचा
ताईता बंधूजीचा त्याचा मैतर बडोद्याचा

भावाची बहीण न्हाणीं बसली उठईना
सोमवारा दिवशीं हात लाऊनी फणीयीला

पित्याच्या जीवावर छंद केला फार फार
डाळींबी बिलवार बारा आण्याचं लेली चार

गाया हंबरत्यात वासरं साद देती
पित्या माझ्या त्या दौलताचा वाडा गौळ्याचा लक्षपती

शेंवग्याचा शेंगा अंतराळीं लोंबत्यात्या
ऊंच ऊंच चोळ्या माझ्या दंडाला शोभत्यात्या

पांची पक्वनाचं ताट वर रुमाल झाकीला
बंधू पहाती वाट माझी कोरेगांवच्या स्टेशनाला

बारीक बांगडी बारा आण्याला लेती जोडी
हावशा बंधू माझा हांसत चंची सोडी

अंगडं टोपडं घाडी बंधुजी झोळण्यांत
तान्ही काय मैना खेळते पाळण्यांत

रंगीत पाळणा त्याला रेशमाची दोरी
बाजेला जूं जूं करी आनंदाखालीं गोरी

बापाजी बयाबाई दोनी काशीचीं देवळं
ताईता बंधु माझा भडक निशाण पिवळं

दिवाळी ववाळायाची आखाजी खेळायाची
बहीण बघी वाट आशेनं भावाची

भाऊ बहिणीच्या प्रसंगानं गांठीभेटी
दिव्या घातीलं तेल झळाळी रेशमी ज्योति

दसऱ्या दिवशीं आपटा गेला लुटी
सारंगी घोडी पोटीं भाईराया

दिवाळी दिवशीं शेजीचा आला भाऊ
सोयऱ्या बंधुराया तुजी किती वाट पाहूं

तुझ्या माझ्या भेटीला वरीस लोटलं
कसं तुला कंठलं भाऊराया

दिवाळीची चोळी शिमग्याचा हार
तुझी मला आशा फार भाऊराया

माझ्या घरीची मी नेशीन गुजरी
तुझ्या चोळीनं पंचीम साजरी

माझ्या घरीची मी लक्षापतीची धनीन
बंधु तुझ्या चोळीची आशा मी करीन

लेण्या लुगड्याची न्हाई मी आसूशी
तुझ्या सुखांत मी संतूषी भाऊराया

बहिणीला दिल्यानं न्हाई तुजं होत कमी
झरा उपस येतं पानी भाऊराया

बहिनीचा आशीर्वाद भाऊ झेलतो बळी
गंगनीं गेल्या केळी हात पुरना कंबळी

वाटेचा वाटसर करतो पाणी पाणी
बंधूच्या मळ्यामंदीं चावऱ्या मोटा दोन्ही

वाटेवरलं शेन ग चिमणाबाईचं माहेर
माझ्या बंधूनीं केल्या गोफणी तयार

वाटेवरलं शेत ग अल्यागेऱ्याचा निंबूर
माझ्या ग. बंधुयाचा भाग्यवंताचा नंबर

बंधूची कमाई बघायाला गेलं काल
होती काळी मार्ती वरती उमलेला लाल

बंधूची कमाई बघायाला गेले शेती
होती काळी माती वरती उमलले मोतीं

बंधूच्या मळ्यामंदीं पिकला बरड
मापाला लागला सव्वा खंडीचा करड

बंधूच्या मळ्यामंदीं पिकला लसूण
उंच गेला ऊस पाणी भरतें बसून

पट्टीचा शेतकरी जन बोलती गांवांत
बंधूच्या ग राशी मंदी तिब्रडा बुडाला पेवांत

बंधू व्याही दादा शेतीमंदीं तुझ्या लाल
मळ्यांतली मेथी माझ्या बैलाला घाल

मळ्यांतली मेथी बैलाला लागे कडू
सांगतें बंधूराया उसाचा डांभ मोडूं

उंसाचा डांभा माझ्या बैलाला भावना
सांगते बंधूराया आण डोंगराचा पवना

डोंगराचा पवना माझ्या बैलाला लागे मऊ
सांगतें बंधूराया डाळ हरभऱ्याची लावू

हरभऱ्याची डाळ माझ्या बैलाला पुराना
सांग रे बंधूराया लाव वाण्याच्या किराणा

वाण्याच्या किराण्यांनीं बैल माझा हारवली
बंधूंनीं माझ्या अट हौसेनी पूरवली

• • •

संग्राहिका–सरोजिनी बाबर

# ( आहिराणींतील ओव्या )

दिवाळीना रोज थाट लागे जड जड
बंधु मन्हा टाके वाकळीना जोड

दुबळा पाबळा भाऊ बैनीले असावा
पावलीनी चोळी एक रातना विसांवा

दिवाळी वनी वर्ना भाऊ बहिननी
बंदवाच्या घरीं चोळी माजी ठेवनीनी

दिवाळीना रोज धाबे धाबे दिवा
भाऊ म्हणे आज मन्ही बहिनना येवा

दिवाळीना रोज मन्ही थाटी म्हान दही
ववाळी वनू भाऊन्या तान्हया गाई

दिवाळी वर्ना वनी भाऊ बहिननी
भाऊ तुन्हा घर चोळी मन्ही ठेवनीनी

भाऊ बहीनना झगडा रानींवनीं
बहिनना डोळे पानी भाऊ पस्तावना मनीं

चाकर मान्या भाऊ साडे चाकरिले पानी
घरनी अस्तुरी वाट पाहे मोरावानी

चाकर मान्या भाऊ तुजी चाकरी देशांत
घरची अस्तुरी हरन गोविली फासांत

पंढरपुरनी माले जतरा दुरनी
भाऊराया मनीं सोबत घरनी

पड पड रे पाऊस व्हऊं दे मुलकी अबादानी
खुशी जया हुई भाऊ लक्ष्मीना धनी

पड पड रे पाऊस पानी लुना मुळे ध्याया
भाऊ म्हने दूरच्या मन्या बहिनी लया

भाऊ म्हने येव येव बहिन घरांत
भवजाई म्हणे कोन बाईशे दारांत

भाऊ म्हने रांध बहिनले भात
भवजाई म्हने साळी पडले पेवांत

भाऊ बहिनना झगडा नमेना
मधीं बसली यमुना उग कोनले म्हनेना

लुगडानी घडी फेकी मी दारांत
भाऊराया मना परती गया बाजारांत

• • •

# मराठी लोकसाहित्य

## भाग दुसरा

१. मराठीचें माणिक मोती

—श्री. न. शं. पोहनेकर

२. लोकगीतांतील साम

—श्री. सोपानदेव चौधरी

३. लोकगीतें आणि संगीत

—डॉ. सरोजिनी बाबर

४. विदर्भाचीं अस्मितादर्शक कांहीं लोकगीतें

—श्री. ना. रा. शेंडे

५. उखाणा

—सौ. कुमुदिनी पवार

६. सासुरवास

—डॉ. विमल चोरघडे

७. हळदीचें सांस्कृतिक स्थान

—कै. चिं. ग. कर्वे

# मराठीचें माणिक मोती

—श्री. न. शं. पोहनेकर

मराठी सरितेच्या विशाल वाळवंटावर अप्रकाशित आणि अलिखित असें कितीतरी साहित्य विखुरलेलें आहे. तें सलग नाहीं. देश–काल–परिस्थितीच्या ओघांबरोबर वाहात आलेलें आणि म्हणूनच अनेक ठिकाणीं पांगलेलें असें तें आहे. या वाळवंटांतील कणाकणांतून हे तेजस्वी माणिक मोतीं मधूनच आपली चमक दाखवितात, मनाला मोहिनी पाडतात. खेड्यापाड्यांतील झोपड्यांतून आणि अशिक्षित समजल्या जाणाऱ्या महिलांतून हे तेजस्वी भावकण आजहि लपलेले दिसतात. आईपासून मुलीला, सासूपासून सुनेला अशा परंपरेनें जें अमाप अलिखित साहित्य आज आमच्यापर्यंत आलेलें आहे, त्याची वास्तपुस्त करणें आज आवश्यक आहे. आपल्या प्राचीन परंपरेला सुधारणेचें नवीन वारें लागलें. आपल्या चालीरीति, आचारविचार, राहणी, संकेत, यांत बदल झाला आणि आमची दृष्टि मागें पाहीनाशी झाली. या कारणानें हें अपौरुषेय वाङ्मय, मराठीच्या ‘ श्रुति ’, आज कुठें तरी आणि कशातरी पडून आहेत. त्यांच्या आवृत्तीची वेळ क्वचितच येते. घाई न केली तर ही संपत्ति अशीच कुजून जाईल म्हणून भीति वाटते.

दोन दोन चार चार अक्षरांत आपल्या सामाजिक आणि धार्मिक जीवनाचें कसदार, डौलदार व मार्मिक असें चित्र रेखाटणारीं हीं सूत्रें म्हणजे मराठीच्या जिव्हाळ्याचे जडाव आहेत. त्यांना नकली दागिन्याची झळाळी नसेल, पण त्यांचें अस्सल वाण पारख्यांच्या मनाला मोहिनी घातल्यावांचून राहात नाहीं. अरुणोदयाच्या वेळीं कुणाहि अशिक्षित महिलेच्या झोपडीच्या दाराशीं कानोसा घ्या. मात्र अगदीं झुंजुरकाचं उठून तुम्हांला ही श्रवणभक्ति करावी लागेल. जात्याच्या दगडी घशांतून निघणाऱ्या रांगड्या स्वराशीं आपल्या भावनेचे स्वर ती जुळवून घेईल आणि तिच्या त्या विशुद्ध कोमल कंठांतून या भावकणिका ओघळतांना जेव्हां तुम्ही ऐकाल, तेव्हां तुमचें अंतःकरण त्याच भावानंदांत हेलकावूं लागेल. तिला दळणाचा शीण वाटत नाहीं.

पहांटच्या दळनाला, पिठाला ग बरकत ।
भोळ्या माझ्या शंकरानं, गिरजा धाडीली सोबत ॥

आपलं जीवन हा एक यज्ञ आहे. स्वतःसाटीं आहेच काय? अशा उदात्त भावनेनें जेव्हां ती दळण दळायला बसते तेव्हांची तिची हिंमत तर बघा.

अनुक्रमांक ३६३८५ दि
क्रमांक ........................ नोंद दि


दळण दळिते एक्या मांडीनं ग पल्ला ।

आणि—कदाचित् थकवा आलाच तर—

रामाला ग ओव्या गातां शीण माझा उतरला ॥

जीवनांतील नित्याच्या गोष्टींतून आपल्या साध्या भोळ्या भावना व्यक्त करून त्यांत तन्मय झालेल्या जीवाला शीण कशाचा वाटेल ? कर्तव्यबुद्धींतून निर्माण होणाऱ्या परिश्रमांतून सफलतेबरोबरच धन्यतेचाहि आनंद निर्माण होतो. त्यांत शीण वाटणें शक्य नाहीं. आजच्या नव महिलेला कदाचित् ही भावना मानवणें शक्य होणार नाहीं. एका मांडीनं पल्लाभर दळण दळणें याला किती कस असावा लागेल ?

मायबाईच्या दुधाची

झडती ग द्यावी न्यारी ॥

अशा उमेदीनं तिनं जात्याला हात घातलेला असतो. तें मोठं आहे. एकटीचं नाहीं अशीहि वस्तुस्थिति आहेच.

थोरलं ग माझं जातं

चवघी ग बायकांचं ॥

पण हें सर्व कशासाठीं ? तिला अभिमान वाटतो. ती त्याच धन्यतेच्या भावनेनं सांगते.

भाईरायाचं ग माझ्या

घर थोर नायकाचं ॥

भाड्याच्या दोन खोल्यांत यंत्राप्रमाणें जीवन जगणारे आमचे आजचे संसार हे नव्हेत. आपल्या एकत्र–कुटुंब–पद्धति आणि परिवाराचा या भाबड्या जीवाला फार मोठा मान वाटतो. घरांत कुटुंबीय तर आहेतच. पण पै-पाहुणा आला गेला, नोकरचाकर, हेहि तिच्या इथं आहेतच. अशा थोर नायकाच्या घरांत भातुकलीचीं चिमुकलीं जातीं कशीं कामाला येणार ?

हें मराठी जीवन अस्सल बालेघाटी आहे. त्याला सुधारणेचे सोपस्कार झालेले नाहींत. आपल्या बाळपणापासून एका ठराविक पद्धतीचे सामाजिक आणि धार्मिक संकेत त्यानें पाळलेले आहेत. त्याला वेदान्ताचे सिद्धान्त आणि धर्मांचीं तत्त्वें ठाऊक नाहींत असें नाहीं, पण तें जीवब्रह्माच्या फापट पसाऱ्यांत पडून चर्चा आणि मतांच्या वावड्या उडवीत नाहीं. दुरून परळीची 'पाणंद' दिसली कीं आतां माझा वैजनाथ मला भेटणार म्हणून एकदम "माझ्या जीवाला आनंद" असे सहजोद्गार मराठी बाईच्या मुखावाटें बाहेर येतात. महाशिवरात्रीच्या महायात्रेला यात्रेकरूंची गर्दी हमखास होणारच. परंतु अशा प्रसंगीं प्रत्येकाची सोय त्यांच्या

त्यांच्या मनाप्रमाणें कशी होईल ? गरीब माणसें त्यांत बहुसंख्य आहेत. मग प्रत्येकाची व्यवस्था होते कशी ?

महाशिवरात्रीच्या दिशीं
घरोघरी ग बिऱ्हाड
देवा माझ्या वैजूबाचं
दीनानाथाचं वऱ्हाड

एकाच एकत्र कुटुंबांतील आहेत ते सर्वजण ! एकत्वाची भावना किती जिव्हाळ्यानं व्यक्त केली आहे येथें आणि त्याबरोबरच मराठी लेकरांची सांस्कृतिक एकताहि मार्मिकपणें दाखविली आहे. श्रीमंत—गरीब असा भेद यांत नाहीं. देवाच्या दरबारांत सर्व एकसारखे.

देसाई ग देशमुख
असे चाललेत पायीं
देवा माझ्या वैजूबाच्या
पालखीला देती बाही

आपल्या राष्ट्रीय देवतेच्या पायाजवळ गेल्यावर तेथें भेदभाव कशाचा ! श्रीमंतहि देवाचेच आणि गरीबहि देवाचेच !

पारवतीच्या सरीचं
सोनं आहे शेरभर
देव माझा वैजनाथ
परळीचा जागीरदार

सारी श्रीमंती, सारें मोठेंपण हें त्या महाप्रभूचं. देवदर्शनाच्या वेळीं आरती होते, कापूर पाजळला जातो. केशरकस्तुरीनें गंध दरवळूं लागतें. त्या सुगंधी वातावरणानें मनावर एक उदात्त आणि पवित्र असा परिणाम जाणवतो.

कस्तुरीचा वास
माझ्या पदरा कुटूनी
देवा माझ्या वैजूबाला
आले सख्याला भेटूनी

दर्शन घेऊन आलें असें ती म्हणत नाहीं. मी सख्याला भेटून आलें अशी आपलेपणाची पवित्र आणि आत्मीयतेची भावना आहे तिची. आपल्या अडी-

अडचणी, संसारांतील सुखदु:खं हीं इतर कुणाला सांगायचीं ? दर्शनानं देवाचा दुरावा जाणवतो, पण सख्याच्या भेटींत अंतःकरणाची ओढ प्रत्ययाला येते.

भारतांत तीर्थक्षेत्रांचा प्रपंच फार मोठा आहे. सर्वच तीर्थांची यात्रा सर्वांना कुठें जमते? प्रत्येक स्थानाचें महत्त्व तिला मान्य आहे. परंतु व्यवहाराच्या वेगळेपणांत 'द्यावा भूमी जनयन्देव एकः' ही एकतेची विशाल भावना तिच्या अंतःकरणांत ठासून भरलेली आहे.

काशीचा ग इस्वेसर
नाहीं अजून पाहीला
देवा माझ्या वैजूबाला
बेल जाउनी वाहीला

काशीविश्वेश्वराचं दर्शन परळी—वैजनाथाच्या महापूजेंत ती अत्यंत धन्यतेनं घेते. आपला अधिकार, आपली साधना यांच्या तुटपुंजेपणाची तिला जाणीव आहे. परंतु परमेश्वरी दरबारांत ऐपतीपेक्षां भक्तीच्या भावनेला महत्त्व आहे हें तिला माहीत आहे. पंढरपूरला गेल्यानंतर बाजारांत तुळशीची माळ तिनें विकत घेतली. देवळांत जाऊन ती पंढरीरायाला म्हणते.

तुळशीच्या माळा
इकती ग बाजारीं
हरी माझ्या दयाळा रे
घाल कंठीच्या शेजारीं ॥

तुझ्या कौस्तुभ कंठीशेजारीं ही माझी तुळशीची माळ घाल असें ती विठ्ठलाला सांगते; आणि आपली ही शुद्ध भावाची विनंती अमान्य केली जाणार नाहीं हा तिला दांडगा आत्मविश्वास आहे !

काव्यप्रतिभा, ईश्वरीप्रसाद यांचं तेजस्वी पाणी या मोतीदाण्यावर चकाकतांना दिसतं. एकेश्वरी निष्ठा, अंतःकरणाची विशुद्ध विशालता, परस्पर बंधुभाव हीं मानवतेचीं मूल्यें त्यांतून भावुकतेनें रंगवलेलीं आहेत. आपल्या सुखदुःखाची कहाणी मनमोकळेपणीं परमेश्वराजवळ सांगण्याइतक्या सख्यत्वाची प्रेमळ भूमिका या भावड्या जीवांनीं स्वीकारलेली आहे. आपल्या जीवनाचीं वैशिष्ट्यें टिपून त्यांच्या आधारानें या माणिक—मोत्यांची स्वैर गुंफण चालू असते. अशा वर्णनांत अनंत कल्पना आणि अलंकारांची आरास अनायासें येथें प्रत्ययाला येते.

माय पारवतीची
सखे जोडवीं वाजतीं

देवा माझ्या वैजूबाच्या
नंदी गाडांचे बुजती ॥

श्रीकृष्णाच्या संसारांत सर्वच गोष्टींना भरपूर वाव! कुणाला कांहीं, कुणाला कांहीं, हें चालू असेच; तरी पण त्यांतहि—

रूखमाईला साडीचोळी
सत्यभामेला दोरवा ।
बाई माझ्या तुळशीला
थंड पाण्याचा गारवा ॥

हे त्याच्या परिवाराचं झालं. पण स्वतः त्याचं काय?

हे ग विटेवरी उभा
युगं झाले अठ्ठावीस
हरी दयाळा रे माझ्या
शीणलास खालीं बस ॥

किती म्हणून वेचणी करावी? अनंत आहेत तीं.

जीवनमूल्यांची निष्ठापूर्वक आराधना जीवनाला सुखशांतीच्या साक्षात्काराबरोबरच दिव्यत्वाची प्रेरणाहि देते. आपल्या कुटुंबीय, आप्तेष्ट, गणगोत यांच्याविषयीं आपलेपणाची भावना यांत व्यक्तित्वाची मर्यादा केव्हांच नाहीशी झालेली असते. मातृदेवता! तिची थोरवी जीवनांत असामान्य आहे. कारण त्या प्रेममूर्तीला तोड नाहीं.

नऊ महिने ग वझं
वागविलं माझं कुशीं
मायबाई हरनीला
फिरूनी ग बोळूं कशी
बापाचा ग उपकार
काशी गेल्यानं ग फिटे
मायबाईचे ग माझ्या
साजनींचे कष्ट मोठे
समुद्र ग शोखील्यानं
जाईना ग माझी तहान

सखी माझी मायबाई ।
गंगा भरली आस्मान ॥

संसाराची शोभा म्हणजे लहान मूल ! आमचा आजचा कवि मुलांना ‘ फुलें ’ म्हणतो. संस्कृत भाषा श्रीमंत आहे. ती मुलांना ‘ गृहरत्नानि ’ म्हणते. मराठवाडा Gardencity चा प्रांत नाहीं. तो फुलें म्हणून मुलांचें वर्णन करीत नाहीं.

राया सावळयाचं माझ्या ।
अंथरून झालं गोळा ॥
बाळ नेनंता ग सये ।
नाग खेळला गव्हाळा ॥
हे ग बिंदीला खेळती ।
सेजीचे पांच बाळ ॥
नेनंती माझी तान्ही ।
त्यांत आहे मोहनमाळ ॥

गव्हाळया नागाची उपमा त्या चपळ, तेजदार, खोडकर अशा बालकाला किती शोभते याचा विचारच करणें बरें ! हा एक आपल्याच मस्तींत येणारा बाळक पाहा.

बाळया सावळयानं ।
दनानलं माझं जोतं ॥
बाळ राजस ग माझं ।
सईचं ग बाळ येतं ॥

कांहीं कांहीं सामाजिक संकेत मोठे मार्मिक आणि वैशिष्टयपूर्ण आहेत.

जल्मामंदीं जल्म ।
यर्थ बामनीं बायाचा ॥
भरल्या ग सभेमंदीं ।
नाहीं पदूर घ्यायचा ॥
दिव्याच्या ग सावलीला ।
नको बसूं सईबाई ॥
नेनंता ग बाळ माझा ।
तुझ्या पाठीचा देसाई ॥

लग्न झालेल्या मुली माहेरीं परत येतात तेव्हांची त्यांची मिजास बघण्यासारखी आहे. मूळ आल्याखेरीज तिचें येणें अशक्य !

गांवांतल्या गांवामधें
गाडी कशाला बईल
ही ग माझी प्राणसयी
मूळ पाठवा येईल ॥

बालविवाह तेव्हां सर्रास होते.

नेनंती माझी बाई
उभी केली कन्यादानीं
अशी सये जावळाची
मामा उकलितो येनीं

लग्न कार्य ठरतांना वतनवाडी पहावी लागे. पण—

अरे इवाही गृहस्था
काय पाहशी वतनाला
बाळराजसाला माझ्या
द्यावी लेक रतनाला ॥

आणि हा मुलगा तरी साधासुधा थोडाच आहे? त्याचं रूप हजारांत उठून दिसणारं आहे.

दहीभाताची ग मूद
आधीं वरून ववाळ
सये माझे इहिनीबाई
मग जावाई न्याहाळ !

विहिणीला जावयाकडे पाहिल्यानंतर मूद ओवाळण्याचं सुद्धां भान राहिलं नाहीं असा तो ‘ नवरा आहे चूनखडा ’ !

लग्नकार्य म्हणजे अनेकांच्या अनेक हौशी ! त्या पूर्ण होणें योग्य !

माझी रे हौऽऽस
पुरवावी रे इव्हाया
हावया नी चन्द्रज्योती
शीव पासूनी लावाव्या ॥

व्याह्याचा वाडा चिरेबंदी टांकीचा आहे पण तो उंच नाहीं.

इव्हाई सोयऱ्याच्या
चिरेबंदी वाडा खोल
भाई राजसाचा माझा
कसा जाइल चवर डोल ॥

लग्नसमारंभाच्या प्रारंभीं पांच पानांचा विडा ठेवून श्रीगणेशाची पूजा करावयाची—

पांच पानाचा ग इडा ।
वऱ्हे मोतियाचा घोस
अशा कारयाच्या कामा
आधीं नमिला गनेश

आणि त्याला मूळ गेलें कीं तो निश्चित येतोच !

मांडवाच्या दारीं
आली धुंगराची गाडी
देव माझा गजराज
आला लग्नाचा वऱ्हाडी ॥

यानंतर मग जात्या–उखळांचे मुहूर्त होतात. सुवासिनींनीं नवऱ्या मुलास तेल लावून अभ्यंग स्नान घालावें लागे.

सासू ग सासऱ्याच्या
कंथाच्या ग कामिनी
बाळरायाला ग माझ्या
तेल लावीती आंगनीं

नवरानवरींनीं परस्परांचीं नांवें घेणें यालाहि महत्त्व असून शिवाय त्यांत मौजहि असते. वराच्या वहिणीचा थाट तर काय विचारतां ? ती करवली आहे.

बाळराजाच्या ग माझ्या
आल्या करवल्या बहेनी
भाची नेनंती ग माझी
मान मागती मेव्हनी ॥

वधूची माय शेरभर सोनं लेऊन आली, पण वरपक्षाचा दिमाख कसा त्रिनतांड आहे.

शेरभर सोनं
लेकीच्या ग आईवरी
सावळे ग बाई माझे
हात तुझ्या पायावरी

मुंजीमध्यें आईनें मुंज लागत असलेली पाहावयाची नाहीं.

मुंजीचं लगीन
बापलेकाशीं ग लाग
सावळी ग माझी बाई
परस ग दारीं वाग ॥

मात्र—भिक्षावळ, घालतांना आईचा मान पहिला आहे. पहिली भिक्षावळ तिची आणि मग इतरांची.

पहेली ग भीकाळ
माय घाली बत्ताशाची
माझ्या तान्ह्या नेनंत्या
मुंजाबाळा भुकेलाशी

याखेरीज फुलानें माथा भरणें, हळदीकुंकवानें पाय पिवळे होणें, भांगांत गुलाल भरणें, एक ना दोन. सर्व प्रकारच्या आबादानीच्या काळांतील सुखी जीवनाचे समारंभ आहेत हे.

मांडवाच्या दारीं
आहेराचे सोळा ताट
बहेना ग बाईच्या
पातळाचे जरीकांठ

नुसत्या पोशाखाच्या नोकझोकावरून मानकरणी ओळखूं येतः.

मांडवाच्या दारीं
करवली कोन अन्तीं
माझी सई बाई
हिरवी नेसली शेवंती ॥

दारांत तुपाची घागर सांडली तरी काळजी न बाळगणाऱ्या सोयऱ्याच्या मांडवांत ओंजळीनं सुपारी वाटली जावी यांत आश्चर्य कशाचें ? अशा सुबत्तेच्या संसारांतच रुसवेफुगवे, मानपान हे चालावयाचे. बहिणीला साधी मूळचिट्ठी पाठविली पण ती तिनें शिंक्यावर टांगली. कां ?

पहेली मूळ चिठ्ठी
ठेवीली शिंक्यापायीं
भाई राजसाला सांगा
मूळावांचून येत नाहीं ॥

किती रास्त आहे हा बहिणीचा आत्माभिमान ! मी तुमची बहीण पण व्यवहारांत आज एका भाग्यवंताची गृहलक्ष्मी आहे. आपल्या घराचें महत्त्व तिला पहाणं भाग आहे. जांवईबुवांनीं आपला रुसवा अशा वेळीं नाहीं तर कधीं बाहेर काढावयाचा ?

सईबाईचा ग वर
हीं ग सेवंती घेईना
माझा बाळराज
शिंगी कबूल करीना ॥

पंचकल्याणी घोडा आल्यावांचून सीमांतपूजनास कोण येणार ? आणि इतक्यांत—

मांडवाच्या दारीं
कशाचा ग गलबला
बाळरायाच्या ग सये
वरातीला हत्ती आला ॥

इतर मानकरीहि कमी नाहींत.

या ग वराच्या परीस
वरधवा ग नटवा
घरधनीनीला त्याच्या
मूळ पालखी पाठवा ॥

असा थाट आणि हें वैभव. ते हि नो दिवसा गताः ॥

हा मराठीचा अस्सल खाक्या आहे. या साहित्यांत देवाची व संतांची स्तुति आहे, महाभारत, रामायण आहे. कथा–पुराणें आहेत. प्रपंच–परमार्थ आहे. नीति आणि धर्म आहे. सर्व कांहीं आहे. खरं खुरं लोक साहित्य आहे हें ! या आरशांत आम्ही आमचा समाज पाहावा. आपल्या जीवनाचं मोल पारखून पाहावं. संस्कृतीच्या सोपानावर आम्ही आहों कुठें हें आमचं आम्हांलाच लक्षांत येईल. इतरांच्या मध्यस्थीची त्यासाठीं आवश्यकता उरणार नाहीं.

●●●

# लोकगीतांतील साम

—श्री. सोपानदेव चौधरी

" न नादेन विना गीतं
न नादेन विना स्वरः
न नादेन विना नृत्यं
तस्मान्नादात्मकं जगत् ॥ "

नादाशिवाय गीताला मोल नाहीं. नाद जर नसेल तर स्वर हा फोल होय असें हें नादाचें माहात्म्य आहे. तुम्हीं कधीं जात्यावरचीं गाणीं जातें चालू असतांना स्त्रियांच्या तोंडून ऐकलीं आहेत का ? मोट हाकीत असलेल्या मोट-कऱ्याचें गाणें ऐकलें आहे का ? आणि ऐकलें असलें तरी त्या स्वरांच्या धूनकडे तुमचें लक्ष वेधलें आहे का ? त्या धूनमधें काव्याला कसें आवाहन मिळतें तें कधीं तुम्हीं पाहिलें आहे का ? या सर्वांचा तुम्हांस अनुभव असेल तरच वरील संस्कृत वचनाचा उकल पडेल.

जात्यांतून किंवा घरोटांतून एक प्रकारचा सूर ऐकूं येतो. घरोटाची तळी आणि पाऊ याच्या घर्षणांतून या स्वराची निर्मिति होते.

कसा घरोट घरोट
चाले माझा घरघर
त्याच्या घरघरींतून
माले ऐकूं येतो सूर ॥

त्या एका स्वरांत ती दळणारी आपल्या गाण्याचा षड्ज पकडते. घरोटांत दाण्याची मूठ पडली म्हणजे तिचा चुरा आणि पीठ होईपर्यंत तेवढ्याच अवका-शांत आरोहांतले स्वर येऊन मिळतात.

" अरे घरोटा घरोटा
तुझ्यांतून पडे पिठीं
तसं तसं माझं गाणं ।
पोटांतून येतं ओठीं ॥ "

घरोटांतील दाण्याची मूठ पीठ होऊन बाहेर पडली म्हणजे त्या घरोटाचा तारस्वर घुमतो. या वेळीं दळणारी बाई द्रुत गतीनें घरोटाची पाऊ गरगर फिरवून आणि त्याचबरोबर तो स्वर कानांत भरवून पुन्हां दाण्यांची मूठ, दाण्यांचा घांस, घरो-

टाला भरविते. घरोट सुरू होतो. दळतां दळतां गाणें चालूंच असते. तें दळणारे हात दुखूं लागले म्हणजे,

"अरे घरोटा घरोटा
माझे दुखतां रे हात
तसं संसाराचं गानं
माझं बसतें मी गात ! ॥"

या श्रमसौंदर्याला नादसौंदर्याची साथ असते. गाण्यानें श्रम वाटतात हलके, हें तर खरेंच, परंतु इथें श्रम हलके वाटून शिवाय हृदयाचें निवेदन हाताला उमगत असतें. आणि हेंच लोकगीताचें त्याचबरोबर लोकसंगीताचें वैशिष्ट्य होय. ही नादमय धून म्हणजे काव्याला आवाहन असतें. विशेषत: जिला काव्याचें अंगभूत देणें आहे अशा माउलीला त्या वेळीं शब्दांची अन् यमकांची कधींच वाण पडत नाहीं. यमकें, श्लेष तिच्या समोर एखाद्या पट्टेवाल्याप्रमाणें अदबीनें उभीं असतात. कल्पना आणि उपमा दासदासींप्रमाणें धांवत येतात. अशा प्रकारें मुखावाटें काव्य झरत असतें. दळण सरत असतें.

मोट चालू असतांना असाच एक सूर ऐकूं येतो. आणि तो म्हणजे मोटेच्या चाक–कण्याचा ! त्या कुर्कुचुंग कुर्कुचुंग आवाजाच्या आवर्तनानंतर भरल्या मोटेचें पाणी धो ऽ ऽ आवाजानें अगदीं समेवर थारोळ्यांत पडतें. थारोळ्याला लागून असलेल्या कुंडांतून पडणाऱ्या पाण्याचा झुळझुळ आवाज त्याला साद देत असतो. न गाणाऱ्यालाहि इथें गळा फुटतो. "नी स रे ग रे नि स" निषाधापासून सुरू होऊन कोमल गंधारला हळूच टिचकी मारून आलेली अशी ती बहुधा तीन स्वरांचीच धून असते. स्वरविस्तार फार थोडा म्हणजे मध्य सप्तकाच्या पंचमापर्यंत एवढाच बहुधा असतो. लोकगीतें स्फुरलीं तींच मुळीं अशा प्रकारच्या धूनमधून स्फुरलीं. गीत गातां पुढचें कडवें सुचत नसलें तरी ही धून चालूच असते. आणि हृदयाच्या निवेदनाला ही धून आवाहन होतांच काव्य जणुं स्वरांनीं भिजत भिजत बाहेर पडतें. हृदयांतून काव्य स्फुरत असतें, आणि—

"आंतल्या आंत
मन बसे सारखें गात ॥"

असें हें मन हृद्गताला स्वरांची साथ देत असतें. स्वरालाहि कांहीं अर्थ असतो. आमचे कांहीं विद्वान् टीकाकार नेमकें हेंच विसरतात.

'आशयाचा तूंच स्वामी
शब्द वाही मी भिकारी

अनु० ३८३८५ क्रमांक नों: दि ९२-९७४

मागण्याला अंत नाहीं
आणि देणारा मुरारी ॥

नवकाव्याचे प्रणेते मर्ढेकर यांनीं, मागण्याला अंत नाहीं, इतकें मागणें मुरारीजवळ मागितलें.—परंतु त्याचबरोबर त्यांनीं कृष्ण मुरारीजवळ त्याच्या गोड मुरलीचा एकच सूर मागितला असता तर—! परंतु नेमका तोच मागायला ते विसरले. मोलाचें काव्य स्वराला अन् नादाला महाग झालें. अर्थातच इथें अभिव्यक्ति दडली आणि दुर्बोधता तेवढी पदरीं पडली.

शास्त्र हें निसर्गाचा हात धरून आलेलें असतें. शास्त्राला झिडकारून नावीन्य प्रस्थापित करण्याचा तुम्ही कितीही प्रयत्न करा, शास्त्र हें तुमच्या छातीवर पाय देऊन उभें असतें. "जुनें जाउंद्या मरणालागुनी" हें फक्त रूढीच्या बाबतींत ठीक आहे. कारण मानवी मनाच्या आढींतूनच ही रूढि उद्भवलेली असते. परंतु शास्त्राचें तसें नाहीं. तें अनुभूतींतून निर्माण झालेलें असतें. इथें विषयाला अनुसरून लोकसंगीतावरच लिहीत आहें. लोकसंगीतांतील स्वराची धून गीत बनून आल्यानंतर त्या लोकगीताचा तर्ज तुम्ही पाहा. तो योग्य त्या रसपरिपोषानें कोणत्या तरी रागाचें स्वरूप घेऊन आलेला असतो. कोणत्या तरी रागाची त्यांत झलक असते. वास्तविक रागरागिणींचें ज्ञान लोकगीत स्फुरलेल्या या अशिक्षित लोकांना कसें असणार ? परंतु त्यांच्या या मर्यादित स्वरसमुच्चयांत त्या त्या रागाचा शुद्ध गाभा येऊन जातो. कु. विमल चोरघडे यांनीं "संगीतविहारांत" लोकसंगीतावर लेखमाला लिहिली आहे; ती स्वरलेखन उमजून कुणीं लक्षपूर्वक वाचली असेल तर माझें म्हणणें त्याला पटल्याशिवाय राहणार नाहीं. त्याचप्रमाणें कुमार गंधर्व यांनीं गायिलेली माळव्यांतील लोकगीतांची माधुरी ज्यांनीं चाखली असेल त्यांना माझ्या या विधानाची प्रचिति आल्यावांचून राहणार नाहीं. तेव्हां आणखी पुन्हां या ठिकाणीं नोटेशन्सच्या आणि कोटेशन्सच्या भानगडींत मी पडूं इच्छित नाहीं. कुमार गंधर्व यांनीं गायिलेलीं लोकगीतें ऐकून मी एवढेंच सांगू इच्छितों कीं,

"इथें ॐकार हुंकार
एकमेकां साद देती
अंगावरले रोमांच
अभिप्राय सांगताती ॥"

लोकगीतें फक्त दळतां कांडतां आणि मोट हाकतांच निर्माण झालीं असें माझें म्हणणें नाहीं. प्रत्येक श्रमजीवी समाजांतून तीं निर्माण झालीं आहेत. शेतकऱ्याबरोबरच कातकरी, विणकरी सर्वच यांत सामील आहेत. संत कबीर हात-

मागावर बसले असतांना धोट्याच्या दोन्ही बाजूंच्या फेंकीमध्यें त्यांना राम-रहिमची धून ऐकूं येत असे. संत कबीराचें उदाहरण मी मुद्दाम देतों. कारण कबीर हे निरक्षर होते. "मसि कागज स्याही सीयो नहीं रे" (मला कागद-शाईचा स्पर्श झालेला नाहीं) असा त्यांनींच स्वतःबद्दल निर्वाळा दिला आहे. या अशा जगत्वंद्य नामवंतांच्या किंवा अनामिकांच्या हृदयांतच वीणा नादत असतो. असा हा अमोल ठेवा ज्याला लाभला असेल अशांच्या मुखांतूनच ही अलौकिक लोकगीतें बाहेर पडलीं आहेत.

वीणा नादतां अंतरीं
झाल्या संगीताच्या कळा
घाम गाळीतां गाळीतां
इथें साम निर्मियला ॥

थोडक्यांत सांगायचें म्हणजे असा हा घाम गाळून निर्मिलेला साम होय.

• • •

# लोकगीतें आणि संगीत

—डॉ. सरोजिनी बाबर

आमचा भारत देश स्वतंत्र झाला आणि या देशाच्या पुनरुत्थानाचें कार्य स्वयंस्फूर्तीनें सुरू झालें. पंचवार्षिक योजना निघाल्या. गांवोगांवचा विकास सुरू झाला. दळणवळणाचीं साधनें वाढलीं. सामान्यांचें जीवन सुधारूं लागलें. त्यांचेजवळील असामान्य गुणांचा विकास घडत चालला. गुणांची पारख होऊं लागली. सर्वसामान्यांच्या जवळचें असामान्यत्व बघून त्यांचा सन्मान होऊं लागला. गौरवाची भाषा निघाली. देशाच्या वैभवाचें मोजमाप होऊं लागलें.

हें मोजमाप होत असतांना ज्या अनेक बाबींचा विचार झाला, त्यांपैकीं लोकगीतें व लोकसंगीत ही देखील एक महत्त्वाची बाब म्हणून लक्षांत घेतली गेली. भारताच्या हर ठिकाणच्या आकाश वाणीनें या गोष्टीची दखल घेतली. त्यामुळें एके काळीं सर्वसामान्य जनलोकांच्या मनांत लोकप्रिय असलेलीं लोकगीतें व त्यांचें संगीत पुन्हां लोकमान्य होत चाललें. सामान्य कलाकार जगापुढें येत चालले. त्यांचा सहानुभूतीनें विचार होऊं लागला. मानसन्मान घडूं लागला. चार मोठ्या माणसांत त्यांची ऊठबस होऊं लागली. त्यांच्या अंगच्या कलेची वाहवा होत चालली.

म्हणून आजकाल लोकगीतें व लोकसंगीत यांचा सगळीकडे बोलबाला होऊं लागला आहे. ज्या गोष्टीकडे विचारवंतांचें दुर्लक्ष झाले होतें, त्याच गोष्टी आतां संशोधनाचा विषय म्हणून मानानें पुढें येऊं लागल्या आहेत. त्यांची लोकप्रियता वाढत्या वयाचें लेणें लेवूं लागली आहे.

आमच्या मराठी मायबोलींतील लोकगीतें आणि त्यांचें संगीत ह्यांनीं आमच्या आम जनतेची संस्कृति सांभाळली आहे.आपल्याजवळ सांठवलेल्या सुंदर कल्पनांनीं आणि चित्तवेधक सुरावटींनीं त्यांनीं विचारवंतांचीं मनें जिंकलीं आहेत. एवढेंच नाहीं तर आपल्यामुळें जीवनांतील उच्चतम सौंदर्याची पारख करायला मानवाला शिकविलें आहे. पिढ्यान् पिढ्यांनीं जिवाभावानें सांभाळलेल्या ह्या धनदौलतीची त्या कारणानें निरनिराळ्या कलाकारांनीं मोठ्या आवडीनें जोपासना केलेली आहे.

लोकगीतांच्या व संगीतांच्या ह्या कलाविलासामुळें लक्ष्मी आणि सरस्वती यांचा मोठा सुंदर मेळावा बसविला आहे. साहित्यलक्ष्मीबरोबरच त्यामुळें स्वर-लक्ष्मीहि मानानें आज वावरते आहे. आणखी म्हणून रस्त्यानें एकतारीवर गीत गात जाणारा एकतारीवाला किंवा कोका वाजवीत दारोदार भिक्षा मागीत फिरणारा कोकेवाला हा एक सन्माननीय कलाकार म्हणून ओळखला जाऊं लागला आहे! आमच्या देशांत घडूं पाहणारें पुनरुत्थान जें होतें आहे म्हणावयाचें तें किंवा सांस्कृतिक जीवनाची जी जोपासना होते आहे म्हणावयाची ती हींच होय.

काव्याचें माध्यम स्वीकारून निर्माण झालेलीं लोकगीतें अंत:करणानें जेवढी श्रीमंत असतात व कल्पनेनें जेवढी वैभवशाली असतात, तेवढींच तीं सुरावटीच्या दृष्टीनेंहि प्रतिभासंपन्न असतात. मनानें तीं गांवरान असलीं तरी विचारानें नागर असतात. त्यांचा जन्म जनलोकांच्या भावनेंतून व अंत:करणांतील सर्वोत्तम विचारांतून होत असल्यामुळें त्यांची भाषा रोजच्या बोलींतील असली, तरी तिची छाप भाषाशास्त्र जाणणारांच्या मनावर पडते, मोहिनी घालते. तसेंच ह्या लोकगीतांचा स्वरविलास हा दिसायला व ऐकायला एकदम साधा वाटला, तरीहि संगीताचा तो पाया आहे व भारतीय संगीताचें तें ऐश्वर्य आहे, ही भाषा जाणत्या संगीतज्ञाला करायला तो भाग पाडतो.

म्हणून लोकगीतें व त्यांचें संगीत या गोष्टी वाटतात तेवढ्या साध्या तर नाहींतच पण त्या म्हणाव्या एवढ्या सोप्या देखील नाहींत. कारण हा एक तर संस्कृतीचा वारसा आहे आणि परिपाठाचा भाग आहे व दुसरें म्हणजे जिव्हाळ्याचाहि विषय आहे. त्या कारणानें उगाच कोणालाहि लोकगीतें मिळत नाहींत, येत नाहींत आणि सांगायचें म्हणजे पाहिजे तशीं समजतहि नाहींत. मनाला व जिभेला ह्यांचें वळणच असावें तरच त्यांचा सहवास लाभतो अशी वस्तुस्थिति आहे

त्यामुळें लोकगीतें म्हणतांना त्यांची परंपरागत चाल–सुरावट–जेवढी महत्त्वाची तेवढाच शब्दांचा उच्चारहि महत्त्वाचा. त्याखेरीज खरा ढंगदारपणा या गीतांना लाभत नाहीं.

संगीत शास्त्राच्या दृष्टीनें विचार करतांना हीं लोकगीतें चार ते पांच स्वरांतच गाईलीं जातात व कोणताहि एक राग ते आळवीत नाहींत. त्यांची स्वररचना होते ती गीतानुकूल भावनाविष्काराप्रमाणें व म्हणून ती नेहमींच बदलती रहाणारीहि असते. निरनिराळे मिश्र राग हीं गीतें थोड्याबहुत प्रमाणांत आळवतात व प्रामुख्यानें 'केरव्या' चा तोल सांभाळतात.

लोकगीतांतील ओवी कशी गाईली जाते याचें या संदर्भात नमुन्यादाखल म्हणून जरूर उदाहरण घेतां येईल.

प्रत्यक्ष ओवीचे प्रकार म्हणजे चार चरणी ओवी, साडेतीन चरणी ओवी, तीन चरणी ओवी किंवा क्वचित् प्रसंगीं पांच चरणांचीहि ओवी असते. शिवाय ही निरनिराळ्या प्रकारची ओवी गातांना तिला पूरक म्हणून ध्रुवपदासारखी खास अशीं वेगळीं चरणें जोडण्याचाहि प्रघात आहे.

राम अवतारीं सीताबाईला दुःख भारी
कृष्ण अवतारीं राज रुक्मीन करी

हीं ओवी गातांना——
दर ओळीला 'साजणीबाई' हा शब्द तर जोडावयाचाच. शिवाय—

"राम त्यो घरीं न्हाई सुकली जाई"

हा स्वतंत्र चरणहि जोडावयाचा व ओवी पुरी गावयाची.

–२–

चूल बानवशी कसा देवारा लखलखी
आतां माजी भैना माझ्या आई चंवळण शिकी

ही ओवी गातांना या दोन्ही ओळी गाऊन झाल्यानंतर "सई माजे" हे शब्द प्रथम जोडावयाचे व नंतर——

सई माज्या गडनीला ग चैन पडना
सरूच्या झाडाखालीं ग राघूमैना

या ओळी ध्रुवपदाप्रमाणें जोडून दरवेळीं म्हणावयाच्या असतात.

–३–

किती ग पुण्य केलं तूं तर कुंभाराच्या विटं
दयाळाचीं माज्या चरणं सांपडलीं कुठं

ही ओवी गातांना प्रत्येक ओळीनंतर—

आट्यापेटयाचा खेळ मोत्याचा
कृष्णा गारुडी बाई गारुडी
गौळण झाली वेडी
सर्व सोडूनी बाई सोडूनी

हा सर्व भाग म्हणावयाचा व नंतर दुसरी ओळ म्हणून मग पुन्हां हाच सर्व भाग म्हणत ही ओवी पुरी गावयाची अशी एक पद्धति आहे.

— ४ —

तुळशीबाई नको फिरूंस जंगलांत
जागा मी तुला देतें चिरेबंदी ग वाड्यांत

ही ओवी गातेवेळीं प्रत्येक चरणानंतर—

काळी चोळी, मोत्या जाळी
हार गुंफी, गळ्यां घाली
काळी करटूली कारलीं
वटी मैनाची भरली
आम्ही गौळणी बायका
इंद्रावानी गोष्ट सांग
दिल्लीच्या नायका
झाडावरी मोर काय
बोलतो ऐका

एवढी सगळी गोष्ट ढंगदार रीतीनें म्हणावयाची व नंतर ओवीचा दुसरा चरण संपवून पुन्हां हेंच सर्व गात तिची अखेरी साधावयाची अशी देखील एक मोठी सुंदर रीत आहे.

— ५ —

मल्हारी देव बोल कां ग म्हाळसा रागामंदीं
गेलोंवतों शिकारीला बानू सांपडली बागामंदीं

ही ओवी गातेवेळीं या ओवीच्या प्रत्येक चरणानंतर—

एकशेंची चंची, दोनशाचीं पानं
तीनशाचा कात, जायफळं आठं

लवंगा साठ, नगरीच्या नारी
पग भिरीभिरी, हातामंदीं वजरी
पायामंदीं जोडा, कौलारी वाडा
बंधू माज्याला दिष्ट झाली
पदर की ग घाला

एवढी हकीकत सांगणारी गोष्ट जोडावयाची व नंतर दुसऱ्या चरणाला देखील हाच भाग गाऊन ती ओवी पुरी करावयाची, अशीहि ओवी गावयाची एक रीत आहे.

— ६ —

बापाजी समींदर बया मालन न्हाती गंगा
दोगांच्या सावलींत कर आंगूळ शिरीरंगा

ही ओवी गावयाची झाली म्हणजे मग प्रत्येक ओवीनंतर—

सई बाई सलाल ग
बंधूच्या दरवाज्यावरी
केवढा दलाल ग
हरिश्चंद्र जागा झाला
सूर्या चमाकला

ह्या ओळी म्हणावयाच्या व नंतर दुसरी ओळ म्हणून पुन्हां ह्या सर्व ओळी म्हणत ती ओवी संपवावयाची अशीहि एक चाल रूढ आहे.

— ७ —

बाई ती लाडकी भैनाबाई पिवळ्या पायानं दारीं येई
आन ती मिरविती वरमाई पायघड्यावरूनी जाई

ही ओवी गावयाची झाली तर या ओवीच्या दोन चरणानंतर “सईबाई ग सखूबाई” असें म्हणतांना दुसरा चरण त्यास जोडींत या ओवीचा पहिला भाग संपवून दुसरा तसाच म्हणीत ओवी पुरी करण्याचा आणखी एक प्रकार आहे.

ही ओवी प्रत्यक्ष कशी म्हटली जाते व त्यावेळीं सुरावट कशी राहते तसाच कांहीं बदल घडलाच तर तो कसा घडला जातो याचें प्रात्यक्षिक घेतां यावें म्हणून या ओवीच्या गाण्याच्या पद्धतीचें ‘सा रे ग म’ येथें देत आहें.

राग–मिश्र ताल–केरवा.

| | |
|---|---|
| धं नी सा सा सा रे ग रे | नीं सा ऽ रे सा नीं धं |
| – ० ० ० ० ० ᵕ ᵕ | ० ० ० ० ० ० – |
| आन् ती मि र वि ती ऽ ऽ | व र ऽ मा ई ऽ ऽ |
| १ + | १ + |
| सा सा ऽ सा रे ग रे सा | सा सा ऽ रे रे ऽ |
| ० ० ० ० – ᵕ ᵕ ० | ० ० ० ० – – |
| पा य ऽ घ ड्या नी ऽ ऽ | व री ऽ जा ई ऽ |
| १ + | १ + |
| रे रे ऽ रे ग म | ग ग ऽ रे सा नीं ध |
| ० ० ० – ० – | ० ० ० ० ० ० – |
| स ई ऽ बा ई ग | स खू ऽ बा ई ऽ ऽ |
| १ + | १ + |
| धं धं ऽ नीं सा रे ग रे | नीं सा ऽ रे सा ऽ |
| ० ० ० ० – ० ᵕ ᵕ | ० ० ० ० – |
| पा य ऽ घ ड्या नी ऽ ऽ | व री ऽ जा ई ऽ |
| १ + | १ + |

याशिवाय ओवी गाण्याचे आणखी पुष्कळ वेगळे प्रकार आहेत. तसेंच एका ओवीची चाल इतर अनेक ओव्यांना लागू शकते असाहि प्रकार घडून येतो. मात्र त्या सर्व एकाच अंगलटीच्या असल्या पाहिजेत इतकेंच काय तें.

एखादी ओवी कोणत्याहि चरणानंतर कसल्याहि शब्दांची जोड न घेतां देखील गाइली जाते. त्या दृष्टीनें उदाहरणार्थ म्हणून पुढील ओवी पाहतां येईल.

हें बाई थोरलं माजं घर हंड्या गल्लास लोंबत्याती
सासूबाईचं बाळराज धनी वाडयाला सोबत्याती

ह्या प्रकारच्या ओवीची स्वररचना अशी केली जाते.

"हें बाई थोरलं माजं ग घर"

एवढाच एक चरण या गायन–प्रकारांत दोनदां म्हटला जातो व पुढें तीच पद्धति प्रत्येक चरणासाठीं अवलंबिली जाते.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| हें | बा | ई | थो र लं | मा जं | ग घ र |
| ग | प (प) ध | | ध र्म प | ग प | ध ध नी |
| हें | बा ई | | थो र लं | मा जं | ग घ र |
| ध | प – | | ध म प | म ग | र्म प प |

ओव्यांच्या प्रमाणेंच खेळांचीं व इतर गाणीं–लोकगीतें–म्हणण्याचे प्रकार देखील अनेक आहेत. यापैकीं बरींचशीं गाणीं सामुदायिक रीतीनें (कोरस) म्हटलीं जातात. परंतु सुरवातीला एकदोघींनीं तीं सांगावयाचीं व नंतर इतरांनीं त्या बरहुकूम म्हणावयाचें असा प्रकार असतो.

हीं गाणीं म्हणतांना ठराविक प्रकारची लय आपोआप निर्माण होते. त्यामुळें एका तालांत व एका सुरांत हीं गाणीं सर्वांकडून म्हटलीं जातात. गाण्यांतील भाव असेल त्याप्रमाणें आवाज येथें कमीजास्त प्रमाणांत फेकला जातो. करतालांनीं त्यांची लय कायम राखली जाते. आणखी डोळ्यांनीं त्याबद्दलची खूण सांगितली जाते. म्हणजे डोळे बोलके होतात व सर्वांना एकत्र यायला खुणावतात.

शेतांतील प्रसंग उभा करतांना व शेतवाडीचें सौंदर्य सांगतांना कांहीं लोकगीतें खास शेतीविषयक म्हणून म्हटलीं जातात. तर अशा वेळचें शेतमळ्यांतील विहिरीच्या पाटावरचें पाणी व पावसानें पडलेलें पाणी कोठें जावें व त्याचें पुढें कशांत रूपांतर व्हावें किंवा त्यामुळें कोणती निर्मिति व्हावी याची कल्पना पुढील लोकगीतांत दिलेली आहे—

पाणी जाऊं द्या जाऊं द्या ।
पळाणी पाटाव ॥
तिथं लिंबाचा लिंबाचा ।
आहे साटाव ॥
कोथमिर म्हणीती म्हणीती ।
माजा सुवास देखा वो ॥
कांदा म्हणीतो म्हणीतो ।
सभेला मांडूं नका वो ॥
कारलं म्हणीतं म्हणीतं ।
उघडुनी पाहूं नका वो ॥
वांगं म्हणीतं म्हणीतं ।
माजा रुबाब देखो वो ॥
लसूण म्हणीतो म्हणीतो ।
माजा सुवास देखा वो ॥
मेथी म्हणीती म्हणीती ।
पैशाला पेंडी वीका वो ॥
पाणी जाऊं द्या जाऊं द्या ।
पळाणी पाटाव ॥

हें गाणें म्हणावयाचें तर त्याची रीत सुरावटीच्या व म्हणण्याच्या ढंगा-प्रमाणें अशीः—

पा ऽ णी ऽ जा ऊं द्या जा ऊं द्या
ग ऽ पध ऽ ध नी धप ध नी धप
प ला णी पा टा व
ग प ध ध ध — प
प ला णी पा टा व ऽ ऽ ऽ
ग प ध ध (ध) प ग रे
प ला णी पा टा व
ग प ध ध (ध) प

व ह्या एका ओळीच्या या पद्धतीनेंच बाकीच्या सर्व ओळी म्हणावयाच्या.

लोकगीतें म्हणावयाचीं म्हणजे त्यांची पद्धति ठरलेली असते. उच्चार स्पष्ट असावे लागतात. त्यांच्या श्रवणानें वर्णित प्रसंग साक्षात् असा समोर उभा राहावा लागतो. त्याखेरीज हीं गीतें परिणामकारी होत नाहींत. म्हणूनच तीं गाण्याची सवय गळ्याला हवी असते. कान पटाईत असावे लागतात. ऐकतांक्षणींच तीं गातां आलीं पाहिजेत अशी तीं गाणारांची अपेक्षा असते.

ह्या गीतांसाठीं साथीला लागणारीं वाद्यें देखील ठराविक असावीं लागतात. त्यांपैकीं, ढोलक, ढोल, मृदंग, झांजा, शहनाई, एकतारी इत्यादि हीं वाद्यें होत. यांच्या जोडीला लोकनृत्यांचे वेळीं पायांतील घुंगूर बोलत असतात ते आणखी वेगळे. या वाद्यांच्या ढंगदार साथीवर हीं गीतें भारी शानदार असा शृंगार धारण करतात व विलोभनीय अशा स्वरविलासांनीं धरणीवर एक आगळीच दुनिया उभी करतात.

लोकगीतें व त्यांचें संगीत ही आमच्या भारत देशाची एक फार मोठी अशी धनदौलत आहे व भारत देशाचें मन अशाच वाडवडिलार्जित धनदौलतीवर सुखानें पोसलेलें आहे. म्हणून या लोकसंगीताचा अभ्यास होणें व जतन होणें हें आजच्या युगधर्माचें प्रधान कर्तव्य होय.

कारण ह्या संगीताचे व गीतांचे पालनकर्ते आज मावळत चालले आहेत; व नव्या पिढीला त्याची अद्याप गोडी लागलेली नाहीं. म्हणून ह्या गीतांचें त्यांच्या पारंपारिक सुरावटीसह ध्वनिमुद्रण होणें अगत्याचें आहे. कारण ह्या गीतांना व संगीतास नव्या काव्याचें किंवा शास्त्रीय संगीताचें जग मानवणारें नाहीं. तीं त्यांच्याच मूळच्या थाटांत सौंदर्यशाली होऊन बसलीं आहेत. नव्या पेहरावाची त्यांस मुळींच गरज नाहीं.

● ● ●

# विदर्भाचीं अस्मितादर्शक कांहीं लोकगीतें

—श्री. ना. रा. शेंडे, नागपूर

विदर्भातील लोकसाहित्याला एक आगळेंच स्वरूप प्राप्त झालें आहे. ऋषि–महामुनींची, थोर साधुसंतांची, पराक्रमी राजांची आणि ख्यातनाम साहित्य-कारांची ही पावनभूमि आहे. प्रभु रामचंद्र आणि भगवान् श्रीकृष्ण व महात्मा गौतम बुद्ध आणि श्री चक्रधर स्वामी यांच्या पदरजानें ही भूमि पुनीत झाली आहे. रुक्मिणी व दमयंतीसारख्या देवतांचें हें माहेरघर. लोपामुद्रा व इंदुमती या पुण्यशील स्त्रिया काय किंवा अगस्त्य, जमदग्नि, मार्कंडेय, भृगु इत्यादि ऋषि किंवा महामुनी काय विदर्भाचेच. ऐतिहासिक काळाच्या दृष्टीनें पाहिलें तर श्री नृसिंह सरस्वती स्वामी, जनार्दन स्वामी, चोखोबासारखे साधुसंत, मराठीचे आद्य कवि मुकुंदराज व एकनाथ, अमृतराय, देवनाथ, दयाळनाथ, विठ्ठल, अनंत, शिवादिन-केसरी, शिवकल्याण, मोरेश्वर, उत्तमश्लोक, गुलाबराय, यांसारखे पद्यकार, भारवी-सारखे महाकवि, भोजासारखे राजकवि, हेमाद्रि, बोपदेव यासारखे निबंधकार आणि भट्ट भास्कर, त्रिविक्रम यासारखे ज्योतिषी विदर्भातच झाले. कविकुलगुरु कालिदास राजशेखर, भवभूतीसारखे महान् पंडित कवि व नाटककार यांचें विदर्भात केवळ वास्तव्यच झालें नाहीं तर विश्वमान्य वाङ्मयनिर्मितिहि, याच पवित्र भूमींत निर्माण झाली. मराठी वाङ्मयाची व संस्कृतीची उज्ज्वल परंपरा अगदीं पुरातन काळा-पासून या विदर्भात चालत आली आहे. विदर्भाच्या अस्मितेचे आणखी विशेष म्हणजे छत्रपति शिवाजी महाराजांचें आजोळ विदर्भातीलच आहे. बुलढाणा जिल्ह्यांतील सिंदखेडराजा हें जिजामातेचें माहेरघर. तर येथून कांहीं दूर अंतरावर मेहुणा हें गांव श्री संत चोखोबा यांचें जन्मस्थान आहे. नागपूरचे शौर्यशाली राजेभोसले घराणें तर इतिहासप्रसिद्धच आहे. या थोर व्यक्तींचें त्या त्या काळचें माहात्म्य, त्यांची कर्तृत्वशक्ति आणि जीवनसंस्कृति यांचें दर्शन घडविणारीं अनेक लोकगीतें व कथा निरनिराळ्या स्वरूपांत विखुरलेलीं आढळतात. तसेंच त्या काळच्या उदात्त चालीरीति व व्यवहार यासंबंधीचेंहि लोकसाहित्य संशोधनांतीं दृष्टोत्पत्तीस येतें. यांपैकीं जीं लोकगीतें उपलब्ध झालीं आहेत त्यांपैकी कांहीं प्रस्तुत ठिकाणीं देत आहे. त्यावरून त्या कालखंडांतील कांहीं विशेष घटनांची व जीवन-संस्कृतीची कल्पना येऊन या परिवर्तनाच्या काळांतहि, त्या लोकसाहित्याचें तेज किती पोषक व प्रभावी आहे याची जाणीव होईल.

## सीता घाली वरमाला

राजा जनकाचा भव्य सभामंडप. सोन्याचांदीनं आणि माणिकमोत्यांनीं मढविलेला. एका उंच सिंहासनावर राजा जनक बसला आहे. सारे सभाजन हातामध्यें वरमाला घेऊन उभ्या असलेल्या सीतेकडे अनिमिष नेत्रांनीं पाहात आहेत. लंकेचा राजा रावण मिशीवर ताव देऊन पहिल्या रांगेंत बसला आहे. ठिकठिकाणच्या बलाढ्य तरुण राजपुत्रांनीं स्वयंवराचें धनुष्य उचलण्याचा प्रयत्न केला. शेवटीं राजा रावण खो खो हंसत उभा झाला. त्यानंहि धनुष्य उचलण्याचा यत्न केला; पण तो तें घेऊनच खालीं पडला! सभेंतील सारे लोक उपहासानं हांसले. रावणानं लाजेनं खालीं मान घातली. शेवटच्या रांगेंत राजपुत्र राम बसला होता. तो पुढं आला. सर्वांच्या नजरा त्याचेवर केंद्रित झाल्या. त्यानं लीलेनं धनुष्य उचललं आणि ते खाडकन् मोडलं. सर्वांनीं टाळ्या वाजवून रामचंद्राचं सहर्ष स्वागत केलं. सीतेनं रामाला वरमाला घालून त्याला वंदन केलं.

या कथाभागावर अनेक लोकगीतें आहेत. त्यांपैकीं हें एक—

राजा जनकाचा मंडप, सोन्याचांदियेचे खांब
माणिक—मोत्यांची झालर
देशोदेसियेचे राजे, बसले आटून दाटून
रावण बसला गर्वानं
देत मिशीवर ताव, पाहिल्या रांगेंत बसयेला
पानाचा इडा चघळला
राजा जनकाचं आसन, बाजू उभी सीता माय
हातीं व्हती वरमाळ
उचला उचला धनुष्य, दावा तोडून एकदां
सीता वरीयेलं त्येला
राजे मोठाले हारले, रावण जोरानं हंसला
दंड ठोकून उभा झाला
धनुष्य उचलाया गेला, भार छातीवर पडला
देह भुईवर टाकला
राजे समदे हासयले, रावणाचें तोंड उतरलें
मान लटलट हाले
राम आखरी बसला, दरबारांत उभा झाला
सर्वांले परनाम केला

 क्रमांक ........................ नों. दि. 

समदे पाऱ्हया लागले, डोरे चित् येक झाले
सर्गीचे देव आले
अंगुठ्यानं फेकियेला, धनुष्य वर उडवला
गमतीनं झेलियेला
धनुष्य रामानं फिरवला, त्येचा खांडोर पाडला
सीता घाली वरमाला
झाला टाळ्यांचा गजर, रामाचा जयजयकार
आनंदाचा वाहे पूर

## लगन रामाचं लागलं

आणि मग रामाचा विवाह झाला. हा सोहळा राजा जनकाच्या घरीं झाला. एकाच मंडपांत राजा दशरथाच्या चारहि पुत्रांचें लग्न लागलें असाहि भाव या गीतांत आहे—

अयोध्या नगरींत वाजा न् वाजते
रामचन्द्र पूर्न जाते
नगरीच्या अंधींमधीं राजाची होई दाटी
दशरथाच्या घरीं झाली रामाले शालमुंदी
राजा जनकाच्या घरीं मंडप देला जुना
पाटावर बैसल्या दशरथाच्या चौघी सुना
राजा जनकाच्या घरीं मंडप देला एक
पाटावर बैसले दशरथाचे चौघे लेक
आकाशाचा मांडो पुरथईचं बोवलं
राजा जनकाच्या घरीं लगन रामाचं लागलं

## रुखमा किसनानं पळवली

वऱ्हाडांत कौंडण्यपूर नांवाचं गांव आहे. प्राचीन काळीं हें गांव मोठें समृद्ध नगर होतें. रुक्मिणीचं हें माहेरघर. भगवान् श्रीकृष्णानं या नगरींत येऊन रुक्मिणीचं हरण केलं. वऱ्हाडी स्त्रिया आजहि कौंडण्यपुराची मोठ्या अभिमानानं महती गातात. या गीतांत मुरलीधर श्रीकृष्णानं रुक्मिणी–हरण कसं केलं तें दर्शविलं आहे.

आमुच्या वराडांत
कौंडनपूर नगर, देवी रुखमीचं घर
आमुच्या वराडांत
रुखमीले आलं न्हानं, वर शोधावा जा न्
आमुच्या वराडांत
गडोगडचे राजे आले, देवी रुखमी वराले
आमुच्या वराडांत
अमरिताची वाहे गंगा, राजाईनं केला दंगा
आमुच्या वराडांत
रुखमीच्या लगनाले, चांद तारे धांवत आले
आमुच्या वराडांत
सोन्याचा भुईपाट, रुखमी पाहे वाट
आमुच्या वराडांत
रुखमीचं माहेर घर, आला देव मुरलीधर
आमुच्या वराडांत
मानक हिऱ्याची खदान, लुटाय आले भगवान
आमुच्या वराडांत
उभं हिऱ्याचं मंदिर, तेथी लपे मुरलीधर
आमुच्या वराडांत
रुखमा मंदिरांत गेली, देव किसनानं पळवली
आमच्या वराडांत
देवाचं जुळें नातें, कौंडनपूर गाणं गाते

रुक्मिणी स्वयंवराचें आणखी हें एक गीत पाहा—

आखरचा आंबा वारूचं भरण
हासे हिवकाची रुखमीण
कन्या रुखमिणीचा, सुपलीटोपलीचा खेळ
येत्या जात्या मार्गावर
हाताचें कांकण, हाताले झालें जड
बेगी जोडा सैंयवर

तीळ तांदूळ बोलले, कन्या झाली उपवर
लागेल बट्टा कुळावर
पिता हिवक बोलला, इंद्रसभेंत जाईन
इंद्र देवराज वर पोरीले पाहीन
कन्या रुखमीण बोलली, इंद्र देव राजा
तोहि वर नोहे माझा
पिता हिवक बोलला, ढवळागिरीले जाईन
ढवळागिरीचा महादेव वर पोरील पाहीन
कन्या रुखमीण बोलली, महादेव राजा
तोहि वर नोहे माझा
पिता हिवक बोलला, मी माहुरा जाईन
दत्तात्रय देवराज वर पोरीले पाहीन
कन्या रुखमीण बोलली, दत्तात्रय देवराजा
तोहि वर नोहे माझा
पिता हिवक बोलला, इंद्रसभेंत जाईन
शिशुपाल देवराज वर पोरिले पाहीन
शिशुपालाचं नांव घेतां, कन्या रुकमीण रडली
अंबिकेच्या देवळीं गेली
अंबेका माझे माय, तिरागुळाची भरीन पार
शिशुपाल कर दूर
आक्षीचा काजळ, केली नखाची लेखणी
द्वारकेच्या महालीं, धाडल्या पत्रिका लिहोनी
द्वारका दरबारीं, देव बसले सिंहासनीं
पत्रिका बाचवोन, खुशाल झाले मनीं
देवी रुखमीण बोलली, ताट पुढचं सरकावा
बेगी सैंयवराले येवा
देवा गोविंदानं, धाव सत्वर घेतली
रुखमीण द्वारकेला नेली

## राजा नळ वरियेला

अत्यंत रूपवती आणि गुणवंती दमयंती वऱ्हाडचीच. त्या रूप व गुणसंपन्न विदर्भकन्या दमयंतीला वरण्यासाठीं थोर थोर राजांनीं व देवादिकांनीं अनेक यत्न केले. पण दमयंतीला एकहि वर पसंत पडला नाहीं. ती उदास झाली. खिन्न झाली. नंतर पुण्यश्लोक राजा नळ तेथें आला. दमयंती हरवली आणि तिनं त्याला वरलं. या कथेचं बहारदार वर्णन—

काहून झुरीमुरी वो, बाई दमयंते ।
तुह्या रूपाले माय तो, दिठ कोणाची लागते ॥
काहून उगीमुगी वो, बाई दमयंते ।
तुह्या आंगीचा ताप बा, कोण वाढवते ॥
काहून सुनसान, बाई दमयंते ।
वराडांत तु ह्या वो, अभार मोत्याचं झुलतें ॥
काहून लाजवते वो, बाई दमयंते ।
समदे देवक आले वो, तुले वरावाले ॥
काहून गजरा सुंदरे, बाई दमयंते ।
तुहं रूपक लुटाया, देवराजे आले खोटे ॥
काहून मंगले गुणवंते, बाई दमयंते ।
तुहा स्वादक घेवाया, जमले समदे भुंगे ॥

आणि मग पुण्यश्लोक राजा नळ आला. दमयंती व नळाची दृष्टभेट झाली. एक ताल धरून हें गीत गायिलें जातें—

आला तुहा वो, तुहा वो
सखा राजा नळ
त्यानं बाई मांडलं, मांडलं
सत्व गुणाची घागर
त्या बाई घागरींत, घागरींत
तुहं रूप चकाकत
त्येच्या ग–ऱ्यालं, ग–ऱ्यालं

तुझं ताईत लटकलं
त्या बाई ताईतांत, ताईतांत
रूप नळाचं दिसतं
बाई दमयंता हासत, हासत
राजा नळ वरियेला

## मऱ्हाटीचं उभं धन

भंडारा शहरापासून सुमारें सहा मैल अंतरावर, वैनगंगेच्या कांठावर आंभोरा हें तीर्थक्षेत्र आहे. प्राचीन काळीं हें गांव अम्बिका नगरी म्हणून फार प्रसिद्ध होतं. या पवित्र स्थळीं मराठीचे आद्य कवि मुकुंदराज यांचें वास्तव्य होतें. श्री. चैतन्येश्वराच्या कृपाप्रसादानें, याच आंभोरा क्षेत्रीं मुकुंदराजांनीं "विवेकसिंधु" नांवाचा मोठा ग्रंथ लिहिला. या तीर्थक्षेत्रीं वैनगंगा, कन्हान, आम, जांब व सूर अशा पांच नद्यांचा मोठा मनोहारी संगम झाला असून, एकच प्रवाह पांच दगडी पितांबरातून वाहात जातो. येथें एका उंच टेकडीवर श्री चैतन्येश्वराचें सुंदर मंदिर आहे. या मंदिराच्या पायथ्याशीं कवि मुकुंदराजाचा मोठा प्रशस्त सभामंडप आहे. या तीर्थक्षेत्राचें माहात्म्य ग्रंथांतून तर प्रत्ययास येतें, पण लोकगीतांतूनहि त्याची मनोज्ञ प्रचीति येते. विशेषत: कैकाडी लोकांच्या मधुर वाणींतून आंभोरा तीर्थक्षेत्र माहात्म्य ऐकायला येऊन मन प्रसन्न होतें.

वैनगंगेच्या तीरावर, परगटे सिरीहरी
आंबोरा गांव भारी
पांच नद्या एका घारी
वैनगंगेच्या तीरावर, मुकुंदराज करे तप
मऱ्हाटीचा वाहे जप
तीर्थाची जागा एक
भनारा शहयरांत, पांच कोसाची ये हाक
दरशनाले जमले लोक
कपाराले लागे राख
भनारा शहयरांत, टर्बूजाची लाल फाक
मुकुंदराजाचा धाक
पांच नद्या एक साथ

आंभोरा तीर्थात, घंटा वाजे घण घण
भनाऱ्यांत हासे सोनं
मुकुंदराज वाटे दान
आंभोरा तीर्थात, बाणगंग परसन्न
म्हाटीचं उभं धन
हरपलं देहभान

पूर्वीचे मनारा म्हणजे आजचे भंडारा शहर. वैनगंगा या शहराला लागूनच पुढें आंभोऱ्याकडे वाहात जाते. वैनगंगेला पूर्वीची बाणगंगा, सरस्वती, जान्हवी अशींहि नांवें आहेत.

## काली 'मेघदूत' लिही....

कवि कुलगुरु कालिदास यांचं रामटेक या तीर्थक्षेत्रीं बरेच दिवस वास्तव्य होतं. त्या वास्तव्यांत त्यांनीं 'मेघदूत' नांवाचं मोठं काव्य निर्माण केलं. हद्दपार झालेला यक्ष रामगिरीवर म्हणजे रामटेकच्या एका उंच डोंगरावर वास करतो. त्याला आपल्या प्रेयसेची तीव्र आठवण होते. विरहानं व्याकुळ झालेला तो यक्ष आपल्या प्रियतमेसाठीं, मेघामार्फत निरोप पाठवितो, संदेश देतो. प्रस्तुत गीतांत काली म्हणजे कालिदास कवि यक्षाच्या भूमिकेत दर्शविण्यांत आला आहे. हें गीत मला एका कैकाडी तरुणीच्या तोंडून ऐकायला मिळालें. एकदोन गीतं म्हणून झाल्यावर नेहमीच्या पद्धतीप्रमाणें ती तोंड वेंगाळून माझ्या पत्नीला म्हणाली. "देवो माय गिरजा बये, भुऱ्या तोंडाचे मना बये, वो मोठ्या गुणाचे माय बये, तुहा भाऊ नेवालो येईन व तुझ्या जन्माचं कल्याणं व्हईल. माही माय देते. टुकू टकू पाहयते. देव् माय गौरा बये..." मी त्या तरुणीला वटवट बंद करायला सांगितलं आणि म्हटलं, "हें बघ, तूं एक चांगल गाणं म्हणून दाखव. पसंत पडलं तर चार आणे देईन." तिनं एक टक माझ्याकडे पाहिलं नि स्वतःच हंसून टाळी वाजवीत ती प्रस्तुत भावपूर्ण गीत गाऊं लागली—

रामाचं रामटेक, गडावर गड भारी
तेथी बैसला राज काली
रामाचं रामटेक, दिसा मागोन गेले दिस
काली करे अस्तुरीचा ध्यास
रामाचं रामटेक, सुर्व्या डुबाया लागला
काळा मेघ वर आला

रामाचं रामटेक, काळी मेघाले बोलला
माही खबर दे अस्तुरीला
रामाचं रामटेक, काळी गह्यवरून गेला
डोंगराचा माथा रडाया लागला
रामाचं रामटेक, कळसावर उभी बीज
काळी हृदयांत अंकुरे प्रीतबीज
रामाचं रामटेक, मोर शिखरावर उडे
काळी धाय मोकलून रडे
रामाचं रामटेक, दाही दिशा झाल्या एक
ऐकोन काळीची आर्त हांक
रामाचं रामटेक, हात जोडे मेघराज
आज्ञा करावी महाराज
रामाचं रामटेक, काळी सांगे खाणाखुणा
जाता राखा सावधाना
रामाचं रामटेक, सरके मेघ उत्तरेला
वारा सोबतीले आला
रामाचं रामटेक, डोळ्याची केली दौत
लिही आसवाच्या अक्षारांत
रामाचं रामटेक, काळी " मेघदूत " लिही
राहे रामटेक ग्वाही

पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, ती तरुणी गीत संपतांच स्फुंदून स्फुंदून रडूं लागली. तिला काय झालं तें कांहीं कांहीं कळेना. मी तिला परोपरीनं विचारलं पण तिची वाचा फुटेना. तिचे हुंदके असह्य वाटूं लागले. थोड्या वेळानं कांहींशी शांत होऊन ती उद्गारली, माझाहि काळी होता, महाराज, पण आतां ती पुढं बोलूं शकली नाहीं. मी दिलेला पावला तिनं तसाच पुढं सारला. आपला फाटका पदर सावरीत ती उभी झाली, आणि आपल्या धन्यासंबंधीचं स्वरचित गीत गात ती पुढं चालूं लागली. त्या गीताच्या एवढ्याच ओळी कानीं पडल्या—

तो दिलाचा दिलबर
माहा काळी भरतार

गेला राणा सर्गावर
खूण आहे हुर्घावर
आणि मग तिनं जोरानं आर्त हाक दिली—
वोऽ कालीऽऽ वो कालीऽऽऽऽ

## धन्य धन्य मेहुणपुरी

मेहुणा हें गांव बुलढाणा जिल्ह्यांतील चिखली तालुक्याच्या ठिकाणापासून २८ मैल अंतरावर पश्चिम दिशेला आहे. मेहुणपुरी हें या गांवचें मूळ नांव. सिंदखेडराया नगरीचे राजे लखुजी जाधव यांनीं आपल्या मेहुण्याला या भागाची जहागिरी दिली होती. म्हणून या गांवाला मेहुणपुरी म्हणजे मेहुणा हें नांव पडलें. श्री संत चोखोबा यांचा या गांवीं जन्म झाला. त्यांच्या जन्माची कथा कांहींशी अद्भुतरम्य आहे. मेहुणा गांवाजवळ कोरेगांव आहे. पूर्वीं हें गांव मोठें सघन शहर होतें. त्याची जहागिरी विश्वंभर राजाकडे होती. तो पंढरपूरच्या विठ्ठलाचा मोठा भक्त होता. त्यानें एका महारणीजवळ पंढरपूरच्या बडव्यांसाठीं शंभर उत्तम आंबे पाठविले. परंतु पंढरपुराजवळ आल्यावर एका वृद्ध ब्राह्मणानें फार भूक लागली म्हणून आंबे मागितले. पण तिनें नकार दिला. ब्राह्मणानें बरीच गयावय केली, तेव्हां तिला दया येऊन तिनें त्याला एक आंबा दिला. तो त्यानें चाखून पाहिला, पण फारच आंबट आहे म्हणून तो आंबा त्यानें परत केला. उष्टा आंबा पाटींत कसा ठेवावा म्हणून तिनें तो आपल्या ओटींत दडवून ठेवला. बडव्यांना नव्याण्णव आंबे देऊन ती मेहुणा गांवीं परत आली तेव्हां विश्वंभर राजानें तिला सर्व आंबे दिले ना ? असा प्रश्न केला. तेव्हां तिनें एक आंबा कमी दिल्याचें प्रांजळ उत्तर दिलें. कुठें आहे तो ? राजानें दरडावून विचारलें तेव्हां तिनें ओटींतील उष्टा आंबा दाखविण्यासाठीं पदर पुढें केला तों आंब्याऐवजीं एक बालक आढळला. पांडुरंगाचीच ही कृपा—त्यानेंच वृद्ध ब्राह्मणाचें रूप घेऊन सत्त्व पाहण्यासाठीं आंबा चोखोवा म्हणून त्या बालकाचें नांव चोखोबा असें पडलें. हाच चोखोबा पुढें महान् संत झाला. त्याच्या जन्माची आणि मेहुणपुरीची महती दर्शविणारें एक लोकगीत असें—

करा भजन सावकाश, करा भजन सावकाश
चोखामेळा विठ्ठल भक्त, मेहुण्याचा थोर संत
एका बाजू पूर्णा वाहे, दुज्या बाजू आमना धावे
मध्यभागीं निर्मळा साजरी, चोखा जन्म घेई मेहुणपुरीं
करा भजन सावकाश, करा भजन सावकाश
कोरेगांवीं राजा विश्वंभर, देवभक्त मोठा चतुर

पंढरपुरीं आंबे शंभर, पाठवे रंभा महारीण कर
माता रमा ग्यानीं ध्यानीं, रातदिस विठ्ठल ध्यानीं
वाटे भेटे पहाया रात, ब्राह्मणरूप घे पंढरीनाथ
बहु भूक लागली माता, आंबा द्यावा एक तरी आतां
सती रमा मनीं गहिवरली, आंबा देवोनि उभी राहिली
आंबा निंबट बहु आंबट, घे परत नाहीं चोखट
उष्टा आंबा ओटीं लपवून, उरले बडव्यांना दे मोजून
महारीण परतली मेहुणपुरीं, विचारे विश्वंभर परोपरी
रमा काढे ओटीचा आंबा, एक बालक आला जन्मा
बापा तोच चोखोबा संत, जन्मा ये महारघरीं भगवंत
करा भजन सावकाश, करा भजन सावकाश
चोखो मेळा करतसे भजन, पांडुरंग घेतसे तान
ओंका निमला सोयरा फेरी, घाले नाचत कर्म मेळा
साधु संत मेहुणपुरी आले, गजर निर्मळा तिरीं चाले
धन्य धन्य मेहुणपुरीं, संत चोखा पावन करी
करा भजन सावकाश, करा भजन सावकाश

## मागोमाग धावे विठोबा

पंढरपुरीं संत चोखोबाला बडव्यांनीं फार त्रास दिला. एकदां तो विठ्ठल दर्शनाला गेला. त्याची सावली मंदिराच्या पायरीवर पडली म्हणून बडव्यांना कपाळ फुटेपर्यंत मार दिला. चोखोबांनीं त्यांना वारंवार जोहार करून क्षमा याचना केली आणि मग तो पंढरपूर सोडून मेहुणपुरीला येण्यास निघाला. त्या प्रसंगाचें आणखी हें एक गीत——

करी जोहार जोहार चोखा संत
तळहातीं सांडतें रक्त
बहु जाहला गुन्हा मायबाप
नाहीं होणार आतां ताप
ध्याना जोहार गा पंढरी राया
मेहुणपुरीं राखावी माया

मंगळवेढयास नाहीं आतां काम
ना उरे पंढरीत राम
जातों मी लोभ असूं द्यावा
राहील तुझाच गा धावा
चालूं लागे वाट चोखोबा
मागोमाग धावे विठोबा

## जयजयकार करी रंगमहाल

बुलढाणा जिल्हा शहरापासून सुमारें ५४ मैल अंतरावर सिंदखेडराजा हें एक मोठें गांव आहे. इ. स. १६०० च्या काळांत हें गांव एक मोठें राजधानीचें शहर होतें. जिजामातेचे वडील राजे लखूजी जाधव यांचें हें शहर. धनधान्यांनीं तें अगदीं समृद्ध होतें. राजे लखूजी जाधवांचा संबंध टापूंत मोठा वचक होता. त्यांनीं आपल्या पराक्रमांनीं विदर्भ व मराठवाडा प्रदेशांत मोठा लौकिक प्राप्त केला होता. छत्रपति शिवाजी महाराजांची पुण्यशील माता जिजाबाई यांचा जन्म सिंदखेडराजा येथेंच झाला. सरदार शहाजी यांचे वडील मालोजी राजे कांहीं काळ लखूजी जाधवाकडे होते. त्या वेळीं माता जिजाबाई व शहाजी हे लहान होते. ते रंगपंचमीच्या दिवशीं महालांत एकमेकांवर गुलाल उधळून खेळत होते. बाजूला राजे लखूजी जाधव व मालोजी बसले होते. खेळांत दंग झालेल्या त्या बालकाकडे पाहून राजे लखूजी उद्‌गारले, ‘ काय नामी जोडा दिसतो नाहीं !’ त्यावर मालोजी उत्तरले, ‘तेंव्हां आपली कन्या जिजा आमच्या शहाजीला दिली तर आपल्या दोन्ही घराण्यांचा हितसंबंध खचितच दृढ होईल. अर्थात् आपली इच्छा असली तर ’ आणि मग त्याच रंगपंचमीच्या दिवशीं जिजा व शहाजी यांचा वाङ्‌निश्चय त्या रंगमहालांतच झाला, असें सांगतात. यासंबंधीं हें एक गीत पाहा—

रंगपंचमीचा दिस, हासे सोनियाचि रास
सिंदखेड नगरींत, बसले राजे विडा खात
जमले गडोगडचे राजे, मधीं शोभले लखूजी राजे
कन्या जिजाई गोजराइ, खेळे शहाजी संगे राजाई
रंगाची नवरंग शाही, धुंद झाल्या दिशा दाही
रंगमहाल रंगला, जिजाईनं गुलाल उधळला

राजा लखूजीनं पाहिला, मालोजीस कानीं बोलला
काय मालोजी सरदार
पोरं दिसती जणु वधु–वर
काय आहे तुमचा विचार
मालोजी सरदार हासला, लखूजीचा हात धरून बोलला
काय सांगूं लखूजी तुम्हाला
राजी आहे तुमच्या मर्जीला
जोडा शोभे तुमच्या कीर्तीला
जाधव–भोसले घराणें थोर, माना तुकवी नाना वीर
जिजा–शहाजीचा गौरव, झाला साखरपुड्याचा भाव
रंगमहालीं भरला रंग
राजे सारे जाहले दंग
सिंदखेडनगरीं गुंग
गुणवंती जिजाईचा आन् राजे थोर शहाजीचा
जयजयकार करी रंगमहाल सिंदखेडराजा, सिंदखेडराजा

## शिवाजी आजोळीं आला

एकदां छत्रपति शिवाजी महाराज आपल्या आजोळीं म्हणजे सिंदखेड-राजाला आले. त्यांना अत्यानंद झाला. जिजामातेच्या चरणीं त्यांनीं माथा टेकला. मातेनें त्यांना आशीर्वाद देऊन म्हटलें, बाळ शिवबा, स्वराज्याची स्थापना करण्यास समर्थ हो. भारत तुझ्या पराक्रमाचा पोवाडा अखंड गात राहो. तेव्हां छत्रपति शिवाजी प्रतिज्ञा करून विनम्रतेनें उद्गारले, 'माता, तुझ्या आशीर्वादानें भवानी मातेची ही अजिंक्य तलवार तुझी इच्छा अवश्य पूर्ण करील.' या घटने-संबंधींचें हें एक हृदयस्पर्शी गीत पाहा.

शरद पौर्णिमा मंगल दिन तो
महाराष्ट्र राणा
शिवाजी आजोळीं आला
रात चांदणी निसर्ग डोले
दाही दिशांतुनि निनाद उठले
जयघोषांना भरतें आलें

अनुक्र. ३०३८४ दि:
ग्रंथ ........................ २५३ ...



छत्रपति आला
शिवाजी आजोळीं आला
घोड्यावर तो स्वार होवोनि
हातीं तळपे तलवार भवानी
दिव्य तेज तें पसरे अवनी
जनकैवारी आला
शिवाजी आजोळीं आला
प्रतापी पुरुषा ओवाळाया
सहस्र नारी धांवत आल्या
मंगल गाणीं गाऊं लागल्या
देवदूत आला
शिवाजी आजोळीं आला
चरणीं त्यानें डोकें टेकलें
माता जिजाला वंदन केलें
गहिवरोनि माता बोले
सुखें नांद बाळा
शिवाजी आजोळीं आला
स्वराज्य स्थापूनि राक्षि देश रे
शक्ति बुद्धि तूं खर्चि घाल रे
जनकल्याणा देह अर्पि रे
इच्छा हीच बाळा
शिवाजी आजोळीं आला
तलवार भवानी साक्षीला ही
विश्वास ठेव तूं माझे आई
स्वराज्याची शपथ घेत ही
आशीर्वाद द्याया
शिवाजी आजोळीं आला
कुरवाळोनि बोले जिजाई
बाळा माझ्या अजिंक्य राही
भारत तुझे रे पवाडे गाई

पराक्रमी राजा
शिवाजी आजोळीं आला
सिंदखेडचा भाग्य दिवस तो
अखंड पोवाडा आजहि गातो
अमर कीर्तिचा अमर राग तो
प्रमाण शिवबाला
शिवाजी आजोळीं आला

खालील गाणीं खेड्यांतील बाया एकत्र जमून ‘ कोजागरी ’ सारख्या रात्रीं फुगड्या घालून नाचतांना व उड्या मारतांना गात असतात.

## सुवर्णाचें अजब आत्मवृत्त

येक फकिराची झोई
त्यांतून निंघाला झिंगा भोई
झिंगा भोयानं फेकलं जाव
त्यांतून निंघाला महादेव
महादेवानं फेकलं पाणी
त्यांतून निघाली गिरजा राणी
गिरजा राणीनं फेकला गुलाल
त्यांतून निघाला लोध्या कलाल
लोध्या कलालानं मांडली भट्टी
त्यांतून निघाला रूंजा वट्टी
रूंजा वट्टयानं धुतलं धुनं
त्यांतून निघालं पिवळं सोनं

## कसं घेऊं सोनं

आमच्या शेजारीं दामाजी सोनार
त्यानं घळोले **बिछोयाचे** जोळ
**कांकणाचे**
**बुगळयाचे**

घेना व घेना व तुमी अंबाई नारी
कशी घेवूं माय नंदा जावा घरीं
—कसं घेवूं सोनं
आहे हेवा परोपरी

## राजाची गौराई

हत्तीच्या सोंडीवर फुटला मोगरा
उलसाक तोळला नगरीं वास गेला
नंगराच्या राजानं नंगरभात देली
उलसिक गौराई माळीवरते नेली
माळीच्या खाल्लयानी खंडलेले तये
राजाची गौराई तथीं धुनं धुये

## विड्याच्या पानाचें गोतवळ

अशी नागीण भली तांडयांत येला गेली
अशी नागीण भली बजारीं मांडली....
अशी नागीण भली चुना भरतार
अशी नागीण भली काथ तिचा देर
अशी नागीण भली जायपत्री जावू
अशी नागीण भली इळ्याच्या पानाची गोतवळ
अशी नागीण भली सुपारी गोळ केली

## सयनाजी

स्त्रिया पुरुषांची गमतीनं थट्टा करतांना हें गीत म्हणतात——

दारीं पेंडवाचं झाळ — सयनाजी
दारीं पाव्हने कोन कोन — सयनाजी
ते आले ना तुमचे भाऊ — सयनाजी
त्यायची गाळी काळी मोळी — सयनाजी
त्यायचा धुरकरी कैकाळी — सयनाजी
त्यायची गाळी बुरख्याची — सयनाजी
ते फिरतं गांवोगांवीं — सयनाजी

आणि मग जोरजोरानं टाळ्या देत किंवा टिपऱ्या वाजवीत त्या स्त्रिया फेर धरून म्हणतात.

अशा बाई माणसानं
भुरटल्या कनसानं
सिवयाच्या जिनसानं
—पल्टी खाय बाई, पल्टी खाय

## जन्मा आली गारगोटी

खेळ मांडला कंसानं किसनाच्या मामानं
त्येनं बलावले राहुकेतु किसनाचे जीव घेऊं
खेळ मांडला कंसानं किसनच्या मामानं
राण्या भरल्या वाड्यांत इसरला गणगोत
खेळ मांडला कंसानं किसनाच्या मामानं
त्येनं लुटला खजिना रडे घरांतला दाणा
खेळ मांडला कंसानं किसनाच्या मामानं
त्येची पेटली राहुटी जन्मा आली गारगोटी

## राजा दशरथाला पिंडदान

फाल्गुना नदींतून हात दशरथानं देला
रामचंद्र नाहीं घरीं सीतानं पिंड देला
सीतानं पिंड देला साक्षदार कोण कोण
कपिला गाय नदी फाल्गुन....

या गाण्याची आख्यायिका अशी :

गयाजवळील फाल्गुन नदींत पितरांना पिंडदान देण्याचा प्रभु रामचन्द्राचा नित्य क्रम होता. एके दिवशीं नगरीबाहेर जातांना हें काम त्यांनीं सीतेकडे सोपविलें. परत आल्यावर, सांगितलेलें काम कोणाला साक्षीला ठेवून केलें? असा प्रश्न त्यांनीं सीतेला विचारला. त्या वेळीं तिनें साक्ष सांगितली :

१. फाल्गुन नदी. २. कपिला गाय. ३. कावळा. ४ धोबी. पण या सर्वांनीं आपण साक्षीला असल्याचें रामचन्द्राजवळ साफ नाकारलें. तेव्हां सीतेनें या सर्वांना शाप दिला.

१. फाल्गुन नदीस : तूं गुप्तपणें वाहशील.
२. कपिला गाईस : तूं नर्क भक्षण करशील व तुझें तोंड अपवित्र राहील.
३. कावळ्यास : तुझा एक डोळा नष्ट होईल.
४. धोब्यास : तुला नेहमीं मळ दूर करावा लागेल.

आणि मग हे सर्व शरण आल्यावर, सीतेनें त्यांना उःशाप दिला.

१. फाल्गुन नदीस : तुझ्या पात्रांत पिंडदान केल्यानें पितरांचा उद्धार होईल.
२. कपिला गाईस : तुझ्या गोमूत्रानें लोक पवित्र होतील.
३. कावळ्यास : तूं पिंड उचलल्यास तुझा उद्धार होईल.
४. धोब्यास : कपड्याचे कितीहि गठ्ठे असले तरी कोणाचा कोणता कपडा हें तुझ्या लक्षांत राहील.

माय फाल्गुन नदींत
राजा दशरथाले पिंडदान
समदा टळे घातपात

या नदीस दशरथाचा हात पिंडासाठीं बाहेर येतो, असा भाविकांचा अजूनहि समज आहे.

## लग्नाचीं गाणीं

पांच जणी सवासनी सहावी वरमाये
मोती न्हानो-याले जाये
मांडोवाच्या दारीं चिखोल काहयेचा झाला
नवरीचा बाप न्हाला
मांडोवाच्या दारीं पिवरे पिवरे पाय
नवरी न्हानली वरमाय
वरबाप वरमाय न्हायाले बसती
वरमायेच्या रत्नांचा चुडा हातीं
मांडोवाच्या दारीं वाजा न् वाजते
नवरदेव पूर्न जाते
बासिंगाचें मोतीं मामा सावरते
नवरीचा बाप अति तथि उभा राहे
जागा जानोशाले पाहे

नवरीचा बाप साराई उपासी
त्याले घळली एकादसी
मांडोवाच्या दारीं अहेराचं आलं ताट
वराची वरमाय बसे डाया हात
बसा बसा वरमाय भाऊच्या डाईवळे
तुमच्या भावाचं अहेराचं ताट चढे
मांडोवाच्या दारीं नवरदेव झोपी जाते
बासिंगाच्या कया मामाजी आवरते

प्रस्तुत गीतांत वरपक्षाची वरचढ दर्शविण्यांत आली आहे. नवरदेवाच्या आईवडिलांचे सर्व सोहळे पुरविले जातात. नवरीचे आईवडील मात्र कमीपणा धारण करून, वरपक्षाची सर्व बाबतींत बूज राखतात. त्यासाठीं त्यांना दिवस दिवसभर उपाशीहि राहावं लागत. नवरदेवाचा असो कीं नवरी मुलीचा असो, मामा पुढें पुढें करीत असतो व त्याचा मान राखूनच दोन्ही पक्षांतील वऱ्हाडी वागत असतात. मामाच लग्नांतील सूत्रधार असतो व त्याच्या मर्जीप्रमाणे वागण्यांत येतें.

माय म्हणे माझ्या शिरीं किरना आजचा दिवस सोन्याचा
सात कू पिढ्या बापा .... हाये धरम् कुळाचा

× × ×

नटला माय सजला, नवरदेव कसा कसा
अगा, कपारच्या बिशिंगाबिगर पर्नू जासीन कसा
बांधा बांधा बाशिंग झुलार, बाशिंग झुलार
लामन दिवा बापा, जानूं द्या मोहरं
कापूर कस्तुरी बाऱ्या फुलाचा झेला व फुलाचा झेला
कशी कू नवरी आहे नंजरी घाला
नंजरी घालतां ढळते माय व, ढळते बाप
त्याहींच्या आसवानं निंवते रात
दिस कू निंघता माय का बोले व माय का बोले
........घ्या लगनाले सुरव्या आले
नवरा–नवरीचा झेंडा लागला
काहून बापा गा उशीर झाला

साडी क् फडकी घेतां उशीर झाला
........जिरं ध्या वो, जिरं ध्या
या नंगरच्या बायानू
कोना कोनाले वो वानू
हे जिरं विकलं या रामचंदर वाण्यानं
हे जिरं घेतलं या सीताई राणीनं
साठवूनसुठवून गेली गंगेच्या पाण्याले
रामचंदरानं माय सीताईले नेले
पाणी भरल्या बायानू नंगरी बाजा वाजे
राम क् सीतावर परनू जाते
माहेरचे सीताई तूं त् दंडपाळण्या झुलसी
सासरचे सीताई तूं त् लळत पाण्या जासी
माहेरचे सीताई तूं त् अंगणांत खेलसी
सासरचे सीताई तूं त् घरांत व् दळसी
अगा नवरदेवा, अगा नवरदेवा
हातचं कड गा, सोन्याचं कड गा काय केलास
काय सांगूं माते, काय सांगूं माते
हार हारिलो, जुवा खेळिलो
....... गावाले येळा देलो
जलम जोडा माते, धरा आणलो ........

× × ×

खांद्यावर कुदळी
माती खंदूं गेला
खंदयेली माती
उजवली राती
अयग भरलें त्यानं
दिव्या — जोतीनं
खंद खंद कुदळी
मन मन माती

देऊळ खचलं अरध्या रातीं
सिरचें बाशिंग गनेरी हातीं
राजाले सांपडला माणिक मोती
तो मोती देई राणीच्या हातीं
राणी क् पाहते दिव्याचे जोतीं

× × ×

झुळ झुळ झुळ झुळ गंगा वाहे वो गंगा वाहे
मांडवा लोट जाये
रामचंद्राच्या देवल कन्या वो देवल कन्या
मांडवा वान वाटे

× × ×

खाय ग सिताई दूधभात
लाग व् सीताई सासुच्या वाटं
नवऱ्यानं नवरी नेली, कां रडतां पोरी व् कां रडतां पोरी
उली उली खोबरं घ्या, जा आपुल्या घरीं
तळ्याच्या तळपारीं झालर आंबा
तेथीं काय उतरले सीतादेवी रंभा
रामानं काढली कंबरची सुरी
सांभाळ सांभाळ सीता आपला वली
मी काय सांभाळूं, काय सांभाळूं आपला वली
पाचा क् वर्साची आहे तुमच्या दारीं
नाहीं पाहयेला मी मायबाप, मायबाप
नाहीं पाहयेला मी रामाचा देश वो
रामायेच्या देशीं हिरवे पिवरे झाड
तेथीं क् झुलती मोतीयाचे घड वो
तळ्याच्या तळपारीं रामाचं मंदिर
तेथींच आहे सीतादेवीचं माहेर

## आलं सरड्याचं लगन

आलं सरड्याचं लगन, वराडी कोण कोण ?
मांजर म्हणे मी मावशी, बसीन बोहल्यापाशीं
माशी म्हणे मी सवाशीन, ताटल्यांत येवून बसीन
कुत्रं म्हणे मी लांडगा, खाईन पापड पोई सांडा
हळया म्हणे मी महार, लगन नेईन दूरवर

नवरदेवासोबत जे मित्र जातात त्यांना लांडग्याचा मान असतो. ते नवरदेवाच्या ताटांत जेवतात. त्याचप्रमाणें नवरीचे भाऊ लांडगे होऊन नवरदेवाचे जोडे वगैरे लांबविण्याचा प्रयत्न करतात. तसे दोन्हीकडचे लांडगे रक्षकाचें काम करतात. महार हा म्होरक्या असतो. लग्नाच्या बाबतींत त्याचा महत्त्वाचा पुढाकार असतो.

## बेंडकीचं लग्न—

नवरी बेंडकाई सजली
पिवरं फडकं नेसली
आली सासरीं सुवासीन
न्हानोरा मांडला तिनं
चार बेंडक्या जमा झाल्या
बोहल्यावर नाचल्या
तेथीं आला खेकड मामा
बेंडकाईच्या कामा
पाणी बरसे धो धो कसा
वाजे वाजंत्र्याचा वाजा
पाटील बोवा सरप घुसे
झुरळाले येई हासे
बेंडकाईची वरात निघे
माय पानोला मागं लागे
करे बेंडकाई डरॉव
जागं झालं समदं गांव

## सुनेची कसोटी

खाष्ट सासू सुनेला खरकटलं खुरकटलं खाऊं घालते आणि तिचेकडून अशक्य अशा कामाची अपेक्षा बाळगते. सून मोठी कष्टाळू व प्रामाणिक असते. सासू तिला एकेक काम सांगतच जाते आणि ती आज्ञा प्रमाण मानून करीतच जाते. एकप्रकारें सासू सुनेची पूर्ण कसोटी घेते. सच्छील सुनेला तिचेवर सोपविण्यांत येणारी प्रत्येक जबाबदारी निसर्ग धाव घेऊन मदत करीत असतो.

कन्याची खरवळ वर तेलाची धार
जेवना गवंर लवकर
जेवली खावली, पडली डकरी
पुढचा धंदा गवराईले मारी....
सांगा ना सासूबाई, कोणताहि धंदा
जा गवरे, बिनबंधाची मोरी आण
जंगलांत गेली ळळत बसली
सात का सरप जमा झाले
बाईच्या मोरीले बिलंगले
घ्या घ्या ना सासूबाई, बिनबंधाची मोरी
भली गे भली कवठाराचे पोरी
तुह्या गे आंगीं इद्या भरून आली ।। १ ।

सांगा ना सासूबाई, कोणताहि धंदा
जा गवरे, बिन पोहऱ्याचं पाणी आण
अडावर गेली ळळत बसली
पांच का कासव जमा झाले
बाईच्या हेलाले बिलंगले
घ्या घ्या ना सासूबाई, बिन पोहऱ्याचं पाणी
भली ये भली कवठाराचे पोरी
तुह्या गे आंगीं इद्या भरून आली ।। २ ।

सांगा ना सासूबाई, कोणताहि धंदा
जा गवरे, बिन गोट्याचं धुणं आण
नदीवर गेली ळळत बसली

पांच का बगले जमा झाले
बाईच्या धुण्याले बिलंगले
घ्या घ्या ना सासूबाई, बिन गोटयाचं धुणं
भली गे भली कवठाराचे पोरी
तुझ्या गे आंगीं इद्या भरून आली ॥ ३ ॥

सांगा ना सासूबाई, कोणताहि धंदा
जा गवरे बिन मुसराचं कांडण आण
उखरापाशीं गेली, ललत बसली
पांच का चिमण्या जमा झाल्या
बाईच्या कांडणाले बिलंगल्या
घ्या घ्या ना सासूबाई, बिन मुसराचं कांडण
भली गे भली कवठाराचे पोरी
तुझ्या गे आंगीं इद्या भरून आली ॥ ४ ॥

सांगा ना सासूबाई, कोणताहि धंदा
जा गवरे, बिन आगीचं जेवण आण
चुलटयापाशीं गेली, ललत बसली
पांच का जोवती जमा झाल्या
बाईच्या सैयंपाकाले बिलंगल्या
घ्या घ्या ना सासूबाई, बिन आगीचं जेवण
भली गे भली कवठाराचे पोरी
तुझ्या गे आंगीं इद्या भरून आली ॥ ५ ॥

गवराईचं सत, इठ्ठल ये धांवत
बाजा कू वाजते गंगनांत

---

डकरी–जड देह. मोरी–मोळी. कवठार–गबाळ. हेल–मडकें. इद्या–विद्या. मुसर–मुसळ. उखर–उखळ. चुलटा–चूल. जोवती–ज्योती.

**माता, बाळ आणि पाळणा—**

बाळा जो जो रे, सिरीकिस्ना
देवकीनंदना, बाळा जो जो रे
माय गाणं गाई,
राधा झोका देई, बाळा जो जो रे
झोप जगन्नाथा,
चांद तुझ्या माथा, बाळा जो जो रे
नोको लळू बाळा,
माहा दाटे गळा, बाळा जो जो रे
माह्या झेंडूच्या फुला,
लावलीस माया, बाळा जो जो रे
इकुसा बाळा देह,
समद्या पुर्थ्वी मोलं, बाळा जो जो रे
असा पाहसी टकटक,
नाई तुले धाक, बाळा जो जो रे
तुहे सोनियाचे केस,
राजबिंडा तुहा भेस, बाळा जो जो रे
लबाडा तूं झोंप,
मुका घेते तुहा बाप, बाळा जो जो रे

—२—

नीज नीज बाळा, माह्या तान्ह्या गोपीचंदा
हालवतां हात दुखला
गाणं गातां कंठ सुकला
नीज नीज बाळा, माह्या तान्ह्या गोपीचंदा........जूऽऽ ऑऽऽ
खेळून माळून आला माहा सरावन्
वाटी जेवू ओवाळीन........जूऽऽ ऑऽऽ
गाईचं गोठान, भरलं शेणानं, झाडीन मैदान
बाळ खेळलं रायपान........जूऽऽ ऑऽऽ
शेजारने बाई, माह्या घराकडं पाहय
पारण्यांत बाळ हाय........जूऽऽ ऑऽऽ

शेजारने बाई, आंगण झाडूं लाग
तुही मैना माहा राघू
खेलती एका जाग........जूSS आँSS

शेजारने बाई, राख आपली मईना
राघू होईल शहाना........जूSS आँSS

शेजारने बाई, माहा राघू उडल
तुही मैना उडवल........जूSS आँSS

बाळाची मेली माय, पुरुसाचं गेलं काय
नंगरी धुंडाळून पाहय
नाहीं दिसे बाळा माय........जूSS आँSS

लेकुरवारी झाली, जंजारांत गुंतली
सोन्या लेकराचं पायीं
माय माहेर इसरली........जूSS आँSS

दंडाचा व पारना, वाजते कारकीर
बाळ मुरलीधर
शोभते घरदार........जूSS आँSS

पारन्याले हीरकाचे बाई वाजती धुंगरूं
राजसाचा लल माहा
बाई सूर पाहे धरूं........जूSS आँSS

गाईकऱ्या दादा, तुझ्या गाई कलवजो
खेलाया बाळासंगं
हरणाईले बोलावजो........जूSS आँSS

आंब्याची आंबराई, लावली दाटदूट
सावलींत राजसाचा
मांडला चौरंग पाट........जूSS आँSS

रातची येळा झाली, नीज बाळा गोपीचंदा
आनंदाच्या रामचंदा........जूSS आँSS

२

तान्हुल्या, कितीक तुझे रे रंग, तान्हुल्या........
असे कसे तुझे ढंग तान्हुल्या........
अंगणांत तूं खेळ मांडला
फळाफुलांनीं पाट सजविला
राधेवर तूं रंग उधळला तान्हुल्या.... ...
टोपलींत तूं नाग ठेवला
दहींदुधाचा सडा टाकला
रक्ताचा रे टिळा लावला, तान्हुल्या........
देव्हाऱ्यांत तूं जाऊन बसला
देव पूजेचा दूर लोटला
उगाच का रे हंसत सुटला, तान्हुल्या......
कोपऱ्यांत तूं दडून राहिला
कुणाकुणाला खडा मारला
राधेचा कां हात रे धरला, तान्हुल्या.......
घरोघरीं तूं धिंगा घातला
चोरी करूनी साव जाहला
मंजुळेचा नाद कां वरला, तान्हुल्या........
पारावर तूं उभा राहिला
जावूं दिलें तूं झोपीं जगाला
एकटाच मग गातचि सुटला, तान्हुल्या.......

–४–

ऊँऽ ऊँऽऽ........जू जू रे जूऽ जूऽऽ
जू बाळा, वेल्हाळा जू जू रे जूऽ जूऽऽ
माता हालवे पाळणा, गुणवंता
लवकुशा देते झोका, माता सीता
जू जू रे जूऽ जूऽऽ
सीता गाते रे गाणं, कुलवंता
जळते विन्द्रावनी दिवा, जसवंता
जू जू रे जूऽ जूऽऽ

– ५ –

दंडाचा पारना लावीन धरना, नीज बाळा सरावना
दंडाच्या पारन्याले सोन्यांचे आकोळे, बाळा तुही निंद्रा भोळे
दंडाचा पारना वाजते कारकीर, राधा झोपली बिनघोर
दंडाचा पारना दंडुल्या भारते, तानं बाळ जोजुवते
दंडाचा पारना करसूत्र सोनियानं, घर शोभलं नानयानं
दंडाच्या पारन्याले पितांबर साज, उघडा झोपे गणराज
दंडाच्या पारन्याले फुलांची केली शेज, माहा झोंपते काळीज.

– ६ –

बयनाबाईचं बाळ शिकलं रांगायले ।
पापी भावजयीनं कसु बांधली अंगनाले ॥
बयनाबाईचं बाळ म्हणते मामा मामा ।
कडे घेवून नाच गा रघु मामा ॥
शेजी देते शिवी जिची तिले मुभा ।
चरित पाहते देव ईसवर उभा ॥
लेकराची माय पाखराचे पाय ।
भुकेला माहा बाळ बेगी बेगी वाय ॥
लेकुरवारीची बाई करावी संगत ।
तिच्या माझ्या लेकराची घळीभर गंमत ॥
लेकरं खेलती औफेर चौफेर ।
माझ्या चिलियाची लकाके नंजर ॥
बाळामधीं बाळ माहा, बाळ ग्यानी ध्यानी ।
होळा लावली लेकरानं, जिंकली पद्मिनी ॥
नंगराच्या लेकरानं, सजवला साज ।
ऐटदार माहा बाळ, शोभते हंसराज ॥
माळ्याच्या वगिच्यांत, फुलांफुलांची मोठी रांग ।
माह्या बाळाचं पाहून रूप, राधिका झाली दंग ॥
माह्या बाळाच्या गुणाचा, तिनी लोकीं वास ।
देवा देवाले लागली, माह्या राजसाची चुरस ॥

## वर्षा-गीतें

वर्षा ऋतूचे जीवनांत किती महत्त्व आहे, हें कांहीं कोणाला सांगायला नको. मनुष्यमात्राच्या सुखसमृद्धीचं भवितव्य वरुण राजाच्या कृपेवरच अवलंबून असतं. योग्य वेळीं पाऊस पडणं आणि शेतीला त्याचा उपयोग होणं अत्यावश्यक असल्यानं, सामान्य जनता तर पावसाची आतुरतेनं वाट पाहातच असते, पण विशेषत: शेतकरीवर्गाला त्याचा एकसारखा ध्यास लागलेला असतो.

## मृगाचा शिरवा

उन्हाळा कडक आहे. त्याची कालमर्यादा संपत आली तरी मृगाचा शिरवा येण्याचं चिन्ह आढळत नाहीं. जमीन तापून तडकली. तळ्यांतील पाणी आटून कमळाचीं फुलं सुकलीं. नदीचा झराहि आटून गेला. पांखरांची लाही लाही होऊं लागली. पण पावसाची एखादी सर नाहीं. तेव्हां शेतकरी हवालदिल होऊन वरुण राजाची आर्त वाणीनं करुणा भाकतात.

ये बाप्पा, ये पावसा ये ।
तुझ्या चरणाची पूजा मांडूं दे—ये बाप्पा ये ॥
भुई तापली माती सुकली ।
मिरगाची सावली नाचत येवूं दे—ये बाप्पा ये ॥
तऱ्याच्या तरीं कमल सुकलं ।
गाईचं वासरू लई तानेलं—ये बाप्पा ये ॥
बांधीचा बांध तडकून गेला ।
नंदीचा झरा आटून गेला—ये बाप्पा ये ॥
मनीच्या मंदेरी कंठ सुकला ।
मातीचा वास गा उडून गेला—ये बाप्पा ये ॥
इकुसं पांखरूं जीवाची लाही ।
तुहीच आस धांवत ये गा ।
मोत्याचा शिरवा टाकून जा गा—ये बाप्पा ये ॥

वरुणराजानं शेतकऱ्यांची आर्त हाक ऐकली. मृगाचा शिरवा पडला—मोत्याच्या त्या शिरव्यानं शेतकरी आनंदले. तृषितधरेनं समाधानाचा श्वास सोडला. मग जोरदार वृष्टि सुरू झाली. सर्व भूभाग जलमय झाला. आयाबायांना कामधंदा करणं कठीण झालं. शेतीवर गेलेल्या शेतकऱ्यांना घरीं परतणं मुष्किलीचं झालं.

नद्यांना पूर आला. गाईवासरं आसरा शोधून दडून बसलीं. वादळी पावसानं चारी दिशा धुंद झाल्या. अशा वेळीं खेडुतांचे कल्पनातरंग किती हृदयंगम आहेत ते पाहा.

पान्यान् पावसानं धंदा कू नाहीं झाला ।
प्रितीचा श्यामी माहा वावरांतच राहयला ॥
नंदीले आला पूर सूर्व्या बसला डोंगींत ।
चांद लपे डोंगराचा माह्या गांवच्या कुशींत ॥
पान्यान् पावसानं कवलावर बाहे गंगा ।
जीवाचा माहा तान्हा गोकुळांत करे दंगा ॥
मोत्याच्या शिरव्यानं हासे तुरशी–बिन्द्रावन ।
लाटा नंदीच्या झेलत धावे देवकीनंदन ॥
पान्यान् पावसानं चव दिशा झाल्या धुंद ।
गाईच्या गोठ्यामंधीं राधिका झाली गुंग ॥
पावस फेरीवाला गांवोगांवी हिंडे भारी ।
माह्या श्यामीच्या वाहाणा झाल्या कू वल्या दारीं ॥

## श्रावण–भाद्रपद आणि वीज

वर्षा ऋतूंत श्रावण आणि भाद्रपद हे दोन महिने महत्त्वाचे. हे दोन्ही महिने भाऊ भाऊ आहेत. श्रावण हा लहान आणि भाद्रपद हा मोठा. वीज ही त्यांची मोठी आवडती बहीण. तिचे लाड पुरवायला ते सदैव तत्पर असतात. वर्षा-ऋतूंतील महिने आणि नक्षत्र यांचे संबंध दर्शविणारी व पावसाळ्यांतील नैसर्गिक घटनांचा मार्मिकपणा विशद करणारी गीतकथा पाहा.

सावन भादव गा भाऊ प्रीतीचे लई मोठे
बिजुलीच्या जीवासाठीं नेती अभारांत घोडे
बहयना बोलली भावाले, भरा गा सिन्‌गार पेटी
चांद तारे कू तोडून सजवली तिची ओटी
धावला सावन बोलला, कावो बाई झुरीमुरी
काय सांगू दादा, माझ्या चोळीले नाहीं बुटी
भाऊ शोधाले निघाला नागीण भेटली वाटेनं
बापा सावना माझ्या धारा घामाच्या काहून ?
माही बहयना रुसली बुटी नाहीं वो चोळीले

पाताराच्या बाजारांत जातो इकत घेवाले
पायीं हिंडून हिंडून सावन थकला मावला
पातारचा राजा शेष त्याले जाऊन भेटला
भला आलास सावना सांग कांहीं गोठमात
तुझ्या गांवचे शहाणे नाहीं दिसत येत जात
अगा अळदलीच्या घरीं झालं लगीन अवंदा
मिरगाच्या मांडवांत झाला पुनवसाचा सोवदा
सावना तुही बोली नाहीं समजत उमगत
कलपना लई भारी साता रूपानं रंगांत
भाऊ धाकला कू गेला दिस झाले सातआठ
भादवानं निंघावाचा मोठा केलान् थाटमाट
बहयना बिजुली बोलली, मी बी येतें तुझ्यासंग
नोको पाहूं मांगपुळह सावनाचा लाव थांग
शोध लावतां लावतां मेघराजानं अडवलं
त्याहींच्या लढाईंत बिजुलीले आली कळ
घोडा धावत निंघाला बिजुलीनं हाक देली
तोल सुटून बहयना गळबळत् भुई गेली....
मेली बिजुली कण्हत सावन भादव रडले
सर्गीचे चांदतारे आसू पुसाया धावले
सावन भादवाचा मास देव घेते अवतार
गाते त्याहींची कीर्ति पान्या पावसाची धार

## पावसाची सर

पावसाची सर, आली घरावर ।
भिजलं माहं देवघर ॥
पावसाची सर, बिन्द्राबनावर ।
अम्रिताची धार देहावर ॥
पावसाची सर, नाचे अंगणावर ।
गोइंद पाहे एक तार ॥

पावसाची सर, पडे कंठावर ।
हासे पोटचा गरभार ॥

## माझी साडी चोळी भिजली

पावसाची मंगल सर जेवढा उदात्त भाव दर्शविते तेवढेंच ती शृंगाराचें मनोज्ञ दर्शन घडविण्यास समर्थ असते. खालील गीतांतील थोडें शृंगारिक वर्णन पाहा. एक खेडुत तरुणी वनांत गेली असतांना एकाएकी पाऊस आला. तो तिला बिलगला. तिची साडीचोळी भिजली. त्यानें तिचेशीं न कळत नातें जोडलें आणि तिची अब्रू लुटली आणि म्हणून आतां घरीं कसें परत जावें, या विवंचनेंत ती तरुणी म्हणते—

असा कसा बिलगला उरीं, बाई उरीं
माही साडीचोळी भिजली
मी रानांत हिंडत व्हतें, बाई व्हतें
त्यानं कैचें जोडलें नातें
तो सांगून आला नाई, बाई नाई
पदराले हिसका देई
केस डोईचे मोकये केले, बाई केले
बदनाले बदन देले
तो बदनीं नाचत गेला, बाई गेला
माही इज्जत लुटोन गेला
आतां जाऊं मी कयासि घरीं, बाई घरीं
उभा असन् दारीं हरी
बाई वो, माही साडीचोळी भिजली

## पावसानं जोर केला

पाऊस थांबला. गार वारे वाहूं लागले. अंग मादक वातावरणानं रोमांचित झालें. रंगूला मोठा आनंद झाला. पांचव्या दिवसाचं तिनं न्हाणं केलं. ती हिरवी साडी नेसली. पिवळी चोळी तिनं घातली. कपाळीं कुंकवाचा टिळा लावला. सातहि प्रकारचा शृंगार करून, ती निसर्ग-प्रकृति रंगू नदीच्या घाटावर गेली. आणि इतक्यांत पुन्हां आभाळ भरून आलं. पाऊस धो धो कोसळूं लागला. रंगू गांगरून गेली. तिच्यापुढं अत्यंत विषारी डोम्या नाग उभा झाला. त्यानं तिला दंश केला. तिच्या रंगाचा भंग झाला. तिचं विष उतरविण्यासाठीं

पांच जलधारा, हवा, वीज सर्व निसर्ग धावून आलं. मंत्र घातले गेले. रक्ताचे पाट वाहू लागले. विष कांहीं उतरेना. पृथ्वीनं शेषाचा धावा केला. श्री शेष प्रसन्न झाला. त्यानं सर्व विष शोषून घेतलं. गांवांत आनंदी आनंद झाला. त्यासंबंधीचें गीत.

पावसानं जोर केला, जोर केला
गावामंधीं बहर झाला....हो झाला
हिरवा जोट नेसली, रंगू नेसली
अंगीं घाले पिवरी चोळी
सात सिंगार करून, टिळा लेवून
घाटावर रंगू गेली
तेथी डोले डोम्या नांग, डोम्या नांग
रंगाचा झाला भंग
उजव्या बोटीं डंख केला, डंख केला
रंगूचा झोक गेला
पावसाच्या पांच धारा, पांच धारा
बिजलीसंगं आला वारा
मंत्र घाले चार आठ, चार आठ
असुवाचा वाहे पाट
पिर्थवीनं धावा केला, धावा केला
शेष देव प्रसन झाला
पावसानं जोर केला, जोर केला
गावामंधीं आनंद झाला

## पाऊस आला आणि गेला

आला पावस गेला पावस
किस्न जन्म झाला
आला पावस गेला पावस
पोरा झाला मोरा
आला पावस गेला पावस
गंपती मान झाला
आला पावस गेला पावस
मोगऱ्या वास आला

आला पावस गेला पावस
धानाले भाव आला
आला पावस गेला पावस
कणस मोती आला
आला पावस गेला पावस
तुरसि दिवा लावा

## पहिली अखाडी....मृगावरी

आषाढ ते ज्येष्ठपर्यंतच्या बाराहि महिन्यांतील सणवारांचें दर्शन खेडुत बांधवांनीं खालील गीतांत अगदीं सूत्रबद्ध घडवून, आपल्या कल्पकतेबरोबर उत्सवप्रियताहि प्रगट केली आहे.

पहिली अखाळी सर्वे सन हल्कारी
कातून टोपून नागपंचमींची फेरी....
नागपंचमीचे काढले नाग
राखी आली मागोमाग
कचकन लावयेला डोळा
तूं अचकन आला पोळा
पोळ्याचें काढयेलें चित्र
सहज आले तवा पित्र
पितराच्या निसतो दाया
आली दिवाळीची छाया
दिवाळीची पुजली पणती
नागादिवाळी आली नेणती
नागादिवाळीचे पुजतो दिये
पुढं तिसक्रा येऊन जाये

---

**शब्दार्थः**—मिरग–मृग नक्षत्र. इकुसं–छोटंसं. डोंगी–होडी. नाव. सावन–श्रावण मास. भादव–भाद्रपद मास. बिजुली–वीज. बहयना–बहीण. झुरीमुरी–उदास, खिन्न. बुटी–सोन्याचांदीचा काठ. अळदली–आद्रा नक्षत्र. पुनवस्स–पुनर्वसु नक्षत्र. सोवदा–सौ सोवदा–सौदा. आम्रित–अमृत. गरभार–गर्भ. मोकये–मोकळे. बदन–शरीर. पोरा–पोळा. भोरा–भोळा. गम्पती–गणपती.

तिसऱ्यांतच पुजतो सुगळ
पारन आलं दुगुळ
पारन्याचं टाकलं नव
मांडोस आली सव
मांडोसची उभारली गुढी
चैईत आला पुढी
चैईताची उभारली काठी
आली आखोजींची दाटी
अखोजीचा निसतो वाट्या
आल्या दोनहि भाव्या
दोन्ही भाव्यांचा केला रस
मिरगानं मारली घस

## गणेशजन्म आणि माहात्म्य

गणेशसंभव : भाद्रपद पौर्णिमा माहात्म्य. या गीतांत ‘श्री’ चा जन्म कसा झाला हें दर्शविलें आहे. गाण्याची प्रत्येक ओळ म्हणून झाल्यावर ‘सयनाजी’ हें पालुपद हेल काढून म्हटलें जातें. पोवळ किंवा ढिला काष्टा असलेल्या नेमळट माणसाला सयनाजी म्हणतात. सयनय म्हणजे ढिला. त्यापासून सयनाजी.

गिरजा बसली न्हायाले.... सयनाजी
आंगा मयी ते काढली.... सयनाजी
त्याचा बाळ बनवला.... सयनाजी
नेऊन दरवाजीं बसविला.... सयनाजी
कोणा जाऊं नोको देऊं.... सयनाजी
कोणा येऊं नोको देऊं.... सयनाजी
शंकर आले बाहेरून.... सयनाजी
शिर बाळाचं देलं उडून.... सयनाजी
शिर उडून देलं कोण.... सयनाजी
गिरजा झाली क्रोधमान.... सयनाजी
शिर हत्तीचं बसविलं.... सयनाजी
अम्रत देऊन सजविलं.... सयनाजी

अनु... ५०२५८ ... 
आंक ...२०३८... नों दि. ...



नेऊन त्याले दे्हाऱ्यासी.... सयनाजी
त्या काय भोळनीच्या दिसीं.... सयनाजी
त्याचा दिवस मानला.... सयनाजी
आंबिलं फये सन केला.... सयनाजी
त्याची सरगत काढली.... सयनाजी
साखर सिरनी वाटली.... सयनाजी

गणेश चतुर्थीच्या दिवशीं खेडुत लोक 'श्री' ची स्थापना करून पुढील गीतांत आपली श्रद्धा व्यक्त करतात.

चतुरथीच्या दिसीं—
देवामधीं देव आंधी बसे सिरी देव
चौरंगावर गा पुंजा ठेव....
त्येच्या क् सेवेला आली शारदा माय
लक्षुमीले हाक जाय....
इद्या—धन चरनावर गणेश हासला
जनार्दन संतुषला....
लाडू मोदकानं त्येनं दुवा ढेकर देली
समदी सिरष्टी डोलली....
गनपती बाप्पा, मोरय्या मोरय्या
दलदर जाये लया....

---

**शब्दार्थ**—अखाळी—आषाढी पौर्णिमा; राखी—रक्षाबंधन. पित्र—पितृ-मोक्ष अमावस्या; दाया—दाळी, छाया—अमावास्या; पारन—महाशिवरात्रीचें पारणें, दुगुळ—वेगानें; नव—गहू भिजवून रवा किंवा मलिदा करतात तो पदार्थ; मांडोस—मांडव; अमावास्या गुढी पाडवा; चईत—चैत्र पौर्णिमा; काठी—महादेवाची काटी... उभारून "हरि भला महादेव" असा गजर करतात, अखोजी—अक्षय तृतीया, वाया—वाळा; दोनहि भाव्या—एक उन्हाय भाव्री म्हणजे वैशाख अमावस्या आणि दुसरी चिखल भाव्वी म्हणजे ज्येष्ठ अमावास्या; रस—आम्र रस; मिरग—मृग नक्षत्र ज्येष्ठ महिना; घस—आघाडी; मयी—मळ; भोळनी—भाद्रपद पौर्णिमा. त्या दिवशीं बाया एकत्र जमून 'गणेशसंभवा'चे गाणें गातात. फटो—फळें, वाळलेला हुरडा इ. सरगत—मिरमणूक; चतुरथी—चतुर्थी; आंधी—अगोदर, प्रथम; सिरी—श्री; इद्या—विद्या; दुवा ढेकर—संतोषानें किंवा प्रसन्नतेनें ढेकर देऊन दिलेला आशीर्वाद; सिरष्टी—सृष्टी; दलदर—दुःख, दारिद्य.

● ● ●

# उखाणा

लेखिका : सौ. कुमुदिनी पवार
बी. ए. (ऑनर्स)

उखाणा हा शब्द कानावर पडल्यावर अथवा डोळ्यांसमोर आल्याबरोबर आपल्यापुढें नववधूचें दृश्य उभें रहातें. थाटानें सजविलेल्या लग्नमंडपांत हातांतील हिरवागार चुडा, पायांतलीं नवीं चकाकणारीं जोडवीं, गळ्यांतलें मंगळसूत्र, जोडीला गळ्यांत असणारा सोन्या-मोत्यांचा दागिना, कपाळीचें टाशीव हळद-कुंकूं, अंगावरील भरजरी साडी या सर्व सौभाग्यलेण्यांनीं आणि इतर साजांनीं नटलेली व हळदीनें आणखीनच आगळें तेज चढलेली नववधू डोळ्यासमोर उभी रहाते. लग्न लागल्यानंतर आतां आपल्याला नांव घ्यायला लागणार या कल्पनेनेंच बिचारी लाजून जाते. शेजारीं बसलेल्या पतिराजाकडे हळूवार दृष्टि टाकतांना आणखीनच तिला लाज वाटते; आणि नांव घेतांना 'हे' जवळ नकोत असें उगीचच तिला वाटूं लागतें.

लग्नसमारंभांतील विवाहाचे सर्व मंगल विधि आटोपल्यानंतर वधूवरांच्या बाबतींत एक मोठा गंमतीचा व इतरांच्या दृष्टीनें आवश्यक आणि आवडीचा असा एक गोड कार्यक्रम असतो. तो म्हणजे, वधूवरांनीं एकमेकांचें नांव घेणें. नांव घेणें किंवा सांगणें याची जी कांहीं एक विशिष्ट पद्धत आहे तिला "उखाणा" असें म्हणतात. वधूनें पतीचें किंवा वरानें पत्नीचें नांव नुसतें न सांगतां आलंकारिक किंवा काव्यात्मक भाषेंत सांगावें हें भोंवतालच्या मंडळींचें आग्रहाचें मागणें असतें. कारण अशा करण्यानें या उभयतांचें आयुष्य वाढतें असा त्यांचा भोळा भाव असतो !

अशावेळीं वधूवरांच्या भोंवतीं समवयस्क स्त्रीपुरुषांचा गराडा पडलेला असतो. विशेषतः वधूला तिच्या पतीचें नांव सांगण्याबद्दल आजूबाजूची मंडळी चिडवून चिडवून बेजार करतात. याबरोबरच आपल्या शेजारीं बसलेल्या पतिराजांची जाणीव वधूला आणखीनच बावरून टाकते. गोंधळून सोडते. या सर्व कचाट्यांतून पटकन् सुटावें म्हणून नवरी नवऱ्याचें नांव नुसतेंच सांगून टाकते ! मग मात्र भोंवतालची मंडळी चिडतात. 'उखाणा' पाहिजे म्हणून तिला सतावतात. उखाण्यांत नांव घ्या बाईसाहेब, आम्ही निमंत्रण-पत्रिकेंत 'त्यांचें नांव वाचलें आहे' अशा प्रकारें आणखीनच चिडवतात. मग पतीला दया येते. बायकोनें लवकर नांव घ्यावें व तिला स्फूर्ति यावी या भावनेनें पति—

जन्मोजन्मींचें नातें जुळलें मंगलघटिकांनीं
लवकर नांव घे ग लाडके राणी

अशा प्रकारचा एखादा उखाणा सांगून पत्नीला उत्साह देतो. या आकस्मित प्रकारानें पत्नी एकदम गोंधळून जाते. पण दुसऱ्याच क्षणीं मग ती आपल्या पतीला साजेलसें उत्तर देते—

सुखदु:खाच्या लाटांनीं भरलें मानससरोवर
आयुष्याचा प्रवास सुखानें करीन राव तुमच्याबरोबर

पतिपत्नींच्या या उखाण्यांनीं जमलेली मंडळी बेहद्द खूष होतात. मग हा उखाण्यांचा कार्यक्रम जमलेल्या सर्व मंडळींत सुरू होतो. तरुणांपासून तों वृद्धांपर्यंत सर्वांची पाळी येते. मग खूप रंग चढतो. या नादांत दोन चार तास वेळ कसा जातो हें देखील समजून येत नाहीं.

आधुनिक सुधारलेल्या शहरांत किंवा अगदीं लहानशा खेडेगांवांत जरी डोकावलें तरी नांव घेतांना नववधूचा पवित्रा एकच आढळतो. कांहीं वेळां पतिदेवहि या प्रसंगीं आपल्या पत्नीप्रमाणेंच गोंधळून गेलेले आढळतात ! कांहीं क्वचित् ठिकाणीं लग्नाअगोदर वधूवरांची बरीच ओळख असते, नातेंहि असतें. त्या-वेळीं तीं दोघेंहि एकमेकांला नांवानें हांक मारतात. तेव्हां कांहीं वाटत नाहीं. परंतु एकदां का अक्षता पडल्या कीं, नूर पालटतो. नुसतें नांव सांगायला देखील संकोचामुळें, लाजेमुळें फार वेळ लागतो. एवढेंच नव्हें तर कांहीं मध्यमवयीन अथवा वयस्कर स्त्रियाहि नांव घेण्यास लाजतात ! पतीचें नांव घेण्यांत किंवा सांगण्यांत नुसती लाज वाटत नाहीं तर, त्यामध्यें एक वेगळीच गंमत असते. आपल्यावर आतां नांव घ्यायची पाळी येणार या नुसत्या कल्पनेनेंदेखील एक निराळीच हुरहूर कारण नसतांना मनांत डोकावते.

लग्न ठरल्याबरोबर बऱ्याच तरुण मुली निरनिराळ्या प्रकारचे बरेचसे उखाणे गोळा करतात. नांव घ्यायच्या पुढच्या प्रसंगाची त्या सर्व तयारी करतात. पण ऐन वेळीं मात्र गोंधळून जातात. परंतु नववधू मात्र पटकन् नांव घेते ! अशा वेळीं कांहीं जणी शाबासकी देतात तर कांहीं जणी कुजबुजतात, "बघा बाई किती धीट आहे हो ? नाहीं तर आम्ही ! अजून लाज वाटते बाई नांव घ्यायची."

उखाणा म्हणजे विवाहित स्त्रीच्या जीवनांतला एक मोठा गंमतीचा आणि करमणुकीचा विषय होऊन बसला आहे. उखाण्यासहित नांव घेण्याच्या निरनिराळ्या पद्धति आहेत. कांहीं उखाणे ठराविक वेळीं, ठराविक प्रसंगीं म्हणजे समयोचित असे आढळतात. कांहीं उखाण्यांतून पत्नी आपल्या पतीचे गुणदोष

विवेचन करते. कांहींतून सासरचें कौतुक करते, तर कांहींतून स्वतःच्या सुखी संसाराचें चित्रण करते. याउलट कांहीं उखाण्यांतून आपल्या माहेरचेंहि कौतुक केलेलें आढळतें.

उखाणे घेण्याचे अथवा सांगण्याचे प्रामुख्यानें दोन प्रकार आहेत. सुशिक्षित किंवा शहरी स्त्रियांचा लहानगा उखाणा व अशिक्षित किंवा खेड्यांतील स्त्रीचा लांबलचक उखाणा. खेड्यांतील स्त्रीचे उखाणे फार मोठे असतात. या दोन्ही प्रकारांत त्यांच्या भाषेंत, शब्दोच्चारांतहि फरक आढळतो.

या उखाण्यांचे कांहीं प्रकार पुढें दिलेले आहेत.

## समयोचित उखाणा—

नववधू घरांत पाऊल टाकतांना पुढील उखाणा घेते—

आधीं झालं सुनमुख, मग आली वरात
आतां आलें मी ××× रावांच्या घरांत

उगवला चंद्र रजनीला लागली चाहूल
××× रावांच्या घरांत टाकतें सुमुहूर्तावर पाऊल

हळदी-कुंकवाच्या वेळीं किंवा सुवासिनी एकत्र जमल्या कीं पुढील उखाणा स्त्रिया घेतात—

सरीखालीं ठुशीखालीं कोल्हापुरी साज
××× रावांचें नांव घेतें हळदीकुंकू आज

नवरत्नांचा हार हिंदमातेच्या गळ्यांत
××× रावांचं नांव घेतें सुवासिनींच्या मेळ्यांत

गौरीच्यापुढें पडल्या हळदी-कुंकवाच्या राशी
××× रावांचं नांव घेतें मंगळागौरीच्या दिवशीं

नांव घेण्याच्या वेळीं पुष्कळ वेळां वडिलधारी मंडळीहि जमलेली असतात तर अशा वेळीं पुढील उखाणा घेतलेला आढळतो.—

तुळशीची करतें पूजा, महादेवाची करतें सेवा
××× राव सुखी असावेत हाच आशीर्वाद द्यावा

सासुरवाशिणीनें काम करावें शक्तीपेक्षा युक्तीनें
××× रावांचं नांव घेतें मनःपूर्वक भक्तीनें

बारशाच्या वेळींहि पतीचें नांव घेण्याचे कांहीं वेगळे उखाणे आहेत—

निळ्या आकाशांत उगवला शशी
××× रावांचं नांव घेतें बाळाच्या बारश्याच्या दिवशीं

मोत्यानें गुंफला पाळणा रेशमानें विणली बाज
××× रावांचं नांव घेतें बाळाचं बारसं आहे आज

## गुणदोष विवेचन करणारा उखाणा—

कुलीन कुलांत जन्मलें, सुशील कुलांत आलें
××× रावांच्या कीर्तीवर भाग्यशाली झालें

विद्येनें विभूषित, विनयानं साजे
××× रावांची कीर्ति जगभर गाजे

गुलाबाचं फूल, माळ्याच्या मळ्यांत
नवरत्नांचा हार, सासूबाईच्या गळ्यांत
पोटीं जन्मला ××× रावांसारखा हिरा
मामंजींच्या मंदिलाला जणू मोत्यांचा तुरा

कांहीं वेळां स्त्रिया मोठी गंमत करतात. पतीची एखादी मजेशीर खोड उखाण्यांत सांगतात—

चांदीची डबी टाकून देतें, अहो झेलून घ्या
××× राव रागीट बोलणं तुम्ही सोडून द्या

महादेवाच्या पिंडीवर टरबुजाची फोड
××× रावांचं बोलणं गोड, पण डोळे वटारायची लई वाईट खोड

खेड्यांतल्या कांहीं स्त्रिया मोठ्या हिकमती. गोड बोलून उखाण्यांतून पतिराजांना आळंदी पंढरपूर दाखवा म्हणतात. मग सर्वांच्या देखत पतीला देखील मुकाट्यानें दाखवीन म्हणावें लागतें.

काळी चोळी कणखर, पुण्याची विनकर,
चांदीचा वाडा, रुप्याचं कुलूप, सोन्याचा हात,
उघडून बघतें तर जिरेसाळीचा भात, भातावर तूप,
तुपासारखं रूप, रूपासारखा जोडा, चंद्रभागेला पडला येडा,
चंद्रभागेंत पांच नावा, ××× राव मला आधीं आळंदी दावा.

हंड्यावर हंडे सात, त्यांच्यांत बारकाचा भात,
बारकाच्या भातावर तूप, तुपासारखं रूप, रूपासारखा
जोडा, चंद्रभागला पडला येडा, चंद्रभागेंत रंगीत नावा,
××× राव मला पंढरपूर दावा.

कांहीं उखाण्यांतून आपल्या सुखी संसाराचें चित्रहि मांडलेलें आढळतें.

सौभाग्याची खूण काळ्या मण्यांची पोत
××× रावांच्या संसारांत तेवते प्रेमाची ज्योत

जिवाभावाची ओवी आळवतें संसाराच्या प्रातःकाळीं
××× रावांच्या नांवचं कुंकू बघा माझ्या भाळीं

पैठणी नको, शाल नको, नको भर्जरी शेला
××× रावांची थोर कीर्ति हाच अलंकार मला

चांदीच्या ताम्हनांत नागाचा वेढा
××× रावांचा नि माझा शोभतो जोडा

संसाररूपी सागरांत पति-पत्नींची होडी
××× आम्हां दोघांची सुखांत आहे जोडी

कांहीं उखाणे असे असतात कीं, त्यांतून सासर-माहेरचें कौतुक आढळतें.

वडिलांनीं शिकविली विद्या, आईनं शिकवलं गृहशिक्षण
××× रावांची विद्या हेंच माझं भूषण

प्रेमाचा दिला हुंडा, भक्तीची केली करणी
आबांनीं मला अर्पण केली ××× रावांचे चरणीं

काळी चंद्रकळा तिच्यावर चांदण्या
××× रावांचं नांव घेतें आबांची कन्या

तुळशीला घालीत होतें पळी पळी पाणी
अगोदर होतें आईबापांची लाडकी तान्ही
न् आतां झालें ××× रावांची राणी

चांदीच्या ताटाला सोन्याची खूण
××× रावांचं नांव घेतें पवारांची सून

उखाण्याच्या या प्रकारांखेरीज पतिराज पत्नीचें नांव सांगतात त्यांतहि आगळी गंमत असते. कांहीं पतिराज मोठे अवखळ असतात. नांव घेण्याच्या गोंधळांत ते एखादा उखाणा असा मजेशीर घेतात कीं, पत्नीचें नांव त्यांत आलें नाहीं याची दखलहि बाकीच्यांना रहात नाहीं !

मी होतों खळ्यांत सपान पडलं मळ्यांत
नवरत्नांचा हार कोल्हापुरच्या अंबाबाईच्या गळ्यांत

## पुरुषांचा उखाणा—

उगवला सूर्य प्रकाशलं ऊन
राधाबाई मातोश्रींची सुरेखा आहे सून

अड्याल डोंगर पड्याल डोंगर मदीं माझं गांव
झनकाऱ्यानं कुंकू लेती येश्वदी तिचं नांव

समोर होती खुंटी खुंटीला होतं दावं
जिकडं मी जाईन तिकडं पार्वतीनं यावं

भाजींत भाजी मेथीची
जानकी माझ्या प्रीतीची

श्रावणांत पडतो पाऊस आणि असल्या पावसांत
राधिकेचं नांव घ्यायची मला फार हौस

चांदीच्या ताटांत बुंदीचे लाडू
ऊठ ऊठ सरस्वती आपण सोमवार सोडूं

अशा या स्त्रीपुरुषांच्या उखाण्यांतून एक मोठी सुंदर अशी अंतरींची ओढ दिसते. या लोकसाहित्यांतून मराठी भाषेचें व मराठी मनाचें वैभव आढळतें. संसाराचें, संसारसुखाचें, जिवाभावाच्या माणसांचें शब्दचित्र व स्वभावलेखनहि उमजून येतें.

## फुगडीचा उखाणा—

नांव घेण्याच्या या प्रकारांखेरीज उखाण्यांचा आणखी एक प्रकार आहे. तो प्रकार म्हणजे स्त्रिया किंवा मुली फुगडी खेळतांना एकमेकींला उखाणा घालतात तो होय. आपल्यापेक्षां दुसरी निराळी कशी याचे गुणविशेष दाखवितांना व स्वतःचें वर्णन करतांना कांहीं उखाण्यांतून एक प्रकारची लय आढळते.

शब्दांतून सुंदरसा नाद आढळतो. कांहीं उखाण्यांतून एकमेकी खेळतांना प्रश्नोत्तरेंहि थोडीं फार करतात. चिडाचिडी होते पण गंमत येते. खेळाला रंग चढतो. पकुवा जोरांत घुमतो. हास्याचा कल्लोळ उसळतो.

या फुगडीच्या उखाण्यांचीं कांहीं उदाहरणें अशीं—

अरंड्यावर करंडा करंड्यावर मोर
माझ्या संग फुगडी खेळती चंद्राची कोर

आज मला आईतवार, उद्यां मला सोमवार
जोडवीं झिन्कार, बिरूद्या कणखार
दारीं होती मेख, फुगडी खेळते
मी कदमांची लेक

फुगडी फुलदार, माझा भाऊ शिलेदार
आकाशाची घार, माझी सासू दगडेदार
लिंबाला आला भार, माझा सासरा हवालदार

खुर्ची बाई खुर्ची वेताची खुर्ची
माझ्याशीं फुगडी खेळती लवंगी मिरची

चहा बाई चहा गवती चहा
मायालेकींची फुगडी पहा ग पहा
पहा तर पहा, उठून जा
आमच्या फुगडीला जागा द्या

फुगडी खेळतांना उखाण्यांतून जीं प्रश्नोत्तरें होतात त्यांतहि मोठी बहार दिसून येते.—

पहिली : केळं बाई केळं, राजेरी केळं,
एवढी मोठी झालीस तरी, लग्न नाहीं केलं ?

दुसरी : कोरा कागद, काळी शाई
माझ्या लग्नाची तुला ग काय घाई ?

पहिली : सहाण बाई सहाण कुरंदी सहाण
मी पडलें लहान पण तुला टाकीन गहाण

दुसरी : गोण बाई गोण भाताच गोण
तूं मला गहाण टाकणारी आहेस तरी कोण ?

पहिली : लोणी बाई लोणी ताकावरलं लोणी
तुला गहाण टाकीन असं म्हटलंय कोणी ?

पहिली : पावसाचं पाणी कौलांत ग कौलांत ग
पाटलाच्या लेकी तुम्हां डौलांत ग

दुसरी : लाही बाई लाही भाताची लाहा
पाटलाच्या लेकी आम्ही डौलांत नाहीं

पहिली : फुगडी खेळतां खेळतां जमीन झाली लाल
माझ्यासंगं फुगडि खेळतेस पक्त्रा तरी घाल

दुसरी : लाही बाई लाही भाताची लाही
मला तर पक्त्रा येतच नाहीं

पहिली : लाही बाई लाही भाताची लाही
मुक्यानें फुगडी शोभत नाहीं

दुसरी : लाही बाई लाही भाताची लाही
फुगडीचा आणा मला येतच नाहीं

• • •

# सासुरवास

—डॉ. कु. विमल ल. चोरघडे
एम्. ए. डी. ( म्युझिक )

लोकगीतांतील काव्यविषय बहुधा नित्याच्या कौटुंबिक जीवनांतील असतात. परस्परांचीं नातीं व त्यांच्या अनुषंगानें उत्पन्न होणारे राग-लोभ वर्णन करण्यांत लोकगीतकारांचा हातखंडा असतो. सासु सुनेचें नातें असेंच संघर्षाचें. त्यांत सुनेची अवस्था अनुकंपनीय. सासुरवाशिणीला आपलें सासर ही प्रतिष्ठेची बाब असल्यामुळें भावनांची अधिकच गुंतागुंत होते. ह्या गुंतागुंतीचें प्रतिबिंब विदर्भांतील लोकगीतांत कसें दिसून येतें हें पाहूं.

लोकगीतांतील बहुतेक भाग ओव्यांनीं व्यापलेला आहे. या गीत-प्रकाराचा मक्ता स्त्रियांनींच घेतलेला दिसतो. म्हणूनच कीं काय, त्यांच्या जिव्हाळ्याचा हा विषय स्त्रियांनीं मोठ्या कुशलतेनें हाताळला आहे.

मुलगी असली म्हणजे लहानपणीं तिनें आपल्या आईच्या घरीं खूप खेळावें बागडावें हा संकेत ठरलेला.

फुलामध्यें फूल फूल हुंगावें जाईचें
आपल्या बाळपणीं सुख भोगावें आईचें

जोंधळ्यापरीस बाढल्या तुरी
लेकापरीस मैना प्यारी

मायेची माया अवघ्या बाळांवरी
गौळणीनें[1] केला खोपा अवघड झाडावरी

बत्तीस धारांचें दूध प्यालें मी कोन्चा रंग
काशी गिरीजाच्या[2] मांडीचा केला मी चौरंग

माय[3] एवढी माया कोणाला येत नाहीं
समुद्र भरला तेथें पाण्याचा थांग नाहीं

---

१. गवळण—पक्षीविशेष २. काशी गिरीजा—आईला उद्देशून ३. माय—आईला माय म्हणतात.

लग्न होऊन ही मुलगी सासरीं गेली म्हणजे सासुरवासाच्या दिव्यांतून तिनें पार पडावें, मोठेपणीं ती स्वतः सासू झाली म्हणजे तिनें आपल्या सुनेला सासुरवास करावा अशी प्रथा या गीतांतून दिसते. सासुरवास कां करायचा याचें उत्तर या गाण्यांत सांपडत नाहीं. पण तो कसा केला जातो हें मात्र कळूं शकतें. सासुरवास ही एक नित्याची बाब आहे. तिला टाळतां येणें कठीण म्हणूनच कीं काय लहान मुलींना तिची जाणीव त्यांच्या भुलाबाईच्या गाण्यांतून दिली जाते.

" कारलीचं बीं पेर ग सूनबाई, मग जा अपुल्या माहेरा "

या गीतांत सासरीं गेल्यावर हळूहळू माहेरचे पाश कमी होत जातात या तत्त्वाचें बाळकडूच जणुं त्यांना मिळतें. आधीं कारलीचं बीं पेरून टाक, मग त्याना कोंब फुटूं दे, मग त्याचा वेल होऊं दे, आतां कारलें लागूं दे, कारलें आलेंच आहे तेव्हां त्याची भाजी करून टाक अशीं नाना कारणें सांगण्यांत येतात. ही भाजी खाऊन झाल्यावर तरी सुनेला माहेरीं जाऊं द्यावें ! पण छे. मामंजी सासुबाईवर, सासुबाई जावेवर, मग ती जाऊ नणंदेवर असे परवानगी देण्यासाठीं एकमेकांवर ढकलतात. शेवटीं राहिले पति पण ते या सर्वांवर ताण करणारे !

" उठले पातं, घतला काठा,
विसर ग आतां माहेरच्या गोष्टी "

अशी तिच्या माहेरीं जाण्याची गोष्ट निकालांत निघते.

" चांदीचा पोळपाट, सोन्याचें लाटणें,
तिथं आमच्या सासूबाई पोळ्या करीत होत्या "

या गीतांतहि माहेरीं जाण्याचें नांव काढतांच पति हातांत काठीच घेतो. मग मुली तरी काय ?

" सासरच्या वाटे कुचु कुचु काटे
माहेरच्या वाटे नारळ फुटे "

म्हणायला कमी करीत नाहींत.

" नदीच्या पलीकडे राळा पेरला बाई, राळा पेरला "

या गीतांत मधल्या बोटाला विंचू चावला असतां माहेरचा आणि सासरचा असे दोन वैद्य येतात. त्यांच्या वर्णनांतहि सासरचा तिटकारा म्हणून उपहासगर्भ टीका आपल्याला सासरच्या वैद्यावर केलेली दिसून येते.

मुलीचें लग्न थाटामाटानें केलें, तिच्या सासरच्या मंडळींचा मानपान राखला तर मुलीला होणारा सासुरवास तेवढाच कमी होईल अशी विचाऱ्या भोळ्या पित्याची कल्पना दिसते. म्हणून आपल्याजवळची धनदौलत तो मुलीला देऊन उरलेल्या थोडक्या भांडवलावर दुसरा व्यवसाय करायलाहि कमी करीत नाहीं.

बापानें दिल्या लेकी लेकी देऊनी झाला वाणी
लवंगा मांडल्या दुकानी

मायबापानें दिल्या लेकी देऊनी झाला वाणी
तुझ्या दैवाला जामीन नाहीं कोणी

एवढें करूनहि सासुरवास व्हायचा तो होतोच. या सासुरवासाचें स्वरूप असें आहे—

आईबापांची लाडकी सासू म्हणे " पाण्या चल "
उन्हानें झाली लाल ॥

आईबापाची लाडकी सासूनें पाण्या नेली
उन्हानें कोमावली ॥

माय म्हणे "लाडाची" सासू म्हणे, "टोल्या उचक्याची"
माय म्हणे, "पलंगावरची" सासू म्हणे, "पलंगाखालची" ॥

माय वाढे दही मांडा
सासू वाढे खरवड कोंडा

आईबापाची लाडकी सासू म्हणे " भांडीं उट "
कोंवळें मनगट ॥

सासूचा सासुरवास नणंदेची लावणी
दीड दिवसांची पाव्हणी ॥

खरें कां बोलणें कान लावेल नणंदी
सासूच्या मनानें सून नसावी घरामंदीं
सासूचा सासुरवास नणंद चुगलेखोर
सांगते रस्त्यावर आपल्या मायपाशीं ॥

सासूचा सासुरवास कटला जीवावरी
मायबापाच्या नांवासाठीं रात्र काढली शेवावरी ॥

धान कांडूं कांडूं हाताला आले फोडे
माहेरचें सुख गोरी आठवून रडे ॥

दळण कांडणानें आले हाताला घोगले*
सुख माहेरीं भोगलें ॥

सासुरवाशिणीला कुणी म्हणेना काम केलं
अग्नीच्या पुढें चट् जळतं ओलं चिलं ॥

सुनेला सासुरवास जिनें आला तिनें केला
माय माझ्या गौळणीचा भोळेपणांत जन्म गेला ॥

रामायणांतील रामाचा वनवास हा वस्तुतः राजकारणांतील प्रसंग. पण स्त्रियांना या घटनेंत सीतेला झालेला सासुरवासच अधिक ठळकपणें दिसतो. सीतेचा वनवास हा कैकई सासूनें केलेला सासुरवास होय. ह्या सासुरवासाचें स्वरूप असें होतें.—

सीतेला सासुरवास कैकईनें केला
रामासारखा जोडा नाहीं तिला भोगूं दिला ॥

लहानपणीं माहेरीं लाडक्या मुलीची जोपासना आईनें केली.—

लंबे लंबे बाल पन्हाळी तुसी वेणी
माय माऊलीनें निगा केली बालपणीं ॥

परंतु सासरीं तिची अशी गत झाली.—

सीतेला वनवास डोईच्या तेलाचा
नाहीं उजर बोलाचा ॥

सीतेला सासुरवास रामाच्या अंतराचा
सुकोन गेला बाई दारीं बाग तुळशीचा ॥

सीतेला सासुरवास सांगती आयाबाया
रामाला नाहीं माया पोटीं गर्भाची छाया ॥

सीता या सासुरवासाच्या दिव्यांतून पार पडली म्हणूनच तिला देवपण प्राप्त झालें अशी संसारी स्त्रियांची श्रद्धा आहे.

---

* घोगला—पाण्याचा फोड.

सीतेला सासुरवास  लोखंडाचे घण
घडलें देवपण  रामाच्या संगतीनं ॥

सीतेला सासुरवास  झाला कोण्या युगांत
रामसीता देऊळांत  राज्य करी ॥

सासूचा सासुरवास  भाऊ ऐकतो चोरावाणी
 आंसू टाकतो मोरावाणी ॥

सासुरवास हा विवाहित मुलींनीं निमुटपणें सहन करावा, माहेरच्या माणसांनीं पण त्याबद्दल वाच्यता करूं नये, मनांतल्या मनांतच तो ठेवावा अशी शिकवण या सासुरवासाच्या गाण्यांत आहे. बहिणीच्या सासुरवासाची कथा ऐकून भावाला किती वैताग आला आहे पहा—

सासूचा सासुरवास  भाऊ ऐकतो गल्लींतून
जावं बहिणाई मरून  आलं हृदय भरून ॥

बहिणीच्या घरीं  वासाचें तांदूळ
बहीण सासुरवाशीण  काय करूं मी असून ॥

बहिणीचा सासुरवास  भाऊ आयके दुरून
जाय बहिणाई मरून  नाहीं पाहणार फिरून ॥

बहिणीला आपल्या भावाच्या आणि आईच्या व्याकुळ मनःस्थितीची जाणीव आहे. आपल्या सासुरवासाची दुःखद कहाणी माहेरच्या माणसांना कळूं नये म्हणून ती म्हणते—

माझं सुख दुःख  सांगूं नका बाजारीं
जाऊं दे जा घरवरी  भाऊराया ॥

आपुलें सुख दुःख  नका सांगूं एकाएकीं
धरणीं अंग टाकी  माय माझी ॥

मुलींना उत्तम वळण लावण्याची जबाबदारी आईवडिलांची. ते मुलीला सांगतात—

सासुचा सासुरवास  सोसावा एकीनें
 कुळवंताच्या लेकीनें ॥

कन्येला वाटतं—

समुद्राएवढी    माझ्या वडिलांची आण
मर्यादा उल्लंघून    कशी जाऊं ॥

पण सहनशीलतेची ही मर्यादा दुःखाच्या अतिरेकानें उल्लंघिली जाते. मनांतलें दुःख आपल्या पित्याजवळ नाहीं सांगायचें तर मग कुणाजवळ व्यक्त करायचें ?

समुद्रासारखं    तुझ्या पोटाला पैस
गोष्ट सांगतें बैस ॥

सुखाच्य दुःखाच्या    बांधल्या पुड्यापाड्या
बाबाजी आला गड्या मीनं उकलिल्या थोड्या थोड्या ॥

पण एवढेंसुद्धां वडिलांना आवडत नाहींसें दिसतें. मुलीनें आपल्या दुःखाला वाचा तर फोडूं नयेच, परंतु सासरच्या माणसांकडूनहि आपल्या मुलीबद्दल शिकायत येणें त्याला पसंत नाहीं.

बाप म्हणे " लेकी,    मर तूं पापिणी
तुझ्या संसाराची    मला जन्म घोकणी ॥

बाप म्हणे " लेकी,    नांद तूं भारानं
माणिक सोयरा    नित्य करतो गाऱ्हाणं ॥

पण पित्याचा हा कणखरपणा केवळ वरवरचा आहे, यांत तिळमात्र शंका नाहीं. आपल्या सासुरवासाची कहाणी ऐकून पित्याच्या मनाला किती यातना होत आहेत याबद्दलची जाणीव सासुरवाशिणीनें व्यक्त केली आहे. एवढा धीर-गंभीर पिता पण कन्येच्या सासुरवासानें खचून गेला आहे. ज्या पित्याचा दरारा अरण्यांत वास्तव्य करणाऱ्या व्याघ्राप्रमाणें आसमंतांत पसरला आहे त्याची मुलीच्या दुःखाची बातमी ऐकून जाळयांत पडलेल्या व तृणांत लोळणाऱ्या असहाय प्राण्या-प्रमाणें स्थिति झालेली आहे.

माझ्या बाबाजीची    छाती पाषाणाची
माती केली रत्नाची ॥

वनांतला वाघ    तणामध्यें लोळे
लेकीचें नाहीं बरें    पिता मनामध्यें झुरे ॥

एखाद्या नशीबवान मुलीच्या पदरीं सासुरवासाचें हें दुःख येत नाहीं.

दळण म्यां दळिलें   पीठ म्यां भरीलें
सासूपुढें ठेविलें ॥

दळण म्यां दळिलें   पीठ भरी लौकरी
सासू माझी सुंदरी ॥

माझ्या चुड्यावरी   सासूबाईचें लक्ष फार
शाई बिजलीचे चितार ॥

नणंदा भावजया   ओसरी उभ्या राहू
बाहेरून आले   तुमचे कंथ माझे भाऊ ॥

अशी पायां पडूं आली   पायां पडूं देईना
नणंदपणा मी दावीना ॥

परंतु हें भाग्य दुर्मिळ. बहुतेकांच्या नशिबीं सासरचा छळच यायचा. कधीं कधीं हा सासुरवास फार उग्र स्वरूप धारण करतो.

सासुरवाशिणीनें   तोंड धुतलें नईला (नदीला)
माता माउलीला   कींव लेकीच्या माईला ॥

हा जाच पाहून शेजाऱ्यापाजाऱ्यांचेहि डोळे पाणावतात. अशा वेळीं एखादी शेजारीण या सासूला हळूच सांगते—

सुनेला सासुरवास   नका करूं मातापिता
आपला राम होता   आली परायाची सीता ॥

सुनेला सासुरवास   नको करूं माय
होता आपला चांफा   आली परायाची जाय ॥

लोकगीतांतून व्यक्त होणारा सासुरवास हा असा आहे. तो प्रत्येक स्त्रीनें सहन करायलाच पाहिजे. सासुरवाशिणीची वृत्ति सहनशीलतेची आहे. पण त्यांत नैराश्य नाहीं, हेहि दिवस जातील अशी आशा आहे. सासुरवासाच्या या कसोटीवर घासल्यानंतर तेजस्वी व्यक्तित्व प्राप्त होणार अशी सुखद जाणीव आहे. आलेली आपत्ति हंसत झेलण्याची शक्ति आहे. आणि घराण्यांतील बारीकसारीक गोष्टी बाहेर पडूं न देण्याचा अभिमानयुक्त संयम आहे.

• • •

# हळदीचें सांस्कृतिक स्थान

—कै. चिं. ग. कर्वे

हरिद्रा स्वर्णवर्णाभा सर्वसौभाग्यदायिनी ।
सर्वालंकारमुख्या हि देवि त्वं प्रतिगृह्यताम् ॥

— पूजामंत्र

" अहो, यंदा लग्नांची बेसुमार गर्दी. कुत्र्यालादेखील हळद लागली ! " असे शब्द कानावर पडत असतांना माझें व्युत्पत्तिवेडें मन हळदीला धरून बसलें. आपल्या संस्कारांतून हळदीला एवढें महत्त्व कां? सुपाऱ्या, नारळ, यांबरोबर हळकुंडें पाहिजेतच. हळकुंडाची कुटलेली हळद तर सौभाग्यालंकारांत प्रमुख. हळदीपासून तयार होणारें कुंकूं त्यानंतर. सर्व जातींतून सोळा संस्कारांत व विशेषतः विवाह आणि और्ध्वदेहिक यांत तर तेल-हळद आवश्यक. लग्नांत ' हळदुली '— नवरानवरीला हळद लावण्याचा विधि लौकिक असला तरी कटाक्षानें पाळला जातो. संतांनींहि या विधीवर रूपकें रचिलीं आहेत.

हळदुली वाटुनी वाटिला पाटा ।
अवगुणाचा नोवरा हळदुली ऊटा ॥

असें एकनाथांचें एक रूपक आहेच. त्यांनींच ' रुक्मिणीस्वयंवरांतील हळदुली ' असें एक सुंदर कथानक केलेलें आढळेल. कृष्ण आणि रुक्मिणी एक-मेकांच्या अंगाला हळद लावतांना करवल्या कशा थट्टा करीत होत्या व रुक्मिणी लाजून कसें देहभान विसरली वगैरे वर्णन हृदयंगम आहे.

" तंव रेवती म्हणे देवा, आधीं घ्यावें नांवा ।
हळदुली मग लावा, उटी इसी ॥ "

यावर कृष्णानें चक्क सांगितलें कीं, " मला रुक्मिणीचें नांव घेतांना लाज कशाची ? " असो.

' हळदुली ' म्हणजे हळद लावण्याचा विधि. आदिवासी जातींतून प्रेत-संस्कारांतहि तो आवश्यक मानलेला आहे. लग्नांतील हळदुलीच्या अनेक गाण्यांप्रमाणेंच प्रेताला हळद लावतांना म्हणावयाचीं गाणीं आहेत. ( चापेकरकृत ' बदलापूर ' पाहा. ) आणखी एक हळदीचें माहात्म्य खंडोबाच्या भंडाऱ्यांत दिसतें. हा हळदीचा ' भंडारा ' या देवतेच्या स्थानीं भरपूर उधळला जातो व प्रसाद—अंगारा म्हणूनहि वाग्ये तो वांटतात. [ " वाटें भेटला खंडेरावु देवु । त्यांनीं लाविल्या

हळदुल्या भंडारु ॥ "–लोकगीत ] जोगेश्वरी–अंबाबाईला जसें कुंकवाचें तसें मल्हारी–मार्तंडाला हळदीचें लेणें.

अशा तऱ्हेच्या गोष्टी मनापुढें येऊन हळदीच्या उत्पत्तिकथा–दंतकथाच त्या–पाहाव्यात असें वाटलें. या कथा ज्यांना असंस्कृत म्हटलें जातें, त्या आदिवासी लोकांत फार आढळतात. या भूमिजनांनीं संसाराला लागणाऱ्या प्रत्येक वस्तूची कथामय उपपत्ति लावलेली आहे. आतां हळदच घ्या. दिदयी या ओरिसांतील जातींत अशी उपपत्ति आहे कीं, देवानें शाक आणि मांस या अन्नाला गोडी येण्यासाठीं आपल्या डाव्या हाताची करंगळी कापून त्यापासून हळदीचीं झाडें उत्पन्न केलीं. डोंगरी साओरा जातीची कथा पाहा––कितुंग या मूळ पुरुषाला पित्त झालें तेव्हां तो ओकला. त्यापासून हळदीचें झाड उत्पन्न झालें. पण या हळदीनेंच त्याचा रोग बरा होऊन त्याला जेवणांत रुचि वाटूं लागली व अंगाची खाजहि गेली. टांगोरबासम देवानेंच एकदां भटजीला हळदीचें पुराण कथन केलें आहे. [ व्हेरियर एल्विन–ट्रायबल मिथ्स ऑफ ओरिसा. ]

या साओरा जातींत स्वयंपाकांत हळद फारशी न वापरतां धार्मिक विधींतच वापरतात. देवरूपी मूर्तींच्या अंगाला तेल-हळद लावतात; पण लग्नांत वापरीत नाहींत हें विशेष. केव्हां केव्हां मुली सौंदर्यासाठीं आपल्या अंगाला हळद लावतात. पुरुष फक्त और्ध्वदेहिक क्रियेनंतर स्नान करून स्वतःच्या अंगाला तेल-हळद लावतात. ही शुद्धीसाठीं असावी. उत्पन्न झालेली हळद देवांनीं ज्या पाट्यावर वाटली तो देवपाटा अद्यापि दाखविण्यांत येतो. [ एल्व्हिन–दि रिलिजन ऑफ ॲन इंडियन ट्राईब ].

जबलपुराकडील गोंड जातींत हळदीची उत्पत्ति–कथा मोठी मनोरंजक आहे––

फार पूर्वी लोकांना लग्न कसें करावें किंवा धान्य कसें खावें हेंहि माहीत नव्हतें. एक अइभुज नांवाचा राजा होता. त्याची राणी बसरकोर. तिनें एक दिवस एका जागेवर पिवळी लघुशंका केली. पुढें त्या जागेवर एक मुलगी उत्पन्न झाली. तिचें नांव हरदावली कनिया. नंतर असाच एक मुलगाहि तेथें उत्पन्न झाला. हीं मुलें मोठीं झाल्यावर हरदावलीनें लोकांना कळविलें कीं, मी या मुलाशीं लग्न करणार आहें. तेव्हां लोकांना आश्चर्य वाटलें. कारण त्यांनीं 'लग्न' असा शब्दच पूर्वी ऐकला नव्हता. ही काय भानगड आहे हें समजून घेण्यासाठीं राणीनें हरदावलीला बोलावून घेतलें व खुलासा विचारला. हरदावलीनें राणीला सांगितलें कीं, मी जेथें उत्पन्न झालें तेथें जाऊन पाहा. ती जागा म्हणजे आपण जेथें लघुशंकेला बसत होतां ती. राणी तेथें जाऊन पाहाते तों तिला त्या जागेवर जमिनींतून एक हळदीचें रोप आलेलें दिसलें. तिनें तें उपटून मुलीच्या हातीं दिलें.

यावर मुलगी चटकन् उद्गारली, "ही हळद माझें आयुष्य सुखाचें करील." [ एल्विन–मिथ्स ऑफ मिडल इंडिया ].

हळदीच्या लागवडीला बलिदानाची फार आवश्यकता आहे; तेथें रक्ताची शिंपण केल्याखेरीज हळदीपासून लालचुटुक रंग कसा येणार, असें कोंड जातीचे लोक प्रतिपादितात. [ फ्रेझर–दि गोल्डन बौ ].

वरील हळदीच्या उत्पत्तिविषयक दंतकथांपासून तिच्या महत्त्वासंबंधीं काय मत बनवावयाचें तें समाज-शास्त्रज्ञ बनवोत. आपण आतां आपल्यांतील मुख्य लग्नविधीकडे वळूं व तींत हळदीची भूमिका कोणती तें पाहूं.

आतांच्याप्रमाणें पूर्वी एक-अर्ध्या दिवसांत लग्न होत नसे. कित्येक महिने अगोदर त्याची तयारी चाले. प्रथम धान्य निवडून, दळून ठेवीत व तेंहि धार्मिक संस्कारानें. याला 'घाणा भरणें' म्हणतात. एका दुरडींत गहूं किंवा तांदूळ घालतात व दोन मुसळे पिवळ्या केलेल्या फडक्यानें एकत्र बांधतात. या फडक्यांत हळकुंड-सुपारी बांधलेली असते. या मुसळांनीं, नवरा-नवरीच्या हातांनीं सुवासिनी स्त्रिया कांडण्याचा विधि उरकतात. मुसळांप्रमाणेंच जात्याचीहि पूजा होते. म्हणजे लग्नसाहित्याला लागणाऱ्या सर्व वस्तूंना प्रथम मान देण्यांत येतो. केवढी ही उदात्त भावना ! या वेळचीं कित्येक गाणीं आहेत.

१. जात्या तूं ईसवरा, तुला सुपारी बांधली ।
नवरी हळद लागली ॥

२. मांडवाच्या दारीं, हळदीबाईचं वाळवान ।
नवऱ्या बाळाचं केळवान ॥

— लोकगीतें

हळद पेरण्यापासून तों वधूवरांना ती लावण्यापर्यंत अशा गाण्यांतून माहिती असते.

नवरा-नवरीला त्यांच्या घरीं मोठ्या सोहळ्यानें हळद लावली जाते. खालच्या जातींतून तर त्याला फार महत्त्व देतात. पांच सवाष्णींनीं दळलेली ताजी हळद पदरांत घेऊन, मुठीनें घालून त्याचे 'घण' मोजतात. जितके घण होतील तितकीं मुलें त्या नवरीला होतील अशी समजूत असते. हे घण भरतांना बायका गाणीं म्हणतात [ अनसूया लिमये–घाटावरील श्रमिकांचीं लोकगीतें ]. सीता, रुक्मिणी, गौरी इत्यादि देवींना त्यांच्या लग्नाच्या वेळीं हळद लावण्यासंबंधींहि गाणीं आहेत. [ महाराष्ट्र लोकसाहित्य माला, पु. १ ]. अशीं हळदुलीचीं गाणीं सर्व जातींतून आहेत [ 'बदलापूर' पाहा ]. भिल्ल जातींत नातेवाईक जेव्हां लग्नाची हळद दळतात तेव्हां जें गाणें म्हणतात त्याचा आशय असा–हळद दळणें

चालू आहे, आम्हीं जात्याला हात लाविला आहे. आमच्या भावाचें लग्न निघालें आहे. तें पार पडण्यासाठीं हळद बारीक दळत आहों. नंतर ती त्याच्या अंगाला लावूं. लग्न तर जवळच येऊन ठेपलें आहे. [ दि भिल्स ].

वडारी लोकांत वधूच्या घरींच नवरा-नवरीला हळद लागते; तेव्हां 'उष्टी हळद' नेण्याचा प्रश्न राहात नाहीं. 'उष्टें बाशिंग' जसें असतें तशी 'उष्टी हळद' प्रथम एकाला लावून दुसऱ्याकडे लावण्यास धाडलेली असते. कातकऱ्यांत नवऱ्याकडील हळद नवरीकडे जाते. ब्राह्मणांत मुलीकडील उष्टी हळद मुलाकडे येते. ही हळद मेहुणी मुलाला चढविते. ती दोन्ही हातांत आंब्याचीं पानें घेऊन, तीं तेलांत बुडवून नवऱ्या मुलाच्या पायांपासून डोक्यापर्यंत वर लावीत जाते. नंतर मुलाची बहीण आंब्याच्या पानांनींच ती हळद उतरण्याचें काम करते. [ प्रेत-संस्कारांत हळद डोक्यापासून पायांकडे खालीं आणावयाची असते ]. हा हळद चढविण्या उतरविण्याचा प्रयोग काय दर्शवितो हा समाजशास्त्रज्ञांपुढें प्रश्नच आहे.

परदेशी तेल्यांत वरघोडा निघण्याच्या वेळीं तिकडे मुलीच्या अंगाला तेल-हळद लावून मळी काढण्यास सुरुवात करतात. अशी मळी काढून तिचा गोळा बनविण्यांत येतो. तो हातीं घेऊन नवरी मांडवांत येते व त्या वेळीं नवरा मांडवाच्या दारीं आलेला असतो त्याच्या अंगावर फेंकते. हा हळदीचा गोळा मुलाला लागला तर मुलगी त्याला आपल्या ताब्यांत ठेवील असें मानतात.

ठाकूर जातींत लग्नानंतर नवरानवरीचे खेळ जे चालतात त्यांत एक-मेकांला हळद चारण्याचा एक खेळ मजेदार असतो. नवरा नवरीच्या पाठीकडून हात नेऊन तिच्या तोंडांत हळद कोंबतो; तर नवरी समोरूनच त्याच्या तोंडांत हळद घालते. उरलेली 'उष्टी हळद' जमलेली वऱ्हाडी मंडळी मग एकमेकांच्या तोंडांत घालतात. पुरुष-बायको हा भेद ठेवीत नाहींत. रंग-पंचमीप्रमाणें बायकाहि तसेंच करतात. या हळद चारण्याच्या प्रयोगानंतर एकमेकांच्या अंगावर पाणी उडविण्याचा खेळ चालतो. असो.

याप्रमाणें लग्नसोहळ्यांत हळदीची मोठीच भूमिका असते. धार्मिक विधींतहि लग्नापूर्वीचें वधूवस्त्र 'अष्टपुत्री', तसेंच लग्नकंकण हळदीनें माखलेलें असतें. लग्न लागण्यापूर्वीच्या विधींतून मंडळींना पानसुपारीप्रमाणें देण्यासाठीं हळकुंडें व सबंध सुपाऱ्या वापरावयाच्या असतात. यांच्या झोळयाहि हळदीनें पिवळया केलेल्या पाहिजेत. देवदेवक बसविण्याच्या विधींत सप्तमातृकांना तेलहळद चढवितात व नंतर उतरवितात. सारांश, 'हळद लागणें' हा वाक्प्रचार लग्नसंस्काराला अगदीं यथार्थ वाटतो.

गर्भाधानाच्या वेळीं रात्रीं एक लौकिक विधि बायका करीत असतात. एक वरवंटा घेऊन तो हळदीनें पिवळया केलेल्या फडक्यांत बांधतात. हा 'गोपा'

नवरी मुलगी सासू, नणंदा वगैरे माणसांच्या हातांत देते व म्हणते, "हा घ्या गोपा, मी जातें शेता" (किंवा अशाच कांहीं कामाला).

हळदीनें सौंदर्य येतें हा समज खानदेशांत दिसून येतो. तिकडे नवरा-नवरीला हळद लाविलेली असतांना बाहेर पडूं देत नाहींत. कारण तसें केल्यास त्यांच्या स्वरूपाला चेटकिणी भुलतात व त्यांना भूतबाधा होते; हळदीनें सौंदर्यांत वाढ होते म्हणूनच बहुधा द्राविड देशांतील बायका स्नान झाल्यावर अंगालाच नव्हे तर तोंडालाहि हळद लावतात. 'पी हळद आणि हो गोरी' ही आपल्या-कडची म्हण सौंदर्यवाचक नव्हे तर काय? हळदीच्या अंगीं कांहीं सुवास असतो म्हणून दक्षिणेंत समारंभांतून बायकांच्या हातांना, कपाळाला जसें हळदीकुंकू तसें हळदीचें गंध लावतात.

हळदीचा रंग आणि वास यांची चांगली जाणीव आपल्या महिलांना दिसते. स्वयंपाकांत वनस्पतिजन्य रंग पाश्चात्य देशांत सर्रहा वापरतात. खाद्य-पदार्थांचें दर्शनीय प्रसाधन (ड्रेसिंग) करण्यांत जें तिकडे कौशल्य रूढ आहे तें आपल्या भोजनांत क्वचितच आढळेल. मात्र रंगासाठीं हळदीचा वापर फार. केशराची जागाहि—सुवास सोडल्यास—हळद बेमालूम भरून काढते. केशराचें गंध मोठ्या पंक्तींतून लावणें परवडत नसल्यानें हळकुंडाचे केलेले गंधाचे रवे चांगले उपयोगी पडतात. आमच्या लहानपणीं मुलें पांढरें गंध लावूं नये म्हणून रोज आंघोळीनंतर रव्याचें गंध लावीत.

मांडवाला, मुसळाला, जात्याला किंवा ओटी भरण्याला जीं हळकुंडें घेतात तीं लेंकुरवाळीं पाहून घेतात. कारण तीं संततीदायक समजतात. याचसाठीं ओटीचीं फळेंहि बहुबीज (डाळिंब, पेरू इ०) लागतात. 'हळकुंडासाठीं लग्न मोडणें' या वाक्प्रचारावरूनहि लग्नांत हळकुंडाचें महत्त्व दिसून येतें. 'अर्ध्या हळकुंडानें पिवळें होणें' यांतहि गर्भित अर्थ लग्नाचा आहे. 'हळद लागली' म्हणून माणूस लगेच ताठ होतो; थोड्याशा वैभवानें फुगतो असा अनुभव आहे. पण हळद उतरल्यावर—काढल्यावर' कोठचा नक्षा? मनुष्य फार घाईत असला किंवा भेटण्यास दुर्मिळ असला म्हणजे 'त्याला हळद लागली आहे' असें म्हणतात. असाच एक लग्नाचा द्योतक वाक्प्रचार म्हणजे 'त्याला (तिला) हळदीचा डाग लागला आहे—विटाळ झाला आहे' हा असून त्याचा अर्थ लग्न होऊन थोड्याच दिवसांत विधुरावस्था किंवा वैधव्य प्राप्त झालें आहे; तेव्हां पुनर्विवाहाला तो पहिल्या लग्नाइतकाच कोरा (कोरी) आहे. महानुभावी पंथांत एक म्हण आहे—'हळदी-पासूनच नवरा बोहरा, त्याला कितीक सावरा!' म्हणजे लग्न झाल्यापासूनच नवरा नाचरा, चंचलवृत्तीचा आहे, तेव्हां त्याला कसा सुधारणार? अशा तऱ्हेनें हळदीसंबंधीं कित्येक वाक्प्रचार लग्नविधीचे द्योतक आहेत. तेव्हां लग्न आणि हळद यांचा अतिनिकट संबंध दाखविण्यासाठीं जास्त विस्तार नको.

हळदीचें औषधी महत्त्व दृष्टीआड करून चालणार नाहीं. हें महत्त्व न कळत का होईना आपल्याला पटलें असावें म्हणूनच आपल्याकडे हळदीचा वापर फार आहे. वैद्यकशास्त्र सांगतें, हळद जंतुघ्न आहे व जखम निर्जंतुक करण्यास व भरण्यास तिचा फार उपयोग आहे. खेड्यापाड्यांतून जखमेवर हळद लावतातच. त्वचारोगावरहि हळद गुणकारी आहे. थंडी-पडसें झालें, खोकला आला म्हणजे आपण दूधहळद घेतोंच कीं नाहीं ? हाच हळदीचा अनुपम औषधी गुणधर्म खंडोबा-देवाचा आवडता ‘ भंडारा ’ होण्यास कारण झाला असेल काय ? खंडोबापुढें नवसाचा ‘ बगाड घेतल्यावर ’ पाठीला होणारी मोठी जखम हळदीनेंच बरी होत असावी. शिवाय हळदींत कांति तर आहेच ( अत्यंत सुंदर अंगकांतीला ‘ हळदीचा गाभा ’ म्हणतात. ) पण वैभव प्राप्त करून देण्याचाहि गुण असावा. ‘ भंडार भरपूर ’ असा आशीर्वाद वाघ्ये भंडारा लावतांना देतात. ‘ हळद लावणें ’ या वाक्प्रचारांत ‘ वैभवास चढणें ’ असाहि लाक्षणिक अर्थ आहे. पण गोमंतकी भाषेंत या वाक्प्रचाराचा अर्थ उलटहि ( नाश होणें ) आहे; तो लग्न-विधीच्या हळदीपासून नसून प्रेतविधींतून निघाला असावा.

जातां जातां हरिद्रा-गणपतीला समंत्रक हळद वाहण्याचा नुसता उल्लेख करतों. आतां शेवटीं एकच मुद्दा राहिला. तो म्हणजे हळदीची कुंकवाशीं सांगड. ‘ हळदकुंकू ’ असें जोड-नांव आपल्या तोंडांत असतें. कुंकू हें हळदीपासूनच पूर्वी तरी करीत; व हे दोन्ही पदार्थ सौभाग्यालंकारांत वरिष्ठ आहेत. एवढेंच नव्हे तर त्यांनीं सुवासिनीपण दर्शविलें जातें. हळदीकुंकू विशेषतः देवीला वाहतात. देवांच्या धातुमूर्तींना देवीचें सान्निध्य असल्यानें त्याला तें वाहण्याची चाल पडली आहे. पण बाण, शालिग्राम यासारख्या अमूर्त देवतांना हळदीकुंकू वाहात नाहींत.

हरिद्राचूर्णसंयुक्तं कुंकुमं कामदायकं ।
वस्त्रालंकरणं सर्वं देवि त्वं प्रतिगृह्यताम् ॥

असा पूजेंतील मंत्र आहे. हळदींत सात्त्विक भाव, तर कुंकवांत विलासी भाव किंवा रजोगुण प्रतीत होतो. या दोहोंचा संयोग सुवासिनींमध्यें असेल तरच ती सुखी संसार करूं शकेल. एखाद्या सुवासिनीच्या भालप्रदेशीं भुवयांच्या मध्यावर हळद व तीवर कुंकू लागलेलें पाहून कोणाच्या मनांत तिच्याविषयीं पूज्यभाव उत्पन्न होणार नाहीं ? कोयरींतील हळदकुंकू देवांना वाहून किंवा दुसऱ्या सुवासिनीला लावून ती जेव्हां स्वतःच्या कपाळाला भक्तिभावानें लावते तेव्हां ती साक्षात् सती लक्ष्मीच शोभते. हिंदु स्त्रियांमध्येंच हें पतिव्रतेचें सौंदर्य हळदकुंकवानें उठून दिसतें. चैत्र महिन्यांतील घरोघरीं होणाऱ्या हळदीकुंकवाच्या समारंभांत महाराष्ट्र महिलांचें विलोभनीय सौभाग्य कोणाला आनंदविणार नाहीं !

• • •

REFBK 0011979

REFBK-0011979